
# MODERN

## COLLEGE MAGAZINE



PROGRESSIVE EDUCATION SOCIETY'S

# MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE POONA 5.

## Our Faculty 1976-77

## Heads of the Departments

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Prof. M. B. Lima e, Principal | M.Com | Business Administration |
| 2. | Prof. L. H. Gadgil, Vice-Principal | M.Sc., Ph.D. | Chemistry |
| 3. | Prof. B. B. Kulkarni, Vice Principal | M.A., Ph.D. | Marathi |
| 4. | Prof. S. Y. Gambhir | M.Sc. | Physics |
| 5. | Prof. P. S. Chirputkar | M.Sc. (Maths)<br>M.Sc. (Stats) | Mathematics and Statistics |
| 6. | Prof. S. Y. Paranjape | M.Sc., Ph.D. | Biology |
| 7. | Prof. S. R. Raykar | M. A. | English |
| 8. | Prof. M. S. Mahajan | M. A. | Economics |
| 9. | Prof. S. G. Datar | B.A., M.Com. | Commerce |
| 10. | Prof. (Mrs.) S. S. Vanarase | M.A. Ph.D. | Psychology |
| 11. | Prof. P. D. Apte | M.A. | Geography |
| 12. | Prof. S. N. Navalgundkar | M.A. Ph.D. | Political Science |
| 13. | Prof. M. R. Bhave | B.Com. F.C.A. | Accountancy |
| 14. | Prof. P. D. Parkhi | M.Sc. I.C.W.A. | Cost Accounting |

# १९७७

प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय
( सीनिअर व ज्यूनियर )
शिवाजीनगर, पुणे ५

॥ संपादन समिती ॥

अध्यक्ष
प्राचार्य मो. भा. लिमये,

उपाध्यक्ष
उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ
उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी

समिती-सदस्य
प्रा. श्री. दा. संगोराम,
प्रा. म. रा. मराठे,
प्रा. अ. गो. गोसावी,

विद्यार्थि-प्रतिनिधी
श्री. मुकुंद संगोराम

प्रकाशक
प्राचार्य मो. भा. लिमये,
मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५.

मुद्रक
चिं. स. लाटकर,
कल्पना मुद्रणालय, टिळक रस्ता, पुणे ३०.

ठसे
सुप्रीम प्रोसेस, टिळक रोड, पुणे ३०.

संपादक
प्रा. दत्तात्रय दिनकर पुंडे

# मॉडर्न '७७

॥ वर्ष सातवे ॥
॥ अंक सातवा ॥

## श्र द्धां ज ली

राष्ट्रपती फक्रुदिन अलि अहमद
महाराष्ट्राचे राज्यपाल अलि यावर जंग
भाऊसाहेब तथा वि. स. खांडेकर
भाऊसाहेब तथा ग. त्र्यं. माडखोलकर
प्राध्यापक रा. श्री. जोग
हिंदी साहित्यिक यशपाल
उर्दू साहित्यिक कृष्णचंद्र
सिने पार्श्वगायक मुकेश

# सं पा द की य

**सुखरूप संतोषरूप । आनंदरूप हास्यरूप । ऐक्यरूप आत्मरूप । सर्वत्रांसी ॥**
**भाग्यवंत जयवंत । रूपवंत गुणवंत । आचारवंत क्रियावंत । विचारवंत स्थिती ॥**
**यशवंत कीर्तिवंत । शक्तिवंत सामर्थ्यवंत । वीर्यवंत वरदवंत । सत्यवंत सुकृती ॥**
**विद्यावंत कळावंत । लक्ष्मीवंत लक्षणवंत । कुळवंत सुचिष्मंत । बळवंत दयाळु ॥**
**युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ । बुद्धिवंत बहुधारिष्ट । दीक्षावंत सदा संतुष्ट । निस्पृह वीतरागी ॥**
**असो ऐसे उत्तम गुण । हें सद्विद्येचे लक्षण । अभ्यासाया निरूपण । अल्पमात्र बोलिलें ॥**

**दासबोध–समर्थ रामदास**

समर्थांनी सांगितलेले ' उत्तम गुण ' उद्याचा भारतीय नागरिक असलेल्या विद्यार्थ्यात संक्रमित करण्याच्या हेतूने आणि ' सद्विद्येचे लक्षण ' टिकविण्याच्या ईर्षेने मॉडर्न महाविद्यालयाची स्थापना झालेली आहे आणि असा प्रयत्न मॉडर्न महाविद्यालय गेली सात वर्षे करीत आहे हे नव्याने सांगण्याची गरज वास्तविक पाहता नाही. तथापि ' संप्रति नव्या ' असलेल्या ह्या महाविद्यालयाने गेल्या सहा वर्षांत जे अभिनव उपक्रम केले, जे नवे पायंडे पाडले, ते सातव्या वर्षातही त्याच अभिनिवेषाने, उत्साहाने आणि शिस्तीने टिकविले आहेत. इतकेच नव्हे तर या वर्षी काही असे नवे उपक्रम केलेले आहेत की त्यांचे यापुढे येणारे शब्दरूप न्याहाळून आपण आनंदून जाल. खरे तर यांतील काही उपक्रमांचे सूतोवाच प्राचार्य लिमये यांच्या ' मॉडर्न १९७६ ' मधील ' सिंहावलोकन ७० ते ७६ ' या लेखात झालेले आहेच. पण असे उपक्रम ही आमची अभिमान-स्थाने असल्याने त्यातील एखाद्दुसऱ्या उपक्रमाची पुनरुक्ती झाली तर तो दोष होणार नाही.

**बदललेले चित्र**

देशातील १९ महिन्यांची आणीबाणी शिथिल करण्यात आली. लोकसभेच्या निवडणुकाही जाहीर झाल्या. साऱ्या देशात स्वातंत्र्याचे मोकळे वारे जोमाने वाहू लागले. मनमोकळ्या स्वातंत्र्यात व्यक्तीची, समाजाची आणि राष्ट्राची वाढ होत असते हे खरे. तथापि यामुळे शिस्तीचे महत्त्व कमी होत नाही. ' स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे ' याची जाण आम्ही ठेवली तरच मनमोकळे स्वातंत्र्य उपभोगणारे नागरिक म्हणून आमची प्रतिष्ठा वाढेल. व्यक्तीचे स्वातंत्र्य जपण्यासाठी शांतता हे आमचे ध्येय राहिले तर कोणतीच समस्या उभी राहणार नाही, हे पटावे.

**शिक्षण व केंद्र सरकार**

शिक्षण ही बाब राज्य-शासनाच्या यादीतून केंद्र-शासनाच्या यादीत गेली आहे ह्या गोष्टीचे आम्ही स्वागत करतो. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने हा बदल आम्हास योग्यच वाटतो. कारण भारतीय नागरिक जर ' एकात्म ' व्हायला हवे तर भारतभर एकधोरणी शिक्षणपद्धती असणे आवश्यक आहे हे कोणीही नाकारणार नाही. म्हणूनच या बदलाचे आपण विश्वासाने स्वागत करू या.

**सेमेस्टर पद्धतीचे आगमन**

पुणे विद्यापीठात पुढील वर्षापासून प्रथम वर्ष कला, शास्त्र आणि वाणिज्य वर्गांकरिता सेमेस्टर पद्धती लागू होत आहे. क्रमाने ती पद्धती द्वितीय व तृतीय वर्षांना लागू होईल.

अभ्यासक्रम पुरा करण्याची प्रक्रिया आणि परीक्षा-पद्धती या दोन्ही बाबतीत सेमेस्टर-पद्धतीमुळे आमूलाग्र बदल होणार. या नव्या बदलाकडे आपण केवळ शैक्षणिक दृष्टीने पाहिले पाहिजे आणि तो यशस्वी केला पाहिजे. सेमेस्टर-पद्धती म्हणजे केवळ विद्यार्थ्याला सत्रभर राबवणे असे न होता या पद्धतीच्या अवलंबामुळे विद्यार्थ्याच्या अंगी नीटस ज्ञान कमावण्याची गोडी यावी, त्याला संशोधकाचा डोळा लाभावा आणि पुढील आयुष्यात कार्यरत राहण्यासाठी हवी असणारी क्षमता त्याला लाभावी असे काही उद्दिष्ट साध्य होण्यास सेमेस्टर पद्धती उपयुक्त ठरावी अशी आमची अपेक्षा आहे. विद्यापीठाची अभ्यासमंडळे आणि तज्ज्ञ, त्या दृष्टीनेच सेमेस्टर-पद्धतीचा अभ्यासक्रम आखतील तरच या बदलाला काही महत्त्व राहील.

**उच्च माध्यमिक शिक्षण**

प्राचार्य मो. भा. लिमये यांचा उच्च माध्यमिक शिक्षणाबाबत उद्‌भवलेल्या समस्यांचा विचार करणारा एक प्रदीर्घ लेख ' मॉडर्न मानस ' या डिसेंबर १९७६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ' मध्यावधि-विशेषांका 'त समाविष्ट केलेला आहेच. येथे आम्हास येवढेच नमूद करायचे आहे की या विविध समस्यांवर मॉडर्न महाविद्यालयाने स्वतःपुरती काही उपाययोजना करून निश्चित दिशेने विधायक पावले टाकली आहेत. १२ वीच्या होतकरू विद्यार्थ्यांकरिता प्रवेश घेण्यापूर्वी मे—जून १९७६ मध्ये घेतलेले इंग्रजी व गणित विषयांचे **उजळणी-वर्ग**, कोणती विद्याशाखा निवडावी या दृष्टीने १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी/पालकांसाठी प्रवेशकाली उघडलेले खास **मार्गदर्शक केंद्र**, ज्या शाळांतून १२ वीचे विद्यार्थी आमच्या महाविद्यालयात आले त्या शाळांच्या मुख्याध्यापकांशी **उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची पाहणी** करण्यासाठी साधलेला संपर्क, शालांत मंडळाच्या स्पष्ट आदेशांची वाट न पाहता १२ वीच्या विद्यार्थ्यांचे स्वाध्याय, सहामाही परीक्षा, उपस्थिती यांबाबत घेतलेली दक्षता इत्यादी गोष्टी बोलक्या आहेत. मॉडर्न महाविद्यालयाने १२ वीच्या विद्यार्थ्यांकडे सापत्न—भावाने मुळीच पाहिले नाही; उलट कुटुंबातल्या शेंडेफळाप्रमाणे त्यांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. ज्या विश्वासाने महाराष्ट्र शासनाने बारावीचे वर्ग महाविद्यालयाकडे सुपूर्द केले त्यास आम्ही योग्य तो प्रतिसाद दिलेला आहे.

**हार्दिक अभिनंदन**

मॉडर्न हायस्कूलचे मुख्याध्यापक आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री. वि. शं. गोखले यांना महाराष्ट्र शासनाने यंदा प्रजासत्ताक दिनी राज्य-पुरस्कार दिला आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या सेवेचा गौरव केला. या घटनेने आम्हास अतिशय आनंद झालेला आहे. प्राचार्यांतर्फे आणि महाविद्यालयातर्फे आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.

आमच्या महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून काम करीत असताना प्रा. राजीव पतके यांची ' ऱ्होड्स स्कॉलर ' म्हणून निवड झाली. अतिदुर्मिळ असा हा बहुमान मिळविल्याबद्दल प्रा. पतके यांचे हार्दिक अभिनंदन

आमच्या महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांनी उच्च माध्यमिक स्तरापासून विद्यापीठ स्तरापर्यंत उपयुक्त ठरलेल्या विविध ग्रंथांचे लेखन केले आहे. ग्रंथलेखन आणि ग्रंथ यांची नामावली केवळ विस्तारभयास्तव न देता आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

**उज्ज्वल यश**

विद्यापीठ पातळीवर प्रतिवर्षी किमान दोन विद्यार्थ्यांनी अलौकिक असे यश संपादन करावयाचे ही जणु आता ' मॉडर्न-परंपरा 'च झाली आहे. मार्च—एप्रिल १९७६ मध्ये झालेल्या पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत आमच्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. राका आयना हिने पुणे विद्यापीठात प्रथम श्रेणीत चौथा क्रमांक मिळविला. त्याचप्रमाणे १९७६ च्या एफ् वाय् बी. एस्सी/प्री. प्रोफेशनल परीक्षेत आमचा विद्यार्थी श्री. विनयकुमार न्यायाधीश हा गणित विषयात

पुणे विद्यापीठात प्रथम श्रेणीत सर्वप्रथम आला आणि रँग्लर परांजपे पारितोषिकाचा मानकरी ठरला. कु. आयना आणि श्री. न्यायाधीश यांचे अभिनंदन.

**क्रीडा-क्षेत्र**

केवळ विद्यापीठीय स्तरावर यश मिळवण्यात समाधान न मानता महाविद्यालयाने क्रीडा क्षेत्रातही नेत्रदीपक आणि अभूतपूर्व यश संपादिले आहे. आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल (महिला) स्पर्धेत मॉडर्नचा संघ लागोपाठ तिसऱ्यांदा विजयी ठरला आणि त्याने हॅटट्रिक साधली. आंतर-महाविद्यालयीन बॉल बॅडमिंग्टन (महिला) स्पर्धेतही आमचाच संघ विजयी झाला. आमच्या अनेक विद्यार्थ्यांनी वैयक्तिक स्पर्धेत प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक मिळविला आहे. अशा रीतीने सांघिक आणि वैयक्तिक क्रीडा-स्पर्धेत विशेष उल्लेखनीय यश मिळविण्याची परंपरा आम्ही यंदाही राखली याचा आम्हास सार्थ अभिमान वाटतो.

**सांस्कृतिक क्षेत्र**

यंदा नंदूरबार येथे झालेल्या पुणे विद्यापीठ युवक महोत्सवात आमच्या महाविद्यालयाने सादर केलेली 'प्रतिज्ञा' ही एकांकिका प्रथम पारितोषिक विजेती ठरली. दलितांच्या प्रश्नाला हात घालणाऱ्या या एकांकिकेची इतकी प्रसिद्धी झाली की पुण्यात आम्हाला तिचे अनेक प्रयोग सादर करावे लागले.

बी. जे. मेडिकल महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केल्या गेलेल्या आंतरमहाविद्यालयीन कथा-कथन स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाने पहिला क्रमांक मिळविला आणि त्याकरिता असलेले 'मुश्रुत' ह्या मानचिन्हाचे आम्ही मानकरी ठरलो. श्रीरामपूर येथील आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत आम्हीच प्रथम क्रमांकाकरिता असलेली ढाल मिळविली. इतरत्रही आम्ही या ना त्या तऱ्हेचे यश प्राप्त केलेले आहेच. विविध वादविवाद स्पर्धेत उतरलेल्या आमच्या सर्व विद्यार्थ्यांचे तोंड भरून कौतुक करण्याचे प्रसंग आमच्यावर यंदा वारंवार आले.

महाविद्यालयातल्या अनेक भित्तिपत्रकांनी आमचे काचफलक सुशोभित असतात. मॉम, कॉम व सायन्स न्यूज या भित्तिपत्रकांच्या रांगेत यंदा ॐ हे नवे भावंड येऊन बसले आहे. या सर्वच हस्तलिखितांचे पुण्यातल्या आणि क्वचित मुंबईतल्या वृत्तपत्रांनी खूप कौतुक केले आहे. 'मॉम'चा दिवाळी अंक तर टी. व्ही' च्या कार्यक्रमात वर्दी लावून आला.

**प्रश्नपेढी**

पुणे विद्यापीठ आणि विद्यापीठीय कक्षेतील सर्व महाविद्यालयांचे लक्ष वेधून घेणारा आमचा यंदाचा कळस-उपक्रम म्हणजे प्रश्नपेढी. परीक्षा-पद्धतीतील सुधारणांचा विचार करताना विद्यापीठ अनुदान आयोगाने भारतातील सर्व विद्यापीठांना प्रश्नपेढीच्या योजनेबाबत विचार करण्यास सुचविले होते. दोन-तीन विद्यापीठांनीच काय ती विद्यापीठ अनुदान मंडळाच्या या महत्त्वपूर्ण सूचनेच्या बाबतीत काही कृती केल्याचे दिसते. तथापि आमच्या महाविद्यालयाने या गोष्टीत विशेष लक्ष घालून प्रथम वर्ष कला, शास्त्र व वाणिज्य वर्गापासून तृतीय वर्ष कला, शास्त्र व वाणिज्य वर्गापर्यंत सर्व वर्गाच्या सर्व विषयांचे मिळून ४८ प्रश्नसंच तयार केले. या प्रत्येक संचात त्या त्या विषयाच्या समग्र अभ्यासक्रमावर आधारित अशा सर्व प्रश्नांचे संकलन आहे. आमच्या महाविद्यालयातील संबंधित वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित विषयांचे संच विनामूल्य देण्यात आले. ज्या महाविद्यालयांनी आमच्याकडे प्रश्नसंचाची छपाईपूर्व मागणी नोंदविली होती त्यांना ते अल्प किमतीत पुरविण्यात आले.

जाने-फेब्रु. १९७७ मध्ये झालेल्या सर्व वर्गाच्या पूर्वपरीक्षा या प्रश्नपेढीच्या आधारे घेण्यात आम्ही यशस्वी झालेलो आहोत. विद्यापीठीय पातळीवरचे हे प्रचंड काम एका महाविद्यालयाने आत्मविश्वासाने केले आहे. सर्व प्राध्यापकांचे उत्साहपूर्ण सहकार्य, प्रा. स. य. गंभीर यांचे कुशल संयोजन, उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी यांचे सूक्ष्म-मुद्रणकला-ज्ञान, उपप्राचार्य

गाडगीळ यांचे व्यवस्थापन आणि प्राचार्य लिमये यांचे समर्थ मार्गदर्शन यामुळेच प्रश्नपेटीचा हा गोवर्धन पर्वत उचलणे महाविद्यालयास शक्य झाले आहे. सर्वांना धन्यवाद.

**आमचे माजी विद्यार्थी**

माजी विद्यार्थ्यांची पहिली तुकडी बाहेर पडल्याच्या वर्षापासून त्यांच्याशी महाविद्यालयाने सातत्याने संपर्क ठेवलेला आहे; त्यांच्या अडीअडचणींचा विचारही केलेला आहे. प्रतिवर्षा-प्रमाणे यंदाही २६ जानेवारी ७७ रोजी सायंकाळी माजी विद्यार्थ्यांचा मेळावा भरलेला होता आणि त्यास १३० विद्यार्थी हजर होते.

मॉडर्नचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात सुयश, अत्युच्च यश प्राप्त करीत आहेत हे चित्र पाहून आम्ही भारावून जातो. आमची विद्यार्थिनी सौ. हेमा लेले हिने १९७६ च्या पुणे विद्यापीठ एम्. ए. (मराठी) परीक्षेत सर्व पारितोषिके, प्रथम श्रेणी व प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याच परीक्षेत आमची दुसरी विद्यार्थिनी कु. मंगला जाधव हिने 'अलंकारशास्त्र' या विषयात प्रथम क्रमांक व पारितोषिक मिळविले. अशा रीतीने १९७६ च्या पुणे विद्यापीठ एम्. ए. (मराठी) परीक्षेकरिता असलेली सर्वच्या सर्व पारितोषिके मॉडर्नच्या या दोन गार्गी-मैत्रेयींनी मिळविली. त्याचप्रमाणे १९७६ च्या एम्. कॉम् परीक्षेत आमचा माजी विद्यार्थी श्री. रवींद्र गुर्जर याने विद्यापीठात प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांक व पारितोषिके प्राप्त केली. त्याच्याच जोडीला आमचा दुसरा विद्यार्थी श्री. श्याम वात्र हा त्याच परीक्षेत विद्यापीठात दुसरा आला. श्री. वात्र याची अहमदाबाद येथील 'बिझिनेस मॅनेजमेंट अभ्यासक्रमा'साठी निवडही झालेली आहे. या गुणी विद्यार्थ्यांच्याच रांगेत बसणारी आमची आणखी एक माजी विद्यार्थिनी म्हणजे कु. यशोधरा भालेराव. कु. भालेरावला पुण्याचा एम्. बी. ए. अभ्यासक्रम पुरा करण्याची संधी मिळालेली आहे. यंदा पुणे विद्यापीठात 'मिस युनिव्हर्सिटी' म्हणूनही भालेराव निवडली गेली आहे. अशी ही आमच्या माजी विद्यार्थ्यांची महाविद्यालयाबाहेरील यशपरंपरा. या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन !

मॉडर्नचे अनेक माजी विद्यार्थी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही अनेक कार्यालयांत सन्मान्य पदावर आहेत, तर काहींनी स्वतःचे छोटेमोठे असे स्वतंत्र व्यवसाय सुरू केलेले आहेत. आमचा एक परदेशी विद्यार्थी मॉरिशसमध्ये आपल्या जीवनात स्थिर झालेला आहे. महाविद्यालयाने त्यांच्यासाठी जे काही अल्पस्वल्प केले, त्याचे हे सुफल पाहताना आम्हास सानंद अभिमान वाटतो.

**कार्यक्रमांचे वैपुल्यः**

विद्यार्थ्यांस केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्याचा सर्वांगीण विकास व्हावा, त्याच्या अंगी सभाधीटपणा यावा, त्यांची विचारक्षमता आणि कार्यक्षमता वर्धिष्णु व्हावी ह्या विविध हेतूंनी महाविद्यालय प्रतिवर्षी विविध उपक्रम आयोजित करते. या उपक्रमात विविधतेबरोबर अभिनवताही असते. यंदा तर आम्ही अशा उपक्रमात विविधता आणि अभिनवता यांचा जणु उच्चांकच गाठला आहे. प्रत्येक विभागाने द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी विषयवार 'One Day Seminars' आयोजित केली होतीच. ह्याशिवाय इतर प्रकारची चर्चासत्रे आणि शिबिरे झाली. त्यांपैकी काहींचा उल्लेख आवश्यक वाटतो.

**संदर्भ ग्रंथ कृतिसत्र** : महाविद्यालयाच्या हिंदी विभागाने आयोजित केलेल्या या सत्रात विद्यार्थ्यांना शब्दकोश, परिभाषा कोश, महा–कोश (Encyclopaedia), संस्कृति–कोश, इ. कसे पाहावेत, संदर्भ कसे गोळा करावेत, याची मूलभूत व सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना ज्ञानसन्मुख करण्याच्या या कृतिसत्राचे उद्घाटन प्राचार्यांनी केले होते. दोन दिवस चाललेल्या या सत्रात ४० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

**वाङ्मयीन समीक्षा शिबिर :** मराठी समीक्षेतील नाना प्रश्नांची उद्‌बोधक चर्चा करून मराठी समीक्षेच्या काही सैद्धान्तिकदृष्ट्या विचार करण्याचा प्रयत्न करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या मराठी विभागाने विद्यापीठ अनुदान मंडळाच्या योजनेनुसार २५ डिसेंबर १९७६ ते ३१ डिसेंबर १९७६ या कालावधीत एक समीक्षा शिबिर आयोजित केले होते. या शिबिरास पुण्यातले आणि पुण्याबाहेरीलही नामवंत समीक्षक, लेखक, कलावंत सातत्याने उपस्थित होते. सात दिवस रोज सकाळ दुपार तीनतीन चारचार तास समीक्षेतील विविध विषयांवरील चर्चासत्रे समाविष्ट असणारे हे पहिलेच मराठी वाङ्मय समीक्षा शिबिर होय. या शिबिराला अपूर्व यश मिळाले ते शिबिर संचालक डॉ. भीमराव कुलकर्णी यांच्या निरंतर परिश्रमामुळेच. या शिबिराची सर्व मराठी वृत्तपत्रांनी, साप्ताहिकांनी आणि काही नियतकालिकांनी दखल घेऊन शिबिराच्या यशस्वितेबद्दल स्तुतिसुमनांचा वर्षाव केलेला आहे. ह्या समीक्षा शिबिरामुळे मराठी समीक्षा क्षेत्र गतिशील झाले आहे एवढे किमान श्रेय आम्ही निश्चितच घेऊ शकतो. शिबिर संचालक डॉ. कुलकर्णींचे अभिनंदन !'

**व्यवसाय मार्गदर्शन शिबिर :** विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त करण्यास मदत करायची एवढ्याच मर्यादित, संकुचित अर्थाने ' शिक्षण ' या शब्दाचे वर्णन होणार. नाही. त्याला मिळणारे शिक्षण हे त्याची स्वतःची पात्रता, जबाबदारी, कुवत ओळखता येण्यास उपकारक असले पाहिजे. जीवनाच्या विशाल महाविद्यालयात त्याला स्वतःच्या आवडीचा व्यवसाय स्वीकारून विहार करता आला पाहिजे. या हेतून महाविद्यालय प्रतिवर्षी व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करते. यंदाही असे शिबिर कला, शास्त्र आणि वाणिज्य विद्याशाखांच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित केले होते. त्याची माहिती याच अंकात अन्यत्र आलेली आहेच.

**नाट्य-प्रशिक्षण शिबिर :** काही कलागुण हे उपजत असावे लागतात हे खरे. पण अंगी असलेल्या अशा गुणांची व्यवस्थित वाढ करणे आणि त्यांच्या ' सु-दर्शना 'करिता वेगवेगळी क्षेत्रे शोधीत राहणे हे शेवटी व्यक्तीला स्वतःलाच करीत राहावे लागते. नाट्य ही अशीच कला आहे. गेल्या वर्षाप्रमाणेच यंदाही निरंतर शिक्षण योजनेनुसार आमच्या महाविद्यालयाच्या विद्यमाने एक नाट्यशिबिर फेब्रुवारी १९७७ च्या पहिल्या आठवड्यात भरविण्यात आले होते. प्रा. वि. भा. देशपांडे यांनी आयोजित केलेल्या या शिबिराचे सूत्रचालन अनुया पालेकरांनी केले होते. पुण्यात दुसऱ्यांदा आमच्याच महाविद्यालयाने अशा तऱ्हेचे शिबिर भरविलेले आहे.

**पालक मेळावे**

पुण्यासारख्या औद्योगिक शहरातला पालक त्याच्या सतत कार्यमग्न जीवनक्रमामुळे आपल्या पाल्याच्या—विशेषतः उच्च शिक्षण घेणाऱ्या पाल्याच्या—शिक्षणाकडे वेळेअभावी पाहिजे तेवढे लक्ष देऊ शकत नाही. तथापि याचा अर्थ तो त्याबद्दल उदासीन असतो असा नव्हे. अशा पालकांना उद्युक्त करून आजच्या शिक्षण प्रक्रियेत त्यांना सहभागी करण्याच्या दृष्टीने पालक-मेळावे घेणे आम्हांस अत्यावश्यक बाब वाटते. गेल्या वर्षी आम्ही असे मेळावे घेतले होते. यंदाही आम्ही महाविद्यालयाचा निरोप घेणाऱ्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा आणि महाविद्यालयच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा असे दोन पालक मेळावे घेत आहोत.

**मॉडर्न मित्र मंडळ**

आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी या महाविद्यालयात आरंभापासून चाललेल्या प्रयत्नांना मूर्त रूप यावे म्हणून मॉडर्न मित्र मंडळाची स्थापना झाली. ' मी आणि जात ' या विषयावरील आत्मचरित्रात्मक निबंध हा मंडळाचा या वर्षीचा एक लक्षणीय उपक्रम. या निबंधातील चार निबंध या अंकात समाविष्ट आहेत. यंदा मंडळाला

मार्गदर्शन करण्याकरिता प्रा. गंगाधर पानतावणे यांना खास पाचारण करण्यात आले होते.

**स्वागत**

या वर्षी महाविद्यालयात सौ. शैलजा नवाथे, सौ. सुधा शालिग्राम, कु. ज्योत्स्ना कंदीकर, सौ. हेमा लेले, सौ. उषा अकोलकर, सौ. वनमाला मनोहर, सौ. शुभदा पुजारी, सौ. आशा धडफळे, सर्वश्री जगदीश चिंचोरे, सुधाकर न्हाळदे, प्रकाश मुथा, विलास जोशी, श्रीरंग जोगळेकर व विनोदकुमार छाब्रा यांची विविध विभागांत विविध स्तरांवर नियुक्ती झाली. आम्ही त्यांचे मनःपूर्वक स्वागत करतो.

**निरोप व शुभेच्छा**

सर्वश्री राजीव पतके, गजानन नळोले, विनय हर्डीकर व बाळकृष्ण वाणी ह्या व्यक्ती अधिक चांगली संधी मिळून इतरत्र गेल्या. त्यांना आमच्या शुभेच्छा.

**७६ च्या नियतकालिकास रसिकमान्यता**

महाविद्यालयाने आपले पहिले पंचवर्षक यशस्वीतेने आणि विविध स्तरांवर गौरव संपादन करीत पूर्ण केले. या निमित्ताने ' मॉडर्न १९७६ 'चा महोत्सवी अंक आम्ही गेल्या वर्षी सादर केला. त्या अंकाचे स्वागत शिक्षणक्षेत्रात तर झालेच पण वाङ्मयक्षेत्रात आणि विचारवंतांच्या वर्तुळातही झाले. गेल्या अंकातील ' दलितांच्या समस्या: एक परिसंवाद ' आणि ' ॲन्तिगॉन ' हे लेख ' माणूस ' साप्ताहिकाने पुनर्मुद्रित केले; तर ' शोध ' ही कथा ' तरुण भारत 'ने ( रविवार आवृत्ती ) पुनर्मुद्रित केली. अशा रीतीने आमच्या नियतकालिकातील वैचारिक, समीक्षात्मक आणि साहित्यिक भाग रसिकांच्या परीक्षेस उतरला.

**पुणे आंतरमहाविद्यालयीन युवक साहित्य संमेलन ( पहिले )**

नियतकालिक विभागाने क्रीडासंघटनेच्या ( मॉम–विभाग ) साहाय्याने पुण्यातील विविध महाविद्यालयांतील युवक साहित्यिकांचे पहिले साहित्य संमेलन १७, १८, १९ डिसेंबर १९७६ या कालावधीत भरविले आणि प्रतिभा नुकतीच अंकुरत आहे अशा अनेक युवक साहित्यिकांना एक ' स्व-तंत्र ' व्यासपीठ उपलब्ध करून दिले. या युवक साहित्य संमेलनाचे वार्तापत्र वाचून कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोलकर स्वतः होऊन जातीने संमेलनाच्या ' एकांकिका वाचन व चर्चा ' या कार्यक्रमास संपूर्ण वेळ उपस्थित राहिले. संमेलनाच्या यशस्वितेची आणखी कोणती वेगळी पावती हवी ?

**प्रस्तुत अंक**

हा अंक सर्व महाविद्यालयाचा आहे. बारावीपासून तृतीय वर्षापर्यंतच्या सर्व घडामोडींची, संघटनांची प्रतिबिंबे यात पहावयास मिळतील.

**कृतज्ञता**

नियतकालिक आणि तेही प्रगतिपथावरील महाविद्यालयाचे नियतकालिक संपादित करणे, प्रकाशित करणे, ही तशी अवघडच गोष्ट. पण संपादन समितीचे अध्यक्ष प्राचार्य मो. भा. लिमये यांनी प्रत्येक गोष्टीत जातीने मार्गदर्शन केले. उपप्राचार्य कुलकर्णी यांनी मुद्रणप्रत तयार करण्यापासून कागद उपलब्ध करून देण्यापर्यंतची उस्तवारी केली. उपप्राचार्य गाडगीळ, जिमखाना कार्याध्यक्ष आपटे यांच्या प्रेरणा आणि प्रा. गंभीर यांच्या बहुमोल सूचना यांचा आम्हास सतत लाभ झाला. समितिसदस्य प्रा. संगोराम, प्रा. गोसावी आणि प्राध्यापक मराठे यांनी कामाचा भार उचलला. इतर प्राध्यापकांनी विविध छोटी मोठी कामे सुकर व गतिमान केली. कार्यालय अधीक्षक श्री. देशपांडे, ग्रंथपाल श्री. बापट आणि इतर सेवक वर्ग यांनी महत्त्वपूर्ण तपशील तत्परतेने सादर केला.

कल्पना मुद्रणालयाचे श्री. चिं. स. लाटकर आणि ब्लॉकमेकर श्री. खाडिलकर यांनी अल्पमुदतीत छपाई व ठसे यांचे कार्य उरकले.

या साऱ्यांचे आणि अंक सिद्ध करताना साहाय्यभूत झालेल्या सर्वांचे आम्ही कृतज्ञ आहोत.

**मुकुंद संगोराम**
विद्यार्थी–प्रतिनिधी

**दत्तात्रय दिनकर पुंडे**
संपादक

# “ मॉडर्न : धाकटी पाती ” याने “ ज्यूनियर कॉलेज ”

**धाकटी पाती !**

पूर्वी काही संस्थानांची ‘थोरली पाती’ आणि ‘धाकटी पाती’ अशी विभागणी असे. यंदापासून महाविद्यालयाचीही ‘सीनियर कॉलेज’ व ‘ज्यूनियर कॉलेज’ अशी विभागणी झाली आहे. हे ज्यूनियर कॉलेज शासनाच्या उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संबंधित आहे आणि ‘सीनियर कॉलेज’ हे पुणे विद्यापीठाशी संबंधित आहे. त्यामुळे यापुढे महाविद्यालयीन कामकाज, अभ्यासक्रम व शिक्षणपद्धती यांवर उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ व विद्यापीठ असे दुहेरी नियंत्रण राहणार आहे. दोहोंसाठी वेगवेगळ्या अनुदानसंहिता व कार्यपद्धती राबराव्या लागत असल्याने संस्थानांच्या धाकट्या व थोरल्या पातींप्रमाणेच आमची अवस्था झाली आहे ! अर्थातच महाविद्यालयाची ‘धाकटी पाती’ नवजात असली तरी वर्षभरातच महाविद्यालयाच्या आवारात पहिल्या दिवसापासूनच आत्मविश्वासाने ती नाचू-बागडू लागली आहे आणि नव्या नवाळीच्या कौतुकाने तिने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

**अनैसर्गिक विभागणी !**

उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ व विद्यापीठ या दोहोंच्या अधिपत्यामुळे महाविद्यालयांच्या दैनंदिन कामकाजात अनेक पातळींवरून नाना प्रकारच्या प्रश्नांना यंदा तोंड द्यावे लागले. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे घटक म्हणून अकरावी, बारावी यांचे वर्ग सलगपणे, संघटितपणे चालविणे आवश्यक असले तरी शासकीय धोरणामुळे अकरावी शाळांकडे व बारावी महाविद्यालयांकडे अशी काहीशी चमत्कारिक विभागणी झाली आहे. अर्थातच हाही संक्रमणावस्थेचाच परिपाक आहे. परंतु या विभागणीची नैसर्गिकता लक्षात घेऊन शक्य तितक्या लवकर त्या दोन्ही वर्गांचा मिळून सलग घटक महाविद्यालयातून निर्माण होईल अशी अपेक्षा आहे. बारावीसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची सर्वांगीण पाहणी केल्यानंतर आणखी एक महत्त्वाची गोष्ट आमच्या निदर्शनास आली. ११वीला घेतलेले विषयच १२ वीला घेतले पाहिजेत, परंतु तसे नसेल तर १२ वीचा पुढच्या टप्प्याचा अभ्यासक्रम लंगडा राहणार ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. परंतु होते काय, शाळा आपापल्या सोयी सवलतीप्रमाणे व मगदुराप्रमाणे

विद्यार्थ्यांसमोर काही विषय ठेवतात. त्यामुळे शाळांमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विषयांच्या निवडी मनःपूतच रहातात. ते सारेच विषय १२ वीसाठी महाविद्यालयात शिकविण्याची सोय करणे शक्य होणार नाही. ही अडचण लक्षात घेऊन शासनाने यंदाच्या वर्षी १२ वी ला वाटेल ते विषय निवडण्याची सवलत दिली. इतकेच नव्हे, तर साहित्य व वाणिज्य या विषयांत परस्पर शाखा बदलांनाही मान्यता दिली. ही सवलत यापुढे विचारपूर्वक दिली जावी असे आम्हांला वाटते.

**शाळा-महाविद्यालय : देवाणघेवाण**

याच दृष्टिकोणातून आम्ही आमच्या महाविद्यालयात आलेल्या विद्यार्थ्यांची पहाणी करून हे विद्यार्थी ज्या ज्या शाळांतून आले, त्या सर्व शाळांशी संपर्क साधला. त्यांनी त्यांच्या शाळांतून काही ठराविक विषयांचे गट पाडून, तेवढ्याच विषयांची सोय करणे महत्त्वाचे का आहे हे त्यांना सांगितले. त्यांच्या शाळांतील ११वीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्याने देण्यासाठी आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी स्वेच्छेने काही तास घेण्याची तयारी दर्शवली. काही शाळांनी या बाबत उत्तम प्रतिसाद दिला; काहींनी अंशतः दिला. परंतु काही शाळा तटस्थ राहिल्या. एकंदरीत या उपक्रमातून परस्पर सामंजस्याचे, वातावरण निर्माण होण्यास मदत झाली हे निःसंशय. आमच्या काही प्राध्यापकांनी वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या मदतीने संबंधित शाळा व ११ वीचे विद्यार्थी यांची अधिक सूक्ष्म पहाणी करण्याचे कार्य हाती घेतले आहे. त्याचे निष्कर्ष पुढील वर्षी आम्हांला निश्चितच उपकारक ठरतील असा विश्वास आहे.

**संक्रमणावस्था**

महाविद्यालयांकडे ज्यूनियर कॉलेजच्या १२ वीचे वर्ग यंदा सुपूर्द करण्यात आले. पहिलेच वर्ष आणि एकंदर कार्यक्रमाबद्दलची संदिग्धता व अनिश्चितता यामुळे यंदाच्या वर्षी अगदी प्रवेशाच्या दिवसापासूनच आमच्या महाविद्यालयाला अत्यंत दक्ष व जागरूक राहावे लागले. अकरावीच्या वर्गातच साहित्य-शास्त्र-वाणिज्य अशा अभ्यासक्रमांत विद्यार्थ्यांची विभागणी झाली असली तरी वेगवेगळ्या शाळांतून वेगवेगळ्या प्रकारच्या अभ्यासविषयांचे गट विद्यार्थ्यांनी निवडले होते. त्यामुळे विद्यालयात काही ठराविक विषयांच्या गटांत या सर्व विद्यार्थ्यांच्या समावेश करणे भाग होते. सुरुवातीला विषयबदलांना व शाखाबदलांना शासनाची मान्यता मिळेल की नाही, याबद्दल साशंक वातावरण होते. प्रवेशाचे काम पूर्ण होत आल्या-नंतर अशी मान्यता मिळाल्याचे जाहीर झाले व अगोदरच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागले. त्या सर्व अडचणी सोडवून महाविद्यालय सुरळीत चालू झाले. परंतु त्यापूर्वी अकरावीच्या परीक्षा शाळांनीच घेतल्यामुळे अकरावीचा साऱ्या विषयांचा अभ्यासक्रम संबधित शाळांनी संपूर्णपणे पुरा केला नसल्याचे लक्षात घेऊन सुटीतच या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी गणित व इंग्रजीचे विशेष वर्ग घेऊन विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यात आला. अभ्यासक्रमांना व्यवस्थित रूप देण्यासाठी आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी पुण्यातील इतर महाविद्यालयांशी विचारविनिमय करून त्या अनुरोधाने शासनाकडे प्रतिनिधित्व करून आपापल्या विषयांसंबंधीच्या अडचणीचे, त्रुटितांचे, संदिग्धतेचे शासनाकडून स्पष्टीकरण करून घेतले. आमच्या महाविद्यालयाने पुढाकार घेऊन याबाबतीत केलेल्या कार्याचे आमच्या सहाध्यापकांकडून कौतुक करण्यात आले. आमच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी शासनाशी सातत्याने संपर्क साधून अनेक प्रकारच्या अडचणींचा पाठपुरावा केला. शासकीय अधिकाऱ्यांनीही ही संक्रमणावस्था आहे, हे ध्यानी घेऊन वेळोवेळी मार्गदर्शन करून सातत्याने सहकार्य केले. आमचे महाविद्यालय या बाबतीत त्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

**महाविद्यालयाची आर्थिक दृष्ट्या विकट परिस्थिती :**

कनिष्ठ महाविद्यालयामुळे आम्हा महाविद्यालयांच्या अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम आणि भावी काळातील शासकीय मदत या संबंधाने निष्पन्न झालेल्या बऱ्याच प्रश्नाची चर्चा आम्ही वेळोवेळी शासकीय अधिकाऱ्यांशी केली. परंतु अद्यापही समाधानकारक रीतीने या प्रश्नांची तड लावली गेली नाही. शाळांमधे ११वीसाठी येणारा खर्च व १२वीसाठी महाविद्यालयात लागणारा खर्च यात खूपच तफावत आहे. तसेच शाळांना मिळणारे जवळजवळ ९७ टक्के अनुदान व महाविद्यालयांना तुटीवर (खर्चावर नव्हे) मिळणारे ३३टक्के ते ५०टक्के अनुदान यामुळे १२वीचे वर्ग चालविणाऱ्या महाविद्यालयांना आर्थिक चिंता अत्यंत भेडसावीत आहे.

यंदा १२ वीचे वर्ग चालू झाले आहेत, आता शासनाने या आर्थिक प्रश्नाबाबत सहानुभूतीने विचार करून महाविद्यालयांचे अनुदानसंहितेत लवकरात लवकर बदल करणे इष्ट व आवश्यक आहे. ॲडहॉक (Ad hoc) पद्धतीने शासनाने काही मदत देऊ केली आहे. परंतु, अशा मदतीच्या बाबतीत अनिश्चितता व अनियमितपणा असतो. त्यामुळे महाविद्यालयांना आपले अंदाजपत्रक व नियोजन करताना अनेक अडचणी येतात.

**शासनास आग्रहाची विनंती**

१२वीचा अभ्यासक्रम जर महाविद्यालयांच्याकडेच राहावयाचा असेल व तो व्यवस्थित कार्यवाहीत यावयाचा असेल तर स्वाध्याय, गृहपाठ वगैरेसाठी छोट्या मोठ्या वर्गांची महाविद्यालयांना गरज लागणार आहे. तसेच प्रयोग शाळांमधे प्रयोगांच्या उपकरण व साधन सामग्रीवर खर्च करावा लागणार आहे. यासाठीही शासनाने वेळीच निर्णय घेऊन मदतीचा हात पुढे केला पाहिजे.

**साहित्य-शाखे-बद्दलची चिंता**

'ज्यूनियर कॉलेज'साठी शासनाने वाणिज्य-विभागासाठी पाच वर्ग, शास्त्र विभागासाठी चार वर्ग व साहित्य-विभागासाठी फक्त एकच वर्ग उघडण्यास संमती दिली होती. त्याप्रमाणे हे दहाही वर्ग भरण्यास आमच्या महाविद्यालयात फार वेळ लागला नाही. वाणिज्य व साहित्य विभागांकडे आणखी काही वर्ग उघडण्यास संमती मिळाली असती तरी चालले असते! परंतु शासनाच्या नियंत्रणामुळे ते शक्य नव्हते. मात्र साहित्य–विभागासाठी सुमारे १०० विद्यार्थ्यांची एकच तुकडी असल्याने महाविद्यालयाची साहित्य–शाखा तुलनेने रोडावलेली राहणार हे स्पष्ट झाले आहे. ही मोठी चिंताजनक बाब आहे. महाराष्ट्रातील सुविद्य शासन व जनता यापुढे याबाबतीत कोणते धोरण स्वीकारणार आहे, यावरती या विभागाचे भवितव्य अवलंबून राहाणार आहे!

**नवागतांचे स्वागत**

ज्यूनियर कॉलेजच्या वाणिज्य विभागाकडे ४२० विद्यार्थी, शास्त्र विभागाकडे २८७ विद्यार्थी व साहित्य शाखेकडे ९५ विद्यार्थी अशी या विभागाची एकूण विद्यार्थिसंख्या ८०२ आहे. विषयवारीने ही विभागणी खालीलप्रमाणे आहे :

इंग्रजी (उच्च) १८, मराठी (उच्च) ७६४, गुजराती (उच्च) ५, इंग्लिश (कनिष्ठ) ७८४, हिंदी (कनिष्ठ) २३, भूगोल ८१, गणित व संख्याशास्त्र ३१८, राज्यशास्त्र ८६, समाजशास्त्र ४८, मानसशास्त्र ३६, अर्थशास्त्र (इंग्रजी माध्यम,) २४० मराठी माध्यम १८१, पुस्तपालन, ४२१, वाणिज्य संघटना ४२१, चिटणिशी कार्यपद्धती १९८ (इंग्रजी) १५६ (मराठी), इतिहास ६०, पदार्थविज्ञान २८७, रसायन २८७, जीवशास्त्र २१९, यंत्रविज्ञान ६८.

**ज्येष्ठ प्राध्यापकांचा स्वेच्छा-सहभाग :**

वास्तविक या विद्यार्थ्यांसाठी जे नवे शिक्षक नियुक्त करण्यात आले आहेत, त्यांच्या हवाली या विद्यार्थ्यांना करण्यात यावयाचे! बहुतेक महाविद्यालयांनी हेच धोरण स्वीकारलेले. परंतु नव्याने नियुक्त केलेले बहुतेक शिक्षक अगदी नव्यानेच विद्यापीठीय परीक्षा संपवून या रिंगणात आलेले. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने त्यांच्याबरोबरच आमच्या महाविद्यालयातील

ज्येष्ठ व नाणावलेल्या प्राध्यापकांनी स्वेच्छेने या वर्गासाठी काही तास मागवून घेतले. त्यामुळे या वर्गांना जवळजवळ आमच्या महाविद्यालयातील सारेच (ज्येष्ठ व नवोदित) शिक्षक शिकवीत आहेत. विद्यार्थ्यांचे या दृष्टीने मोटेच भाग्य होय. आमच्या या प्रथेचे अनुकरण कालांतराने अनेक महाविद्यालयांनी केले आहे, हे नमूद करण्यास विशेष अभिमान वाटतो.

**आम्ही सारे एकच एक !**

ज्येष्ठ प्राध्यापकांचा सहभाग हे जसे या महाविद्यालयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य तसेच या धाकट्या पातींना महाविद्यालयाच्या साऱ्याच वातावरणात थोरल्या पातीबरोबर अगदी 'एकच एक घटक' या नात्याने एकसारख्या संधी, सवलती देण्यात आल्या. क्रीडास्पर्धा, स्नेहसंमेलन सांस्कृतिक कार्यक्रम आणि साऱ्याच तत्सम महाविद्यालयीन उपक्रमात ज्यूनियर महाविद्यालयाचे विद्यार्थी अगदी समरस होऊन गेले. त्यामुळे पुढच्या वर्षी ज्येष्ठ महाविद्यालयाचे घटक म्हणून जरी त्यांना वावरावे लागणार असले, तरी यंदाच्या वर्षी आपण कोणी कनिष्ठ महाविद्यालयाचे आहोत, हे त्यांना जाणवलेच नाही. ज्येष्ठ विद्यार्थ्यांनाही त्यांच्यात वावरताना वासरात शिंगे मोडून शिरत असल्यासारखे वाटले नाही.

**स्वाध्याय–गृहपाठ–चाचणी**

मॉडर्न महाविद्यालय हे 'शिस्त व नवे उपक्रम' यांसाठी विशेष प्रसिद्ध आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांना त्याचा पहिल्याच वर्षी पुरेपूर प्रत्यय आला. शिस्तबद्ध व नियोजनपूर्व अभ्यासक्रमाची आखणी, शारीरिक शिक्षणाचे वर्ग, गृहपाठ व स्वाध्याय यावर विशेष भर व महाविद्यालयीन सत्रात परीक्षेबरोबरच चाचणी परीक्षांची योजना, यांमुळे 'मॉडर्न'चा विद्यार्थी म्हणून हे विद्यार्थी तात्काळ ओळखू येतील. त्यांच्यासाठी वर्गशिक्षकांची 'मार्गदर्शक' म्हणून योजना केल्यामुळे त्यांच्या नाना प्रकारच्या प्रश्नाची योग्य ती जाणीव होऊन त्यांच्या अडी अडचणी शक्य तितक्या प्रमाणात दूर होण्यास मदत झाली.

यंदाच्या एकूण अनुभवाच्या आधारे पुढील वर्षी १२ वीच्या विद्यार्थ्यांना आम्ही यापेक्षाही अधिक सोयी व सवलती देऊ शकू असा विश्वास वाटतो.

ज्यूनियर कॉलेजसंबंधीचे सर्व नियम लक्षात घेऊन पुढील वर्षापासून ज्या विद्यार्थि–विद्यार्थिनींनी १० वी ११ च्या परीक्षांमधे साठ टक्क्यांपेक्षा जास्ती गुण मिळविले असतील अशा सर्वांना सर्व क्रमिक पुस्तकाचा संच, पारितोषिक व उत्तेजन म्हणून दिला जाईल. तसेच ७५ टक्के व त्याहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे शिष्यवृत्त्याही दिल्या जातील.

**पालक मेळावा**


गेल्या वर्षापासून आमच्या महाविद्यालयात पालक-मेळाव्यांची सुरुवात झाली आणि त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. बारावीच्या विद्यार्थ्यांच्या समस्या त्यांच्या पालकांपुढे मांडाव्या आणि पुढच्या वर्षापासून सुरू होणाऱ्या ज्येष्ठ विभागातील सत्र पद्धतींची त्यांना कल्पना देऊन सुरुवातीपासूनच त्यांना जागरूक ठेवावे या हेतूने १० मार्च रोजी एक पालक मेळावा घेण्यात आला. पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्याला उत्तम प्रतिसाद दिला. पालकांनी दाखविलेल्या या जागरूकतेबद्दल व जिव्हाळ्याबद्दल धन्यवाद.

**विद्यार्थ्यांचे अभिनंदन व शुभेच्छा**

सांस्कृतिक व क्रीडाक्षेत्रात बारावीच्या विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या नैपुण्यांचे चित्र इतरत्र संबंधित अहवालातून देण्यात आले आहे. या साऱ्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन ! बारावीच्या अनेक विद्यार्थि विद्यार्थिनींनी राष्ट्रीय पातळीवरदेखील उत्तम यश मिळविले आहे त्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

उद्याच्या त्यांच्या परीक्षेमध्ये त्यांना उज्ज्वल यश प्राप्त होवो, ही सदिच्छा !

# क्रीडा संघटना व्यवस्थापन समिती




खुर्चीवर डावीकडून : श्री. शिंत्रे (I. C S R.), प्रा. आपटे (कार्याध्यक्ष), उपप्राचार्य कुलकर्णी, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य गाडगीळ, प्रा. गंभीर, कु. देशपांडे (I. C. S. R.)
उभे १ ली रांग डावीकडून : प्रा. नवलगुंदकर, प्रा. नातू, प्रा. पुंडे, प्रा. गोसावी, प्रा. संगोराम, प्रा. (सौ.) वनारसे, प्रा. म. आ कुलकर्णी, प्रा. कुलकर्णी, प्रा. शिंदे, श्री. लागू, प्रा. पाथरे
उभे २ री रांग डावीकडून : सर्वश्री डात्रखर, कदम, भोसले, सांगवे, कुलकर्णी, भालेराव, कु. कुकडे, कु. भट, कु. मेढेंदळे, कु. पारसनीस, सर्वश्री संगोराम, मोटे, भगत, काळे, नावडकर

## आंतर महाविद्यालयीन व्हॉली बॉल ( महिला ) विजयी संघ




खुर्चीवर डावीकडून : कु. भट, प्रा. आपटे ( कार्याध्यक्ष ), उपप्राचार्य कुलकर्णी, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य गाडगीळ, प्रा. पाथरे, श्री. लागू, कु. देशपांडे
उभे १ ली रांग, डावीकडून : कु. बोरावके, कु. बनबेरु, कु. पतकी, कु. सोनटक्के, कु. शेलार,
उभे सेवक, डावीकडून : सर्वश्री नरवडे व पवार

## आंतर महाविद्यालयीन बॉल बॅडमिंग्टन ( महिला ) विजयी संघ




खुर्चीवर डावीकडून : कु. बोरावके, श्री. कुलकर्णी, प्रा. आपटे ( कार्याध्यक्ष ) उपप्राचार्य कुलकर्णी, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य गाडगीळ, प्रा. गोसावी, श्री. लागू, कु. देशपांडे
उभे १ ली रांग, डावीकडून : कु. पतकी, कु. भट, कु. शहा, कु. मेहेंदळे
उभे सेवक, डावीकडून : सर्वश्री पवार, पासलकर व पाटेकर

## आंतर–महाविद्यालयीन विशेष नैपुण्य ( अभ्यासेतर उपक्रम )




खुर्चीवर डावीकडून : श्री. शित्रे ( I.C.S.R. ) श्री. लागू, उपप्राचार्य गाडगीळ, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य कुलकर्णी, प्रा. आपटे ( कार्याध्यक्ष ), कु. देशपांडे ( I.C.S.R. )
उभे डावीकडून : कु. जोशी (ॲथलेटिक्स), श्री. काळे (ॲथलेटिक्स), श्री. ढमाले (कुस्ती), श्री. दुबे (वेटलिफ्टिंग) श्री. रोंघे ( बॉडी ब्युटीफुल ), श्री. गोळे ( ॲथलेटिक्स ), कु. पारसनीस (कथाकथन, कवितावाचन व वक्तृत्व)

## राष्ट्रीय छात्र–सेना : विद्यार्थि–अधिकारी



खुर्चीवर डावीकडून : U/O पाटील, U/O गोखले, LT आपटे, उपप्राचार्य गाडगीळ, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य कुलकर्णी, Sub/LT पाथरे U/O वाव्हळ
उभे डावीकडून : SGT पोवार, Ld/C सावंत, SGT ढोरे, SGT शेडगे, C. H. M. पंजाबी, SGT पवार, U/O कुलकर्णी, SGT राव, SGT लघाटे, Ld/C सोनवणे, SGT खेर

## शारीरिक शिक्षण-गटनायक ( सीनियर व ज्यूनियर कॉलेज )




खुर्चीवर : कु. बर्वे, श्री. छाब्रा ( शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख ) प्रा. आपटे, उपप्राचार्य गाडगीळ, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य कुलकर्णी, श्री. लागू ( शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख ) श्री. आवटे
उभे डावीकडून : कु. पारखी, कु. भोगले, कु. लोकापूर, सर्वश्री मटकर, निकम, शिंदे, क्षीरसागर, काळे, कु. पावसे कु. महामुनी, कु. जोगळेकर

## राष्ट्रीय सेवा योजना : विद्यार्थि-नेने



खुर्चीवर डावीकडून : श्री. घुब्रे, प्रा. गोखले, प्रा. म. आ. कुलकर्णी ( रा. से. योजना प्रमुख ), उपप्राचार्य गाडगीळ, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य कुलकर्णी, प्रा. न्हाळदे, प्रा. गोसावी
उभे डावीकडून : सर्वश्री खरात, ढमढेरे, जोगळेकर, गुंड, पांचाळ.


## वर्ग-प्रतिनिधी ( सीनियर कॉलेज )



खुर्चीवर डावीकडून : सर्वश्री बाफना ( तृ. व. वाणिज्य 'अ' ), पुराणिक ( तृ. व. वाणिज्य 'ब' ), घुमे ( पदवीपूर्व शास्त्र ), उपप्राचार्य कुलकर्णी, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य गाडगीळ, प्रा. आपटे, सर्वश्री जाधव जयंत ( तृ. व. शास्त्र ), जाधव पांडुरंग ( तृ. व. कला )

उभे १ ली रांग डावीकडून : सर्वश्री चौधरी ( प्र. व. शास्त्र 'अ' ), पाटील ( द्वि. व. शास्त्र ), भिलारे ( प्र. व. कला 'ब' ), कडोलकर ( द्वि. व. कला 'ब' ), कैलाशचंद्र ( पदवीपूर्व वाणिज्य ), गंभीर ( प्र. व. शास्त्र 'ब' ), हेगडे ( द्वि. व. वाणिज्य 'अ' ), शहा ( द्वि. व. वाणिज्य 'ब' )

## विद्यापीठ युवक महोत्सव ( नंदूरबार ) : प्रथम क्रमांक मिळवलेली एकांकिका : प्रतिज्ञा




खुर्चीवर डावीकडून : सौ. लेले, प्रा. आपटे ( कार्याध्यक्ष ), उपप्राचार्य गाडगीळ, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य कुलकर्णी, प्रा. सौ. वनारसे

उभे डावीकडून : श्री. पंडित, श्री. खरात, कु. मेहेंदळे, कु. पारसनीस, श्री. संगोराम, श्री. पायगुडे, श्री. पितळिया


उभे सेवक : सर्वश्री पवार, पासलकर

## व्हॉली बॉल ( महिला ) विजयी संघ ( ज्यूनियर कॉलेज )




खुर्चीवर डावीकडून : श्री. छाब्रा, प्रा. आपटे ( कार्याध्यक्ष ), उपप्राचार्य गाडगीळ, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य कुलकर्णी, प्रा. पाथरे, श्री. लागू
उभे डावीकडून : कु. पाठक, कु. पठारे, कु. हर्डीकर, कु. कल्याणी, कु. अरगडे, कु. निंबाळकर, कु. उंब्रेकर
उभे सेवक : सर्वश्री पवार, कदम, पाटेकर

## विशेष क्रीडा नैपुण्य ( ज्यूनियर कॉलेज )




खुर्चीवर डावीकडून : श्री छाब्रा, प्रा. आपटे ( कार्याध्यक्ष ), उपप्राचार्य गाडगीळ, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य कुलकर्णी, श्री. लागू
उभे डावीकडून : श्री. साने (व्हॉलीबॉल), श्री. भागवत (खोखो), श्री. शिंदे (हँडबॉल) कु. हर्डीकर (व्हॉलीबॉल) कु. अरगडे ( व्हॉलीबॉल ), श्री. दाणी (कुचबिहार करंडक) श्री. राठी (खोखो), श्री. दाते (कुचबिहार करंडक)

## वर्ग प्रतिनिधी ( ज्यूनियर  कॉलेज )




खुर्चीवर डावीकडून : प्रा. आपटे, उपप्राचार्य गाडगीळ, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य कुलकर्णी,
उभे डावीकडून : सर्वश्री गुप्ता ( ग तुकडी ), शिवतरे ( क तुकडी ), धाडगे ( सी तुकडी ), शिंदे ( ह तुकडी )
खराडे ( अ तुकडी ), पाटील ( ड तुकडी ), मिश्रा ( फ तुकडी ).

## जिमखाना दिन



श्री शिंत्रे ( I. C. S. R.), श्री. शिवाजीराव भोसले, कु. देशपांडे ( I. C. S. R. ), प्राचार्य लिमये, प्रा. आपटे ( कार्याध्यक्ष )

## मॉडर्न मित्रमंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना : कार्यांचा शुभारंभ



माननीय ॲड. सुशीलकुमार शिंदे, (सांस्कृतिक कार्य, युवक सेवा, क्रीडा आणि समाजकल्याण राज्य-मंत्री ) भाषण करताना आणि प्राचार्य लिमये.



## प्रश्नपेढी : प्रकाशन समारंभ

प्रश्नपेढी संचांचे प्रकाशन करताना
पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दाभोलकर.
डावीकडे प्राचार्य लिमये


←



## शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक वितरण

पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत पुणे विद्यापीठात
चौथी आलेली आमची विद्यार्थिनी कु. राका
आयना कुलगुरू दाभोलकरांच्या हस्ते
पारितोषिक स्वीकारताना

→



## सत्कार शक्तीचा !

एन्.डी.ए. चे डेप्युटी कमांडंट कर्नल
शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते पै. हिरामण
बनकर यांना महाराष्ट्र केसरी पद मिळविल्या-
बद्दल महाविद्यालयाच्या वतीने सत्कार

←



## आंतर वर्ग क्रीडा स्पर्धा


कर्नल भोसले यांचे हस्ते सर्वसाधारण विजेते
पदाची कै. दिवेकर ढाल स्वीकारताना प्रथम
वर्ष शास्त्र वर्गाचा प्रतिनिधी श्री. चौधरी

→

## विद्यापीठ परीक्षांतील उज्ज्वल यश



कु. राका आयना
पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत प्रथमश्रेणी आणि विद्यापीठात चौथा क्रमांक. महाविद्यालयात सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून दामोदर ट्रॉफी.



श्री. विजयकुमार न्यायाधीश
प्रथम वर्ष शास्त्र परीक्षेत प्रथमश्रेणी, गणित विषयात सर्वप्रथम व रँग्लर परांजपे पारितोषिक.

### पदवीपूर्व शास्त्र

### ॥ प्रथम श्रेणीचे मानकरी ॥




दिलीप भावे
महाविद्यालयात सर्वप्रथम



विजय जाधव




प्रकाश गंभीर



अजित दिवेकर



धनंजय साठे




नितीन साठे




शिरीन तेलंग



गिरीश कुमठेकर



मधुकर मांजरेकर



राजेंद्र वैद्य

पदवीपूर्व वाणिज्य


## ॥ प्रथम श्रेणीचे मानकरी ॥



पुलकेशिन मठाधिकारी



मीरा भडगावकर




सुधीर हवेली



मनोहर सोनावणे



सुनीता दामले



मंगला पटवर्धन



राजेंद्र महाजन



माधव भावे



पद्मजा आठल्ये



पुष्पलता कोठावळे



अंजली गोखले




नंदकिशोर कार्किडे




सुषमा नाटेकर



सीमा पारखी




आशिषकुमार शहा




जालंधर रमाणे

पदवीपूर्व वाणिज्य ॥ प्रथम श्रेणीचे मानकरी ॥ प्रथम वर्ष शास्त्र



दिलीप देशपांडे



सुजाता पाषाणकर




वसुधा टिल्लू




विद्या गाडगीळ




विलास पाटील




काशिनाथ पाटील




परशुराम शुक्ल



ए. बी. छाजेड



आनंद लंबे




संजय पाठक



श्रीनिवास नारविलकर



सुभाष अगरवाल



नंदकिशोर कुलकर्णी



संध्यादेवी कोल्हे



मेघा रेगे




शैलजा कोल्हे

प्रथम वष शास्त्र

## ॥ प्रथम श्रेणीचे मानकरी ॥

तृतीय वर्ष शास्त्र




सखाराम गाडे



कल्याणी पुणतांबेकर



नीलिमा दहिफळे




चंद्रशेखर पाटील
महाविद्यालयात सर्वप्रथम




वीणा हरिभट




विजय पवार



नारायण शिंदे



मल्हारी मांडे



प्रफुल्ल वैद्य



सुहासिनी शुक्ल




रजनी जगताप




शीला माने



गुलाब भोसले



प्रकाश गायकवाड




माधव दुराफे



चिंतामणी देशमुख

तृतीय वर्ष शास्त्र


## ॥ प्रथम श्रेणीचे मानकरी ॥




विकास दोलारे




रजनी शिंदे




बाबुराव पाटील



जयंत शाळीग्राम




एस. शर्मा




सुनिल अवचट




नूरजहाँ नाईक




विलास कर्डिले




अजित कुलकर्णी




गीताराणी झाड्ड




विनायक असलेकर




दिनकर वाघ




गोपाळ देवरे



एस. जनार्दन




संजीव कर्णिक




राजेंद्र महाजनी

## तृतीय वर्ष शास्त्र

## ॥ प्रथम श्रेणीचे मानकरी ॥




वसंत वाळुंज



चंद्रशेखर पलुसकर




सरिता गोन्हे



वसंत दगडे



सुनीता यंदे



सुहास शेटे




मनीला बाभ्रा

## तृतीय वर्ष वाणिज्य
## प्रथम श्रेणीचे मानकरी

↓



कीर्तिमालिनी कुलकर्णी
महाविद्यालयात सर्वप्रथम



प्रकाश भावसार



मेधा पारखी




रमण सोळंकी




जयश्री करंदीकर


## अभिनंदन




शांतीलाल गांधी




रमेश बोरा



सुरेंद्र कट्टी



आर. सी. शहा
ऑल इंडिया एरो मॉडेलिंग
स्पर्धेकरिता निवड



प्रा. संजीव पतके
'ऱ्होड्स स्कॉलर' चा
बहुमान

# ' साधुसंत येती घरा '

विविध उपक्रम कार्यक्रमांच्या निमित्ताने आमच्या महाविद्यालयास पुण्यातील आणि पुण्या-बाहेरील अनेक मान्यवर व्यक्तींनी भेट देऊन आम्हास मोलाचे मार्गदर्शन केले. महत्त्वपूर्ण व्यक्तींची नावे अशी –

ना. ॲड. सुशीलकुमार शिंदे, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य ( समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व युवक सेवा विभाग ), प्रा. देवदत्त दाभोलकर, कुलगुरू, पुणे विद्यापीठ, कर्नल शिवाजीराव भोसले, डेप्युटी कमांडंट, एन्. डी. ए, खा. जयंतराव टिळक, संपादक ' केसरी ', एस. पी. गुप्ता, डेप्युटी सेक्रेटरी, यु. जी. सी., डॉ. एम्. आर. भिडे प्रमुख प्राध्यापक भौतिकशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, डॉ. (श्रीमती) चित्रा नाईक, डायरेक्टर इंडियन इन्स्टिट्यूट, ऑफ एज्युकेशन, पुणे, प्राचार्य एम्, आर, चिटणीस, प्रा. जे. बार्नबस, प्रा. बी. के. देशमुख, प्रा. बी. बी. पाटील, प्राचार्य सत्यरंजन साठे, विधि महाविद्यालय, पुणे उपप्राचार्य स. वि. कुलकर्णी विधि महाविद्यालय, पुणे, प्रा. राम बापट, राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, प्राचार्य ग. वि. पंडित ( सेवानिवृत्त ), प्रा. ए. एम्. देशपांडे, इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ, डॉ. पी. एन्. व्यवहारे, सायकिॲट्रिक मेंटल हॉस्पिटल, येरवडा, श्री. मोरे, असिस्टंट सोशल वेलफेअर ऑफिसर, प्रा. गंगाधर पानतावणे, संपादक, अस्मितादर्श ' औरंगाबाद, श्री. बी. पी. साळुंखे असिस्टंट डायरेक्टर ऑफ स्पोर्टस, डॉ. राम काळे, डेन्टल सर्जन, पुणे, प्रा. डी. एस. पिंगे, रा. से. योजना विभाग प्रमुख, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई. डॉ. एस. एन्. कौशिक, मॅनेजमेंट कन्सलटंट, पुणे, डॉ. पी. सी. शेजवलकर, डायरेक्टर, इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲड रिसर्च, पुणे, श्री. जे. एल. जेरथ, मार्केटिंग मॅनेजर, इंजिनीयरिंग डिव्हिजन, राजाबहादूर मिल्स पुणे, श्री. एम्. बी. जोशी, ब्रँच मॅनेजर, L. I. C. पुणे, श्री जगन्नाथन, सीनियर अकौंटस ऑफिसर, टेल्को, पुणे. श्री. गो. म. बोंबले, उपसंचालक राज्य शिक्षणशास्त्र संस्था, पुणे, प्रा. जी. बी. कुलकर्णी वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट, पुणे, डॉ. रा शं. वाळिंबे मराठी विभाग प्रमुख ( सेवानिवृत्त ) पुणे विद्यापीठ, श्रीमती पद्मा गोळे, पुणे, डॉ. विद्याधर पुंडलीक, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ सौ. सरिता पदकी, पुणे, डॉ. कुंभारे, एम्. ई. एस महाविद्यालय, पुणे प्रा. श्याम जोशी एन् वाडिया महाविद्यालय, पुणे, नाटककार सतीश आळेकर, पुणे, श्री राम नगरकर, पुणे, श्री. निळू फुले, पुणे, श्री बाबा मोहोड, अमरावती, प्रा. सतीश बहादूर फिल्म इन्स्टिट्यूट, पुणे प्रा. भालबा केळकर, पुणे, डॉ. व्ही. एस. वोकील, पुणे.

आम्ही सर्वांचे कृतज्ञ आहोत.

# पाच कविता

## व्यथा

माझ्या व्यथेला माझ्या कथेला
आधार तुझ्या स्वप्नांचा
स्वप्ने असतात प्रीतीची
कधीही न होणाऱ्या मीलनाची
माहीत आहे सारे मला
तरीही गुंफतो स्वप्नमाला
प्रीतीच्या थेंबाची व्हावी बरसात
वाटते ओसरू नये स्वप्नांची रात

**विलास अवचट** / प्र. व. वाणिज्य

## हळूच उतर हृदयात...

हळूच उतर हृदयात,
जखमा नको व्हायला
साकळलेल्या रक्ताची
खूण नको रहायला ! !
जपून ठेव पाऊल,
पैंजण नको वाजायला !
चुकल्या कुणा तालावर
उगा नको नाचायला ! !

**किशोर कुलकर्णी** / तृ. व. वाणिज्य

## पाप की पुण्य

याच क्षणाला ( कविता लिहितानाच्या ) साक्षी ठेवून मी
तुला सांगू इच्छितो,
पुण्य साठवणं सोडून दे तू !
अरे काय करायचीय ही पुण्य-साठवण !
ती पापं बघ,
लाजरी बुजरी
लपलीयेत तुझ्यापासून दूर
कुठेतरी कोपऱ्यात !
त्यांना जवळ कर
त्यातच तुझं पुण्य आहे
लक्षात ठेव—त्यातच तुझं पुण्य आहे !

**संगम राव** / तृ. व. वाणिज्य

## माझ्या मना

माझ्या मना सारं विसर
हा रस्ता असाच आहे
चालता चालता पडायचं आहे
पडता पडता उठायचं आहे
रस्ता रक्ताने माखला तरी...
रक्ताळलेल्या पायाने चालायचं आहे
हा रस्ता असाच आहे
ज्याच्यासाठी तुला जगायचं आहे
त्याला मात्र तुला विसरायचं आहे
कितीही दु:खाच्या डागण्या दिल्या तरी...
हसत जीवन जगायचं आहे
हा रस्ता असाच आहे
रस्त्यावर सौंदर्य दिसायचं आहे
आस्वादासाठी सामोरं व्हायचं आहे
सगळं सौंदर्य विरून गेलं तरी...
आठवणींवर जगायचं आहे
हा रस्ता असाच आहे
वाटेत अग्नी भेडसावणार आहे
जीवन नको वाटणार आहे
पण कितीही चटके बसले तरी...
अग्निदिव्य करायचं आहे
हा रस्ता असाच आहे

**संजीवनी हसबनीस** / तृ. व. वाणिज्य

## वाट !

कधीही न संपणारी
एक वाट
कोठे सुरुवात ?
कोठे अंत ?
प्रवास मात्र
दोन अशा
अज्ञात स्थलांत.

**भालचंद्र पाडळकर** / प्र. व. वाणिज्य

# अग्निहोत्र

**अविनाश धर्माधिकारी**
द्वितीय वर्ष वाणिज्य

पहाटचे बरोबर तीन. पलंगावर पडल्यापडल्या नजर थेट आकाशात टाकतो. तीन तारे सरळ रेषेत. चन्द्राचा स्वच्छ प्रकाश आणि झोपी गेलेलं जग. दिवसभर उनाडक्या करून दमून भागून रात्री शांत झोपणाऱ्या अवखळ निरागस बालकासारखं. गढूळ पाणी शांत झाल्यावर त्यातला गढूळ अंश खाली बसतो आणि नितळ स्वच्छ भाग वर रहातो तशी माणसाची धावपळ गडबड सध्या थंडावली होती. यावेळेला घडते ते खरं जगाचं दर्शन. झोपलेलं...शांत...जग.

मग एकदा ते शांत झालं की ? गडबड, कोलाहल, घाईगर्दी कोणी पत्त्याचे बंगले बांधणार...कोणी हवेत मनोरे रचणार...कोणी सगळ्याच ताणांना वैतागणार ...कोणी प्रमोशनसाठी धडपडणार...कोणी राजीनामे खरडणार...पण सगळे मिळून भेसूर जीवनाच्या पिळून काढणाऱ्या चरकातून जाणार...निराश होणार...जिद्दीने झगडणारे दुर्मिळ. अशा हाडांचा कीस काढणाऱ्या प्रचंड रगाड्यातून जाण्यापेक्षा झोपणेच जास्ती चांगले.

गेले कित्येक तास मी तोच प्रयत्न करीत होतो. माझ्या जागेपणी मी हळूहळू शांत होत गेलेलं जग पाहिलं... गडबड थंडावली. सारं कसं शांत...आणि शहराच्या कोपऱ्यातल्या टुमदार उपनगरात चन्द्रप्रकाशात अभ्यंग-स्नान करणाऱ्या बंगल्याच्या खोलीत डोळे सताड उघडे ठेवून मी...सगळा कोलाहल थंडावला असल्यामुळे एरवी कधी ऐकू न येणारे लांबवरचे आवाज ऐकू येतात. धड-धडत जाणारी शिट्टी देणारी रेल्वे...कारखान्यातून येणारा संयमित खडखडाट आणि क्वचित् एखाद्या वटवाघुळाचा फडफडाट...

पण त्याहीपेक्षा एरवी कधी ऐकू न येणारा आवाज... स्वरनाद...स्वतःचा आवाज ऐकायला हीच वेळ योग्य असते. पण त्यावेळेला आम्ही सगळे डोळ्यांवर कातडे ओढून झोपलेले आणि झोप येत नसेल तर कसोशीने निद्रादेवीची आराधना करणार.

या कुशीवरून त्या कुशीवर असं अनंत वेळा करून पलंगपोस पायजमा आणि चादर तीनही पार चुरगाळून गेले. खिडकीतून दिसणारे तारे पाठ झाले. शांतता ऐकून कानाला दडे बसले.

काल संध्याकाळपासून जरासा अस्वस्थच होतो. कधी न ऐकलेला कुठला तरी मधुर आवाज दूरवरून कुठूनतरी अस्पष्ट कानावर येत होता. पण कोलाहलात तो विरून जायचा. पुन्हा अंधुक अंधुकसा कानांवर यायचा, हुरहूर लावून निघून जायचा.आनंद देणारी हुरहूर. हळवी, सुखद, मुलायम हुरहूर. रखरखीत वाळवंटात दुरून पाण्याचा वास आला तरी प्रवासी जसा अस्वस्थ होईल तशी अस्वस्थता. झोप तर पार उडून गेली. पाण्यात खडा टाकल्यावर खडा तळाशी जातो आणि पाण्यावर तरंग पसरतात तशी गडबड तळाशी जाऊन शांतता सर्वदूर पसरली...झिरपली तसतसा तो आवाज अधिकाधिक स्पष्ट होत गेला.

मधुर...जिवाचे कान केले तरी तो साठवायला अपुरे पडले हे पार्थिव कान. ओंकार ध्वनी...जगभर आनंद-लहरी निर्माण करत पसरत जाणारा ओंकारध्वनी. दुसऱ्या नवीन दिवशी नव्या दमाने जीवनकलहात झगडण्यासाठी माणसाला दुर्दम्य शक्ती देणारा प्रणव. माणसाच्याही नकळत त्याच्या हृदयात साहून भरारी घेणाऱ्या गरुडाच्या पंखातली ताकद. भक्ष्याचा अचूक भेद करणाऱ्या चित्त्याचा पोलादी पायातली ताकद देणारा उच्चार...

अर्थात्...आमची इच्छा असेल तर !

आणि आम्ही त्यावेळेला झोपलेले...!

पहाटेचे तीन. मी त्या मधुर झंकारात पार विरघळून गेलो. रंध्रारंध्रातून तो झंकार प्रवेशला...मला त्याने वेढून

टाकले...तो ओंकारध्वनी मला बोलवत होता. पण मलाच का बोलवत होता ? कुठे ? उत्तर नाही...

तरीही मी उठलो...कदाचित इच्छेविरुद्ध ! अंगावरची चादर हळूच बाजूला सारली. पलंगावरून सावकाश पाय जमिनीवर ठेवले...एकदम एक थंड लहर पायापासून मस्तकापर्यंत दौडत गेली. मांजराच्या पावलांनी दारापर्यंत गेलो. आवाज न करता दारापर्यंत गेलो. आवाज न करता कडी उघडली. दार पुन्हा लोटून घेतले आणि बाहेर पाऊल टाकले...

स्पष्ट शांतता...बोचरी थंडी...सगळ्या बाजूंनी भाले खचाखच्चा अंगात घुसत आहेत असं वाटले...जणू मला पुढे पाऊल टाकायला बंदी करत होते ते...पण तो आवाज माझ्या आत्म्याला साद घालणारी ती हाक...छे थाबणं शक्यच नव्हतं. अंगावर शाल घ्यावीशी वाटली...घेतली नाही पायांत काहीतरी घालावेसे वाटले...पण वेळच नव्हता.

वेड्यासारखा निघालो...मिळेल त्या रस्त्याने...त्या आवाजाकडे...रस्ता लांबवरून आलेला. घरावरून पुन्हा लांबवरून एका बिंदूत मिळालेला...जणू तिथून पुढे रस्ता बंद आहे असे वाटते...पण तिथे गेल्यावर कळते...रस्ता अजून किती तरी पुढे आहे...तू जाशील तितका. तिथे रस्ता आहेच.काळाकुळकुळीत...रात्रीच्या वेळी तोही स्वच्छ झाला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला शेतं पसरलेली... तीही पहाटवाऱ्यात डोलत होती...रस्त्यावर दव साठून राहिलेलं. रस्त्यावर पाय ठेवले आणि पाय ओलसर झाले ...रस्त्यावरचे दव तुडवत, शेतातल्या रोपांच्या टोकावर विराजमान झालेले चन्द्रप्रकाशात तेजबिंदुसारखे दिसणारे दव निरखत निघालो...त्या आवाजाच्या रोखाने दंवबिंदू उचलून घ्यावेत आणि रेशमी दोऱ्यात ओवून सुंदर माळ तयार करावीशी वाटली...पण हातात येण्यापूर्वीच ते विरून गेले दवबिंदू. शेताच्या कडेला वटवृक्षाखाली बसून झुंजुरवेळी गार ऊस दातांनी तोडून खावासा वाटला... कदाचित ते आनंददायी झालं असतं. पण तो झंकार जास्ती आनंददायी वाटत होता...मी तिकडेच खेचला गेलो.

रस्त्याच्या कडेला समान अंतराव ट्यूबलाईट्स स्वच्छ रस्त्याच्या आरशात स्वतःला पहात होत्या. रात्रभर बहुदा त्या दुःखी असाव्यात. आपल्या प्रकाशातून पुढे जायला कोणी नाही म्हणून...दवबिंदु म्हणजे त्यांचे गोडे अश्रू.

पाच दहा मिनिटांतच शहरातला रस्ता मागे पडला. मग एका शेतातून वळवळत जाणारी पायवाट. पाया-खाली ओसलर तांबडी माती आणि डोक्यावर रिमझिम बरसणारा शीतल चन्द्रप्रकाश. नादब्रह्म अधिक अधिक स्पष्टतर होत चाललं होतं. जसाजसा जास्ती जास्ती स्पष्ट आवाज कानांवर येईल तसतशी पायांतली ताकद आणि मनातला उल्हास वाढत होता.

एका पर्वतापाशी येऊन ठेपलो. उंचच्या उंच... ठिकठिकाणाहून ताशीवकडे...बोट फिरवलं तर सर्रकन् रक्ताची धार येईल. फूटभरसुद्धा नसेल चिंचोळी वाट... नव्हतीच ती...कुणी तुडवली तर वाट तयार होते...इथे तर किडामुंगीचीही चाहूल नव्हती...एका बाजूला खोल दरी...पाताळ...दुसऱ्या बाजूला सरळ आकाशाकडे झेपावणारा उंच कडा...वाटेवर अनंत काटे...टोकदार खडे दबाधरून बसले होते...पाऊल ठेवले मात्र...कच-कन् पायात एक दगड घुसला...रक्ताची धार लागली... पायात काहीतरी घालावसं वाटलं...पण आता इलाज नव्हता. तसाच चालायला लागलो आणि मग पायात काही नाही या वेदनेपेक्षा शालीचं लोढणं बरोबर घेतलं नाही याचं सुख जास्ती वाटलं...थंडी तर कधीच पळाली होती...थंडी वाजवून घेणाऱ्याकडे...माझ्या अंगात एक आल्हाददायक उष्णता भरून राहिली होती...पायात खडे बोचत होते. एखादा खव्याळ कातडं भेदून जायचं धाडस करायचा.

पायातून रक्त वहायला लागले...मी तसाच पुढे मागे माझ्या उष्ण रक्ताचे ठिपके सोडत. पायाला त्रास तर होत होता. नाही कसा ? पण तो ओंकार खेचत होता.

खूप वेळ झाला. चन्द्रही आता विझू लागला. पहाटे पूर्वीचा एक तास...घनदाट अंधार त्या पर्वताच्या अल्याड-पल्याड...एक प्रकारचा अनिश्चित पण दीर्घकाल टिकणार असं वाटावं असा गुडुप्प अंधार. मला थांबवायला पार्थिव उपाय अपुरे पडल्यावर त्याला पाठवलं होत की काय कुणास ठाऊक. डोळ्यांत घालायला तेलही नव्हतं...रात्रभर पहारा करणारा निशाकांतही चालला...गेला. वटवाघूळांची फडफड वाढली...साप, विंचू...सरपटायला लागले विषारी फुत्कार सोडत...भीतीच वाटायला लागली...

पण तो आवाज...!

मग डोळ्यांतच ज्योती पेटवल्या ...ठेचकाळत ... धडपडत एक वळण घेतले आणि अचानक त्या अंधारातच एक चित्रवत् दृश्य माझ्या डोळ्यातल्या ज्योतींनी मला दाखविले...

हिरवीगार मखमल पांघरलेले...पहुडलेलं माळरान त्याच्याच बरोबर मध्यभागातून लहरी उठत होत्या...

तरंगासारख्या पसरत आनंदाची कंपने निर्माण करीत होत्या...आता स्पष्ट कंपने कानाला स्पर्श करत होती. पायात असेल नसेल तेवढी ताकद एकवटली आणि पळत सुटलो...मध्यभागी आलो आणि पाय जागीच खिळले.

एक मोठं आळं तयार केलं होतं...मांसाचा बांध घालून . त्या आळयाच्या मधे एक काडी रोवलेली होती तिरका छेद घेऊन...त्या आळयात रक्ताचं तळं साटलं होतं मखमली हिरवी चादर...रक्तवर्ण आळं...आणि मधे कोमल गुलाबाची काडी...आळयाच्या कडेला एक माणूस उभा होता तोंडातून सावकाश रक्ताचा एक एक थेंब त्या तळयात टाकत होता...अभिषेक !

तो होता हडकुळाच...उंचसा...अंगातलं रक्त गेल्याने पांढरट दिसत होता...पण चेहरा विलक्षण तेजस्वी दिसत होता...कोणालाही दिपवून टाकण्याइतका...डोळयांत तर साक्षात् दोन सूर्यच जळत होते...प्रखर...बहुदा त्या तेजाच्या आधारावरच रात्रभर तो रक्ताचा अभिषेक त्या गुलाबाच्या काडीपाशी करीत होता...

कधी काळी त्याला पानं फुटतील फांद्या येतील... हिरव्या हिरव्या पानांच्या सान्निध्यात रंगीबेरंगी गुलाब फुलतील...सुख देणारं...आणि त्या गुलाबांची जपणूक करण्यात सगळं जग वेडं होईल...हरवून जाईल...हरवून जाईल...हेवेदावे विसरेल ! या अपेक्षेने...वेडा !

त्याच्या रक्ताचा थेंब पाण्यात पडला की रक्ततरंग उठायचे. तिथूनच तो मधुर ... स्वर्गीय ... झपाटून टाकणारा...वेढून टाकणारा ओंकारध्वनी प्रसृत होत होता...अनंत काळपर्यंत ऐकत राहावा असे वाटत होते. पण त्याकरता रक्ताचा अभिषेक चालू राहायला हवा आणि या उमद्या माणसाचं रक्त चाललं आहे हे पहावत नव्हतं...तिरीमिरी सरशी गेलो त्याच्या पायापाशी...त्याला दोन्ही हातांनी धरले...त्याने एक क्षणभर माझ्याकडे पाहिले...एक आगीची ज्वाला अंगाला स्पर्श करून गेली ...आणि मग मला ढकलून दिलं...मी धडपडत दूर जाऊन पडलो...त्या कृश हातात एवढी ताकद ? पुन्हा रक्ताचा अभिषेक सुरू...त्याच्या कपाळावर रक्ताचा लालभडक मोठ्ठा टिळा होता...

.................

ओंकारध्वनी वाढत गेला...पसरत गेला...डोंगरदऱ्यांत ...दऱ्याखोऱ्यांत... वाटेवाटेवर ... घराघरांत ... त्याचा आपटून प्रतिध्वनी होत तो प्रचंड झाला आणि ग्रहगोलाच्या टक्करीतल्याहून प्रचंड आणि गंभीर तेजस्वी नादब्रह्म प्रत्येकाच्या कानांवर आदळले...तापल्या शिशासारखं जळजळत जाऊन हृदयाला ग्रासलं...अलिशान बंगल्यात ...झोपडीत...फूटपाथवर . राजवाड्यात झोपलेले सगळे जागे झालो...वादळवाऱ्यात घोंघावत...खळाळत रोरावत ...पिसाटासारख्या उसळणाऱ्या तुफानी लाटेप्रमाणे तो ध्वनी त्यांच्या कानांतून पोलादी आघात परत मेंदूपर्यंत जाऊन पोचला...

आणि मग

सगळेच संतापले, कोण हा गोंधळ ? एवढ्या लवकर कोणी उठविले. आमची झोप कोणी मोडली...सैताना-सारखे संतापले...इंगळयासारखे डोळे लाल लाल करून हातात काय सापडेल ते घेऊन...बंदूक, पिस्तूल, लाठी-काठी, कुऱ्हाड, गज सळया...निघाले...

रस्त्यारस्त्यावरनं गर्दीचे ओघ त्या शिखराकडे लागले ...सगळेच एका गोष्टीने झपाटलेले...त्या गदारोळात ते आपले भेद विसरले...गरीब...श्रीमंत...स्त्री...पुरुष... लहान.. मोठा...नोकर... मालक ...ऑफिसर ...क्लार्क ...सरारा निघाले...त्या उन्मत्त, अमानवी आवाजाला ठेचायला संतापाच्या भरातच झपाझ्याने सगळेजण ते शिखर चढून गेले...जे शिखर चढायला मला त्रास झाला होता...ते शिखर...जे शिखर चढायला मला सगळी शक्ती एकवटावी लागली होती ते शिखर...ते अक्षरशः वायुवेगाने चढून आले.

समोरचं दृश्य पाहिलं मात्र...हातातली सगळी ताकद एकवटून सगळया वस्तू फेकून मारल्या...सगळया लांब-वरच पडल्या फक्त दोन दगड पोहोचले...एक थेट त्या उमद्या...त्यागी...तेजस्वी पुरुषाच्या डोक्यात बसला. फटकन कवटी फुटली...धाडकन् तो खाली कोसळला ...त्याच्या डोक्यातून एक विद्युल्लतेचा लोळ निघाला आणि सळसळत माझ्या डोळयांत शिरला...माझ्या डोळयात सूर्य धगधगू लागले...

दुसरा दगड त्या रक्ताच्या तळयात पडला...एक थेंब सरळ उंच झेपावला तो माझ्या कपाळावर विसावला माझ्या कपाळावर लालभडक मोठा टिळा उमटला.

आणि डोंगरमाथ्याआडून लालभडक सूर्याचा गोळा प्रकाशाची उधळण करत...रंगांची खैरात करत...तेजाची बरसात करत...वर आला. माझं त्या काडीकडे लक्ष गेलं त्याला दोन बारीक चुटुकदार पानं फुटली होती...

माळरानाच्या कडेला हातात भाले, कुऱ्हाडी, बंदुकी घेऊन टपलेला माणसांचा कळप...माझ्याजवळ पडलेला

तो छिन्नमस्तक सत्पुरुष...माझीही तीच अवस्था होणार. गुलाबाच्या काडीला फुटलेली दोन कोवळी पानं.

मलाच...आता पुढलं काम मलाच करायला हवं. काल त्यानं आपल्या डोळ्यांतले तेज सूर्याला अर्पण करून अग्निहोत्र चालू ठेवलं...सूर्य...त्या लालभडक रक्ताची ओळ घेत प्रखर झाला...फुटलेल्या दोन पानांना आता मीच रक्ताचा अभिषेक करायला हवा...तरंग उठतील ओंकारध्वनी पसरेल...पुन्हा आज रात्री कोणीतरी येईल अग्निहोत्र चालु ठेवायला...उद्याच्या पहिल्या सूर्य किरणां-पर्यंत माझं आयुष्य...बास्स !

आज दिवसभर लोक धांदलीत असतील...माणसाला विसरलेली असतील. तेव्हा मी शांतपणे आवाज न करता जळीन...रक्ताचा अभिषेक करीन...कधीकाळी त्याला फांद्या येतील...नेत्रांना सुख देणारे रंगीबेरंगी गुलाब त्या हिरव्या पानांच्या सान्निध्यात बहरतील...आणि त्या गुलाबाची जपणूक करण्यात सगळं जग हरपून जाईल हरखून जाईल...हेवेदावे विसरेल...रक्त लहरीतून उठणारे नादब्रह्म प्रत्येकाला झपाटून टाकेल...

पण...

पण तोवर तरी रक्ताचा अभिषेक मी चालू ठेवायला हवा...उद्याच्या सूर्याला उगवायची ताकद आणि तेज येण्यासाठी आज...आत्ता मी रक्त आटवायला हवं. सगळं जग झोपलेलं असता अग्निहोत्र मी चालू ठेवायला हवं... उद्याच्या दिनकराच्या पहिल्या पावलापर्यंत...अग्निहोत्र.

✣

---

नंदुरबार युवक महोत्सव :
विजेत्या कविता

## नशीब

[एक वय असं असतं की आयुष्यात नक्की काय करावं हे समजत नाही. अनेक मार्ग पुढे असतात. या द्विधा मनःस्थितीत सल्ला देणारे पुष्कळ असतात. खरं कोण, खोटं कोण हेच कळत नाही. पुष्कळ वेळा या भोळ्या मनाला फसवेच लोक भेटतात.]

**भविष्याच्या भिंतीवर माझं नशीब थडथडा टकरा घेतंय,**
**आयुष्याच्या पोकळीत भिरभिर फिरतंय,**
**अंधारात चाचपडणाऱ्या पाकोळी सारखं...**
**अश्वत्थाम्यासारखं दूध म्हणून ते पिठाचं पाणी पितंय.**
**नि,**
**राजहंसासारखं पाणी टाळून दूध प्यायला बघतंय,**
**पण...,**
**बेमालूम भेसळ त्याच्या डोळ्यांत धूळ फेकतेय,**
**खरं दूध मिळालं, तर तेच त्याला पिठाचं पाणी वाटतंय.**

## व्यथा

[व्यथा आहे एका पुनर्विवाहित विधवेची. नवऱ्याच्या प्रथम पत्नीचं मूल ती स्वतःचंच असल्याच्या भावनेनं सांभाळते. पण तिचं मूल तिला दूर ठेवावं लागतं. पुर्न-लग्नाची किंमत तिला स्वतःचं मूल द्यावी लागते. व्यथेला पुरुषी अहंकाराचा वास येतो आणि ही व्यथा बोलकी होते.]

**आज, आज मी ते विकलं.**
**माझ्या रक्तामासाने पोसलेलं,**
**ते फूल मी विकलं.**
**आज मी माझ्या प्रीतीला विकलं.**
**ऐटदार, कोमल, फूल मी विकलं,**
**जगानं गोंडस नाव दिलं,**
**मी त्याला दत्तक दिलं.**
**आज, मी, माझ्या प्रीतीला विकलं.**
**रिकाम्या हातांनी रक्त बंबाळ हृदय सावरलं,**
**माझं मन आक्रंदलं,**
**मी मलाच विकलं हो, मी मलाच विकलं.**

**राणी पारसनीस**
तृतीय वर्ष कला

आत्मचरित्रात्मक निबंध

# मी व जात

मॉडर्न मित्र मंडळ

'स्वजातिःदुरतिक्रमः।' असे एक संस्कृत सुभाषित आहे. त्याचा संदर्भ बदलून ते जर भारतीय समाजाच्या जातव्यवस्थेच्या संदर्भात घेतले तर ते अगदी यथार्थपणे लागू पडते. जात ही संस्था चिवट आहे. लहानपणापासून तिचा आमच्यावर संस्कार होत असतो. ह्या संस्काराची प्रतवारी अजमावण्याच्या हेतूने मॉडर्न मित्र मंडळाने 'मी व जात' या विषयावर एक परिसंवाद आयोजित केला होता. या विषयावर विद्यार्थ्यांना आत्मचरित्रात्मक निबंध लिहिण्यास प्रवृत्त केले होते. जीवनकुमार माने, रमेश हंडे सुरेन्द्र जाधव, निर्मला शेजाळे, एस्. आर. बोंबले, एस्. बी. ठोसे, सुहास देवधर, रवीन्द्र खरात, मीनाक्षी येडुरे, अर्जुन भिंगारदिवे आणि निवृत्ती दांगट अशा एकूण ११ विद्यार्थ्यांनी असे निबंध लिहिले होते. परिसंवादाचे अध्यक्ष प्रा. गंगाधर पानतावणे ( संपादक 'अस्मितादर्श' ) यांना हे सर्वच निबंध फारच परिणामकारक वाटले. त्यातील चार निबंध येथे देत आहोत.

## काट्याच्या आतलं जगणं

'समाज' नावाचा शब्द मला कळायला लागल्यापासून माहीत आहे. परंतु तेव्हा या शब्दाचा माझा अर्थ खूपच संकुचित होता. 'वस्तीतील प्रौढ मंडळी म्हणजे समाज' ही माझी समाजाची व्याख्या! याबाहेर जग खूप मोठं असतं हे मला माहीत नव्हतं! सहावीत असताना जगाचा नकाशा पाहिला तेव्हा मात्र मला पुसटसी कल्पना आली.

लहानपणापासून मला एक प्रश्न खटकायचा की आमची घरं गावाबाहेर का ? प्रेतं आमच्याच बाजूला का

---

# दोन कविता

: १ :

स्वप्नवणांचे दोन निरोपी अभंग
अक्षयओल्या गळ्यातून शांतपणे स्रवणारे
गुणगुणताहेत त्याचे प्राणध्वनी प्रवासताना

प्रत्येक शब्दाशब्दातून
प्रत्येक उन्ह–धारांमधून

कागदांनो, सावध रहा
नाहीतर, तुमच्या पानांनाही
चिरंतनची शल्यतहान लागेल (!!)

: २ :

असू देत शापांसाठी
परावर्तीत अंकुरखुणा
दोन सेकंदाच्या, विस्मित प्रवासाच्या...!!
ते समुद्रफूल आठवणीने एकवार झेल
अनेक नगण्य अस्तित्वांचा गंध
( शापांसाठी ) चंदनकण होऊन दरवळेल
त्याची ओळख ठेव परतताना...
असू देत उपहासी बलात्कार जगाचे
...आता शापांचीही सवय...
क्वचित् परावर्तीत होईल मनही
शापित निरोपासाठी
शापित नि...रो...पा...सा...ठी...!!!

वासंती इनामदार
प्रथम वर्ष कला

जाळतात ? मात्र हे प्रश्न विचारायचं धाडस कधीच झालं नाही. विचारायचं तरी कोणाला ? वडील अडाणी ! गावातली कोतवालकी सांभाळायचे ! महिन्याला तीस रुपये पगार व्हायचा. तोही तालुक्याच्या गावी ! रात्री नऊ-दहा वाजता वडील त्यादिवशी घरी यायचे. मी खूप वाट पहायचा. कारण वडील त्यादिवशी एक बुंदीचा लाडू अन् भेळीचा पुडा आणायचे. तोच माझा महिन्याचा खाऊ !

आईचं तर विचारायलाच नको ! दिवसभर घरकाम नि शेतात राबणं ह्याशिवाय तिला काही माहीत नव्हतं. माझा भाऊ शिकत होता. तालुक्याच्या गावी ! तो घरी क्वचितच येत असे. तो आला की जातीतले इतर लोक खूप जमत. महाराचा पोरगा तालुक्याच्या गावी शिकतोय म्हणजे काय !

कोठे जर एखाद्या कार्यक्रमानिमित्त जेवण असलं तर कळकट सदऱ्याखाली पितळी लपवून आम्ही बोळाबोळातून पळायचो ! पुढे पुढे पितळी न्यायची लाज वाटू लागली. पण जेवायला जायचाच. घरी कधी गोडधोड मिळत नव्हतं ! तिथं गेलं की खायला मजा वाटायची. त्या मातीत बसूनही. पण पुढं समजू लागलं आपली पंगत इतर लोकांपासून पंधरा हातांवर दूर आहे. मग वर्गातल्या पोरांबरोबर बसू लागलो. मात्र एकदा एका शहाण्याने मला तिथून उठविले. मी जेवायला जाणे सोडून दिले तेव्हापासून.

माझ्या देखत आमच्यात कोणी भाकरी मागत नव्हते अथवा कोणी जनावरे फाडत नव्हते. परंतु जर म्हाताऱ्या माणसांच्या गप्पा ऐकायला मिळाल्या तर त्यात हे वर्णन असे. सारेजण त्या काळाची प्रशंसा करत. मी तिकडे दुर्लक्ष करी.

मराठी शाळेत सारेच शिक्षक मला हुशार म्हणत. मला त्याचा अभिमान वाटे. जातीचा उच्चार शाळेत कधी झालेला मला आठवत नाही. परंतु एक प्रसंग आठवतो. मी चौथीत असताना कवायतीसाठी रांगेत उभा होतो. तेवढ्यात एक मास्तर ओरडले, ' ए महारा, मागे हो ! ' मी रांगेत नीट उभा राहिलो. परंतु काहीतरी अपमान झाल्यासारखा वाटला. मात्र त्याच वेळी हेडगुरुजींचे नि त्या मास्तरचे माझ्यावरून खूपच भांडण झाले. त्या दिवसापासून तो मास्तर माझ्याकडे तिरस्कारी नजरेने पाहू लागला.

रात्रीच्या घासलेटच्या ढणढणीत दिव्याच्या उजेडात अभ्यास करणे मला आवडे. परंतु रात्री दहाच्या पुढे जर मी जागलो तर वडील रागवत, ओरडत, " अरे किती पुस्तकं वाचतोस ! झोप पाहू ! " माझ्या हातात पुस्तक दिसले की वडिलांची तळपायाची आग मस्तकाला पोचायची. शिक्षणाच्या पूर्ण विरोधी होते ते. परंतु त्यांच्या कडव्या विरोधाशी गांधीजींच्या तत्त्वांचे युद्ध मी केले व म्हणूनच आज कॉलेजमध्ये पाऊल टाकू शकलो. मात्र आनंदाची गोष्ट ही की कॉलेजमध्ये आल्यावर मी शिक्षणाच्या बाबतीत वडिलांचे मत चांगले करू शकलो.

घरच्या गरिबीमुळे माझा नामकरणविधी मी चौथीत असताना झाला. तेव्हा मोठा भाऊ तालुक्याच्या गावी वसतिगृहात राहात होता. दलितांच्या गुढीपाडव्याच्या दिवशी नामकरणविधी होता. त्या दिवशी सायंकाळी जेवणाचा कार्यक्रम होता. जेवणाची पंगत बसली तेव्हा फक्त आमच्याच लोक बसले होते. चौकशी अंती कळले की, ' आपल्या हातचे इतर खात नाहीत. ' डोक्यात अनेक सुया टोचल्यासारखे झाले. दगडांनी त्यांची तोंडे ठेचावीत असे वाटले. परंतु राग व्यक्त करायला जागा नव्हती. न जाणो राग व्यक्त केला असता तर आज असे लिहूही शकलो नसतो.

सातवीत गेल्यानंतर मला वर्गात म्हणजे अर्थातच गावात पहिला नंबर काढावा असे वाटू लागले. वस्तीतील हायस्कूलची पोरे मला म्हणत, " रव्या, पहिला नंबर आपल्या वस्तीचा आला पाहिजे हा ! " तेव्हा मला राग यायचा. आपणच आपलं घरकूल करून स्वतः मागे जात आहोत असं वाटायचं ! मी ती परीक्षेची शर्यत खेळलो ती फक्त माझा नंबर येण्यासाठी, आमच्या वस्तीतला येण्यासाठी नव्हे ! परंतु दुर्दैव आड आले. भानुदास पावळे पहिला आला नि मी आलो दुसरा ! त्याला ७३ टक्के मार्क्स होते तर मला ७२·५ टक्के होते.

आमच्याच गावात हायस्कूल होते तरी मला तेथे शिकावे वाटेना. तालुक्याच्या गावी जाण्यास भावाची संमती होती, मात्र वडिलांची संमती नसल्याने पुन्हा हायस्कूलसाठी गावीच राहिलो. वडील आईवर नेहमी भडकत ! त्याला कारण परिस्थिती ! भाऊ वसतिगृहावर सुपरिंटेंडेंट झाला होता, चाळीस रुपये पगारावर ! त्याचे त्यालाही पुरत नव्हते. ह्या परिस्थितीत देखील वडिलांनी भावाचे लग्न काढले. मी ह्यावेळी इतरांकडे लक्ष दिले नाही. वहिनी घरी आल्या. गावातली लोकं बोंबलू लागली, " पोर, वाण्याच्या सुनेपेक्षापण भारी हाय बरं का !

अगोदरचं लफडं होतं वाटतं." असं म्हटलं की मला राग यायचा. परंतु माझ्या देखत ते कोणी म्हणत नसत. त्यावेळी प्रेमविवाहाच्या विरुद्ध मी होतो. आजचे विचार वेगळे आहेत ही गोष्ट निराळी! परंतु माझ्या भावाचा नुसता 'विवाह' झाला असताना त्यांनी उगाच लावलेला 'प्रेम' शब्द मला आवडत नव्हता.

मला अकरावीत शेवटचा एक कटू अनुभव आला. मी सुट्टीत एक नाटक लिहिले होते. अजूनही ते आहे माझ्याजवळ! त्याचा प्रयोग गणतीच्या सभारंभाला करायचे ठरले. आम्ही रिहर्सल सुरू केली. मात्र ऐन वेळी नाटकातील नायक आणि खलनायक यांनी अंग काढून घेतले. नाटक चारी मुंड्या चीत झाले. दुसऱ्या दिवशी शाळेत "सत्यनारायणाची पूजा" होती. अर्थातच लीडर मी होतो. सर्व सभारंभ पार पडल्यानंतर प्रसाद वाटण्यासाठी मी बसलो. माझ्या नाटकात खलनायकाचे काम केलेला, खरोखरीच खलनायक असणारा खलनायक माझ्यासमोर सारखीच सुपारी खात बसला. आमच्या शिक्षकांनी त्याला झापले नि तो बाहेर गेला. मी बाहेर काम संपवून आल्यावर मला कळले की तो दवाखान्यासमोर काही मुलांना म्हणाला होता, "मास्तरड्यांना माळ्या-मराठ्याचा पोरगा नाही मिळला. पण महाराचंच कार्टं बरं मिळतं प्रसाद वाटायला." मला महाप्रलय झाल्यासारखं वाटलं. असंच जावं नि त्याचं गचुंड धरून विचारावं, "कशाला आलास रे तिथे? तुला माहीत नव्हते काय की कार्यक्रमाचा प्रमुख महाराचाच पोरगा आहे?" परंतु अशा गोष्टी मला झटक्यासरशी करता येण्याजोग्या नव्हत्या. तो तर अगडबंब होता. माझ्या मित्रांच्या कानावर ही गोष्ट गेली. ते सवर्ण असले तरी नवमतवादी होते. तावडतोब पंधरा-वीस पोरं जमली. निर्णय झाला की त्याला मारायचे. परंतु मी अडवले. मी घाबरत होतो की लोकात बोंब होईल महाराच्या पोरावरून मारामारी झाली.

असे जिवलग मित्र मिळत गेल्याने मी खूपच सुधारण्याचा प्रयत्न केला. शिक्षकही चांगले मिळत गेले.

ह्या शाळेच्या जीवनात काम करीत असतानाच मला अनेक वेळा नेतृत्वाचे कार्य करावे लागले. त्यामुळे की काय मी सभाधीटपणा प्राप्त केला, थोडाफार! माझ्यात वक्तृत्वकला पोसू लागली. शाळेत वक्तृत्वस्पर्धेत दोन-तीन वेळा पहिला आलो. इतर ठिकाणी वक्तृत्वाच्या स्पर्धा जिंकण्याचे टरविले, परंतु शाळेकडून मला धीर मिळाला नाहीच; मग आधार कुठला? शाळेच्या त्या पडक्या वाड्यात माझ्या वक्तृत्वाची कधी स्तुती केली गेली नाही की माझा हा गुण मला वाढविता येईल असं कोणी मला म्हणालं नाही. ह्याचं नक्की कारण कोणतं ते देखील मी ओळखू शकलो नाही आत्तापर्यंत!

एका बाबतीत मात्र मी उपाशीच राहिलो; अगदी दहावीपर्यंत! मला कितीही चांगले मार्क्स पडले अथवा कोणताही गुण मी उचलला किंवा त्यात प्रावीण्य मिळविले, तरी देखील कोणाकडूनही माझे कौतुक केले गेलं नाही. मला मनोमन वाटायचं आपण जर वर्गात पहिला आलो तर वडिलांनी पेढे वाटावेत; मला नवीन चांगले कपडे शिवावेत. परंतु...

म्हणूनच की काय कोण जाणे, मी खूप स्वप्नाळू बनलो. आमच्या शेतात आमचाच बंगला मला दिसायचा. सुंदरशी नि छोटीशी बाग त्यात फुललेली असायची. वडिलांच्या अंगावर मांजरपाटऐवजी तलम वस्त्रे दिसायची. आईचं जुनेर कोठेतरी धूळ खात पडून तिने उंची वस्त्रे परिधान केल्यासारखी वाटायची. माझ्या आवडीचे पदार्थ दही-भात हे रोज मिळायचे. त्या स्वप्नाळू बंगल्यात वाजवीपेक्षा जास्त फर्निचर आणि नोकर-चाकर दिसायचे. सारं काही खरं वाटायचं. परंतु सकाळी जेव्हा मी उठे तेव्हा फाटक्या गोधडीचे वाभारे झालेले मला समजून चुकायचे. वास्तवता आणि स्वप्न यातील फरक मी तेव्हापासून शिकलो.

ज्यावेळी मी अकरावीत पाऊल टाकले, त्यावेळी पुन्हा मला दुसऱ्या निश्चयाने ग्रासले. पुन्हा मला त्या इवल्याशा शाळेत नंबर काढण्याची इच्छा झाली. पुन्हा मी अभ्यासाकडे वळलो. परंतु त्यातही अडचणी अनेक येऊ लागल्या. पुस्तकं नसत. वह्या आणण्याची वडिलांची आश्वासने मंत्र्यांच्या आश्वासनासारखी होऊ लागली. पेनच्या निफाला कधीतरी मोडण्याचीच हुकी येऊ लागली. अकरावी संपेपर्यंत चार आण्यापेक्षा जास्त किंमतीचा पेनचा निफ असतो हे मला माहीत नव्हते. अनवाणी फिरणे म्हणजे आमचा दिनक्रमच होता. त्यातही काही वैशिष्ट्यपूर्ण नव्हते. तर अशा परिस्थितीतही मी दोन दिवसांच्या उपाशी माणसाने शिळा उचलण्याचा प्रयत्न करावा तसा मी नंबर काढण्याचा प्रयत्न करू लागलो. परंतु दोन दिवसांचा उपाशी माणूस काम कसा करणार! मी पुन्हा हरलो. आमच्या दोस्ताने (भानुदास बालसराफ) ६८·८ टक्के मार्क मिळविले आणि मी मात्र फक्त ६६·८ टक्के मार्क्स मिळविले. नंबर न आल्याने मला डाचत होते. परंतु दुसरा नंबर आल्याने माझ्या वहिनींनी

पहिला पेढा माझ्या तोंडात घातला. आईकडून न मिळणारे बरेचसे सुख मला माझ्या वहिनींकडून मिळते आहे ह्याचा मला जास्त आनंद वाटतो. तेही आई जिवंत असताना!

असं काट्यांच्या आत असणारं हे माझं जीवन! मला आज आश्चर्य वाटतं ते हे की अशा परिस्थितीत आपण जगलो कसे?

फक्त शिकून मोठं व्हावं, चार रुपये कमवावेत, पोराबाळांना सुखी ठेवावं, अशी माझी आज तरी इच्छा नाही. स्वतः एखाद्या रोगातून उठणाऱ्या माणसाला, दुसऱ्याला तो रोग व्हावा असे कधीच वाटत नाही. तसंच, अगदी तसंच मी ज्या संकटातून आलो, त्या संकटांचा माझ्या भांवडांना स्पर्श होऊ नये असं मला वारंवार वाटतं! म्हणून शहरात एखाद्या नोकरीच्या अधीन होण्यापेक्षा, खेड्यात जाऊन शक्य तितकं आपण आपल्या भावंडांना काळरूपी सर्पापासून दूर ठेवावं वाटतं.

गांधीजींची भावंडं ४५ कोटी होती की जी भारताची लोकसंख्या आहे. आज माझीही भावंडं आहेत ४५ कोटी, खरी आहेत ६० कोटी! परंतु त्यातील १५ कोटी स्वतः पुढे गेली, आम्हाला मागे टाकून! आमचा भाकरीसाठी तळमळणारा आत्मा त्यांना दिसत नाही. झोपडीतील बाळाला दुधाच्या ऐवजी पिठाचं पाणी प्यावं लागतं हे त्यांना त्यांच्या बिल्डिंगमधून दिसत नाही. दिवसभर श्रमाचे काम करून देखील सायंकाळी शिळ्या भाकरीचे तुकडे मिठाबरोर खावे लागतात. मिटक्या मारीत, हे त्यांनी पाहिलं नाही. त्यांनी पाहिलाय रेफ्रिजरेटर, स्कूटर, बंगला, उंची कपडे, अत्तरे वगैरे वगैरे! वाटतं त्यांना ओरडून सांगावं, कानठळ्या बसेपर्यंत ओरडावं,—

"मातीवर चढणे एक नवा थर अंती."

आज माझ्या गावातील मारुती चांभार, ग्यानबा मांग मधू परिट, रखमा महार, दत्तू वडारी सारे डोळ्यांसमोर येतात. माझ्या जीवनात मला कॉलेज तरी पहायला मिळालं पण यांच्या घरी जन्मलेल्या मुलांना हायस्कूलही पहायला मिळतं की नाही कोणास ठाऊक? वयाच्या दहाव्या वर्षी ही पोरं म्हशीमागं पाहिली की जीव गलबलतो. मी स्वतः जनावरे चारीत असतानाचा त्रास आठवतो. त्यांना ते काम सोडायला सांगावं वाटतं. मग त्यांचे आईवडील ओरडतात. "आमच्या भाकरी बाबासायबानी बंद केल्या. आता काम करूनशान प्वॉट तरी भरू द्या. कशाचं शिक्शान? कशाचं काय?"

हे शहर सोडलं म्हणजे अजूनही आपल्याला अन्यायच दिसतो. अजूनही दलित भिकारीच वाटतो. अजूनही समाज अडाणीच वाटतो. अजूनही त्यांच्या वस्त्रांची ताकद अब्रुरक्षणापेक्षा जास्त वाटत नाही. म्हणून खेड्यात जायला हवं! शहरात राहून तुम्ही काही करू शकणार नाही. महाबळेश्वरसारख्या निसर्गरम्य वातावरणात बसून तुम्ही दलितांचे प्रश्न सोडवू शकणार नाहीत. त्यासाठी तुम्हाला स्वतः दलित बनावे लागेल.

असो, लिहिण्याच्या ओघात भलतीकडेच झुकलो. अशा रीतीनं मी एस्. एस्. सी. झालो. आता वाटते खूप शिकावं, परंतु पुन्हा अनेक कारणं पाठीशी धाड घालतात. त्यांच्याशी टकरा देत मी आज शिकत आहे, टकरेमुळे होणाऱ्या जखमेतून येणारे रक्त माझे मीच चाखतो आहे. त्याचा अनुभव घेतो आहे. आज माझे मित्र, शिक्षक माझ्यासाठी झटतात, परंतु एक काळ असा होता अथवा आहे म्हटलं तरी चाल की मला माझं अस्तित्व माहीत नव्हतं. मी माणूस असून जिवंत आहे यापलीकडचं मला काही माहीत नव्हतं!

आजही जर मी गावी गेलो तर कोणी मला साधा नमस्कार करीत नाही आणि मीही कोणाला विचारीत नाही. परंतु पुढं गेल्यावर मागची ऐकू येते, "म्हाराचं प्वार वं, कालीज शिकतंय पुण्यात! प्यापरात नाव आलं व्हतं असं मास्तर म्हन्त्यात बुवा."

**रवींद्र खरात**
प्रथम वर्ष वाणिज्य

■

## मला जात शिकवली जातेय

■

प्रत्येकाला आपल्या जातीचा अभिमान असतो. परंतु मला माझ्या (ब्राह्मण) जातीचा तिरस्कार आहे. आमच्या जातीने आजपर्यंत काय केले! स्वतःच्या स्वार्थासाठी आम्ही आजपर्यंत इतर जातीयांना धर्माच्या खोट्या वचनांचा धाक दाखवून सदैव आमची सेवा करायला लावली; त्यांना सदैव एका विशिष्ट पातळीखाली दाबून ठेवले आणि आज कायद्याचे राज्य असल्याने आमचे हात बांधले गेले आहेत आणि सध्या सरकारने इतर जातीयांना काही सवलती देऊन त्यांना आमच्या बरोबरीने आणण्यासाठी जे प्रयत्न चालवले आहेत त्यामुळे आमचा

जळफळाट होतोय !

माझ्या मुंजीनंतर मला आपली जात, इतरांच्या जाती वगैरे फरक समजावून देण्यात आला. म्हणजे माझ्या घरच्या मंडळींनी हळूहळू जातीविषयी त्यामधील परंपराविषयी सूचनावजा माहिती दिली. कोणाशी जास्त संबंध ठेवावेत, कोणाशी ठेवू नयेत व सध्याच्या आधुनिक काळात इतर जातीयांशी संबंध येतोच तरीही ते कोणत्या विशिष्ट मर्यादेपर्यंत ठेवावयाचे याचे ज्ञान मला त्यावेळी देण्यात आले. परंतु असे का वागायचे ? या माझ्या प्रश्नाला आजपर्यंत तरी कोणीही समाधानकारक उत्तर दिलेले नाही. उलट "नसते प्रश्न विचारू नकोस. सांगितले तेवढेच करीत जा" अशी माझ्या शंकेची संभावना केली गेली.

त्यावेळी घरातील माणसांच्या धाकाने त्यांनी सांगितले तसेच वागावे लागले. व आजही मी पूर्णतः माझ्या कुटुंबियावरच अवलंबून असल्याने घरातील जातिविषयक नियम काही प्रमाणात मला पाळावे लागत आहेत.

परंतु अशा प्रकारे मुलांच्या शंकांना स्वतःजवळ समाधनाकारक उत्तर नसल्याने त्यांना धाक दाखवून स्वतःचे विचार त्यांच्यावर लादल्याने काय होते, याचा विचार या मंडळींनी केला आहे काय ? मुले त्या धाकाने वडीलमंडळींना दाखविण्यापुरते त्या विशिष्ट चौकटीत वावरतात. पण त्यांच्या मनात 'असे का ?' हा प्रश्न कायम जाचत राहतो. हीच मनःस्थिती माझी झाली होती.

परंतु जसजसे मला थोडेफार समजू लागले व जात या विषयावरील काही पुस्तकांमधील लेखन जेव्हा वाचण्यात येऊ लागले, तेव्हा मला माझ्या जातीचे खरे स्वरूप समजले व त्याचवेळी माझ्या जातीची मला घृणा वाटू लागली. माझ्या जातीची व पर्यायाने माझी मलाच लाज वाटू लागली. शाळेतील मित्रालाही माझ्या सारख्याच अशा शंका होत्या.

खरे पाहिले तर माझी जात, जी उच्च समजली जाते, तिच्यापेक्षा इतर जातीयांत किती तरी चांगले गुण आहेत पण आम्हाला ते आम्ही आमच्या डोळ्यांवर प्रतिष्ठेचा बुरखा ओढून घेतल्याने दिसत नाहीयेत. आज आम्ही ज्यांना हलक्या जातीतले म्हणून हिणवतो, त्यांच्यातले दोन अत्यंत चांगले गुण आमच्यात आहेत काय ? एक म्हणजे सेवाभावी वृत्ती व विनम्रपणा आणि दुसरा म्हणजे माणुसकी.

या माझ्या विधानाचा माझ्या अनेक मित्रांना राग आला, व त्यांनी मला 'स्वाभिमानशून्य' व दुसऱ्यांची हांजीहांजी करणारा म्हणून हिणवले. परंतु स्वतःचे दोष दाखवल्यावर कोणाला बरे राग येणार नाही ?

माझे अनेक जातीबांधव स्वतःमधील वरील दोषांवर पांघरूण घालण्यासाठी इतर जातीयांना आपल्यापेक्षा कमी लेखण्याची कारणे देतात. त्यातील काही म्हणजे,

(१) आमचे कूळ त्यांच्यापेक्षा उच्च दर्जाचे आहे.
(२) हलक्या जातीतील लोक अत्यंत अस्वच्छ राहतात.
(३) त्यांची भाषा अशुद्ध असते व त्यांना बुद्धीही कमी असते.

यामधील पहिले कारण महत्त्वाचे आहे. आम्ही इतर जातीयांना आमच्यापेक्षा हलक्या दर्जाचे समजतो याचे कारण काय ? तर ते जो व्यवसाय करतात त्या व्यवसायाचा दर्जा आमच्या व्यवसायाच्या दर्जापेक्षा आम्ही हलका समजला. म्हणजे आम्ही व्यक्तीला महत्त्व न देता त्याच्या व्यवसायास महत्त्व दिले; परंतु आपल्यासारखाच तोही माणूस आहे, याचा विचार केला नाही. तसेच त्यांनाही आमच्या सारख्याच भावना आहेत, याचा आम्हास विसर पडला आणि जोपर्यंत आम्ही माणुसकीशून्य भावनेने व्यक्तीपेक्षा त्याच्या व्यवसायास महत्त्व देत आहोत तोपर्यंत ही उच्च नीचतेची भावना नष्ट होणे अशक्य आहे.

आता ते अस्वच्छ राहतात ही दुसरी बाब. परंतु मुद्दाम अस्वच्छ राहणे कोणास आवडेल ? आणि काही प्रमाणात जर अस्वच्छता असेल तर तो दोष त्यांचा नसून आमचाच आहे. कारण आम्ही त्यांचा व्यवसाय हलक्या दर्जाचा समजून त्यांना त्यांच्या कष्टाप्रमाणे मोबदला न दिल्याने त्यांना दारिद्र्यात रहावे लागते व दारिद्र्य हेच अस्वच्छतेचे प्रमुख कारण होय.

त्यांची भाषा अशुद्ध असते व त्यांना बुद्धी कमी असते, या बाबतीतही असेच म्हणता येईल. आम्ही आमच्या जातीस उच्च ठरवून निरनिराळ्या धार्मिक व वैचारिक ग्रंथांवर आजपर्यंत स्वतःचे प्रभुत्व गाजवले. त्या ज्ञानाचा इतर जातीयांना जराही गंध लागू दिला नाही. मग त्यांनी तुमच्याशी कोणत्या आधारावर बरोबरी करावी? आणि आजपर्यंत आम्ही त्यास शिक्षणाचीही संधी न दिल्याने ते आपल्या बुद्धीची चमक कशी बरे दाखवणार ? आणि शिक्षणाची संधी मिळताच बाबासाहेब आंबेडकर, की ज्यांच्या जातीस आम्ही हलक्या दर्जाची जात म्हणून संबोधतो, त्याच जातीतल्या या माणसाने भारतासारख्या प्रचंड देशाच्या अत्यंत गुंतागुंतीच्या अशा राज्यघटनेची

रचना करून आपले बुद्धिसामर्थ्य दाखवून दिलेच आहे. मग स्वतःला 'उच्च जातीचे' म्हणवून घेणाऱ्यांनो तुमच्यात व त्या इतर जातीयांमधे फरक कोठे व कसा आहे? कोणत्या कारणाने तुम्ही आजपर्यंत त्यांच्यावर अत्याचार केलेत? या अन्यायी वर्तनाबद्दल तुम्ही कोणते प्रायश्चित्त घेण्यास तयार आहात? या प्रश्नांना आमच्याजवळ उत्तरे नाहीत!

आज जरी कायद्याने सर्वांना समान लेखले असले, तरीही अजूनही जातीजातींमधे भेदभाव केलाच जातो. आजही अस्पृश्यांना काही ठिकाणी नव्हे तर बहुतेक सर्वच ठिकाणी विहिरीवर पाणी भरण्याबाबत, देवळातील प्रवेशाबाबत व इतरही अनेक बाबतींत अन्याय सोसावा लागत आहे. परंतु आजही त्यांना कायद्याविषयीचे ज्ञान नसल्याने व गावातील उच्च जातीयांचा त्यांच्यावर अजूनही पगडा असल्याने अशा अन्यायाला जाणूनबुजून तोंड फोडले जात नाही.

तसेच गेली शेकडो वर्षे त्या जातींमधील लोकांना हलक्या दर्जाचे समजल्याने त्या जातीमधील लोकांच्या मनात एक न्यूनगंड निर्माण झाला आहे. त्यांच्यात आजही आत्मविश्वासाचा अभाव दिसून येतो. अनेक दिवस पिंजऱ्यात कोंडलेल्या पक्षास जर एकदम बाहेरच्या मोकळ्या हवेत सोडले तर तो जसा बुजून जातो, त्याप्रमाणे त्यांची स्थिती झाली आहे आणि म्हणून आजही स्वतःस उच्च समजणाऱ्यांची मते ग्राह्य मानायची वृत्ती या लोकांत आहे. आणि म्हणून आजही त्यांना शिक्षण वगैरे घ्यायची इच्छा असूनही घेता येत नाही. म्हणून स्वतःच्या साध्या मूलभूत हक्कांचीही त्यांना जाणीव न झाल्याने ते स्वतःस हलकेच समजतात. हे दुष्ट चक्र असेच चालू राहिले आहे. परंतु या चक्रव्यूहाचा भेद कोणी करावयाचा?

या चक्रव्यूहाचा भेद आम्हा तरुणांनाच करावयाचा आहे. आमच्या या योग्य मतांशी त्यांची मते जुळत असतील अशा मागच्या पिढीतील लोकांचे मार्गदर्शन आम्हास हवेच आहे. परंतु केवळ स्वतःच्या स्वार्थापोटी आमच्या आड येणाऱ्यांची पर्वा करण्याचे आम्हांस कोणतेच कारण नाही.

आजचे जातिनिर्मूलनाबाबतचे सरकारी धोरण योग्यच आहे. त्याची अत्यंत काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. परंतु आजच्या या सरकारी धोरणाशी पूर्णतः विसंगत असा एक प्रकार आजही दिसतो. तो म्हणजे आज कोणत्याही कामासाठी अर्ज करावयाचा असेल तर, किंवा एखाद्या संस्थेत प्रवेश घ्यावयाचा असेल तर अर्जात जात नोंदवावी लागते. तसेच आमच्या शाळेच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावरही "जात" हा वेगळा कॉलम असतो. त्याचे प्रयोजन काय?

तर अशा या आजच्या युवकाच्या मतांची आजच्या बुरसटलेल्या समाजाने 'भरकटलेले विचार', किंवा 'उसळत्या रक्ताचे परिणाम' अशी संभावना केली व त्यामुळे निराश होऊन आम्हा युवकांच्या हातून एखादे प्रक्षोभक कृत्य घडल्यास तो आम्हा युवकांचा दोष नाही, दोष त्या समाजाचा व स्वतःला "उच्च" जातीचे म्हणवून घेणाऱ्यांचाच होईल.

**सुहास देवधर**
पदवीपूर्व कला

■

## मनात सारखा जातीचा प्रश्न

■

वर्डस्वर्थ कवीने आपल्या एका कवितेत म्हटले आहे की, मूल ज्यावेळी लहान असते, तेव्हा ते परमेश्वराच्या सान्निध्यात असते व ते मूल पवित्र असते. त्याच्यामध्ये कोणत्याही वाईट भावना नसतात. त्याला कोणतीही जात अगर धर्म नसतो. परंतु जसजसे मूल मोठे होऊ लागते तसतसे ते परमेश्वरापासून दुरावत जाते कारण त्याच्यावर बाहेरील जगातील बऱ्यावाईट गोष्टींचा संस्कार घडत जातो.

मी महार जातीमध्ये जन्मलो. १ ते ४ वर्षापर्यंत मी अज्ञान होतो. मी पाच वर्षांचा असताना माझी जात काय आहे? माझा धर्म कोणता? या विषयी माझ्या मनात कसलाही विचार नव्हता. असेच एकदा मी लहान असताना माझ्या मित्राबरोबर आमच्या खेडेगावातील महादेवाच्या मंदिरात दर्शनास गेलो. मी व माझ्या मित्राने देवळात जाऊन मनोभावे देवाचे दर्शन घेतले. दर्शन घेऊन बाहेर आलो तोच एक वयस्क बाई माझ्या मित्रास रागाने बोलू लागली, "हरामखोरा! तुला कळत नाही का हा महार जातीचा पोरगा आहे ते? याला देवळात कशाला घेऊन आलास? मेल्या, देवाला बाटविलास का?" तिने माझ्या तोंडावर दोन लाफे लगावले आणि धक्के देऊन बाहेर काढले. मी रडत घरी आलो. मी आईला झालेली सर्व हकिगत सांगितली. मी आईला विचारले, "आई त्या बाईने मला का मारले? महार जात म्हणजे काय ग?

आई ! मला देवाच्या पाया का पडू देत नाही ? मी एका मागून एक प्रश्न विचारीत राहिलो. पण आईने एकही उत्तर दिले नाही. आणि आई रडत म्हणाली "त्या देवळामध्ये जाऊ नकोस." पण मला राहवलं नाही. कारण हे कोडं काय ते मला समजलं नाही. म्हणून मी परत विचारले "का ? देव आपला नाही काय ?" आई म्हणाली, "आपली जात कमी प्रतीची आहे. आपणाला देवळात जाऊन देवाचे दर्शन घेण्याची परवानगी नाही." हे आईचे वाक्य ऐकल्यापासून माझ्या मनात प्रश्न येऊ लागला, 'हे असं का ?' त्या दिवसापासून माझ्या मनात अत्याचारी लोकांविषयी चीड निर्माण होऊ लागली. आणि जात ही काय भानगड आहे ? महार जात काय ? हे प्रश्न मनात येऊ लागले.

काही दिवसांनी मला हळूहळू कळू लागले. या माणसाची जात अमुक आहे, त्या माणसाचा धर्म तमुक आहे, वगैरे जाती विषयी विचार येऊ लागले. मी एकदा वडिलांना म्हणालो, "बाबा आपली जात उच्च कधी होणार ?" तेव्हा बाबा म्हणाले, "बाळ तू मोठा हो. बाबासाहेब आंबेडकरांसारखा शिकून मोठा हो. म्हणजे आपली जात मोठी उच्च होणार."

हे बाबांचे वाक्य ऐकून मी सतत अभ्यास करीत राहिलो. मी वयाच्या पंधराव्या वर्षी नववीत होतो. मी चांगल्या मित्राची संगत करीत असे. परंतु त्या मित्रांच्या घरी जायला घाबरत असे कारण मित्र ब्राह्मण जातीचे असत. एकदा माझा मित्र ब्राह्मण होता तो मला विचारू लागला की, "अरे तू शाखेत येणार का ?" मी म्हटलं, "कसली रे बाबा शाखा ? जशी जात आहे तशी ही काय एक शाखा जात आहे काय ?" त्याने हसून म्हटले, "अरे, शाखा ही काही जात नाही. ही एक राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाखा आहे. आपण सर्व हिंदू धर्मीय एक आहोत. आपणाला आपल्या राष्ट्राची सेवा करावयाची आहे. तू सुद्धा शाखेत ये." हे मित्राचे वाक्य ऐकल्यानंतर जाती विषयी प्रश्न मनातून गेला आणि मी दररोज शाखेत जाऊ लागलो.

एकदा आमच्या शाखेचा कँप होता आणि तो कँप गावापासून पंधरा मैल अंतरावर होता. जिल्ह्यातील सर्व शाखा एकत्र येणार होत्या. त्या दिवशी आम्ही सर्व कँपला गेलो. तेथे सर्व जिल्ह्यांतील शाखा आल्या होत्या. गटागटाचे कार्यक्रम चालले होते. त्यानंतर दुपार झाली. आमच्या सर्वांच्या पोटात भुकेचे कावळे ओरडू लागले. तितक्यात संघनायकाने जेवणाची वेळ झाली असा इशारा दिला. आम्ही सर्वांनी विहिरीवर हात पाय धुतले आणि जेवणाचे डबे घेतले. तोच मला वाईट अनुभव आला. माझे काही मी मी म्हणणारे ब्राह्मण मित्र मला जवळ जेवायला न बोलावता ग्रुपने जेऊ लागले. मला या गोष्टीविषयी चीड निर्माण झाली.

माझे आजपर्यंत पुष्कळ जातीच्या मित्रांमध्ये वावरणे झाले. माझे खूप मित्र माझ्याबरोबर चांगल्या प्रकारे वागतात. खेळीमेळीने राहतात. जेवते वेळी आपल्याबरोबर जेवायला बसवतील; आपली भाजी देतील; परंतु माझी घेण्यास नाकारतात. कारण त्यांच्या डोक्यात जातीचे भूत आहे.

हे जग कृतीविना वाचाळ आहे. देवाने सर्वांना सतत लहान मुलांच्या जन्माला घालावे म्हणजे आम्ही देवाच्या सहवासात राहू. आम्हांला जातीधर्माचे भूत लागणार नाही. आम्ही मनाने पवित्र राहू व एक मानव जात म्हणून राहू.

**अर्जुन भिंगारदिवे**
पदवीपूर्व कला

■

## भारतीय नागरिकाची जात सुटत नाही

■

आजकाल आपण जातीसंबंधी बरेच ऐकतो. तसेच प्रत्येक जातीला आपापल्या जातीचा अभिमान असतो. भारतीय समाजात अनेक जाती दिसून येतात. जातीजाती मध्येही पोटजाती दिसून येतात.

आपल्या समाजात मुख्यतः मराठा, ब्राह्मण, सोनार, धनगर, कासार, तेली, वाणी, चांभार, न्हावी, सुतार इत्यादी जाती आपल्याला आढळतात. जाती व पोटजाती मिळून भारतात सुमारे तीन ते साडेतीन हजार जाती असाव्यात असा अंदाज आहे.

प्रत्येक जातीचे काही नियम व काही बंधने असतात. साधारणपणे प्रत्येक जातीमध्ये असा एक कॉमन नियम असतो की प्रत्येक जातीने आपल्याच जातीत लग्न करावे. परंतु आता सर्वसाधारणपणे हा नियम पाळला जात नाही.

भारतीय नागरिक म्हटला म्हणजे तो कोणत्या तरी जातीत व त्या जातीच्या एखाद्या पोट जातीत मोडत असतो. त्यामुळे मीही एक भारताचा नागरिक असल्यामुळे मलाही जात व पोटजात चिकटलेली आहे. माझी जात मराठा होय. ब्राह्मण, मराठा अशा जाती ऐकावयास

ऱ्या वाटतात. परंतु मला तर इतर जातींबद्दल अभिमान वाटतो. याचे हेही कारण असू शकेल की मी लहानापासून मोठा हा इतर जातीतील मुलांबरोबर झालो. माझे जवळ जवळ सर्वच मित्र जातीबाहेरील असे आहेत. त्यातल्या त्यात मला आपल्यापेक्षा खालच्या दर्जाच्या जातीचा जास्तच आदर वाटतो. कारण कोणत्या जातीत जन्म घ्यावा हे काही मानवाच्या हातात नाही. त्यामुळे आपल्यापेक्षा खालच्या दर्जाच्या जातीच्या मित्राची टिंगल केलेली मला सहन होत नाही.

असाच माझा एक मित्र आहे. त्याची जात विचाराल तर मलाच सांगण्यास लाज वाटते. परंतु हा चांभार या जातीचा आहे. परंतु तो नेहमीच माझ्याबरोबर असतो. त्यामुळे प्रथम प्रथम मला घरून सूचना मिळत की, तू दोस्ती कर परंतु एखाद्या चांगल्या जातीच्या मुलाबरोबर कर. लहानपणीच असे संस्कार होणे म्हणजे त्या घरातील आई-वडील हे अशिक्षितच की !

ज्या घरात मुलींना जास्त दाब किंवा वचक असतो त्याच घरातील मुली जास्तीत जास्त पळून जातात. त्या प्रमाणे माझ्यावर जास्त दडपण ठेवण्यात आल्यामुळे मी या विषयात लक्ष घालू लागलो.

आमच्या जातीव्यवस्थेमध्ये बरेच असे नियम आहेत. परंतु हे नियम माझ्याकडून लहानपणापासून मोडत आले. एक म्हणजे, मटन वर्ज्य. तसेच इतर जातीतील म्हणजे खालच्या जातीतील मुलांबरोबर फिरवयाचे नाही. यामुळे माझ्या मनात याविरुद्ध विचार येऊ लागले व मी त्या चांभार व इतर मुलांबरोबर फिरू लागलो. हळू हळू घरची बंधने शिथील होऊ लागली.

जातीव्यवस्था फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. कारण ज्ञानेश्वरांनाही जातीतून वाळीत टाकण्याचा पुरावा आहे. तसेच अनेक संतमंडळींमध्येही जाती जाती दिसून येतात या नष्ट करण्यासाठी अनेक संतमंडळींनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली परंतु ही जातीव्यवस्था दूर झाली नाही.

माझा एक शालेय जीवनातला जातीवरून अनुभव आला तो असा. मी व माझा मित्र एस्. एस्. सी. पास झाल्यानंतर उच्च शिक्षण घ्यावे असे म्हणू लागलो. परंतु माझा मित्र चांभार असल्यामुळे म्हणा किंवा पुढील शिक्षण घेणार नाही या कारणाने कोठे तरी नोकरी शोधत फिरू लागला. एके ठिकाणी त्याच्या मुलाखतीच्या वेळेस जातीचा उल्लेख झाला. तेव्हा त्यास स्पष्ट सांगण्यात आले की चांभाराने चांभारकीच करावी. नोकरी कशासाठी ?

त्यावेळी मित्राला काय वाटले असेल ? परंतु मला मात्र या जातीव्यवस्थेचा भयंकर राग आला होता की, मोठमोठे पुढारी जातीवर मोठमोठाली भाषणे देतात, की सर्वांना समान संधी मिळावयास हवी परंतु प्रत्यक्षात त्याच्याच घरी काय असते ?

तसेच जातीजातीत नेहमीच भांडणे असतात. याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे ज्या वेळेस माझ्या भावाने बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेत एखादी चांगली जागा मिळावी म्हणून अर्ज केला होता व जेव्हा मुलाखत झाली तेव्हा तर माझ्या मनातल्या जातीच्या रागाचा कळस झाला. कारण त्याला इंटरव्ह्यूमध्ये प्रथम जात विचारली व स्पष्ट सांगण्यात आले की, "तुम्ही या जागेस पात्र नाही. तुम्ही या बँकेत शिपायाच्या जागेसाठी अर्ज करा. शेवटी असे समजले की येथे फक्त ब्राह्मणांनाच प्रवेश आहे.

यावरून असे दिसून येते की जाती जातीमध्ये सारखे संघर्ष चालू आहेत व ते मिटवण्याचे प्रयत्नही फार पूर्वीपासून करण्यात आले आहेत. कारण संत मंडळींनीही तेच सांगितले आहे व राजाराम मोहन रॉय, म. गांधी आगरकर, म. फुले वगैरेंनी जाती नष्ट करण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले, चळवळी केल्या. परंतु त्याचा काही एक काडीमात्र उपयोग झाला नाही.

तसे मी कितीही लिहू लागलो, पुढाऱ्यांवर टीका करू लागलो तरी शेवटी **मी एक भारतीय नागरिक आहे व भारतीय नागरिक असल्यामुळे माझी जात ही मला सोडता येणार नाही. तसेच ती सुटणारही नाही** हे मला पूर्णपणे ठाऊक आहे व हे जगात चालूच राहाणार आहे. जोपर्यंत जातीय दंगली, जातीजातीतील वैमनस्य दूर होत नाही, तोपर्यंत एकसंध समाजनिर्मिती होणे शक्य नाही.

**निवृत्ती दांगट**
पदवी पूर्व कला

■

# हीन मानल्याचा अनुभव आला नाही

■

मानवाने जन्म कोणत्या जातीत घ्यावा व कोणत्या जातीत घेऊ नये याविषयीचे कोणतेही स्वातंत्र्य मानवाला नाही. कारण ते जर आपल्या हातात असते तर बहुतेक कनिष्ठ जातीची मंडळी अस्तित्वात राहिलीच नसती. बरे असो.

मी स्वतः मागासलेल्या जातीची आहे. प्रथम प्रथम म्हणजे जेव्हा मी प्राथमिक शिक्षण घेत होते, तेव्हा मला अधूनमधून 'तू कोणत्या जातीची?' हा प्रश्न कित्येक विद्यार्थिनींनी विचारला होता. त्यावर मी त्यांना दिलेले उत्तर आठवून मला अद्यापही हसावयास येते. कारण मी त्यांना असे उत्तर दिले होते की, 'अग! तुम्ही कित्ती वेड्या. माझी जात मुलगी आहे हे मी तुम्हाला सांगायला पाहिजे का?' असं उत्तर ऐकून काही मुली हसल्या. त्या हसण्याचा रोख मला फारच उशिरा कळाला. पण जसजशी मी मोठी होऊ लागले तसतसा हा प्रश्न मला सतत भेडसावू लागला. म्हणून मी एकदा घरी येऊन ह्या प्रश्नाचे उत्तर आईवडिलांना विचारले. मग तेव्हा मला माझ्या जातीचा खुलासा झाला.

हळूहळू कालांतराने माझे असे ठाम मत झाले की एखादी जात अगर व्यक्ती जाणून घेण्यायोग्यतेची असेल तर जरूर जाणून घ्यावी. बहुतेक ह्या माझ्या मताप्रमाणे मी वागल्यामुळेच प्रत्यक्षात अद्याप तरी मला कधी मी अस्पृश्य जातीची आहे म्हणून अवहेलना सहन करावी लागली नाही. मी शाळेत असल्यापासून माझी निरनिराळ्या जातींतील मुलींशी मैत्री आहे. साधी मैत्री करतानाही मला वाईट प्रत्यय आला नाही. माझी एक मराठा मैत्रीण तर पहिली पासून माझी मैत्रीण आहे. अद्याप आमची मैत्री टिकून आहे.

चांगले विचार फार काळ टिकत नाहीत म्हणून त्यांचा प्रभाव असेपर्यंतच माणसाने चांगली कामे उरकून घेतली पाहिजेत. ह्याचा प्रत्यय आमच्या आईवडिलांना असल्यामुळे लहानपणीच चांगले संस्कार त्यांनी आमच्या मनावर घडविले. असे म्हणण्यास हरकत नाही.

आमच्या जातीतल्या लोकांचे म्हणणे असे आहे की, इतर वरिष्ठ जातीतील लोक आम्हांला समजावून घेत नाहीत. पण प्रत्यक्षात मी माझ्या आजपर्यंतच्या अनुभवावरून असं म्हणेन की जर त्या जातीतील लोकांशी आपण सरळमार्गी स्पष्ट बोललो. तर ते आपल्याला समजावून घेऊन चूक कुठे आहे ते समजावून देतात. पण त्याकरता आपणहून पुढं जावं लागत. स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही हे काही खोटे नाही. पुढं जाऊन चुका समजावून घेऊन दुरुस्त करावयास हव्यात व हे करण्यासाठी धाडस लागतं. ते आमच्या अस्पृश्य जातीतील लोक करू शकत नाहीत 'मी अस्पृश्य जातीतला आहे. स्पृश्य जातीतल्याशी कसा बोलू?' असं म्हणत राहतात. त्यामुळे ते मागं मागं रहातात. अन मग ते शेवटी स्वतःचा राग दुसऱ्याच्या मस्तकावर आदळतात झालं.

हल्ली स्पृश्य, अस्पृश्य हा प्रकार जवळजवळ नाहीसा झाला आहे. उदा :—जातीने चांभार असलेल्याला साधा एक खिळाही चप्पलला ठोकता येत नाही. बरं असो. ज्याप्रमाणे अखंड यशाने आपल्याला जीवनाची केवळ एकच बाजू कळते, दुसरी बाजू कळायची असेल तर त्यास अपयश हे हवेच, त्याप्रमाणे ह्याबाबतीतही तसे अनुभव यावयास हवेत. प्रत्यक्षात ते अजून मला फारशा प्रमाणात आले नाहीत.

मी कॉलेजमध्ये ॲडमिशन घेण्याकरता म्हणून मामलेदाराचं कास्ट सर्टिफिकेट आणावयाला गेले होते. तर त्यावेळी सर्टिफिकेट घेतल्यावर जाताना तेथील गडी म्हणाला की, प्रत्येकांनी प्रत्येक सर्टिफिकेटाच्या मागे २/२ रुपये द्या. मी त्यांना हे पैसे का द्यायचे म्हणून विचारले तेव्हा तो ओरडला की "सगळे साले फुकट घेतात अन् सर्टिफिकेटसाठी २ रुपये द्यावयास जिवावर येतं होय!" अशा प्रकारची बोलणी ऐकून घ्यावी लागतात. म्हणून इतर विद्यार्थ्यांनी २/२ रुपये दिले व निघून गेले. पण मी मात्र ते पैसे कशाकरता द्यावयाचे हे जाणून घेण्याची इच्छा प्रकट केली व मी परत मामलेदारांकडे निघाले. तेव्हा मला त्या गड्याने आत जाऊ दिले नाही व तुम्ही पैसे देऊ नका, आता घरी जा, असे सांगितले. त्यामुळे मी काहीच करू शकले नाही. मुकाट्याने घरी आले. पण खरं हा आम्हा लोकांवर अन्याय आहे. केवळ खालच्या जातीचे व जवळ धाडस नाही म्हणून का हे अन्याय सहन करावेत. केवळ जात ही पुरातन काळापासून मानवाला जळूसारखी चिकटलेली आहे म्हणून आपणही जातीला चिटकून का राहायचे? धाडस करून बोलायला पाहिजे. म्हणजे आपल्याला स्वतःचे हक्क मागून घेता येतील. कर्तव्य केल्यावर हक्क मागणे हा प्रत्येक मानवाचा जन्मसिद्ध हक्क आहे, असं माझं मत आहे.

प्रत्यक्ष व्यवहारातही कधी मला मी मागासलेल्या वर्गाच्या जातीची आहे म्हणून हीन मानल्याचा प्रकार झाला नाही. पण इतर जनतेच्या बोलण्यावरून काही उदाहरणे मात्र तशी असलेली दिसतात. पण आम्हा मागासलेल्या वर्गाच्या जातीत वारंवार आपापसात भांडणे व हेवेदावे मात्र भरपूर असतात. कारण पशूंना द्रव्याची इच्छा नसते पण तीच इच्छा मनुष्याला पशु बनवते हे त्यांना उमगत नाही. शिवाय त्यांना हेही माहीत नसतं की

ऐकल्यानं शहाणपण येतं नि बोलण्यानं पश्चात्ताप होतो. कारण शहाणपणाचं भांडवल उपयोगी पडतं, पण ते पुरेसं नसतं. ह्याला काही प्रमाणात अपवादही आहेत म्हणा ! पण...

आमच्या जातीतील लोकांना श्रम न करता जगणं हा एक गुन्हा वाटतो. कारण त्यांना लहानपणापासून तसे संस्कार झालेले असतात व लहानपणापासूनच कामाची सवय असते. तर स्पृश्य जातीतील लोक कमीत कमी श्रमात जास्तीत जास्त पैसा कसा मिळेल ते पाहतात.

**अन आमच्या जातीतील लोकांना वाटत की देवानं सर्व दुःखं अस्पृश्यानाच दिली आहेत** पण मी ते मानणारी नाही. कारण या जगात दुःख मनुष्याच्या पाचवीला पुजलेलं आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात ते निरनिराळी रूपं घेऊन येतं. स्वप्नभंग हा माणसाचा कायमचाच सोबती आहे. त्याचप्रमाणे स्पृश्य जातीतील लोक आमच्या जातीतील लोकांवर निरनिराळे आरोप ठेवतात व ते बहुतेक खरेही असतात. पण गरीबीमुळं माणूस मिंधा बनतो. हे मिंधेपण त्याची जीभ कापून टाकते व त्याला पापाशी तडजोड करायला लावते. हे त्यांना परिस्थिती करावयास लावते. मात्र हे इतर जातींच्या लोकांच्या लक्षात येत नाही.

माझ्या मते जगात दोन जाती आहेत; एक मनस्वी मनाची व दुसरी मुर्दाड मनाची. मुर्दाड माणसं अष्टौप्रहर जगण्याची केविलवाणी धडपड करीत राहतात अन् मनस्वी मनाची माणसं तशी नसतात. मानानं नि अभिमानानं जगता आलं तरच ती जगतात. त्याचप्रमाणे अनुक्रमे अस्पृश्य व स्पृश्य या जातीतील फरक आहे. पण हल्ली तो फारच कमी प्रमाणात आढळतो. बरं असो.

स्पृश्यांशी वागताना अस्पृश्याने विस्तवाशी वागतो तसे वागावे कारण अतिजवळ गेल्यास होरपळण्याचा संभव असतो त्याचप्रमाणे अति दूर राहिल्यास शेक मिळण्याचा संभव नसतो. **म्हणूनच मी या मताची आहे की स्पृशाशी वागताना अस्पृश्याने विस्तवाशी वागतो तसे वागावे.**

सरतेशेवटी आयुष्यात ज्याला त्याला आपापल्या पाऊलवाटेनं पुढे जाण्यास मार्ग मोकळा असतोच म्हणा !

**मीनाक्षी येडुरे**
पदवीपूर्व कला

---

## प्रेरणा

**तुझ्याभोवती घुटमळताना**
**कविता माझी फुलली होती**
**तुझ्याच शब्दाभोवती तेव्हा**
**माळ लयाची झाली होती**
**तुझी प्रेरणा तुझीच इच्छा**
**माझ्या शब्दातुनि प्रकटते**
**माझ्याभोवती तू नसताना**
**प्रतिभा माझी सदैव रुसते**
**कितिक काव्ये केली आणि**
**कितिक ओठी विरुन गेली**
**तुझ्यावाचून कुणास सांगू ?**
**किती आसवे वाहुन गेली.**

**नेमिचंद कासवा**
बारावी शास्त्र

## बालवधू

**रानात वनात गाय-गुरे चरतात**
**हिरव्या हिरव्या गवतात काय रमतात !**
**सखे त्यांचे गुराखी पाठोपाठ येतात**
**काय काय खेळ ते खेळती आनंदात.**
**उसाच्या मोठ्या घनगर्द रानात**
**सुळसुळ पाने सळसळतात**
**वाऱ्याला पाहून खसखसतात**
**की कुणाला पाहून ती हसतात ?**
**पहा ही बालवधू दिसे त्या पानात**
**लपून का बसलीय ती हिरव्या रंगात !**
**केसांवर तिच्या किरण चमकतात**
**हळूच भास्कर हसतोय गालांत.**

**विलास दुत्रे**
बारावी कला

# ब्राह्मणकन्या

**कविता कर्वे**
तृतीय वर्ष कला

'ब्राह्मणकन्या' ही डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांची सर्वोत्तम कादंबरी. पुण्यातील एका स्थानिक घटनेचे समाज शास्त्रीय व्यापक स्वरूप वाचकांच्या पूर्णपणे लक्षात यावे इतक्याच व्यक्ती व घटनांच्या सहाय्याने डॉ. केतकरांनी ह्याचे कथानक उभारले आहे. 'ब्राह्मणकन्या' ह्या नावातच संपूर्ण व्यापक परंतु दुर्लक्षिल्या गेलेल्या एका प्रश्नाचा धागा सापडतो. कालिंदी ही एक सुशिक्षित देखणी तरुणी; एका अविवाहित स्त्रीची नात व ब्राह्मण, भित्र्या परन्तु 'सुधारक' अशा पित्याची लेक; हिचा 'विवाह' ही ह्या कादंबरीची मध्यवर्ती घटना तसे पाहता ह्या घटनेचे व्यापक गुंतागुंतीचे स्वरूप आपल्या लक्षात येत नाही परंतु केतकरांमधील 'समाजशास्त्रज्ञ' हळूहळू जातिसंस्था, कुटुंबसंस्था, सामाजिक प्रतिष्ठा इत्यादी अनेक अंतर्भूत प्रश्नांशी आपला परिचय करून देतो.

आपले विचार समाजापर्यंत नेऊन पोहोचविण्यासाठी ह्या प्रभावी माध्यमाचा केतकरांनी उपयोग केल्यामुळे, ह्या कादंबरीची रचना व तंत्र ह्यांनी थोडे वेगळे स्वरूप धारण केले आहे. त्यांचा मूळ उद्देश सामाजिक अवलोकनाच्या सूक्ष्म व जटिल समस्येपर्यंत मराठी वाचकाला नेण्याचा आहे. केतकर कादंबरीकडे भावनेपेक्षा वैचारिक अंगाने पाहतात हे लक्षात येते. त्यामुळे काही ठिकाणी कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे भान ठेवून केतकर ब्राह्मण-कन्या लिहीत असले तरी त्यांच्यातला 'ज्ञानकोशकार' व समाजचिंतक या कादंबरीत सतत डोकावत राहतो. परंतु समाजातील एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे केतकर वळले असल्याने त्यांच्यामधील 'समाजशास्त्रज्ञ' जागा होणे जसे साहजिकच आहे, तसेच त्यामुळे मराठी कादंबरीला वेगळे परिमाण प्राप्त झाले, हेही खरे आहे!

अनौरस संतती अनुलोम प्रतिलोम विवाहातून झालेली संतती, व अशा संततीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण व त्यामुळे त्यांच्या आयुष्याची होणारी शोकांतिका ह्याचाच केतकरांनी प्रामुख्याने मागोवा घेतला आहे. एक ब्राह्मण अनौरस संततीशी विवाह करतो ह्याला केतकरांचे मन अनुकूल नाही असे नाही, परंतु ते समाज-शास्त्राचे गाढे पंडित असल्यामुळे, त्यांना समाजाच्या कुत्सित अंतरंगात शिरावयाची जी शक्ती होती त्यामुळे त्यामागचे प्रश्न व समाजाच्या प्रतिक्रिया त्यांना भेडसावीत राहातात. समाज भावनिक समजुतींना व त्या भरात केलेल्या लैंगिक संबंधांना समाजात कसलेही स्थान देत नाही. तो केवळ निखळ व्यवहारच बघतो. चिंतोपंतांची सर्व संपत्ती ही वारसाहक्काने त्यांच्या औरस मुलांकडे जाते व त्यांच्या अनौरस मुलीला शांतीला काहीच मिळत नाही ह्याचे आप्पासाहेबांना व शांताबाईंना अतोनात दुःख होते. येथेच केतकरांनी व्यवहार व ध्येयवाद ह्यातील फरक दाखवून दिला आहे. जातिभेद मोडणाऱ्या माणसांची अखेर शोकांतिकाच होते. जातिभेद मोडण्याचा प्रयत्न असा एकट्यादुकट्याने केला तर त्याचाच घात होतो. जातिभेद मोडण्यासाठी एक संघटना, विशिष्ट विचार यांची आवश्यकता असते, अन्यथा ते खालच्या 'अकरमासे, विदूर' ह्याच जातीत भर घालतात. शिवशरण अप्पाच्या अधःपतनातून किंवा अयशस्वी व्यापारावरून हेच लक्षात येते. कालिंदीची आजी मंजुळा, एक शाळामास्तरीण, लग्न न करता एका प्रतिष्ठित माणसाजवळ रहाते, येथेच या संघर्षाचे, कालिंदीच्या गृहत्यागाचे, बीज पडल्याचे आपल्या लक्षात येते. समाज अशा व्यक्तींकडे कोणत्या दृष्टिकोणातून पाहातो? समाज आपली चौकट सोडायला कधीच तयार नसतो. अशा वेळी प्रतिष्ठा किंवा पैसा यांचा प्रश्न नसून तो समाजाच्या मान-मान्यतेचा प्रश्न असतो. याच प्रतिष्ठे-पायी आपण आपल्या मुलीच्या आयुष्याचे नुकसान करीत आहोत हे अप्पासाहेब यांच्या लक्षात येत नाही. कालिंदी

मात्र आपणास ब्राह्मण वर्गात कधीच स्थान मिळणार नाही हे जाणून असते. एके ठिकाणी ती सत्यव्रताला स्पष्ट-पणे सांगते ' विवाह केला तरीदेखील आपली संतती जर अकरमाशांच्या वर्गातच जाणार आहे, तर विवाहाच्या बंधनाची तरी काय आवश्यकता आहे ? ' अविवाहित मातृत्व ही लज्जास्पद गोष्ट नाही हे कालिंदी व रामराव यांच्या चर्चेवरून लक्षात येते. कालिंदीने हे मातृत्व केवळ शरीराच्या भूकेपायी पत्करलेले नसून त्यामागे एक नवी विचारसरणी आहे. मातृत्वाकडे पहाण्याचा एक नवा दृष्टिकोण केतकर आपल्याला देतात.

विषम विवाहात काही मोठे प्रश्न निर्माण होतात. शांतीने ब्राह्मणासारखे वागावे ही अप्पासाहेबांची इच्छा असते. पण त्यामुळे पत्नीच्या मनावर होणाऱ्या अन्यायाकडे त्यांचे लक्ष कधीच जात नाही. अशा विवाहांमुळे उलट काही नवेच प्रश्न निर्माण होतात. प्रश्न केवळ सुटतच नाहीत तर गुंततच जातात. ह्या वास्तवतेकडे केतकरांनी आपले लक्ष वेधले आहे.

सुधारक ' सुधारणेच्या भरात ' लग्न करतात. पण त्यामागची परिस्थिती, घटना स्वीकारावयास तयार नसतात. स्वार्थापायी उद्धार करणाऱ्या माणसांकडून सुधारणा होत नाही. त्याला समाजकार्याने वैचारिक पातळीवर प्रेरित झालेल्या व्यक्तींचीच गरज असते. ध्येय-वादी रामराव व व्यवहारी कालिंदी एकत्र आल्यानंतर त्यांच्या मनातील विचार हे वास्तवलक्षी असल्याचे जाणवते. अनेक सामाजिक विषय व कामगारजीवन ह्यावर त्यांची जी चर्चा होते, त्या चर्चेतून केतकरांची सूक्ष्म व समर्थ अवलोकनशक्ती आपले अस्तित्व सतत दर्शविते. रामरावाच्या ध्येयवादास पूर्णता येते ती कालिंदीच्या व्यवहारीपणामुळेच.

आई, वडील, बहीण, भाऊ ह्यांच्या तसेच, एसतेर–कालिंदी ह्यांच्याही चर्चेतून केतकरांनी सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकलेला आहे. ' कालिंदीच्या शोकान्तिकेची बातमी अद्याप रास्तापेठेत जाऊन पोहोचली नव्हती ' असे विधान करताना केतकर सूचकपणे आपल्या जातीतच दंग व तेवढ्यापुरतेच मर्यादित असणारे लोक दाखवितात. तसेच रास्ता पेठेतील बेने-इस्रायली जमातीच्या लोकांचा इतर पुण्यातील लोकांचा अजिबात नसलेला संबंधही जातिभेदाच्या तीव्रतेवर प्रकाश टाकतो. प्रतिष्ठेच्या पायी जवळचे नातेवाइक उपयोगी पडत नाहीत तर एसतेर-सारखी दुसऱ्या जातीतील मुलगीच कालिंदीच्या मदतीस येते !

सर्वसामान्य सामाजिक चौकट मोडल्यामुळे आयुष्याला मिळणारी निराळीच गती व त्या आयुष्यक्रमाचे चित्रण करून केतकर कादंबरीच्या उत्तरार्धात त्यावर काही तोडगा सुचवितात. ' वैजनाथ-स्मृती 'च्या रूपाने केतकरां-मधील समाजशास्त्रज्ञ प्रभावीपणे आपली बाजू मांडताना दिसतो. समाजातील काही बिकट प्रश्नांचा त्यांनी केलेला सखोल अभ्यास व सूक्ष्म अवलोकनान्ती काढलेले निर्णय व तोडगे त्यांच्या विद्वत्तेची साक्ष देतात. वैजनाथ शास्त्र्यांकडे आप्पासाहेब व सत्यव्रत ह्या प्रश्नावर काही चर्चा करतात. ही चर्चा ' वैजनाथ–स्मृती ' म्हणून मांडली आहे. स्मृतीकार हा समाजाला स्थैर्य प्राप्त करून देणारा असतो. ( मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती इ. ) सामाजिक गरजांच्या अनुषंगाने तो समाजावर बंधने घालतो, समाजाला वळण लावतो. विवाहबाह्य किंवा आंतरजातीय विवाहसंबंधाने झालेली संतती ही कोठल्यातरी जातीत समाविष्ट झाली पाहिजे व तिला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असा विचार त्यांच्या चर्चेतून निष्पन्न होतो. हा मार्ग ' ऋषिमंडळ ' ह्या नव्या जातीच्या निर्माण होण्यानेच केतकरांना सापडलेला दिसतो. स्त्री-पुरुषांच्या व्यवहार–नियमाचे शास्त्र, धर्म-शास्त्र, ह्या नीतिकल्पना अतिशय मागासलेल्या आहेत. हिंदू धर्माचे हे शास्त्र मानवाच्या सुखदुःखाच्या मूळावरच आघात करते, असे केतकर दाखवून देतात. विवाह हे एक सामाजिक बंधन आहे पण त्याहीपेक्षा मानसिक बंधन हे उच्च पातळीवरचे व अधिक महत्त्वाचे आहे. विवाह हे केवळ एक नियंत्रण आहे. त्याने मने घडत तर नाहीतच, उलट अनेक वेळा अशा काही प्रश्नांनी ती तुटण्याचाच अधिक संभव असतो. हे केतकरांनी चिंतोपंत-मंजुळा, आप्पासाहेब–शांताबाई, कालिंदी-शिवशरणअप्पा-रामराव ह्या पात्रांच्या कथानकांच्या साहाय्याने सिद्ध केलेले आहे. कायद्याखेरीज माणसें नीट वागत नाहीत हे जरी खरे असले तरी हिंदू समाजातील तीव्र जातीभेद व जुन्या कल्पना यांनी अशा संततीची विनाकारणच ससेहोलपट कशी होते ह्याचे चित्रण ह्या कादंबरीत आहे.

केतकरांनी ह्या कादंबरीत नवे रचनातंत्र अवलंबिले आहे, हे खरे. तरी त्यांच्यावर जो ' अकलात्मते 'चा आरोप होतो तो योग्य वाटत नाही. येथे एकाच सूत्राचा विचार वेगवेगळ्या अंगांनी, उपकथानकांनी व पात्रांच्या साहाय्याने त्यांनी केलेला दिसतो. एकाच कथानकाला प्रधानत्व देऊन बाकीच्यांना गौणत्व देणे असा प्रकार येथे नाही. सर्वच कथा-उपकथानकांना त्यांनी सारखेच महत्त्व दिले

आहे. तीच गोष्ट पात्रांच्या बाबतीत आहे. यातील एखादे पात्र वगळायचे म्हटले तरी ते शक्य होणार नाही इतकी सर्व पात्रे ह्या कादंबरीच्या कथानकाशी एकरूप झालेली आहेत. 'व्यापक प्रश्नांची ज्वलंत चर्चा' हाच ह्या कादंबरीचा वेगळेपणा व विशेष आहे. विवाहविषयक काही जटिल प्रश्नांचे दर्शन घडले आहे. हिंदुसमाजांतर्गत विवाह-विषयक प्रश्नांच्या कचाट्यात सापडलेल्यांचे वास्तव व प्रखर दर्शन केतकर आपल्याला या कादंबरीच्या साहाय्याने घडवितात.

व्यापक सामाजिक अवलोकनातून नजरेस आलेल्या गोष्टी नमूद करण्याचा मोह केतकरांना आवरत नाही व त्यामुळे ते निबंधवजा विवेचन गंभीरलेखनशैलीच्या साहाय्याने करतात ही गोष्ट मात्र खटकते. व्यक्तिचित्र रेखाटताना चर्चा करण्याचा मोहही ते आवरू शकत नाहीत. मांडणीच्या दृष्टीने सुसूत्रता व आकर्षकता ह्यात निश्चितच आहे. जीवनविषयक अत्यंत प्रगल्भ अशा जाणीवेचा अभाव तोपर्यंत मराठीत कादंबरीत होता, परंतु केतकरांनी त्याचा सखोल अभ्यास केल्याची जाणीव कादंबरी वाचताना पदोपदी होते. 'लक्षात रहावे असे व्यक्तिमत्त्व म्हणजे केतकर' हे अ. ना. देशपांडे यांनी त्यांच्याविषयी काढलेले उद्गार, व 'फार मोठा कादंबरीकार होण्याची संधी केतकरांना होती पण त्यांनी ती संधी हुकविली' असे प्रा. नरहर कुरुंदकर यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया ह्या दोन्ही टीका त्यांच्या या कादंबरीचे महत्त्व पटवून देतात. त्यांच्या लेखन कादंबरी पद्धतीबद्दल फार मोठे असमाधान असतानाही त्यांच्या मोठेपणाची जाणीव सतत होत रहाते, यातच त्यांच्या यशाचे मर्म आहे हे निश्चित.

## अक्षर–मॉडर्न

इथल्या पावलांना वाटा नाहीत, फक्त ढासळत्या वेशी बंधनाच्या...!
उन्हात आसवं वाळल्यावर जन्मणाऱ्या कळा स्वप्नांच्या...!

या ओळी आणि त्यातील भावनांचा कल्लोळ अनुभवताना एक प्रकारचा अभिमान वाटत होता. या ओळी आहेत **वासंती इनामदार** हिच्या. राज्य पुरस्कार विजेती अशी ही आमच्या कॉलेजची विद्यार्थिनी कवयित्री. अनेक भावमधुर कविता आणि काही कादंबऱ्या वासंतीने लिहिल्या आहेत. मनाचा सहज निरागसपणाही तिच्या बालगीतांतून सुंदर प्रगटला आहे.

आता बालगीतांकडे वळलेल्या हजारांवर कविता दिवाळी अंकातून व इतरत्र प्रसिद्ध झालेल्या आणि 'अबोलीची नक्षी' रेखाटणाऱ्या आमच्या माजी विद्यार्थि-लेखकाने, '**कल्याण इनामदार**' याने, तर प्रथितयश कवी म्हणून मान्यता मिळविली आहे. नुकतेच त्याचे 'अडघम् पडघम्' आणि 'गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या' हे मुलांना खरच गिरकी घ्यायला लावणारे दोन सुंदर बडबडगीतसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

'साधना ठोके' या नावाने लेखन करणारी आमची आणखी एक विद्यार्थिनी म्हणजे **भानुमती ठोके** मासिकांतून, नियतकालिकांतून तिच्या कविता प्रसिद्ध होत असतात. नवोदित कवींच्या कविता असलेल्या 'अंकुर' आणि 'स्वप्नजल्लोष' या दोन संग्रहात तिच्या कविता समाविष्ट आहेत.

कॉलेजमधील युवकांनी केलेल्या विविध उपक्रमांचे जवळून निरीक्षण करून सगळ्यांनाच त्या घडामोडींबद्दल जागरूक राहण्यास मदत करणारा, 'युवक-विश्व' या सदरात सातत्याने लेखन करणारा आमचा विद्यार्थि-लेखक **मुकुंद संगोराम** याचे आजपर्यंत जवळ जवळ १२५ लेख प्रसिद्ध झालेले आहेत व त्याचे लेखन अधिकाधिक लोभस, सखोल होत आहे.

**रवीन्द्र खराब** हा कॉलेजला ज्याचा अभिमान वाटावा असा आणखी एक लेखक. सुगावा, होरा या नियतकालिकांमधून कथालेखन करतो. नेमके व नीटस लेखन करणाऱ्या या विद्यार्थ्याने युवकमहोत्सवात प्रथम क्रमांक पटकविणाऱ्या आपल्या कॉलेजच्या 'प्रतिज्ञा' या एकांकिकेच्या निर्मितीतही हातभार लावला आहे.

अभिनयाच्या क्षेत्रात क्रियाशील असलेली आमची विद्यार्थिनी **उज्ज्वला पारसनीस** सुद्धा ही नियतकालिकांमधून कथालेखन व कवितालेखन करते. या वर्षी झालेल्या युवक महोत्सवात हिला कवितावाचनाचे प्रथम पारितोषिकही मिळाले आहे.

आपल्या कॉलेजने या सर्वच विद्यार्थि–लेखकांना सतत प्रोत्साहन दिलेले आहे. त्यांची लेखन-क्षेत्रातील प्रगती म्हणजे आपल्या कॉलेजचा अक्षर-अभिमानच !

**स्मिता रानडे** तृ. व. वाणिज्य

# अशी घडली 'प्र ति ज्ञा'

**शरद पायगुडे**
द्वितीय वर्ष वाणिज्य

ठण ण ण ण ण ण ण ठण ठण ठण. शाळा भरल्याची घंटा वाजते आणि प्राथमिक शाळेतील एक वर्ग भरतो. शिक्षिका आणि विद्यार्थी प्रतिज्ञा म्हणू लागतात.

'भारत माझा देश आहे.
सारे भारतीय माझे बांधव आहेत......'

प्रतिज्ञेचे महत्त्व माहीत नसल्यामुळे बाई फक्त म्हणायला सांगतात. रटाळपणे प्रतिज्ञा म्हटली जाते. तीही विविध चाळे करतच. मुलांचे चित अद्याप शाळेत स्थिर झालेले नसते. तो वर्ग संपतो आणि इयत्ता आठवीचा एक वर्ग भरतो. वर्गावर हरिजन शिक्षकांची नवीनच नेमणूक झालेली असते. गावातल्या पाटलाच्या हुकमानुसार त्यांना वर्गाबाहेर उभं राहून शिकवावं लागतं. आणि म्हणून मुलं त्याची टिंगल करतात, टर उडवतात. शिक्षक भडकतात. वर्गही तापतो. कसलीही पर्वा न करता हरिजन शिक्षक मुलांवर हात उगारतात आणि खवळलेल्या वर्गाकडून त्याला स्वतःलाच मार खाऊन घ्यावा लागतो.

गावातल्या चावडीवरील जत्रेच्या बैठकीचा प्रसंग उभा राहतो. नेहमीप्रमाणेच सरपंच व पाटील प्रत्येकावर अशक्य असलेल्या वर्गणीचं ओझं लादत असतात. गावकीची कामं न करणाऱ्या हरिजनांनी दुप्पट वर्गणी द्यावी असं ठरतं. गावातल्या या अत्याचाराला त्रासलेले हरिजन पेटून उठतात आणि गावाविरुद्ध आवाज उठवतात. संपूर्ण गावासमोर मूठभर हरिजनांचे काहीच चालत नाही. मारहाणीशिवाय कोणताही न्याय त्यांना मिळत नाही. यंत्राच्या भोवऱ्यात सापडलेल्या मुंबईच्या स्टायलिश लोकांना शिवाशीव पाळायला वेळच नसतो हे जरी खरं असलं तरी संध्याकाळी घरी आल्यानंतर हा प्रश्न उद्भवतोच. अन्यथा परदेशातून उच्च पदवी घेऊन परतलेल्या हरिजनाला स्पृश्य वस्तीत राहायला जागा का मिळू नये? विहीर खणताना मागासवर्गीयांनी काम केलेलं चालू शकतं पण त्या विहिरीमधील पाणी मात्र त्यांना पिता येत नाही. शिवाशीव झाल्याने विहीर विटाळते. मग खणण्याचे काम चालू असतानाच विटाळलेल्या विहिरीचं पाणी गावकऱ्यांना कसं चालतं? एकीकडं गावकरी भजन, अभंगांतून 'मनुष्यधर्म समान आहे. कोणीही उच्चनीच नाही' हे सांगत असतात तर त्याच गावात दुसरीकडं हरिजन स्त्रियांवर राजरोसपणे बलात्कार होतात. आंतरजातीय विवाह करून जातिभेदाची दरी कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर देखील हल्ला होतो. त्या दोघांना त्याचं काहीच वाटत नसलं तरी गावकऱ्यांना या गोष्टीमुळं आपल्याच कुळाला बट्टा लागला असं वाटतं. देशामध्ये अद्यापही शिवाशीव पाळली जात असली, हरिजनांवर अत्याचार होत असले तरी एक ना एक दिवस जातिभेदाचे निर्मूलन करण्यात आम्ही यशस्वी होऊ हे प्रेक्षकांच्या मनात ठसवतच प्रतिज्ञा संपते. अशा प्रकारच्या कथानकात कुठेही एकसंधता नाही. एका प्रसंगाचा दुसऱ्याशी अजिबात संबंध नाही तरीही काहीतरी संबंध आहे असं उगीचच वाटतं आणि वेळोवेळी ज्याला आपण दूर ढकलत आलो तो जातीयतेचा प्रश्न आपल्या मनाला घट्ट चिकटून बसतो.

'साधना' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध होत असलेल्या 'एक गाव–एक पाणवठा' वाचत असतानाच प्रा. बनारसेबाईंना प्रतिज्ञाचं कथानक मिळालं आणि 'प्रतिज्ञा' मनात घर करून राहिली. दिवसेंदिवस विचार करून रूप तयार झालं आणि एक दिवस असंच श्री. बादल सरकार यांच्याशी चर्चा करत असताना 'प्रतिज्ञा' करण्याचं नक्की झालं आणि योगायोग म्हणजे त्याच दिवशी डॉ. बाबा आढाव यांच्या 'एक गाव एक पाणवठा'चं प्रकाशन झालं होतं.

मानव तितुका एकच आहे
उच्च न कोणी नीच न कोणी

हांच आपुला धर्म खरोखर,
हीच आपुली शाश्वत वाणी

या गाण्याचा वेगवेगळ्या पद्धतीनं उपयोग करत कथा नक्र पुढं न्यायचं ही मूळ कल्पना. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या पुस्तकांवर असलेल्या प्रतिज्ञेच्या वापराची कल्पना अशीच सुचली. ती पक्की झाली आणि अतिशय परिणामकारक टरली. प्रसंग एक गाव एक पाणवठावरून तसेच घेण्यात आले, तर काही ठिकाणी प्रा. बनारसेबाईंना संवाद लिहावे लागले. एक प्रसंग विद्यार्थिमित्र रवींद्र खरात यानं लिहिला आहे. नामदेव ढसाळांच्या गोलपिठा कविता संग्रहातील 'रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो...' या कवितेचा वापर ही आणखी एक उत्कृष्ट कल्पना. गावातील सार्वजनिक विहिरीवर पाणी भरायला गेलेल्या हरिजनाला मारहाण झाल्यानंतर तो ही कविता म्हणतो. या कवितेचे सामर्थ्यच इतकं प्रचंड आहे की समोरचा मनुष्य पेटूनच उठतो. दलितांवर होणाऱ्या अत्याचाराचं आणि त्यांच्यात होऊ लागलेल्या वैचारिक क्रांतीचं चित्र या प्रसंगातून उत्तमपणं रेखलं जातं.

काही गोष्टी ह्या संवादातून सांगताच येत नाहीत असं म्हणण्यापेक्षा त्या परिणामकारक ठरत नाहीत असं म्हणणे योग्य ठरेल. अशा ठिकाणी प्रा. बनरासेबाईंनी गाणी, ताल टेका याचा अतिशय योग्य वापर केलेला आहे.

डॉ. बाबा आढावांच्या 'एक-गाव एक पाणवठा' या पुस्तकातील अनुभवाचं नाट्यीकरण करणं तसं अवघड होतं. कारण या अनुभवाचा इंटीग्रेटल फोर्स सांभाळणं महत्त्वाचं होतं. पुष्कळच विचार व चर्चा झाली आणि हा अनुभव ग्रुपच्या सहाय्यानं सादर करायचा असं टरलं. सध्या प्रायोगिक नाटकांमध्ये ग्रुपची वाढती लाट आहे किंवा जुलूसमध्ये वापर केला म्हणून ग्रुप वापरायचा असं मुळीच नव्हे तर जातीयवाद हा कुणा एका व्यक्तीचा प्रश्न नाही, कुठल्याही एका जातीचा प्रश्न नाही, तो तुम्हा–आम्हा सर्वांच्या दृष्टीनं महत्त्वाचा प्रश्न आहे. तो एकट्यानं सांगून परिणामकारक ठरणार नाही म्हणून ग्रुपचा वापर करायचा.

म्हणून ग्रुपचा वापर करून अनेक कॉम्पोझिशन्स बसविली. स्पृश्यांच्या पिंजऱ्यात अडकलेला अस्पृश्य, मनुष्यधर्म समान असतो हे भजन, मानव तितुका एकच आहे... हे ड्रील, मशिन माईमिंग, भंग्यांची वसाहत असे कितीतरी सांगता येईल. या सर्व प्रकारांत कुठंही स्टेज प्रॉपर्टी नाही. सर्व काम्पोझिशन्स ही Human Bodies चा वापर करूनच बसविली आहेत आणि तसा प्रा. बनारसे व दिग्दर्शिका सौ. हेमा लेले यांचा आग्रह होता. निर्मिति–संकल्पक प्रा. बनारसे व सौ. हेमा लेले यांचं understanding अगदीच सारखं होतं. एकेक काम्पोझिशन किती सुंदर आणि वेगळ्या प्रकारे बसविता येईल अशी त्यांच्यामधे चुरसच लागली होती आणि अजूनही एखादा प्रयोग वेगळ्या काम्पोझिशन्समधे करण्याची त्यांची कल्पना आहे.

ऱ्हिदमची Expressive Power काय असते हे जाणण्यासाठीच 'प्रतिज्ञा'मधे ऱ्हिदमचा वापर केला आहे. काही ठिकाणी फक्त पायाचा आवाज, भजनाच्या वेळी टाळ व ढोलकी, तसेच ड्रीलच्या वेळी ट्रॅगलचा वापर तसेच पाणी भरताना वापरलेली ढोलकी, मशीनमाईमिंगमधे मुलांनी तोंडाने मशीनचे वेगवेगळे काढलेले आवाज किती expressive वाटतात ते दिसून येतं. या प्रयोगातील संगीताचा संगीत म्हणून विचारच केलेला नाही तर वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळा आवाज कसा वापरायचा हे चिकित्सेनं पाहिलं गेलं.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या पुस्तकाच्या दुसऱ्याच पानावर असलेली प्रतिज्ञा, जी आपण नेहमीच कॉलेज मॅगेझिन मधील कवितांचं पान उलटावं तशी उलटून टाकतो, तिचा वापर प्रयोगामधे पाच वेळा वेगवेगळ्या मूड मधे केला आहे. प्रथम प्राथमिक शाळेतील वर्गात प्रतिज्ञा म्हणत असताना मुलं ती किती रटाळ म्हणतात ते दिसतं. बाईंच्या दटावण्यानंही मुलांवर काहीही परिणाम होत नाही. त्यांना ती निरर्थकच वाटते. शिक्षणाच्या क्षेत्रात 'प्रतिज्ञा' किती भीतिदायक आहे हे दाखविलं आहे. खेडेगावातील शाळेत अस्पृश्य शिक्षक शिकवायला जातो तेव्हा मास्तर आपल्याला काहीच करू शकणार नाही हे पक्कं माहीत असल्यामुळं मुलं त्याची टिंगल करतात आणि मास्तरनी क्रांती करण्याचा प्रयत्न केलाच तर त्याला जबर मारहाण होते व तो भीतीनं म्हणतो, 'भारत माझा देश आहे. माझ्या देशावर माझं प्रेम आहे...'परदेशातून उच्च शिक्षण घेऊन परतलेल्या हरिजनाला चांगल्या वस्तीत राहायला जागा मिळत नाही त्यावेळी प्रयोगामधे निराशेचे वातावरण तयार होते व सर्वजण निराशेनं प्रतिज्ञा म्हणतात. समाजामधे मनुष्याचं शिक्षण, राहणीमान न पाहता तो फक्त कोणत्या जातीचा आहे हे पाहिलं जातं व जातीच्या उच्चनीचतेवर त्याला राहायला जागा मिळू शकते हे इथं दिसतं. 'ब्राह्मण झाला कितीही भ्रष्ट, तरि तो तिन्ही लोकी श्रेष्ठ'

याचा वापर करताना समाजामधे दलित, दलितविरोधी व या दोहोंची समजूत घालणारे असे तीन प्रकारचे गट दाखविले आहेत. दलित व त्यांची पिळवणूक करणारे हे कधीही एकत्र राहू शकणार नाहीत हेच या प्रसंगात सांगितलं आहे. समाजामधे अशा प्रकारची वागणूक एक मेकांना मिळत असेल तर आपण 'भारत माझा देश आहे सारे भारतीय माझे बांधव आहेत हे कशासाठी म्हणायचे हा प्रश्न आपल्यालाच पडतो. त्या ठिकाणी उपहासात्मक प्रतिज्ञेचा वापर केला आहे. एवढं सगळं झाल्यानंतर स्वतः काही करायचं नाही. जो दुसरा कोणी करत असेल त्याच्या कृत्यात विघ्नं आणायची म्हणून एखादं पाऊल पुढं टाकून आंतरजातीय विवाह करणाऱ्या हरिजनाच्या विवाहात सुद्धा अडथळे निर्माण केले जातात, मारहाण होते. मग अशा वेळी आपल्यालाच आणखी एक असा प्रश्न पडतो की खरोखरच भारत माझा देश आहे का? माझ्या देशावर माझं प्रेम आहे का? आणि म्हणून या ठिकाणी प्रतिज्ञा प्रश्नार्थक रूपात वापरली आहे.

या बीज कथानकाचं नाट्यात रूपांतर करताना अनेक अनुभव आले, अनेक अडचणी आल्या. नाटकाला कथानकात गुंतवलं असतं तर व्यक्ती आणि जात या दोन्हींचा एकमेकांत गुंता असल्यामुळं काहीच स्पष्ट झाले नसतं. त्यामुळं तमाशाचं तंत्र वापरावं अशीही एक कल्पना येऊन गेली. नेपथ्य, प्रकाशयोजना, वेषभूषा, रंगभूषा यांचा वापर करून तसेच काही प्रसंगात विरोधाभास दाखवून प्रेझेंटेशन करावं अशीही सूचना आली. पण त्या सर्व बाजूला सारल्या. कारण नाटक प्रतीकात्मतेत अडकलं असतं. परिणाम नाहीसा झाला असता. उलट आहे त्या Presentation मध्ये प्रतिज्ञेपासून कवितेपर्यंत सर्व प्रश्न चढवत न्यायच व नंतर या सर्व प्रश्नांच्या उत्तरांचं Structuring त्याच पद्धतीनं करायचं असं ठरलं. परंतु प्रत्यक्षात उत्तरं शोधण्याचा भाग प्रभावी होत नाही म्हणून बातम्यांचा डिव्हाईस व भजनाचा वापर करून थिएटरचा बॅलन्स साधायचं ठरलं.

या प्रयोगामधे आठ मुलं व दोन मुलींनी भाग घेतला होता. या सर्व कलाकारांच्या प्रामाणिक प्रयत्नामुळंच आम्ही नंदुरबार इथं झालेल्या पुणे विद्यापीठ युवक महोत्सवातील प्रथम क्रमांकाचं पारितोषिक पटकावू शकलो. निर्मिति-संकल्पक प्रा. बनारसेबाई, दिग्दर्शिका सौ. हेमा लेले व सर्व कलाकार यांचं ते श्रेय आहे. याशिवाय कु. राणी पारसनीस ही आपल्या उत्कृष्ट अभिनयाच्या जोरावर एक अभिनयाचं बक्षीसही घेऊन आली. या प्रयोगात सर्वांत जास्त कष्ट दिग्दर्शिका प्रा. हेमा लेलेंचे. त्यांनी सुरुवातीला आम्हाला प्रसंग समजावून दिले, आमची त्यातील भूमिका काय हे अनेकदा (!) समजावून दिल्यानंतर आता तुम्हीच तुम्हाला येईल ते करा असे निर्धास्तपणे सांगून आम्ही काय करतो याकडं लक्ष दिलं. याचा सर्वांत मोठा फायदा आम्हांला झाला की प्रत्येकाला काय करायचं आहे हा विचार करावा लागला. त्यामुळं आपोआपच निरीक्षण, प्रामाणिकपणा, सहकार्य, टीमवर्क यांची जाण वाढली. आणि चुका करतच अनेक सुंदर कॉम्पोझिशन्स् बसत गेली आणि आमची प्रतिज्ञा यशस्वी व परिणामकारक झाली. इतकी की पुण्यात तिच्या प्रयोगाची अनेक आमंत्रणं आम्हाला स्वीकारावीच लागली.

✤

---

## वंचना

नयनातील भाव जाणलेस तू
माझ्यासाठी गाळलीस टिपे चार
समजावलं अखेर मीच तुला
पुसले अश्रूही ! !
तू घातलास मोह मला
नकळत सुखावले बाहुपाशात
पण आज,

हळवा तू, कठोर झालास
मी करत होते अजून प्रार्थना
निर्माल्याचा सुगंध घेऊन ! !
पण आता,
सुगंध सुकलाय
नि प्रार्थना उरलीय
वंचना ! ! केवळ वंचना ! !

**भानुमती ठोके**
तृतीय वर्ष कला

# माझे पहिले डिसेक्शन (फ्रॉगचे)

**ज्योती शिंपी**
प्रथम वर्ष शास्त्र

त्या दिवशी मी कॉलेजमध्ये गेले आणि गेल्या गेल्याच मला हादरवून सोडणारी बातमी कळली की, उद्या फ्रॉगचे डिसेक्शन आहे. खरे म्हणजे जेव्हा मी B Group घेतला तेव्हाच मला कळाले होते की आपल्याला फ्रॉगचे डिसेक्शन करावे लागणार. पण प्रत्यक्ष वेळ आली की माणूस कसा हादरतो याचा चांगलाच अनुभव घेतला. . त्या दिवशी पिरीयडला गंमत अशी की मला सगळीकडं बेडूकच बेडूक दिसू लागले होते.

रात्री तर झोपेचे अक्षरशः खोबरे झाले. सारखे बेडकाचेच स्वप्न पडत होते. कधी मी त्याला कापताना दिसत होते तर कधी तो आनंदाने मजेत उड्या मारताना दिसत होता. चू, चू! उद्या मी एका निष्पाप प्राण्याचा जीव घेणार होते! लहानपणापासून मी एखाद्या मुंगीलासुद्धा इजा करण्याचे टाळले होते आणि आता...आता तर मी जाणून बुजून एका प्राण्याचा बळी घेणार होते.

शेवटी एकदाची ती वेळ येऊन ठेपली. माझ्या हातापायांना एकसारखा कंप सुटत होता.नरकात जातानासुद्धा एखाद्याला इतके धडधडले नसेल तितके मला धडधडत होते. सारखे तिथून दूर दूर पळावेसे वाटत होते.

एकदाचे लॅबोरेटरीचे दार-उघडले गेले आणि अक्षरशः मनावर दगड ठेवून बेडरपणे (मनातून घाबरलेलेच होते) मी आत पाऊल टाकले.

फ्रॉग्ज वगैरे आणले गेले.

सर आम्हाला तिकडे डिसेक्शन कसे करायचे ते समजावून सांगत होते आणि माझे मन मात्र आधी त्या बेडकाला हात कसा लावायचा या एकाच प्रश्नाने रडकुंडीला आले होते. (हे मात्र आमच्या सरांना सांगू नका बरं का! नाहीतर आमची कंबक्तीच!)

सरांनी सीझर हातात घेतली आणि ते बेडकाची वरील त्वचा कापू लागले. एकदम माझ्या अंगावर काटा आला. माझ्या मनात एकदम विचार आला समजा तो बेडूक त्याच वेळी शुद्धीवर आला तर? आई ग, किती वेदना होतील त्याला!

आणि तो भयंकर प्रसंग आमच्यावर येऊन ठेपला. त्या बेडकाचे हातपाय कसे बांधावे या विचारानेच मी गर्भगळित झाले. एकदाचे मी त्याला कसेबसे वधस्तंभाला लटकवले आणि त्याच्या वधाच्या तयारीला लागले.

"अरेच्चा! हे पाणी लाल कसं झालं? अरे देवा! Abdominal vein च तुटली. एकदम माझा थरकाप उडाला. सरांनी ही व्हेन कट न करण्याविषयी काहीतरी सांगितल्याचे अंधुकसे आठवू लागले. कोणत्यातरी कादंबरीत मी वाचले होते की दुःखी झालेला तो तरुण शून्यात पाहू लागला. मी सुद्धा आता दुःखीच झाले होते. त्यामुळे मला आता इतरासाठी तरी शून्यात पहाणे भाग होते. पण शून्यात पहायचे म्हणजे नेमके कुठे पहायचे हे न कळल्यामुळे माझी नजर भिरभिरू लागली. शेवटी तो नाद सोडून माझ्या दृष्टीने अर्थशून्य अशा बेडकाच्या देहावर नजर स्थिर केली. इतक्यात दूरून कोठून तरी मला गाण्याचे स्वर ऐकू येऊ लागले,

"रोना, कभी नही रोना
चाहे टूट जाये कोई खिलौना।.

इथं तर काय क्षुल्लक Abdominal vein तर तुटली होती. ते काही नाही! आता चांगले डिसेक्शन करायचेच! असा निर्धार करून मी डिसेक्शन करू लागले.

एकाएकी त्या बेडकाचे हार्ट हलण्याचे थांबले. म्हणजे आता तो बेडूक खरोखर मेला होता तर! आणि हो आता खोटे नाही सांगत. एकाएकी मला त्या वेळी त्या प्रसंगाला हास्यास्पद ठरेल असे गाणे आठवले,

छोड गये बालम ...

इतक्यात सर आमच्याकडेच येताना दिसले. मी

हादरलेच. कारण आत्तापर्यंत मी त्या बेडकाचा इतका चेंदामेंदा केला होता की, नवख्या माणसाने तो बेडूक आहे की कोणते सोंग आहे ते मुळीच ओळखले नसते. सरांना माझा बेडूक दिसू नये म्हणून मी शक्यतो मान खाली घातली आणि मी माझ्या कार्यात अगदी मग्न आहे असे भासविले. परंतु सरांनी माझे ढोंग ओळखले वाटते कारण ते माझ्याच जवळ येऊन उभे राहिले आणि मी काय करते ते लक्षपूर्वक पाहू लागले. पण मी काय करणार होते? माझ्या दृष्टीने डिसेक्शन झाले होते. Lingual शोधता शोधता मला नाकी नऊ आले पण शेवटी माझा अती अंत न पाहता ती मला सापडली होती. अर्थात अपघातात सापडल्यासारखी ती दिसत होती.

सरांनी माझ्या बेडकाकडे पाहिले आणि 'हं' असा पसंतिदर्शक उद्‌गार काढताच मी अक्षरशः बेशुद्ध पडण्याच्या बेताला आले. त्या बेडकाचा अचेतन देह इतका छिन्नविच्छिन्न करूनही सरांना माझे डिसेक्शन पसंत पडले होते तर...

हुश्‌! आता इथून सटकायला काहीच हरकत नव्हती तर!

✣

# झोपडपट्टी : समस्येची दुसरी बाजू

**सुहास देवधर**
पदवीपूर्व कला

आज अनेक मोठ्या व छोट्या शहरांमधून झोपडपट्टी व तिच्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे. या झोपडपट्ट्यांवर व झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांवर आज अनेक लोक अनेक आक्षेप करीत आहेत. काहींच्या मते झोपडपट्टी ही समाजाला लागलेली कीड आहे; तर याही पुढे जाऊन काही विचारवंत (!) असे म्हणू लागले आहेत की झोपडपट्टी ही शहरांना झालेली खरुज होय!

वरील विधाने स्वतःच्या उत्कृष्ट घरात भरपूर जेवण झाल्यावर आराम करताना म्हणावयास अशा लोकांना फारच बरे वाटत असेल नाही? परंतु त्या माणसांचा, की जे स्वतः झोपडीत रहात आहेत, अशांचा विचार माणुसकीच्या भावनेतून कोणी केला आहे काय? अशा झोपडीत जर आपण असतो तर आपण काय केले असते? स्वतःच्या पुढे कोणताच विशेष प्रश्न नसेल, तर अशा प्रश्नांबाबत बेजबाबदार विधाने करण्यात आम्ही भारतीय पटाईत आहोत.

आज अनेकजण असे म्हणतात की झोपडपट्टीचे संपूर्णतः निर्मूलन केले पाहिजे. परंतु झोपडपट्टीचे निर्मूलन करणार म्हणजे काय करणार? सर्व झोपडपट्ट्याच काढून टाकून त्या लोकांना हाकलून देणार? की झोपडीऐवजी पर्यायी चांगले, म्हणजे किमानपक्षी रहाण्यास योग्य असे घर **त्यांना परवडेल अशा दरात** बांधून देणार?

झोपडपट्ट्या पाडून टाका, असे म्हणणारे एकतर हृदयशून्य असतील, किंवा ज्यांचे संडास ही 'एअर कंडिशन्ड' आहेत असे गर्भश्रीमंत असतील. परंतु **वरील विधान करणाऱ्यांनी** असा विचार करून पहावा की, एखादी व्यक्ती वा सरकारही भविष्य काळात **त्यांचे** स्वकष्टाने बांधलेले घर पाडावयाला निघाले, तर हे न्याय्य होईल काय?

झोपडीत रहाणाऱ्या लोकांची आर्थिक परिस्थिती खालावलेली व कमी प्रतीची असल्यानेच त्यांना झोपडीत रहावे लागते. त्या लोकांना असे वाटत नसेल का, की आपल्याला किमानपक्षी घरात ओल नसणारे, न गळणारे घर असावे? परंतु परिस्थितीमुळेच त्यांना झोपडीत रहावे लागत आहे. झोपडीत हौस म्हणून कोणीही रहात नाही.

आजची आमची नेते मंडळीही या बाबत बेजबाबदारपणे बोलू लागली आहेत. काही नेते म्हणतात की काहीही

झाले तरी आता शहरात नवीन झोपडी बांधावयाची नाही. परंतु शहरातच जर नोकरी वा उपजीविकेचे साधन सहजतः उपलब्ध होत असेल, तर त्या शहरात जाणाऱ्यांनी कोठे रहावे ? त्यांनी उघड्या मैदानात उन, पाउस, थंडीवाऱ्याची पर्वा न करता जनावराप्रमाणे रहावे, अशी नेत्यांची अपेक्षा आहे काय ? पण जर निवारा नसेल, तर शहरात येण्यास अशा गरिबांना **अप्रत्यक्षपणे** बंदीच होईल ! आणि आपल्या लोकशाही देशात संचार-स्वातंत्र्य असल्याने ही **अप्रत्यक्षपणे** का होईना पण बंदी अन्याय्य ठरेल.

झोपडी उभारावयाची नाही, तर अशा लोकांना त्यांना **परवडेल अशाच दरात** चांगली घरे बांधून द्यावयाची सरकारची आर्थिक कुवत आहे काय ? किंवा झोपडपट्टी हटवा असे म्हणणाऱ्यांची तरी झोपडपट्टीच्या निर्मूलनार्थ वेगळा असा ' कर ' भरावयाची तयारी आहे काय ? जर उद्या सरकारने झोपडपट्टी निर्मूलनार्थ कर ठेवला, तर त्या कराविरुद्ध सर्वप्रथम ओरड हे तथाकथित टीकाकारच करतील यात मुळीच शंका नाही !

काही जण असे म्हणतात की झोपडपट्टीमुळे समाजातील गुन्हेगारीत वाढ होते. परंतु हे विधान सर्वस्वी चुकीचे आहे. झोपडीत राहणारा गरीब माणूसच सर्वात स्वाभिमानी असतो व भारतात गरिबांची संख्याच जास्त असल्याने अशा झोपडपट्ट्या अधिक आहेत. समाजकंटक व गुन्हेगार, गुन्हा करून लपावयाचे ठिकाण म्हणून अशा झोपडपट्ट्यांचा उपयोग करतात, त्यामुळे सर्वच झोपडपट्टीवासीय गुन्हेगार आहेत असे होत नाही ! परंतु तरीही जर या टीकाकारांना असेच म्हणावयाचे असेल की झोपडपट्टीत रहाणाऱ्या लोकांची मनोवृत्ती गुन्हेगाराची असते, तर मी त्यांना असे विचारतो की, आज भारतातील अनेक व्यापारी, अनेक प्रकारे आपापल्या विक्रीच्या वस्तूंत भेसळ करतात, अशा काहींना शिक्षाही झाल्या आहेत. परंतु उद्या जनता जर असे म्हणू लागली की सर्वच्या सर्वच व्यापारी भेसळ करणारे, व स्वार्थी मनोवृत्तीचे आहेत, तर हे विधान कितपत बरोबर होईल ?

आणि तरीही काही झोपपट्टीवासीय गुन्हे करीत असतील, तर ते बहुतेक गुन्हे त्यांनी केवळ स्वतःच्या कुटुंबाच्या पोषणासाठीच केलेले आढळतील ! ही गोष्ट आपल्या देशाला खासच सन्माननीय नव्हे की केवळ पोटाची भूक भागवण्यासाठी लोकांना गुन्हे करावे लागत आहेत !

दुसरी गोष्ट अशी की, काही विद्वानांच्या मते झोपडपट्टी ही अस्वच्छतेचे आगर आहे, म्हणून ती हटवली पाहिजे. परंतु ही अस्वच्छता का निर्माण होते याचा विचार हे विद्वान करीत नाहीत. आज कोणा झोपडपट्टीवासीयांस शरीराच्या नैसर्गिक गरजा भागविण्यासाठी अशा सोयी पुरेशा प्रमाणांत आहेत ? आज काही मोठमोठ्या बंगल्यांमधून केवळ ४ च माणसे रहात असली तरी तेथे २–२ संडास आहेत व संपूर्ण झोपडपट्टीतील लोकांना समाईक असे २ संडास ! हा फरक का ? आज अनेक बंगल्यांत २४ तास भरपूर पाण्याची व्यवस्था आहे, तर झोपडपट्टीतील नळांना, ते सुद्धा कमी नळांना, दिवसातून फक्त ४ तासच पाणी असते. हा एवढा फरक जर स्वच्छतेस आवश्यक असणाऱ्या गोष्टीत असेल, तर कोणत्या आधारावर तुम्ही झोपडपट्टीवासीयांकडून स्वच्छतेची अपेक्षा करता ?

आणि वस्तुस्थिती पाहाता आपण टीका करणाऱ्या लोकांपेक्षा झोपडपट्टीतील लोकांनाच स्वतःच्या स्वच्छतेची अधिक काळजी असते. आपल्यातील अनेकजण झोपेतून उठल्याउठल्या तोंड वगैरे न धुताच " बेड टी " (!) घेत असतील व ही अत्यंत किळसवाणी गोष्ट प्रतिष्ठितपणाची मानत असतील ! तसेच झोपेतून उठायला उशीर झाला, म्हणून तोंडावर पावडर फासून ऑफिसला वा शाळा-कॉलेजांत जाणारे महाभागही थोडे नाहीत ! परंतु आम्ही या गोष्टी अगदी अभिमानाने दुसऱ्यांस सांगतो की " बघा आज मी आंघोळ न करूनही केल्यासारखी वाटत आहे ! "

आमच्या या मनोवृत्तीतील फरकास कारण एकच. ते म्हणजे आम्ही केवळ चांगल्या आर्थिक परिस्थितीमुळे चांगल्या दर्जाच्या घरात राहतो व झोपडीत रहाणाऱ्याची आर्थिक परिस्थिती चांगली नसते. म्हणून कोणीही उठावे व झोपडीत रहणाऱ्यावर टीका करावी अशी सध्याची परिस्थिती झाली आहे.

आणि तसे पाहिले तर झोपडीत रहाणाऱ्यांचे खरोखर कौतुक करावेसे वाटते. कारण उन्हाळा, पावसाळा, हिवाळा, या तीनही ऋतूंत त्यांना अत्यंत त्रास होतो. तसेच स्वच्छता, आरोग्य या दृष्टीने त्यांची जागा माणसाला रहावयास सर्वथैव अयोग्य असूनही आज समाजातील कष्टाची कामे झोपडीत रहाणारे असेच मजूर व गरीब वर्ग करीत आहेत. आज ४ दिवस मोलकरीण आली नाही म्हणून काम करावे लागले तर आजारी पडणाऱ्या, सर्व सुखसोयींनी युक्त अशा घरात रहाणाऱ्या

महिला कोठे आणि स्वतःच्या झोपडीतील सर्व कामे सर्व प्रकारच्या अडचणींवर मात करून करीत, दुसऱ्याकडे परिस्थिती मुळे कामाला जाणाऱ्या अन् तरीही आरोग्य-संपन्न अशा झोपडीतील महिला कोठे ?

तर आपणही माणसेच व झोपडीत राहणारीही माणसेच. परंतु दोघांच्यात भयानक खोल अशी भीषण आर्थिक दरी ! आणि आम्ही ज्यांच्या जीवनावर व जिवावर आज या दरीच्या वरच्या टोकावर व मध्यावर उभे आहोत त्यांचाच निवारा काढून घ्यायचा आम्हाला कोणत्याही बाजूंनी अधिकार पोहोचत नाही. म्हणून झोपडी हटवण्याच्या कोणाच्याही कसल्याही प्रयत्नास, की जेप्रयत्न केवळ स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी केले जातात, अशा प्रयत्नास माणुसकी असलेल्या प्रत्येकाने विरोधच केला पाहिजे व आपल्या झोपडीत राहाणाऱ्या बांधवास त्याची झोपडी कशी चांगली होऊ शकेल या बाबत मदत केली पाहिजे. केवळ झोपडपट्टी हलवण्याच्या मोहिमा काढून हा प्रश्न सुटणार नाही. उलट अशा गरिबांचा निवारा नष्ट केल्याने त्यांना जर राग येऊन त्यांनी एखादे प्रक्षोभक वा हिंसक कृत्य केले तर हा प्रश्न अधिकच बिकट होईल.

तेव्हा झोपडपट्टी हटवायला नको, तर आपणही झोपडीच सुधारावयास जाऊ. ते होणार नसेल तर त्या लोकांना किमान चांगले घर मिळालेच पाहिजे. कारण **प्रयत्न करू—पाहू** वगैरे भाषा ही ढोंगी पुढाऱ्यांची असते. आपण ढोंगी आहोत काय ?

❖

# मुलाखत : एका चोराची

**मारुती माने**
तृतीय वर्ष कला

माझी ओळख सांगत मी पिऱ्या रामोशाला नमस्कार केला. पिऱ्याने करड्या साशंक नजरेने मिशांवर हात फिरवीत माझ्याकडे पाहिले. मनातून मी थोडासा घाबरलोच. पण चेहऱ्यावर मनातील भीती न दाखवता मी पिऱ्याला म्हणालो, “ आपणाशी मला काही गोष्टींची चर्चा करावयाची आहे. ”

पिऱ्या भारदस्त आवाजात म्हणाला “ पोलिसाचा माणूस हाय काय तुम्ही ! ”

मी नकारार्थी मान हलविली, तरी त्याचा विश्वास बसला नाही. “ मला तुमच्यासंगं कायबी बोलायचं नाही. ” असे स्पष्ट सांगून पिऱ्या त्याच्या झोपडीत गेला. मी अडचणीत पडलो. मला पिऱ्याशी तर बोलायचे होते. म्हणून मी तसाच त्याच्या झोपडीसमोर उभा राहिलो. पिऱ्याशी पुन्हा एकदा बोलण्याचा प्रयत्न करावा म्हणून म्हणालो, “ मी फार लांबच्या गावावरून आलो आहे तुम्हाला भेटावयास. ”

“ कणच्या गावावरनं आलाय ? ” पिऱ्या आतूनच वाघासारखा गुरगुरला.

मी माझ्या गावाचे नाव सांगताच पिऱ्या झटकन् झोपडीतून बाहेर आला. मला पुन्हा एकदम नीट न्याहळले. नजरेतला अंगार गेलाच नव्हता.

पिऱ्या पुन्हा गुरगुरला “ तुम्ही गिरजा रामोशीनीला वळखता का ? ”

आयुष्यभर जिनं गावाला कधी सरळ झोप येऊ दिली नाही ती म्हातारी माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली. मी म्हातारीची पूर्ण ओळख सांगितली. पिऱ्याच्या करड्या नजरेत ओलावा आला. त्याचे डोळे पाणावले. त्याला मी फार जवळचा माणूस वाटलो. इतका वेळ मी उभाच होतो याची जाण त्याला झाली. हातभर गोणपाटाचा तुकडा त्याने मला बसायला टाकला. अल्युमिनियमच्या गळक्या तांब्यात मला पाणी दिले. मी सुद्धा घसा ओला केला. पिऱ्यानं आपल्या थोरल्या बहिणीबद्दल आतुरतेनं

चौकशी केली. मीही समाधानकारक उत्तरं दिली. पिऱ्या माझ्याशी फार मनमोकळेपणानं बोलत होता आणि म्हणून मी विषयाला हात घातला.

" काय पिराजी, तुम्हाला लोक चोर म्हणतात हे खरं काय ? "

" अहो सायेब ! ज्यानं आयुष्यभर फक्त चोऱ्याच केल्या त्याला लोक काय म्हणतील ? चोरच ना ? "

" तुम्ही आयुष्यात पहिली चोरी कधी केली ? "

" खरं सांगू साहेब, मला लहानपणी इतरपोरानसारखं साळत जावसं वाटायचं. पण माझे आयबाप कधी माझी येवस्तीशीर अंग झाकू शकले नाहीत. आणि जेव्हा मला कापडं मिळाली तेव्हा पाटी पुस्तक नव्हतं. मला तर साळत जाण्याची लई इच्छा होती. एक दिस मारवाड्याच्या दुकानात गेलो. त्याचा डोळा चुकवून एक पाटी घेऊन पळालो. पण तो बी मारवाडीच. त्यानं माझा पाठलाग केला. मी पळत असताना ठेस लागून पडलो आणि पाटी फुटली. खरं म्हणजे तिथंच माझं नशीबबी फुटलं. त्यानंतर कधी साळंची पायरी चढता आली नाही. हीच माझ्या आयुष्यातली पहिली चोरी साहेब. "

" पिराजी, आयुष्यात तुम्ही चोऱ्या किती केल्या हो ? "

पिऱ्यानं डोक्याचं मुंडासं काढून डोकं माझ्यासमोर धरले आणि म्हणाला, " साहेब माझ्या डोईचं केस किती ते सांगा बघू. " यावर मी केवळ हसलो, पिऱ्याला काय म्हणायचं होतं, ते मला कळलं होतं. " मंग साहेब मी वयाच्या आठव्या वर्षापास्नं आज साठ वर्षे चोऱ्या करत आलोय. मग त्या किती म्हणून काय सांगू. "

" पिरा, तुम्हांला चोरी करण्यापेक्षा दुसरे काही चांगलं करता आलं नाही का ? कामधंदा का केला नाही ? "

" खर सांगू साहेब, इमानदारीनं जगण्याचा लई वेळा प्रयत्न केला. पण ह्या गावकऱ्यांनी कधी सरळ जगूच दिलं नाही. माझ्या बानं आयुष्यभर चोऱ्याच केल्या आणि मी बापासारखाच असं समजून गावकऱ्यांनी मला कधी दारात उभं केलं नाही. काम कधी दिलं नाही. काही दिवस दारूची भट्टी चालवली पण अधून–मधून तुरुंगात जावंच लागायचं. तेव्हा तो धंदाबी करता आला नाही."

" पिरा, तुम्ही तुरुंगात किती वेळा गेला हो ? "

" नक्की आठवत नाही सायेब, पण लई वेळ तुरुंगात गेलो. "

" पिरा, तुम्ही जेव्हा तुरुंगात असायचे तेव्हा तुमच्या बायकोचे काय व्हायचे?" " तुम्हीच सांगा सायेब, चोराच्या बायकोला कधी कुणी काम दिलंय का ? दारात सुद्धा कुणी उभी केली नाही आणि म्हून सायेब टीचभर पोटा-साठी माझ्या बायकोनं भाकरीचीसुद्धा चोरी केली हो. "

" पिरा, एवढ्या चोऱ्या केल्यात मग तुम्ही श्रीमंत का झाला नाही ? "

" सायेब, मला ज्या चोऱ्या कराव्या लागल्या त्या टीच-भर पोटासाठी, श्रीमंत होण्यासाठी नाही. "

" चोरीबद्दल तुम्हांला काही वाटत नाही का ? "

" सायेब, ज्याचं दुःख त्याला ठाव. एखाद्याच्या तोंडातला घास हाणून मारून आपल्या घशात उतरवणं, आणि तेही काळ्या कुट्ट अंधारात...साहेब लई लई वंगाळ हे. पन..."

" पिरा, तुमच्या आयुष्यातील सर्वात दुःखाची गोष्ट कोणती ? "

" मी माझ्या कष्टाचे कधीच खाऊ शकलो नाही. हे सर्वात मोठं दुःख आहे सायेब. अंगात रग व्हती तव मारून खाल्लं. आज मात्र भीक मागून खातोय... "

" अहो पिरा, सरकारनं तुम्हाला जमिनी दिल्या आहेत ना ? " पिरा गालांतल्या गालांत हसला आणि म्हणाला, " व्हय सायेब, पण त्या उघड्या माळावर. दिवसा ढवळ्या सुद्धा माणसं तिथं जायला भेत्यात. "

" पिरा, तुमच्या आयुष्यातील आनंदाची गोष्ट कोणती ? " पिऱ्याच्या डोळ्यांतून दोन अश्रू ओघळले. पिऱ्या शांतपणे म्हणाला. " माझ्या पोटी पुत्र जनमला नाही हीच माझ्या आयुष्यातली आनंदाची गोष्ट हाय ! "

# वाटचाल

**संजय गोखले**
प्रथम वर्ष वाणिज्य

उन्हाची खई उसळली होती. वारा म्हणून सुटत नव्हता.

जिवाची घालमेल करणाऱ्या झळा मात्र हैराण करत होत्या. सारी भूमीच धगधगत होती !

हवेत विचित्र उष्मा भरून राहिला होता. थंड बसलेल्या रवीच्या मनात मात्र चलबिचल होत होती !

वेळ धीमेपणाने जात होता ... घरात घडलेल्या स्थितीची कणव नसल्यासारखा !

खोलीत सर्वत्र शांतता पसरली होती, अगदी नीरव शांतता !

त्याला ते सर्व असह्य झालं.

जरा अंग टेकावे म्हणून तो उठला.

पलंगावर पाठ टेकताच एक जोरदार चटका अणू-रेणूत भिनला. पण तो तसाच पडून राहिला.

त्याला वाटले, " अशीच झोप लागावी गाढ झोप ! "

परत कधीही जागे न होण्यासाठीच !

थेट भूल दिल्यासारखी झोप !

सर्व वातावरण शांत होतं.

फक्त पांढऱ्या कपड्यांची वर्दळ काय ती !

रवीच्या हृदयाचा थरकाप उडाला होता. शस्त्रक्रियेची भीती त्याच्या डोळ्यांत स्पष्ट दिसत होती.

" देवाचं औक्षण केलं का ? "

तिच्या प्रश्नानं केवढा तरी दचकला तो...

" हो — ऽऽ ! "

कितीतरी अस्फुटसं — जवळ जवळ ओठातच बोलला तो !

वरकरणी शांत पण, अंतर्यामी व्याकुळ झालेल्या त्याच्या चेहऱ्याकडे पाहून ती त्याही स्थितीत हसली. एक क्षीण हास्य !

त्याचं अंतर्मनच जणू तिला कळलं होतं — कोणीतरी आपल्याजवळ उभं आहे.

आपल्या विषयी अमाप प्रेम — जिव्हाळा वाटणारा आपला नवरा.

याच जाणिवेने तिला अंमळ धीर आला. त्याचवेळी ती स्वतःचं दुःख, भीती विसरून गेली !

तिच्या चेहऱ्यावर चकचकीत हसू फुटलं !

" रवी — ऽऽ ! "

" अं ... "

" ऑपरेशन माझं आहे की तुमचं — ! "

तिच्या या प्रश्नानं केवढा धीर आला, तिच्या निरागस, अल्लड बोलण्याचं त्याला हसू आलं.

पण तिच्या प्रश्नाला काय उत्तर द्यावं हे मात्र त्याला कळलं नाही !

रात्रीने हलकेच पाय लांबवले ...

दिवसाचा प्रकाश अंधारात झिरपत होता. दिशा चारी बाजूनी अंधारून येत होत्या अन् आता गारसर वारा सुटला होता. दिवसाच्या अखेरची शांतवेळ सुरू झाली.

तो टेकून बसला होता. सिगरेट पेटवत होता -- अन अर्धी होते ना होते तोच चिरडून टाकत होता.

नजर शून्यात गुरफटली होती — !

अशातच त्याने कसला तरी निर्णय घेतला. दाराजवळ ठेवलेल्या चपला पायात सरकवल्या, स्विच ऑफ केले.

सर्व यांत्रिक हालचाल !

तिच्या एकाकी जाण्यानंतर तो बराच खंगला होता — खचला होता — मनाने तर तो केव्हाच कोंदटला होता — कशाचं म्हणून त्याला भान नव्हतं.

तीन खोल्यांचा ब्लॉक पूर्वी त्याला केवढा अपुरा वाटे. वास्तविक दोघे घरात असल्यावर तो भरल्यासारखा वाटे.

पण आता मात्र त्याला तोच ब्लॉक अति-विशाल, विषण्ण वाटत होता.

हॉटेलपर्यंत तो तसाच चालत गेला सर्व हालचाली यांत्रिक, जीव नसल्यासारख्या ...

मग हॉटेलातल्या वर्दळीने तो भानावर आला —

साऽब ऽऽ — खाना !

एकदा कोठल्याशा पार्टीला जाऊन तो उशिरा घरी आला होता — तेव्हा किती चिडली होती ती त्याच्यावर — !

चला जेवायला — !

मला भूक नाहीये — आज बरंच खाणं झालंय. तू जेऊन घे — !

माझंही जेवण झालंय — !

हा काय वेडेपणा — खरोखर मला भूक नाहीये — !

नंतर तो जेव्हा झोपण्यासाठी बेडरूम मध्ये गेला, तेव्हा अचानक आलेल्या हुंदक्यांमुळे त्याचे लक्ष गेले.

निस्तब्ध, निरागस चेहऱ्यावर पाणी तराळले होते —

ती कॉटवर बसली.

मग बराच वेळ स्तब्धतेत गेला — नंतर तोच म्हणाला —

' चल आपण जेवून घेऊ ! '

रवी ऽऽ !

प्रधानच्या हाकेने तो भानावर आला —

हॅलो ऽऽ !

चल पिक्चरला येतोस का !

नो, थँक्स !

हल्ली बराच उदास दिसतोस — रवी. वहिनींचं ऐकून वाईट वाटलं —

वहिनींचं नाव निघताच त्याची मान तारेने खचल्यासारखी वर आली — काही क्षण तो तसाच प्रधानकडे पहात राहिला —

मग मात्र एकदम उठला !

ताटावर एव्हाना बऱ्याच माशा बसल्या होत्या —

मगाचची वर्दळ कमी होऊन रस्ता ओसाड पडला होता.

क्षयाच्या रोगाप्रमाणे म्युनिसिपालटीचे दिवे मिणमिणता प्रकाश फेकत होते — बस्स एवढेच —

# रिकामे फुटपाथ

गृह मागशी माझ्या सख्या परि
फुटपाथचि रिकामे मुंबापुरी ॥धृ॥

आजवरी कर्जाच्या गोणी,
तुझ्यावरी रे वेच्या पाहुनी,
येते किती रे खिन्नता मनी,
करि रोष न सखया निघ बाहेरी ॥१॥

सावकाराचे ते हेलपाटे,
व्हिस्की ब्रँडी रमचे साठे,
पाहुनि, चित्ती हुरहुर वाटे,
भाडे टाक पहिले कसे तरी ॥२॥

सशब्द वदतो मित्र तुझा तो
पत्नीला तू झोडीत बसतो
शेजाऱ्याशी भांडत उठतो,
तक्रार करति ते किती तरी ॥३॥

बील विजेचे कालच आले,
रुपये सदतीस एकूण झाले,
वीजवाले तार कापून गेले
तुज ठेवण्या परि रे बळ न करी ॥४॥

विजय माळगावकर
प्रथम वर्ष कला

# खरा धर्म कोणता ?

**भारती पोतनीस**
द्वितीय वर्ष वाणिज्य

अलीकडच्या काळात आपल्या जीवनात विलक्षण स्थित्यंतरे झाली. जिथे एकेकाळी एका जातीची माणसे दुसऱ्या जातीच्या माणसांची सावली अंगावर घ्यावयास तयार नव्हती, तिथे तीच माणसं एकमेकांच्या खांद्यास खांदा लावून वावरू लागली. जिथे एकेकाळी भाव-भक्ती हेच माणसाचे सर्वस्व होते, तिथे तेच लोक कशावरच विश्वास ठेवण्यास आता तयार नाहीत.

म्हणजेच जग आता झपाट्याने पुढे चालले आहे. यंत्रयुग सुरू झाले आहे. माणूस आपल्या बुद्धीच्या जोरावर मोठमोठे शोध लावतो आहे. त्याबरोबरच एकीकडे त्याचा अधःपात होतो आहे. मोठमोठे मजले उभारण्याचे अभूतपूर्व यश मिळणाऱ्या या मानवाच्या जगात आज हजारो लोकांना रात्री डोके टेकावयास जागा नाही. मोठमोठे कारखाने आहेत, उद्योगधंदे आहेत, की जिथे हजारो लाखो लोक काम करीत आहेत. तेथेच दुसरीकडे बेकारी आ वासून उभी आहे. शिक्षणाच्या, विद्वतेच्या बौद्धिक प्रसाराबरोबरच भावना, श्रद्धा, सत्प्रवृत्तींचा संकोच होत चालला आहे.

अशा विलक्षण विरोधी जोड्यांनी जग ग्रासून गेले आहे. एकीकडे संरक्षण, समृद्धता तर दुसरीकडे संहार, विध्वंसकता आहे. अशा या धकाधकीच्या जीवनात एक वर्ग सर्वांगाने विकसित होऊन पुढे चालला आहे तर हजारो आपल्या दुष्प्रवृत्तींनी, दुष्कृत्यांनी त्याला आपल्याबरोबर मागे खेचण्याचा प्रयत्न करीत आहेत व हे क्रियाशून्य लोक देशाच्या ऱ्हासास कारणीभूत ठरत आहेत. कारण या धकाधकीच्या जीवनातसुद्धा ' असेल माझा हरी. . . ' म्हणणारे लोक दुर्मिळ नाहीत. ' दैवात असेल तसे घडेल. ' असे म्हणत काही न करता निष्क्रीय रहाणारे लोक या राष्ट्रात अनेक आहेत. त्यांना हे माहीत नाही का ? की, " असाध्य ते साध्य । करता सायास । कारण अभ्यास । तुका म्हणे ॥ " मग केवळ हरिनामस्मरण करून अगर परमेश्वरावर हवाला ठेवून का कधी इच्छित हेतू साध्य होतो ?

या विश्वात जे जे सुंदर आहे, पवित्र आहे, आदरणीय आहे, बलवान आहे, तेच आमचे आदर्श आहेत. तोच आमचा परमेश्वर आहे. सामान्यांच्या चौकटीत न बसणारे जे असामान्य तेच आहे तीच आमची दैवते आहेत. मग देवावर हवाला ठेवून आपण किती दिवस बसणार ? देव कशासाठी असतो ?

जेव्हा मानवी प्रयत्न कमी पडतात, यशाचे सर्व मार्ग बंद होतात, मानवी बुद्धी जेव्हा कुठेतरी कमी पडते तेव्हा आपल्या मनाला, आपल्या हृदयाला, देवचरणी दिलासा मिळतो, आधार मिळतो. चुकलेले लेकरू अगर थकलेले पाखरू ज्याप्रमाणे आपल्या मातेच्या कुशीत विश्वासाने अंग टाकते त्याप्रमाणे मंदिरात अगर परमेश्वराच्या सान्निध्यात आपल्या सर्व भावना गळून पडतात व आपण एका विशिष्ट पावित्र्याशी, कुठल्यातरी असामान्य अद्वितीय दिव्यत्वाशी एकरूप होतो आणि गमावलेला विश्वास, हरविलेला आनंद व थकलेला प्रयत्न एकवटून नवीन उत्साहाने आपण कार्यास लागतो. ह्यासच देवत्वाचा परिणाम म्हणतात.

आपण आपल्यापुढे काहीतरी तेजोमय आदर्श हवेत म्हणून सर्व असामान्य व्यक्तींना देव, परमेश्वर असे नाव देऊन सर्व सौंदर्याने नटलेले हे दैवत पुढे उभे केले. परंतु त्याचा अर्थ असा नाही की आमच्या स्वार्थासाठी, आमच्यातील हव्यासासाठी आम्ही परमेश्वराचे स्मरण करावे.

आपली भूमी ही संतांची आहे. हा भारतदेश महान संस्कृतीचे प्रतीक आहे. श्रद्धारूपी पायावर जीवनाची ही इमारत उभी आहे. कर्तृत्व व कर्म या दगडविटांनी बांधलेली ही जीवनरूपी इमारत आहे. रक्तरूपी पाणी या इमारतीसाठी कित्येकांनी येथे खर्ची घातले आहे. " कर्म इश भजावा " हा येथील साधुसंतांचा संदेश आहे. कृती हेच त्यांचे जीवनसार होते. भक्त कबीर हा शेले विणत असताना

रामगीते गायचा. संत जनाबाई दळता दळता विठ्ठलास आळवायची. म्हणजे परमेश्वराच्या ध्यानात त्यांचे कर्तव्यकर्म त्यांनी सोडले नव्हते. पुंडलिकाने तर प्रत्यक्ष विठ्ठल दारात उभा असतानासुद्धा मातापित्याचे पाय चेपण्याचे कर्तव्य पूर्ण केले. म्हणजेच "परमेश्वराचे स्मरण करीत आपले दैनंदिन काम आवडीने आणि लक्षपूर्वक करणे ह्यातच जीवनसार सामावले आहे."

याचा अर्थ असा नाही की माणसांनी कुठेही श्रद्धा, विश्वास ठेवूच नये; परमेश्वरास मानूच नये. पण स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून केलेले कार्य नेहमीच यशस्वी होते. स्वामी विवेकानंद म्हणतात, "ज्यांचा ईश्वरावर विश्वास नाही ते नास्तिक असे प्राचीन धर्मांनी म्हटले आहे. पण नवा धर्म म्हणतो की ज्याचा स्वतःवर विश्वास नाही ते नास्तिक होत." ज्याच्यात स्वतःस घडविण्याचे सामर्थ्य नाही तो दैव, नशीब या गोष्टींवर अवलंबून रहातो. पण जो कर्तृत्वाच्या, प्रयत्नाच्या आधीन होतो, कर्माच्या आधीन होतो, त्याच्याच आधीन दैव होते. तोच जीवनात यशस्वी होतो. म्हणून दैवास कृतीने नमविणे आवश्यक आहे. कारण दैव हे देवाच्या पाठीशी नसून कृतीच्या, कर्माच्या पाठीशी आहे व कर्माची कपार ओलांडल्याशिवाय जीवनास दैवाची किनार लाभणार नाही.

म्हणून जीवनात समतोलत्व हवे. कुठलेही एक पारडे जड झाले तर तुला चुकण्याचा संभव असतो त्याप्रमाणे कुठलीही गोष्ट मर्यादेबाहेर गेली की जीवनाचा तोल बिघडण्याचा संभव असतो. म्हणून कर्म, कृती, कर्तव्य यांचे एक पारडे तर दुसरे विश्वास, श्रद्धा, प्रेम यांचे आहे आणि ही समतोल स्थितीतच असणे आवश्यक आहे. परंतु हल्ली काही अंशी हे अंधश्रद्धेचे पारडे खाली झुकू लागले आहे. कारण सध्या राष्ट्रात जी बुवाबाजी चालली आहे ते कशाचे द्योतक आहे? ते द्योतक आहे आमच्या कर्महीन, कृतिहीन वागणुकीचे. आम्हांस कष्टाशिवाय, प्रयत्नाशिवाय यश हवे आहे म्हणून आम्ही या बुवाबाजीच्या मार्गाने चाललो आहोत. हल्ली माणूस विकृतवादी बनला आहे. हिप्पी, रजनीश अशांसारख्यांच्या अनैतिक कृत्यावर तो विश्वास ठेवतो. आपल्यापुढचे आदर्श मात्र तो विसरू लागला आहे. सावरकर ध्येयप्रेरित होते पण म्हणून नुसतेच ते देशप्रेमाचे स्तोत्र गात बसले नाहीत तर त्यांच्यात ध्येयासाठी सर्व समुद्र पोहून जायची तत्परता होती. महात्माजींच्यात एक कोटी लोकांसाठी स्वतः वस्त्र न घालण्याची एकनिष्ठता होती. त्यांचा स्वतःवर विश्वास होता. स्वतःच्या मोहावर, लोभावर त्यांची सत्ता होती. यश मिळेपर्यंत कृती करत रहाण्याची त्यांच्यात चिकाटी होती. म्हणून हे लोक असामान्य ठरले. कृतीने त्यांनी परकीय सत्तेला नमविले.

यावरून आपणांस असे दिसते की कृती, कर्म हेच खरे जीवनाचे मोठे आधारस्तंभ आहेत. अपयशावर कृती हेच जालीम औषध आहे. म्हणून आम्ही आमच्यातील जुन्या कल्पना सोडून जुन्या अंध चालीरीती मोडून ईप्सीतासाठी, ध्येयासाठी प्रेरित होऊन कामास लागले पाहिजे. आपल्याला ध्येयाची जर खरी आच असेल तर कर्माची कास धरलीच पाहिजे. मग दैवही आपल्याला साथ दिल्याशिवाय रहाणार नाही.

म्हणून जीवनाचे हे 'मर्म' ओळखून त्याप्रमाणे 'कर्म' करणे हाच खरा मानवी 'धर्म' आहे.

---

## मी

कबूलच करतोय मी
जगातील सर्वच वाईट गोष्टी
माझ्यामधे आहेत

म्हणून रागवली आहेस ना माझ्यावर
पण...!
पण तुला माहितेय

ज्याच्यावर प्रेम असतांना त्याच्यावर
रागावता येतं
खरं ना हे!

मग! गम जपेन मी तुझ रागावणंसुद्धा
वेड्यासारखं
काटे जपतात ना फुलं
तसंच अगदी तसंच

**राजेंद्र पिंपुटकर**
द्वितीय वर्ष वाणिज्य

# भारतीय घटनेची ४२ वी दुरुस्ती : एक परिसंवाद

**राज्यशास्त्र विभाग**
मॉडर्न महाविद्यालय

राज्यशास्त्र (तृतीय वर्ष कला) या विषयाच्या अभ्यासक्रमात भारतीय राज्यघटना व राजकारण समाविष्ट केले आहे. सामान्यतः राज्यशास्त्राच्या व विशेषतः भारतीय राज्यघटनेच्या विद्यार्थ्याला राज्यघटनेतील परिवर्तन व भारतीय राजकारणातील नवे प्रवाह यांचा शैक्षणिक दृष्टीने जवळून परिचय होणे यथार्थ ठरते. नुकतीच राज्यघटनेत ४२ वी दुरुस्ती झाली. या दुरुस्तीला व्यापक स्वरूप आहे. या दुरुस्तीमुळे राज्यघटनेतील राजकारणातील सत्तासंबंधांचे आमूलाग्र परिवर्तन झाले आहे किंवा नाही याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. यासाठी ५ डिसेंबर १९७६ रोजी राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी ४२ व्या घटनादुरुस्तीच्या संदर्भात एक दिवसाचा परिसंवाद आयोजित केला. परिसंवादाला निमंत्रित तज्ज्ञ प्राध्यापक, प्राचार्य मो. भा. लिमये, अन्य-प्राध्यापक व राज्यशास्त्राचे विद्यार्थी उपस्थित होते.

वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना परिसंवादात सहभाग मिळावा म्हणून त्यांचे चार गट करण्यात आले. प्रत्येक गटाने प्राध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार आपापसांत चर्चा करून व संदर्भ घेऊन निबंध तयार केले. परिसंवादात चार बैठका घेण्यात आल्या. प्रत्येक बैठकीला भारतीय राज्यघटनेवर प्रभुत्व असणाऱ्या तज्ज्ञांना मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रण देण्यात आले होते. निबंध वाचन, निबंधाला अनुलक्षून चर्चा व तज्ज्ञांचे मार्गदर्शन या क्रमाने चारही बैठका यशस्वी झाल्या. या परिसंवादात वाचलेले निबंध येथे सादर करीत आहोत.

---

## घटना दुरुस्तीच्या संदर्भात भारताच्या राष्ट्रपतीचे स्थान

भारतीय घटनेने संसदीय पद्धती स्वीकारली आहे. त्यामुळे कार्यकारी मंडळाचा खरा प्रमुख व नामधारी प्रमुख असा भेद केला आहे. नामधारी प्रमुखाचे पद म्हणून राष्ट्रपतीच्या पदाची निर्मिती केली आहे. घटनेत राष्ट्रपतीस बरेच महत्त्वाचे अधिकार दिलेले आहेत. राष्ट्रपतीला संसदेने संमत केलेले विधेयक नामंजूर करता येते. तसेच तो वटहुकूम काढू शकतो आणीबाणी जाहीर करतो व महत्त्वाच्या नेमणूका करतो. तो पंतप्रधान व मंत्रिमंडळ यांची नेमणूक करतो. राष्ट्रपतीच्या अधिकारांची यादी पाहिली तर वरवर पाहता त्यास बरेच अधिकार आहेत असे वाटते. परंतु हा एक भ्रम आहे. तो आपल्या अधिकारांचा वापर करताना सतत मंत्रिमंडळाचा सल्ला घेत असतो. म्हणूनच घटनेमध्ये With the aid and advise of the council of ministers' असा शब्द सतत आलेला आहे. उदा० राष्ट्रपती मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने वटहुकूम काढू शकतो. त्याचप्रमाणे नेमणुका करतानासुद्धा त्याच्यावर बंधने आहेत. ती इतकी आहेत की राष्ट्रपती फक्त नावापुरताच नेमणुका करीत असतो. पंतप्रधानांची नेमणूक तो करतो. याचाच अर्थ लोकसभेत ज्या सभासदास सर्वात जास्त सभासदांचा पाठिंबा असेल त्यास राष्ट्रपती मंत्रिमंडळ बनवण्यास सांगतो. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची नेमणूक करताना तो न्यायाधीश उच्च अनुभव असलेला हवा असे त्याच्यावर बंधन आहे. राष्ट्रपतीच्या अधिकाराचा वापर राष्ट्रपती स्वतःच्या मताप्रमाणे करू शकत नाही असे म्हणावे लागेल. कारण राष्ट्रपतीचे पद निर्माण करताना घटनाकारांच्या समोर इंग्लंडचे राजेपद होते. इंग्लंडच्या राजेपदाचे आज काय महत्त्व आहे ? ते पद आज समारंभात्मक महत्त्वाचे किंवा शोभेपुरते उरलेले आहे. परंतु ते पद परंपरागत चालत आलेले असल्या-मुळे त्याची एक खास प्रतिष्ठा किंवा प्रतिमा राजकीय व्यव-स्थेत दिसून येते. अशीच प्रतिमा भारताच्या राष्ट्रपतीची होऊ शकेल काय ? परंपरागतरीत्या त्या पदास काहीच महत्त्व-नाही, कारण आपण प्रजासत्ताक पद्धतीचा स्वीकार केल

आहे. मग राहता राहिले त्या पदावर काम करणाऱ्या व्यक्तिमत्त्वामुळे निर्माण होणारी प्रतिमा, की जी राजेंद्र प्रसाद किंवा राधाकृष्णन यांच्यामुळे निर्माण झाली आहे. स्वातंत्र्य-युद्धातील किंवा चळवळीतील एक योद्धा म्हणून राजेंद्रप्रसादांना महत्त्व होते, आणि एक जगप्रसिद्ध तत्त्वज्ञ म्हणून राधाकृष्णन यांची प्रतिमा होती त्यामुळे या पदाचे त्या काळात महत्त्व होते.

राष्ट्रपती पक्षीय राजकारणात सहभागी झालेला नसावा अशी एक अपेक्षा घटनाकारांच्या मनात असावी म्हणून राष्ट्रपतीच्या निवडणुकीत विशेष काळजी घेतली आहे. परंतु शेवटी निवडणूक म्हणजे बहुमत आहे व निवडणूक जिंकणे म्हणजे स्पर्धा आली. म्हणजेच पक्षीय राजकारण आपोआपच आले. म्हणजेच सत्ताधारी पक्ष आपले उमेदवार उभे करणार व त्यातून जो निवडून येणार त्याची काय प्रतिष्ठा व प्रतिमा निर्माण होणार ? श्री. व्ही. व्ही. गिरी यांची निवड ज्या पद्धतीने झाली त्यामुळे वरील गोष्ट चांगलीच स्पष्ट झाली आहे आणि हे ही लक्षात ठेवले पाहिजे की एकदा सत्ताधारी पक्षाच्या कृपेमुळे आपण या पदी आरूढ झालो आहोत असे म्हटल्यानंतर त्या पक्षाच्या मंत्रिमंडळाच्या विरुद्ध जाणे त्यास शक्य होणार नाही. ज्यांनी आपणाला निवडले आहे, त्यांना ती व्यक्ती मी राष्ट्रपती आहे म्हणून माझा अधिकार आहे असे सांगू लागेल, असे कदापिही होणार नाही. म्हणजेच पक्षीय राजकारणातून निवडलेला राष्ट्रपती हा सतत दुय्यम भूमिकाच घेणार ! सतत मंत्री-मंडळाच्याच सल्ल्याने वागणार ! आपली स्वतःची मते गुंडाळून ठेवणार, हे आपण गृहीत धरले पाहिजे. याचाच अर्थ असा होतो की इंग्लंडप्रमाणे राजपदाभोवती असलेले वलय नाही, व्यक्तिमत्वामुळे येणारी प्रतिष्ठा नाही, तर फक्त भारतीय घटनेने दिलेली दुय्यम भूमिकाच आहे. अशा मर्यादित राष्ट्रपती पदाचा रबरी शिक्का झाला नाही तर नवलच! असामान्य कर्तृत्व व व्यक्तिमत्त्व असलेल्या व्यक्ती पक्षीय राजकारणात उतरतील अशी आशा धरण्यास जागा नाही. आणि एखादा उतरलाच तर त्याला बहुमतवाल्या पक्षाच्या तिकिटावरच उतरावे लागेल. म्हणजेच या पदाचे महत्व पक्षीय राजकारणापासून अलिप्त असणाऱ्या व्यक्तीमुळे निर्माण होणार नाही.

भारतीय घटनेने राष्ट्रपतीस दुय्यम भूमिका दिलेली आहे. प्रत्यक्ष राजकारणात घटना राबविताना आजपर्यंतचा अनुभव लक्षात घेता राष्ट्रपती पदाचे महत्त्व कमी होत गेले आहे असे आढळते. याला आणखी एक कारण म्हणजे पंतप्रधानांचे व्यक्तिमत्त्व होय. पंडित नेहरू पंतप्रधान आहेत म्हटल्यावर त्यांच्या आजुबाजूच्या कोणत्याही पदावरील व्यक्तीचे महत्त्व कमी होणार हे साहजिकच आहे. कारण त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वामुळे प्रत्यक्षात मंत्रिमंडळाचे महत्त्व कमी झालेले होते, तर मग राष्ट्रपतीच्या पदाचे काय ?

आज पंतप्रधान-पदावर असामान्य राजकीय कर्तृत्व असलेल्या श्रीमती इंदिरा गांधी आहेत. त्यामुळे राष्ट्रपती-पदावर पंतप्रधानांच्या व्यक्तिमत्वाची सतत सावली पडलेली आहे, असे पाहावयास मिळते.

राष्ट्रपती पदाचे महत्व आणखी कमी होण्याचे कारण म्हणजे सत्ताधारी पक्षास मिळालेले निर्णायक बहुमत. जेव्हा लोकसभेत निरनिराळ्या पक्षांना जवळपास सारख्याच जागा मिळतील, तेव्हा राष्ट्रपती पदाचे महत्व वाढण्याची शक्यता आहे. पंतप्रधान कोणास नेमायचे हाही राष्ट्रपतींचा अधिकार महत्त्वाचा होण्याची शक्यता आहे. लोकसभा बरखास्त करण्याचा अधिकार महत्त्वाचा होण्याची शक्यता आहे. आहे, तसेच आणीबाणीचा अधिकारही महत्त्वाचा होऊ शकेल. पण आजपर्यंतचा अनुभव लक्षात घेता हे शक्य वाटत नाही.

घटनाकारांची भूमिका राष्ट्रपतींच्या पदाबद्दल स्पष्ट होती. डॉ. आंबेडकरांच्या शब्दात ती व्यक्त होते. ते म्हणतात, ' राष्ट्रपतींचे स्थान इंग्लंडच्या राजासारखे आहे. तो राज्याचा प्रमुख आहे, कार्यकारिणीचा प्रमुख नाही. तो राष्ट्राचे प्रति-निधित्व करतो, शासनाचे नाही. सर्वसाधारणपणे मंत्र्यांचा सल्ला स्वीकारण्याचे त्याच्यावर बंधन आहे. त्यांच्या इच्छे-विरुद्ध तो काहीच करू शकत नाही, तसेच त्यांच्या इच्छे-शिवाय त्याला काहीही करता येत नाही. ' तसेच श्री अशोक चंदा सारख्या अभ्यासकाचे व श्रेष्ठ अधिकाऱ्याचे म्हणणे ही लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, ' ज्या दोन राष्ट्रपतींचा आम्ही अनुभव घेतला त्यावरून राष्ट्रपतींपदाबद्दल व त्याच्या घटनात्मक स्थानाबद्दल अत्यंत गैरसमज निर्माण झाले असून असे वाटू लागले आहे की, राष्ट्रपतीला स्वतःचे काही अधिकारच नाहीत की काय ? आणि तो राज्यकारभारात काहीच सहभाग घेऊ शकत नाही की काय ? पंडित नेहरूंच्या दिव्यवलयी व उत्तुंग व्यक्तिमत्वामुळे व त्यांच्या वादातीत क्षमतेमुळे राष्ट्रपतीचे स्थान हे असे झाले आणि राष्ट्रपती हा केवळ ' शोभेची उत्सवमूर्ती ' ठरला. नेहरूंच्या वारस-दारांनी हीच परंपरा यशस्वीपणे पुढे चालविली आणि हे प्रस्थापित केले की—केंद्रशासनाचा कारभार राष्ट्रपतीच्या

नावाने चालतो, पण चालविणारे पंतप्रधान व मंत्रिमंडळच असते. ज्या निर्णयांवर त्याचे शिक्कामोर्तब लागते तेवढे फक्त त्याने करायचे असते.'

परंतु नवीन घटना दुरुस्तीमुळे आता या चर्चेस फारसा अर्थ उरलेला नाही. राष्ट्रपतीच्या अधिकाराबद्दल असलेली संदिग्धता आता संपुष्टात आलेली आहे. कारण ७४ व्या कलमामध्ये दुरुस्ती करून आता असे म्हटले आहे की राष्ट्रपतीने आपले कार्य मंत्रिमंडळाच्या सल्ल्याप्रमाणेच केले पाहिजे. हा सल्ला आता त्याला मानलाच पाहिजे असा स्पष्ट अर्थ या दुरुस्तीचा होतो. संसदीय पद्धतीत कार्यकारी मंडळाचा नामधारी प्रमुख हा खरोखरीच नामधारी असतो, फक्त नावापुरता असतो. ही गोष्ट भारतीय संसदीय लोकशाहीत आता निर्विवादपणे सिद्ध झालेली आहे.

## संसद : काल व आज

भारतीय राज्यघटनेने संसदीय पद्धत स्वीकारली आहे. संसदीय पद्धतीचे आदर्श उदाहरण म्हणून इंग्लंडचे उदाहरण देण्यात येते. या देशाच्या प्रमाणे संसदीय पद्धतीत संसद महत्त्वाची असते. इंग्लंडमध्ये संसद सार्वभौम आहे. कोणताही कायदा या संसदेस करता येतो किंवा बदलता येतो. तिला परिदृढ घटनेचे बंधन नाही, अथवा सर्वोच्च न्यायालयाचेही बंधन नाही. इंग्लंड हे एकात्म राज्य आहे. त्यामुळे कायदे करण्याबाबतचे सर्व अधिकार एकट्या संसदेला आहेत.

भारतातील परिस्थिती वेगळी आहे. भारत हे संघराज्य आहे. त्यामुळे कायदे करण्याची सत्ता तीन याद्यांप्रमाणे वाटून दिली आहे. राज्य-यादीतील विषयावर, आणीबाणी सोडल्यास इतर वेळी संसदेस कायदा करता येत नाही. त्याचप्रमाणे भारतीय घटना इंग्लंडइतकी लवचिक नसल्याने तिच्यात बदल करण्यासाठी विशेष प्रक्रिया सांगितली आहे. म्हणजेच सैद्धांतिकदृष्ट्या ती परिदृढ गटात बसते. संसदेने केलेले कायदे घटनेप्रमाणे आहेत की नाही ते पाहण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला दिलेला आहे. सर्वोच्च न्यायालय कायद्याची घटनात्मकता तपासून पाहते. नागरिकांच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारे कायदे संसदेस करता येत नाहीत. अशाप्रकारे संसदेच्या अधिकारावर भारतीय घटनेने नियंत्रणे घातली आहेत. घटनादुरुस्तीबद्दलचे अधिकार संसदेस दिले आहेत. परंतु त्यावरही विशिष्ट मर्यादा घातल्या आहेत.

वरील मुद्द्यांवरून हे स्पष्ट होते की, भारताची संसद पूर्णतः सार्वभौम नाही. तिला विशिष्ट मर्यादेत कार्य करावे लागते. परंतु गेल्या काही वर्षात आणि विशेषतः १९६९ पासून संसदेच्या अधिकाराबद्दल या देशात उलट-सुलट चर्चा होऊ लागली आहे. संसदेने केलेले कायदे सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य म्हणून फेटाळून लावले. त्याचप्रमाणे संसदेच्या घटना दुरुस्तीच्या हक्काबद्दल सर्वोच्च न्यायालयाने ताठर भूमिका घेतली. यामुळे संसद विरुद्ध सर्वोच्च न्यायालय असे द्वंद्वाचे चित्र उभे राहिले.

संसदेचे अधिकार निश्चित किती आहेत, त्यावर कोणत्या मर्यादा आहेत, सर्वोच्च न्यायालयाला दिलेला अधिकार कितपत योग्य आहे, या मुद्यांवर चर्चा होऊ लागली. संसदेमध्ये बहुमतात असलेल्या पक्षांनी आणि काही डाव्या पक्षांनी असे म्हटले की, लोकशाहीमध्ये जनतेच्या प्रतिनिधींना देशाचे भवितव्य ठरविण्याबाबत अंतिम अधिकार असला पाहिजे. कालानुसार जे बदल आवश्यक आहेत ते करण्याचा अधिकार संसदेला असावा. जनतेच्या कल्याणासाठी समाजवादी कार्यक्रमाची जरुरी आहे व त्यासाठी संसदेला जादा अधिकाराची जरुरी लागणार आहे. घटनेत जरुर ते फेरबदल करावे लागणार आहेत. मूलभूत हक्कांनाही धक्का लागेल. न्यायाधीश परंपरागत विचाराचे असतात व ते जनतेचे प्रतिनिधी नसतात. त्यामुळे न्यायालये संसदेच्या अधिकारावर विनाकारण मर्यादा आणतात. ही झाली एक बाजू.

विरुद्ध बाजूने असे म्हणणे मांडले की, घटना हा मूलभूत कायदा आहे. त्यात बदल करणे अवघडच असले पाहिजे. पूर्ण विचारांनी घटना बनविण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालय घटनेचे संरक्षण करण्यासाठी आहे. नागरिकांचे मूलभूत हक्क हा लोकशाहीचा प्राण आहे. त्यांना धक्का लावण्याचा अधिकार संसदेस असता कामा नये.

१९६९ ते ७५ या काळामध्ये वरील प्रमाणे देशभर चर्चा झाली, परिसंवाद झाले, वर्तमानपत्रात लेख लिहिण्यात आले; वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. संपूर्ण देशभर या वादामुळे दोन गट पडल्यासारखे भासले.

नवीन घटना दुरुस्तीमुळे या वादाचा आणि चर्चेचा एक प्रकारे शेवट झाला आहे असे म्हणण्यास हरकत नाही; किंवा काही काळ तरी या प्रश्नाचा निकाल लागला आहे असे म्हणावेसे वाटते. नव्या घटना दुरुस्तीत ज्या कलमांचा समावेश झाला आहे व बदल झाला आहे त्या अनुषंगाने चर्चा केल्यास आपणांस माझे हे म्हणणे पटेल असे वाटते.

३६८ वे कलम घटना दुरुस्तीबद्दलचे आहे संसदेला

घटना दुरुस्तीचा अंतिम अधिकार देण्याच्या दृष्टीने या कलमातील तिसऱ्या clause नंतर चवथा clause घालण्यात आला आहे या clause मुळे घटनेमध्ये संसदेने केलेल्या कोणत्याही दुरुस्तीस कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही. यामध्ये घटनेच्या तिसऱ्या विभागाचाही समावेश आहे. तसेच आता फक्त घटना दुरुस्तीबाबतच आव्हान देता येईल. याचा अर्थ भारतीय संसदेला घटना दुरुतीबाबतचा अंतिम अधिकार या नवीन घटना दुरुस्तीत मिळाला आहे.

त्याच प्रमाणे नवीन घटना-दुरुतीने कायद्याची घटनात्मकता तपासून पाहण्याचा न्यायालयाचा अधिकारही थोडा बदलला पाहिजे. या दुरुस्तीने कायद्याची म्हणजेच संसदेची व राज्याच्या विधिमंडळाची ताकद वाढविली आहे. संसदेने केलेल्या कायद्याच्या विरुद्ध एखाद्या नागरिकास जर दाद मागायची असेल तर राज्याच्या उच्च न्यायालयाकडे जाता येईल. संसदीय कायद्याबरोबर शासनाने दिलेले हुकूमही समाविष्ट करण्यात आले आहेत. अशा प्रकारे न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारातही बदल झाला आहे.

संसदेची मुदत पाच वर्षापासून सहा वर्षापर्यंत वाढविण्यात आली आहे. याशिवाय घटनेच्या सातव्या परिशिष्टात काही बदल करण्यात आले आहेत. त्यातील महत्वाचा बदल म्हणजे शिक्षण हा विषय सामायिक यादीत समाविष्ट करण्यात आला आहे. या संदर्भातही काही मुद्दे मांडणे महत्त्वाचे आहे. भारतीय संघराज्यात सुरवातीपासून केंद्र प्रबळ राहिले आहे. भारतीय घटनेनेच केंद्रास जास्त अधिकार दिलेले आहेत. आणीबाणी-विषयक अधिकारात नव्या दुरुस्तीने जे बदल केले आणि केंद्र व राज्य यादीत जे बदल केले आहेत त्यामुळे जे केंद्र अगोदर प्रबळ होते ते अधिकच प्रबळ झाले. संसदेचा अधिकार वाढला आहे. घटक राज्याच्या विधिमंडळाच्या तुलनेने संसदेचे महत्व आणखी वाढलेले आहे.

संसदेच्या अधिकारात वाढ होण्याच्या दृष्टीने वरील दुरुस्त्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या सर्व दुरुस्त्यांमुळे नोव्हे. १९७६ पूर्वीची संसद आणि नंतरची संसद यांमधे अधिकाराबद्दल फरक पडला आहे. परंतु हा प्रश्न येथे संपत नाही. प्रत्यक्षात जेव्हा आपण असे म्हणतो की, संसदेचे अधिकार वाढले तेव्हा त्याचा नेमका अर्थ काय होतो? नेमका अर्थ असा होतो की, अप्रत्यक्षपणे व प्रत्यक्षपणेसुद्धा कार्यकारी मंडळाचे अधिकार वाढतात. कारण संसदेत बहुमतातील पक्षाचे राज्य असते. बहुमताच्या मंत्रिमंडळाच्या हातात सर्व कार्यकारी सत्ता एकवटलेली असते. बहुमतवाल्या पक्षाचेच नेते मंत्रिमंडळात असतात. त्यांची पक्षसदस्यावर पकड असते आणि जर निर्णायक बहुमत असेल तर मंत्रिमंडळाचे महत्त्व व नियंत्रण आणखीनच वाढते. त्यामुळे संसदेतील बहुमताच्या जोरावर मंत्रिमंडळ आपल्याला हवे ते धोरण मान्य करायला लावते. म्हणजे जेव्हा संसदेचे अधिकार वाढतात, तेव्हा प्रत्यक्षात मंत्रिमंडळाचेच अधिकार वाढतात, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. नव्या घटनादुरुस्तीमुळे संसदेचे अधिकार वाढलेले आहेत म्हणजेच मंत्रिमंडळाच्या सत्तेत वाढ झालेली आहे.

परंतु सध्या पार्लमेंटचा घटना-दुरुस्तीचा अधिकार वादातीत झाला आहे असे आपणास दिसून येते.

## न्यायमंडळ व घटना दुरुस्ती

न्यायमंडळ हा शासनसंस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे. कायद्यांचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी, नागरिकांच्या मूलभूत हक्कांची जपणूक करण्यासाठी, संघराज्यात्मक शासन पद्धतीत केंद्रीय सरकार व घटक राज्याचे सरकार यांच्यात संघर्ष उद्‌भवल्यास तो सोडविण्यासाठी न्यायमंडळाची गरज असते. लॉर्ड ब्राईस यांनी असे म्हटले आहे की, "कायद्याने काही नैतिक परिमाणे व्यक्तीच्या मनात प्रस्थापित होत असतात. पण जर कायद्याचे प्रशासन अप्रामाणिकपणे केले तर सुव्यवस्थाच कोलमडेल. शिक्षेच्या तीव्रतेपेक्षा शिक्षेच्या अटळतेमुळे गुन्हेगारी कमी होत असते. न्यायाचा दीप विझल्यास होणाऱ्या अंधःकारास अन्त नाही." भारतीय समाज अज्ञानी व निरक्षर. देशात लोकशाही शासनव्यवस्था नव्याने आलेली. अशा स्थितीत घटनाकारांनी लोकहिताच्या दृष्टिकोणातून स्वतंत्र न्यायमंडळाची निर्मिती केली.

भारतीय न्यायमंडळ स्वतंत्र असावे म्हणून घटनात्मक तरतुदी केलेल्या दिसतात त्या अशा :

(१) सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्राध्यक्ष करतात. न्यायधीशाच्या अंगी गुणवत्ता व अनुभव असला पाहिजे. त्याची दखल राष्ट्राध्यक्षाने घेतली पाहिजे.

(२) न्यायाधीशांचे सेवानिवृत्ती वय राज्यघटनेने ठरवून दिलेले आहे. त्यांच्या विरोधी अभियोग यशस्वी करून त्यांना अकाली पदच्युत करणे सोपे नाही. थोडक्यात म्हणजे न्यायाधिशांना सेवा-शाश्वती देण्यात आलेली आहे.

(३) राज्यघटनेने न्यायाधीशांचे वेतन निश्चित केले आहे. त्या वेतनावर संसदेचे नियंत्रण नाही. संसद त्याचे

वेतन वाढवू शकते पण कमी करू शकत नाही. हे वेतन राखीव निधीतून दिले जाते.

( ४ ) न्यायधीशांना बदनामीपासून संरक्षण दिले आहे. त्यांना व्यवहारात शारीरिक संरक्षण दिले जाते.

राज्यघटनाकारांनी न्यायमंडळाला स्वातंत्र्य दिले आहे व अधिकारही दिले आहेत. राज्यघटनेच्या ४ थ्या प्रकरणातील पन्नासाव्या कलमात असे म्हटले आहे की, राज्यकारभारातील न्याय व अंमलबजावणी खात्याची फारकत करण्याची योजना राज्य करील. परंतु काळाच्या ओघात न्यायमंडळ व संसद यांच्यात सत्तासंघर्ष निर्माण झाल्याचे आपणांस दिसून येते. भारताने संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केला आहे. त्यामुळे संसद सर्वश्रेष्ठ आहे. पंडित नेहरूंनी भारतीय संसद श्रेष्ठ असल्याचा निर्वाळा अनेक प्रसंगी दिला आहे. ए. के. गोपालन या कम्युनिस्ट नेत्याने प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कायद्याची घटनात्मकता विवाद्य ठरवून न्यायमंडळाकडे दाद मागितली. त्यावेळी न्यायाधीश कन्हैया व पतंजलीशास्त्री यांनी संसद श्रेष्ठ असल्याचा निर्वाळा दिला. त्यामुळे प्रतिबंधक स्थानबद्धतेचा कायदा घटनाबाह्य ठरू शकला नाही. परंतु नंतरच्या काळात न्यायमंडळाने आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित केले. जस्टिस सुब्बाराव यांनी न्यायमंडळाचे अधिकार प्रस्थापित केले. त्यांच्या मते १३ ब कलमानुसार पार्लमेंटला मूलभूत हक्क कमी करण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार नाही. १३ ब कलम असे आहे की, ' राज्याला असा कोणताही कायदा करता येणार नाही, की जो या भागात नमूद केलेले हक्क हिरावून घेईल किंवा मर्यादित करील आणि या कलमाला विरोधी असणारा कायदा करण्यात आला तर तो कायदा तेवढ्या विरोधापुरता निरर्थक ठरेल. याबाबतीत संसदेने ३६८ वे कलम उचलून धरले आहे. संसदेच्या मते, संसदेला घटना दुरुस्तीचा पूर्ण अधिकार असावा, संसदेने केलेला कायदा घटनाबाह्य ठरविण्याचा अधिकार-न्यायमंडळाला नसावा, संसदेचे सभासद हे लोकप्रतिनिधी असतात. ते कायद्यांच्या माध्यमातून लोकांच्या इच्छा व्यक्त करतात. अशा स्थितीत मूठभर न्यायाधीशांनी कोट्यवधी लोकांच्या इच्छा नामंजूर करणे, समाजाच्या सर्वांगीण प्रगतीला अडथळा आणणे, अयोग्य आहे व लोकशाहीशी विसंगत आहे.

स्वर्णसिंग समितीने न्यायाधीशांचा अधिकार कमी करावा व पार्लमेंटचा अधिकार वाढवावा अशी शिफारस केली आहे. त्याप्रमाणे घटना-दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यातून

---

**मॉडर्न महाविद्यालय**
**राज्यशास्त्र विभाग आयोजित**

## भारतीय राज्यघटनेची ४२ वी दुरुस्ती : परिसंवाद

### ( १ ) घटना दुरूस्तीच्या संदर्भात भारताच्या राष्ट्रपतींचे स्थान

अध्यक्ष : प्रा. स. वि. कुलकर्णी,
उपप्राचार्य, विधि महाविद्यालय, पुणे.
मार्गदर्शक–प्राध्यापक : राजेंद्र व्होरा.
निबंध लेखक– विद्यार्थी : सर्वश्री दाभाडे, काळोखे, माहूरकर, वहिले, चव्हाण आणि जाधव पी. एन.

### ( २ ) भारतीय संसद–काल व आज

अध्यक्ष : प्रा. सत्यरंजन साठे,
प्राचार्य, विधि महाविद्यालय, पुणे.
मार्गदर्शक-प्राध्यापक : राजेंद्र व्होरा.
निबंध लेखक–विद्यार्थी : सर्वश्री चिकोडीकर, गडगे, फोफलिया, थोरात, चुंबळकर व पोतदार.

### ( ३ ) न्यायमंडळ व घटनादुरुस्ती

अध्यक्ष : प्रा. राम बापट,
प्रपाठक, राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ
मार्गदर्शक–प्राध्यापक : शं. ना. नवलगुंदकर.
निबंध लेखक-विद्यार्थी : कु. हरिप, कु. गिरे, कु. कांबळे, कु. बाविसकर, कु. ठाकरे, कु. देशपांडे.

### ( ४ ) घटना दुरूस्तीच्या संदर्भात मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे

अध्यक्ष : प्रा. जी. व्ही. पंडीत,
निवृत्त प्राचार्य विधि महाविद्यालय पुणे.
मार्गदर्शक–प्राध्यापक : (डॉ.) दि. का. गर्दे.
निबंध लेखक विद्यार्थी : सर्वश्री बोरकर, दामले, ऐनापुरे, गाडगीळ, आणि जाधव एस.एस.

काही प्रश्न निर्माण होतात.

( १ ) पार्लमेंटची हुकूमशाही निर्माण होईल का ?

( २ ) संसदीय पद्धतीत पार्लमेंटच्या बहुमताच्या पाठिंब्यावर मंत्रिमंडळ राज्यकारभार करते. घटना दुरुस्तीमुळे मंत्रिमंडळाची हुकूमशाही निर्माण होईल का ?

( ३ ) मूलभूत हक्कांचा संकोच झाल्यास व्यक्तीने कोणाकडे तक्रार करायची ? व्यक्तिस्वातंत्र्य कितपत सुरक्षित राहील ?

( ४ ) न्यायमंडळ कमिटेड करण्यात आले तर लोकशाहीच उरेल का ?

## घटना दुरुस्तीच्या संदर्भात मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे

भारतीय राज्य घटना जगातील सर्वात मोठी राज्य घटना आहे. राज्य घटनेच्या मोटेपणाच्या निरनिराळ्या कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे घटनेत मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट केली आहेत. मूलभूत हक्कांना न्यायालयांचे संरक्षण लाभले आहे. घटनाकारांवर मानवी हक्कांना प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय सनदांचा व थोर विचारवंतांचा प्रभाव होता. भारतातील बहुसंख्य समाज अज्ञानी, गरीब व लोकशाहीच्या बाबतीत अननुभवी आहे हे लक्षात घेऊन नागरिकांच्या हक्कांची जपवणूक होण्याची निकड घटनाकारांना वाटली. म्हणूनच एका बाजूला मूलभूत हक्कांना न्यायालयीन संरक्षण दिले गेले तर दुसऱ्या बाजूला मूलभूत हक्क कमी करण्याचा किंवा काढून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही अशी शाश्वती घटनेतील '१३ ब' कलमाने दिली आहे.

घटनाकारांना अशी जाणीव होती की, सर्व हक्क, अधिकार सर्वांना उपलब्ध करून देणे सरकारच्या दृष्टीने अशक्य ठरेल, ( उदा. प्रत्येकास जीवनाचे आर्थिक साधन उपलब्ध करून देणे ही निकडीची गरज असली तरी सरकारला ते शक्य होईल असे नाही. ) मूलभूत हक्क म्हणून अशा गोष्टींचा घटनेत समावेश केला व त्याला न्यायालयीन संरक्षण दिले, तर सरकारपुढे पेच-प्रसंग निर्माण होतील. ह्याची घटनाकारांना जाणीव होती. त्यासाठी काही तरतूदी मूलभूत हक्कांच्या स्वरूपात न करता राज्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरूपात केल्या गेल्या. थोडक्यात म्हणजे मूलभूत हक्कांचे दोन प्रकार केले गेले. ( १ ) वादयोग्य हक्क व ( २ ) अवादयोग्य हक्क. मूलभूत हक्कांमुळे नकारात्मक स्वातंत्र्य मिळते, सरकारच्या अधिकाराला हक्कांच्या मर्यादा पडतात. याउलट मार्गदर्शक तत्त्वातून होकारात्मक स्वातंत्र्य प्रस्थापित होते. म्हणजेच नागरिकांच्या सर्वांगीण प्रगतीची नैतिक जबाबदारी सरकारवर येते.

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या प्रकरणात १४ ते ३२ कलमांत मूलभूत हक्क आढळतात.

( १ ) कलम १४ ते १८ मध्ये समतेचा हक्क आहे. भारतात अर्थिक आणि सामाजिक विषमता मोठ्या स्वरूपात असल्यामुळे हा हक्क महत्त्वाचा आहे. या हक्कामुळे प्रत्येक व्यक्तीला कायद्याचे समान संरक्षण लाभले आहे. सर्व नागरिकांना राज्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही पदावर नियुक्त होण्याची समान-संधी मिळाली आहे. सार्वजनिक क्षेत्रात सर्वांचाच दर्जा समान मानला जाईल याची शाश्वती देण्यात आली आहे.

( २ ) स्वातंत्र्याचा हक्क– सर्व नागरिकांना भाषण आणि मत प्रदर्शनाचे स्वातंत्र्य, शांततापूर्वक निःशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, वास्तव्य स्वातंत्र्य, खाजगी संपत्तीविषयक स्वातंत्र्य आणि व्यवसाय स्वातंत्र्य दिले आहे.

( ३ ) राज्यघटनेत पिळवणुकीविरुद्धचा हक्क दिला आहे. या हक्कातून गुलामगिरीला प्रतिबंध केला आहे. कोवळ्या वयाच्या मुलांना व स्त्रियांना विशेष संरक्षण दिले आहे.

( ४ ) राज्यघटनेने धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क दिलेला आहे. भारतात बहुधर्मीय आहेत. कोणत्याही धर्माच्या अनुयायाला आपापल्या धर्मानुसार आचार करण्याची संधी मिळावी म्हणून हा हक्क आवश्यक आहे.

( ५ ) राज्यघटनेने सांस्कृतिक, शैक्षणिक हक्क दिलेले आहेत. त्यातून अल्पसंख्याकांच्या हितासंबंधांची जपणूक केली आहे.

( ६ ) राज्यघटनेच्या ३१ व्या कलमाने व्यक्तीला खाजगी संपत्तीचा हक्क ( अधिकार ) दिला आहे. ह्या अधिकारामुळे नंतरच्या काळात काही गंभीर पेचप्रसंग निर्माण झाले. त्यामुळे घटनादुरुस्ती करावी लागली. सत्तारूढ पक्षाने स्वीकारलेले समाजवादी समाजरचनेचे स्वप्न साकारण्यासाठी खाजगी मालमत्तेच्या अधिकाराला मर्यादा घालाव्या लागल्या.

( ७ ) घटनेच्या ३२ व्या कलमाने मूलभूत हक्कांना न्यायालयीन संरक्षण देण्यात आले आहे.

भारतीय घटनेच्या ४ थ्या प्रकरणात मार्गदर्शक तत्त्वांचा उल्लेख आहे. ती तत्त्वे प्रत्यक्षात अमलात आणणे हे राज्याचे कर्तव्य आहे. सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय देणारी

समाजव्यवस्था निर्माण करणे, अल्पवयीनांचे पिळवणूकीपासून संरक्षण करणे. देशात सर्वांना एकच मूलकी कायदा लागू करणे, स्त्री-पुरुषांना उपजीविकेची पुरेशी साधने उपलब्ध करून देणे, समान कामासाठी समान वेतन मिळवून देणे, समाजातील दुर्बल घटकांच्या विकासाचा विशेष प्रयत्न करणे, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देणे, लोकांच्या आहारात सुधारणा घडवून आणणे, सार्वजनिक आरोग्याकडे लक्ष पुरविणे, छोटया उद्योगधंद्यांचा विकास घडवून आणणे इत्यादी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

नागरिकांना दिलेल्या हक्कांमुळे व हक्कांना दिलेल्या न्यायालयीन संरक्षणामुळे काही पेच-प्रसंग निर्माण झाले. बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, अर्बन सीलिंग कायदा, लँड सीलिंग कायदा इत्यादी गोष्टी समाजवादी समाजरचनेच्या दृष्टिकोणातून केल्या गेल्या. परंतु खाजगी संपत्तीच्या अधिकाराच्या विरोधी उचललेले पाऊल अडचणीत सापडले. कारण न्याय मंडळाने हक्कांच्या रक्षणासाठी कायदेमंडळाचा प्रयत्न रोखून धरला. थोडक्यात म्हणजे कायदेमंडळ आणि न्यायमंडळ यांच्यात मूलभूत हक्कांच्या निमित्ताने संघर्ष उद्भवला. पार्लमेंटने घटना दुरुस्ती करून न्यायमंडळाच्या अधिकाराचा संकोच केला. सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने मूलभूत हक्क कमी करण्याचा किंवा रद्द करण्याचा आधिकार पार्लमेंटला प्राप्त झालेला आहे. त्याचबरोबर कल्याणकारी राज्यनिर्मितीच्या दृष्टीने मार्गदर्शक तत्त्वे अमलात आणण्याला सरकार बांधलेले आहे. कल्याणकारी राज्याची निर्मिती एकटया सरकारच्या प्रयत्नातून होऊ शकत नाही. त्यासाठी शिस्तबद्ध प्रयत्नशील समाजाची गरज असते. समाज शिस्तबद्ध होण्यासाठी नागरिकांना दिलेल्या हक्कांच्या बरोबर नागरिकांनी काही कर्तव्ये केली पाहिजेत. त्या दृष्टीने ४४ वी घटनादुरुस्ती करून घटनेत कर्तव्ये समाविष्ट केलेली आहेत. ती खालीलप्रमाणे :

(१) घटना, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर बाळगणे.

(२) स्वातंत्र्य-आंदोलनाच्या उदात्त तत्त्वांना उजाळा देणे.

(३) देशाची सार्वभौमता, ऐक्य आणि एकात्मता यांचे रक्षण करणे.

(४) गरज भासेल तेव्हां देशाचे संरक्षण करणे.

(५) देशातील लोकांत बंधुभाव निर्माण करणे व स्त्रीजातीचा अपमान होईल अशा गोष्टी टाळणे.

(६) देशाच्या एकात्म संस्कृतीचा श्रेष्ठ वारसा जतन करणे.

(७) नैसर्गिक वातावरण कायम ठेवणे व त्याबाबत जीवसृष्टीविषयी प्रेम बाळगणे.

(८) वैज्ञानिक दृष्टिकोण, मानवता, चिकित्सक व सुधारक प्रवृत्ती वाढविणे.

(९) हिंसा टाळून सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे.

(१०) वैयक्तिक व सामूहिक क्षेत्रात श्रेष्ठ पद मिळविण्यास प्रयत्न करणे.

कर्तव्यांचा समावेश करीत असताना काही मार्गदर्शक तत्त्वे घटनेमध्ये समाविष्ट करण्यात आली.

(१) देश विरोधी पक्ष व देश विरोधी कृत्य यांना बंदी घालण्यात आली. देशाचा एखादा भाग देशापासून फुटून निघण्यासाठी एखादी कृती शब्दाने अथवा वागण्याने सूचित करणे, देशाची सार्वभौमता, सुरक्षितता, एकता धोक्यात आणणे, बळाने सरकार उलथविण्या । प्रयत्न करणे, देशांतर्गत गोंधळ माजवून सार्वजनिक सेवा बंद पाडणे, धार्मिक, भाषिक व प्रादेशिक एकात्मता नष्ट करणे, ही कृत्ये देशाविरोधी कृत्ये मानली जातील. तसेच संप घडवून आणणे, राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीला खीळ घालणे, कर चुकविणे, एकंदरीत उत्पादनाला आणि विकासाला खीळ घालणे यांचाही समावेश त्यामध्ये येतो. शासन त्याविरुद्ध आता शिक्षा करू शकते.

(२) भारताच्या उद्दिष्ट प्रक्रियेचे स्वरूप हे समाजवादी, निधर्मी, लोकशाहीवादी, सार्वभौम–प्रजासत्ताक असे झालेले आहे. आणि त्यामुळे आपोआपच त्याला अनुसरून आणखीही काही मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश नवीन घटना दुरुस्तीमध्ये करण्यात आला. उदा. कामगारांना व्यवस्थापनात मिळालेला सहभाग, गरिबांना कायद्याचा मोफत सल्ला मिळू शकणे, आर्थिक अन्याय दूर करण्यासाठी पीडितांना मदत मिळणे. याशिवाय मुलांना स्वातंत्र्यात व मानाने वाढण्याची संधी, नैसर्गिक व वन्य प्राण्यांच्या रक्षणाची दक्षता याही मार्गदर्शक तत्त्वांचा नवीन घटना दुरुस्तीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

ही मार्गदर्शक तत्त्वे चांगली आहेतच. तसेच मार्गदर्शक तत्त्वांबावत दुमत होण्याचेही काही कारण नाही. ह्या मार्गदर्शक तत्वांची जेवढ्या गतीने अंमलबजावणी होईल तेवढी देशाची प्रगतीही लौकर होईल.

# ऋणानुबंध

माधुरी पांढरे
बारावी वाणिज्य

सत्कार संपवून मोटारीतून अच्युतराव घरी येत होते. आज त्यांचा सत्कार करण्याचे कारण देखील तसेच अलौकिक होते. महिन्यापूर्वीचा तो भयंकर प्रसंग अजून त्यांच्या डोळ्यांपुढे नाचत होता. हृदयात कालवाकालव होत होती. कंठ सद्गदीत झाला होता. हे सगळे वाईट स्वप्न होते असेच त्यांना अजून वाटत होते. त्या भयंकर प्रसंगाला धैर्याने तोंड देणारा पहाड आज मात्र खचल्यासारखा दिसत होता.

उदय आणि सारंग ही त्यांची दोन्ही मुले हुशार, कर्तबगार आणि उच्च शिक्षण पूर्ण झालेली. लक्ष्मी आणि सरस्वतीचा सुंदर संगम झालेली त्यांची ती पवित्र वास्तू. कोणाचीही दृष्ट लागावी असा त्यांचा संसार. काही म्हणून कमी नाही. दोन्ही मुले उपवर झालेली. प्रथम ज्येष्ठ चिरंजीवांचे करावे म्हणून त्यांनी मृणालची निवड केली. लग्नाचा दिवस उजाडला. मोठ्या घरचे लग्न धुमधडाक्यातच होणार सर्व इष्ट मित्रमंडळी, नातेवाईक जमले. लग्नानंतर जेवणाच्या पंक्ती उठू लागल्या. थोडा वेळ विश्रांतीसाठी बसलेल्या मंडळीत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद होता. वराकडील बायका जेवणानंतर एकत्र बसून गप्पा मारू लागल्या. कुणी म्हणाल्या, " मुलीकडचे जरा यथातथाच दिसतात. " लगेच दुसरीने री ओढली, " खरं म्हणजे वधुपित्याला न पेलणारं स्थळ हे ! पण अच्युतरावांनी हुंडाच काय पण इतर कोणतीही देणगी म्हणून घेतली नाही. " टमाकाकू मध्येच म्हणाल्या, " खरं तर उदय किती राजबिंडा, हुशार आणि उच्च शिक्षण झालेला. आमच्या आशूसाठी ह्यांनी विचारले तर म्हणे सध्या कर्तव्य नाही. " त्यांचा सूर पाहून विजयाबाई हळूच म्हणाल्या, " अहो तुमच्या आशूपेक्षा चांगली माझी भाची आहे : पण यांना श्रीमंतीचा गर्व फार. पाहू ना आता ही रूपवती मृणाल काय दिवे लावते ! गरीबाची मुलगी नक्की घर फोडणार. " " अहो चला तिकडे मानपान चाललंय आणि तुम्ही इथे काय करता ? " उदयची आई आली. तिने सर्व बायकांना साड्या दिल्या. तात्पुरत्या का होईना सगळ्या खूष झाल्या. लग्न सोहळा थाटात पार पडला.

वधू-वर आणि सारंग एका मोटारीतून आणि अच्युतराव व त्यांचे काही स्नेही दुसऱ्या मोटरीतून नंतर येणाऱ्या एस. टी. तील वऱ्हाडाची व्यवस्था करण्यासाठी पुढे निघाले. रात्रीचा प्रवास. सर्वजण आनंदात होते. चेष्टा, मस्करी, मजा चालू होती. सारंग आपल्या दादा-वहिनीची गोड चेष्टा करीत होता. ए वहिनी, हे वाच ना असे म्हणतच त्याने एक छोटा कागद बाहेर काढला. 'Joy ! Joy This year...' वहिनीने ते वाक्य मनातच वाचले. ती लाजेने चूर झाली होती. मनातल्या मनात आपल्या सौभाग्याचा हेवा करीत होती. आपण स्वप्नात तर नाही ना अशी तिला वारंवार शंका येत होती. एक अनामिक हुरहुर तिला सुखावीत होती. उदय सुंदर, सुस्वभावी पत्नी मिळाली म्हणून देवाचे आभार मानीत होता. 'उदय, बेट्या नशीबवान आहेस.' हे त्याच्या मित्राचे वाक्य त्याला अजून आठवत होते आणि तो सुखावत होता.

पण काळाला हे पहावत नव्हते. क्रूर नियती विकट हास्य करीत होती. मृत्यूला त्या अश्राप नवविवाहित जोडप्याचा तो अलौकिक आनंद पहावत नव्हता. जे आपल्याला असा जीवनसाथी लाभला म्हणून देवाचे आभार मानीत होते, जे आपल्या भावी संसाराची सुखस्वप्नं रंगवीत होते. त्या अश्राप जोडप्याच्या आनंदावर अखेर दैवाने घाला घातलाच. 'आई ग ! ' म्हणतच उदयने छातीवर दोन्ही हात दाबून धरले आणि तो भावाच्या मांडीवर कोसळला. सारंगला वाटले, दादा चेष्टा करतोय. पण दोन मिनिटांतच सर्व प्रकार त्याच्या लक्षात आला. त्याचा आवाज फुटेना. त्याने हातानेच ड्रायव्हरला थांबण्याची खूण केली आणि मागून येणाऱ्या वडिलांच्या मोटारीला हात केला. सर्व प्रकार कळताच अच्युतरावांना आकाश फाटल्यासारखे वाटले.

मेंदूला मुंग्या आल्या. ' हे खोटे आहे, हे खोटे आहे ' अशा अर्थी त्यांची मान हलली. काळीज पिळवटून निघाले. पण दुःख करायला उसंत नव्हती. मागून येणाऱ्या वऱ्हाडाच्या एस. टी. गाड्यांमध्ये स्पर्धा सुरू झाली होती. आणि त्या पुढे निघून गेल्या होत्या. अच्युतरावांनी मृणाल आणि सारंगला दुसऱ्या एका मोटारीतून पाठविले व स्वतः उदयचे डोके मांडीवर घेऊन त्या गाडीतून निघाले. काळरात्रच ती ! काय वाटले असेल त्या पित्याला ?

मृणाल बिचारी हादरलीच. तिला काय झाले तेच कळेना. तिने सारंगला विचारून विचारून बेजार केले, ' काय झाले त्यांना ? चक्कर आली का ? कशामुळे आली ? ' सारंगला आपल्याशी मृणाल काय बोलते आहे ते ऐकायलाच येत नव्हते. तो फक्त तिच्याकडे कोरड्या डोळ्यांनी पहात होता. त्याचे काळीज फाटले होते. सीतेला वाल्मिकींच्या आश्रमात सोडतानासुद्धा लक्ष्मणाच्या मनाची एवढी ओढाताण झाली नसेल. मृणालने त्याला पुन्हा विचारले; तेव्हा त्याने एक आवंढा गिळला आणि म्हणाला, " त्याला महिनाभर जागरण आणि धावपळीमुळे त्रास झाला आहे. " कुठल्या तोंडाने तो सांगणार की नुकताच तुझ्या भांगात ज्या हातांनी सिंदूर भरला, ज्याच्या नावाने नुकतेच सौभाग्य अलंकार तू ल्यायलीस, सौभाग्य तिलक मस्तकी ल्यायलीस, तो तुझ्या भाग्यात नाही. असे अचानक मृत्यूने आपल्यातून उदयला नेले कसे हेच त्याला समजत नव्हते. त्याला वेड लागेलसे वाटत होते. काळाने आपल्याला का नाही नेले ? का दादा-वहिनीला असा चिरविरहाचा शाप नियतीने दिला ? का ? का ?

पहाटेच्या गार वाऱ्याने तो तंद्रीतून जागा झाला. घर जवळ येऊ लागले. शहनाई आणि मंगलवाद्ये यांनी त्याचे मन हेलावले. ' बंद करा ते सगळे ' असे जोरात ओरडावे असे त्याला वाटले पण शेजारी वहिनी बसली होती. घरात येताच त्याने रोषणाई विझवली. मंगलवाद्ये बंद केली. वऱ्हाडी-मंडळींना काहीच प्रकार कळेना. तेवढ्यात अच्युतरावांची मोटार दारात उभी राहिली. कोणत्या शब्दात सांगायचे की उदय आता या जगात नाही. कुणाला तरी खरे वाटेल का ? ' हार्ट फेल ' एवढेच शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले आणि मटकन खाली बसले. उदयच्या आईने आक्रांत केला. ' हे खोटंय ! हे खोटंय ! ' असे म्हणतच ती बेशुद्ध पडली. सर्व वऱ्हाडात ही बातमी पसरली. बायकात बसलेल्या मृणालची तर दातखीळ बसली. सारंगची ओढाताण होऊ लागली. आई आणि वहिनी, कोणाला समजावायचे ? कोणत्या शब्दात सावरायचे ? स्वतःला शोक करता येत नव्हता. वहिनीचा आपण घोर अपराध केला आहे असे त्याला वाटू लागले.

अच्युतरावांनी स्वतःला महतप्रयासाने सावरले. उदयच्या अंत्यविधीची तयारी केली. दोन आत्म्यांच्या मीलनाचा शुभ-दिन दोन आत्म्यांच्या चिरविरह घडविणारा काळ ठरला. वऱ्हाडात कुजबूज सुरू झाली. पांढऱ्या पायाची ! येताच नवऱ्याला खाल्ले ! डाकीण आहे मेली ! कोणी तिच्याशी धड बोलेना. प्रत्येकाच्या कपाळाला अठी पडलेली. वहिनी, वहिनी, सूनबाई, सूनबाई करणाऱ्या बायकांनी तोंड फिरविली. आधार फक्त सारंगचा. धरणी दुभंगून पोटात घेईल तर बरे असे तिला झाले. अच्युतरावांनी काळजाचा पत्थर करून उदयला अग्नी दिला. मृणालचे कुंकू पुसा असे वऱ्हाडी म्हणत होते पण अच्युतराव म्हणाले, " नाही, त्या पोरीने काय पाप केलं म्हणून तिला अशी भयंकर सजा देता ? " त्यांनी उदयच्या आईला समजावले. " समाजाच्या भीतीने त्या पोरीला आपण एकटे टाकायचे का ! तिच्या आई वडिलांना आपण वचन दिले आहे. आता ती आपलीच मुलगी आहे." त्यांचा निश्चय पक्का होता. त्यांनी वऱ्हाडी लोकांना धीर-गंभीर शब्दात सांगितले, ' उदयला क्रूर नियतीने आपल्या-तून ओढून नेले पण म्हणून काय त्या सुकुमार कळीला आता उमलण्याचा अधिकार नाही का ? तिने आपले आयुष्य असेच अंधारात पिचत कढत काढायचे का ? नाही, देवाने मला दोन मुले दिली होती. माझ्या घरात आलेल्या लक्ष्मीचा मी अपमान करणार नाही ! याच मांडवात आता मी मृणालचे लग्न माझा धाकटा मुलगा सारंग याच्याबरोबर लावणार आहे.'

लोकांनी त्यांना वेड्यात काढले. बायकांत कुजबूज सुरू झाली. ' तिने आल्या आल्या नवऱ्याला खाल्ले, पांढऱ्या पायाची दळभद्री कार्टी. तिला घराबाहेर काढा. ' पण अच्युतरावांनी त्या समाजाची पर्वा केली नाही. त्यांचा निर्धार पक्का होता. ' काळाने अनपेक्षितपणे उदयाला आपल्यातून नेले त्यात तिचा काय दोष ? नियतीला उदय-मृणालचे ऋणानुबंध मान्य नव्हते. मृणालची जन्मगाठ सारंगशी आहे. सारंगची जीवन-साथी मृणाल आहे. नियतीने योग्य मार्ग दाखविला. यात बदल नाही.' असे म्हणतच त्यांनी सारंगच्या खांद्यावर हात ठेवला. सारंगला गहिवरून आले त्याने वडिलांचे दोन्ही हात हातात घेतले. त्याची ही मूकसंमती मिळताच समाजाची पर्वा न करता अच्युतरावांनी मृणालचा आपली धाकटी सून म्हणून स्वीकार केला.

# हिंदी मुझे नहीं आई !

**राम जाधव**
प्रथम वर्ष कला

हिंदी मेरा प्यारा विषय है। पाँचवीं से लेकर अबतक बराबर मैं हिंदी का अध्यापन करता आ रहा हूँ। अध्यापकोंने खूब पढ़ाया, मैंने भी खूब पढ़ा। लेकिन उस दिन की एक घटना ने मेरी आँखें खोल दीं और मैंने 'यह जाना कि न जाना कुछ भी।' मुझे मालूम हुआ कि मेरा हिंदी का ज्ञान किसी काम का नहीं।

हुआ यह कि कुछ दिन पहले हमारे पड़ोस में एक मेहमान आनेवाले थे। रहनेवाले थे नागपुर के पासवाले गाँव के। पडोसी को उन्हें एक खत लिखना था। और वह खत था हिंदी में। अब हिंदी जाननेवाला तो मैं ही था वहाँ। वे आए मेरे पास। उन्होंने मराठी में सब मजमून बताया। उसे ठीक ठीक हिंदीमें कैसे लिखा जाए। मुझे तो नानी याद आ गई। खेतीबारी की शब्दावली, व्यवहारकी कई बातों को व्यक्त करने का ढंग मुझे कहाँ आता था? मैंने सीखी थी पाठ्यपुस्तके, घोखी कविताएँ, रटे थे शब्दार्थ। लेकिन फिर भी हिंदी के बारे में मै कोरा ही रह गया था। यह देखकर मुझे लगा कि मुझे हिंदी नहीं आई।

ऐसा ही एक और अनुभव बताने लायक है। इस दीवाली की छुट्टी में मुझे इंदौर जाने का मौका मिला। वहाँ तो हिंदी बोली जाती है। मैं वहाँ के युवकों और युवतियों से हिंदी में बातचीत करने लगा। असल में मैं मन ही मन बहुत झेंप रहा था। मुझे लग रहा था कि मेरे बोलने में सहजता नहीं है। मेरे उच्चारण भी ठीक नहीं हो रहे हैं। मैं जिनसे बात कर था, वे भी मेरी बातें सुन कर आपस में हँस रहे थे। उस समय मुझे महसूस हुआ कि मैंने ५ वीं से लेकर एफ्. वाय. तक हिंदी सीखी लेकिन मुझे हिंदी बोलना किसीने नहीं सिखाया। मैं मन ही मन पुस्तकों को पढता रहा और चुपचाप ओठों को बंद कर के परीक्षा के पर्चे लिखता रहा। मुझे किसीने बोलना नहीं सिखाया। बोलचाल की हिंदी का ढंग कैसा है, उसके उच्चारण की क्या क्या खास विशेषताएँ हैं, इसका ज्ञान हम छात्रों को कहाँ मिलता है? इसलिए हम पुस्तकी पंडित रह जाते हैं और व्यवहार के क्षेत्र में पिछड़ जाते हैं। इस अनुभव के कारण मुझे लगा कि मुझे हिंदी नहीं आई।

अभी यह जो लेख आप पढ़ रहे हैं, इसकी एक कथा सुनिए। यह लेख मैंने लिखा और प्राध्यापकजी के पास दिया। उन्होंने कहा कि इसे फिर से लिखकर लाओ। मैंने पूछा क्यों? तब वे बोले कि इसमें वर्तनी (स्पेलिंग) की सैकडों भूलें हैं। मैं बहुत लज्जित हुआ। नौ वर्ष हिंदी का अध्ययन करनेपर भी ठीक ठीक हिंदी लिखना नहीं आया। इसमें क्या लाभ हुआ? हिंदी का इतना अध्ययन करने पर भी हिंदी मुझे नहीं आई।

इसलिए भाइयो हम सब मिलकर हिंदी सिखानेवाले गुरुजनों से यह प्रार्थना करें कि—

(१) आप हमें शुद्ध हिंदी कैसे लिखें, इसके बारे में अधिक जानकारी दीजिए। पाठ्यपुस्तक को जरा अलग रखकर इस बातका ध्यान केंद्रित कीजिए।

(२) आप हमें बोलचाल की हिंदी सिखाइए। सब्जी मंडी में, दूकान में, मित्रोंके साथ किस तरह बातचीत की जाए, इसका ज्ञान हमें मिलना चाहिए।

(३) हिंदी के व्यावहारिक स्वरूप से हमारा परिचय हो जाना चाहिए। इसमें दफ्तरों में चलनेवाली हिंदीका पत्रव्यवहार, घरेलू पत्रव्यवहार आदि सब का अंतर्भाव होना चाहिए।

आज के जमाने की यही माँग है!!

# हिंदी में हास्यरस

**सुनीता बर्वे**
द्वितीय वर्ष कला

मैं हिंदी की एक अदना-सी विद्यार्थिनी हूँ और फिर भी इस विषयपर लिख रही हूँ, यही कुछ कम हास्यास्पद नहीं है। जो अभी तक बी. ए. भी नहीं हुई वह साहित्य और हास्यरस जैसे वजनदार विषयपर अपने मौलिक विचार प्रस्तुत करने चली है! आप सब इस बात पर हँसेंगे। हँसिए, जरूर हँसिए मगर मुझे जो कुछ कहना है वह कहना ही है। मैं दो–तीन वर्षों से हिंदी के हास्य-रसात्मक साहित्य को देख रही थी और उसके संबंध में मेरा जो मत बन गया है उसे स्पष्ट रूप से कह डालने की तीव्र इच्छा मेरे मन में उमडती थी। आज मौका आया है, उसे क्यों छोड़ूँ?

मैं पहले ही कह देती हूँ कि मैंने पी. डी., एफ. वाय. और एस. वाय में जो कुछ पढा – और वह बहुत कम नहीं है–उससे मुझे लगता है कि हिंदी का हास्यरस बहुत उच्च कोटि का है ऐसा नहीं माना जा सकता। बात तो असल में यह है कि कभी कभी यह हास्यरस इतना घटिया किस्म का होता है कि उसके घटियापन पर ही हमें हँसी आए तो आ जाए। उदाहरण के लिए विनोद रस्तोगी का 'इंटरव्यू' और केशवचंद्र वर्मा का 'उडी हुई दीवार' लीजिए। 'उडी हुई दीवार' में ऐतिहासिक चीजों के पीछे पागल रहनेवाले व्यक्तियोंपर व्यंग्य है। रोशनलाल का घर ऐसी चीजों का अजायबघर है। पूना शहर का बूढा मार्गदर्शक (टूरिस्ट गाईड) रोशनलाल को उल्लू बनाता है। शिवाजी की तलवार को दो दो फर्लांग लंबी बताता है, पेशवा और अंग्रेजी मेम के प्यार की मनगढंत कहानी सुनाता है। रास्ते की किसी भी ईंट को उठाकर ज्ञानेश्वर के प्रताप से उडी हुई दीवार की ईंट बताता है और मूर्ख रोशनलाल उसे सच मान लेता है। ये सारी बातें असंभव और हास्यास्पद हैं। हिंदी के कुछ लेखकों को अतिशयोक्ति के सहारे हास्य उत्पन्न करने की जो आदत है न, उसीपर मुझे हँसी आती है।

विनोद रस्तोगी का इंटरव्यू एकांकी, बेढब बनारसी का बैलगाडी निबंध इसी कोटि में आनेवाले हास्य के नमूने हैं। इंटरव्यू एकांकी में बी. ए. फेल नायक को इंटरव्यू के लिए बुलाया जाता है। वह इंटरव्यू के सवालोंका पागलों जैसा जवाब देता है, ऐसे नालायक युवक को दिखाने के लिए एक लडकी (माला) लायी जाती है। वह उसके सामने नाचता और थिरकता है और उससे भी ऊटपटाँग प्रश्न पूछता है। यह सब अतिशयोक्ति की अतिशयोक्ति है। रबड को तानने की भी कोई हद रहती है। हिंदी के ऐसे हास्यलेखकों के पास इस संयम का अभाव है। 'बैलगाडी' निबंध को लीजिए। यहाँ लेखक बैलों के सींगोंपर से पानी फिसलने को पुलिस के पैसोंपर फिसलने की उपमा देता है। लेखक सिर के बदले खोपडी शब्द का प्रयोग करके कृत्रिम हास्य पैदा करने का असफल प्रयत्न करते हैं। सूरती फाँकना, सुषुम्ना नाडी में उत्तेजन होना ये भी ऐसे ही हँसाने का अयशस्वी प्रयत्न करनेवाले शब्द हैं।

प्रभाकर माचवेजी का हास्यसाहित्य में बडा मान है। मैंने उनका 'खरगोश के सींग' और 'मकान' पढा। कुछ खास असर नहीं हुआ। कृत्रिमता की मात्रा इनके पास ज्यादा है। ये भी शब्द–चमत्कार और अतिशयोक्ति के ही शिकार हैं। उदाहरणार्थ, मकानमालिकों की शर्तोंका जो वर्णन है वह अतिशयोक्तिपूर्ण है। 'चाहिए एक मकान जिसकी बुनियाद हिलती है, बीच की मंजिल धक धक करती है...यह सब वर्णन बहुत उच्च रसिकता का नहीं माना जा सकता। इसी प्रकार म का और न अक्षरों को लेकर लेखक ने जो हास्य पैदा किया है वह बहुत लचर है।

बेढब बनारसी और अन्नपूर्णानंद वर्मा की कहानियों ने भी मुझे तहेदिल से नहीं हँसाया है। कृत्रिमता,

अतिशयोक्ति और हल्की अभिरुचि का ही प्राधान्य इन हास्यरचनाओं में भी है। हमारे प्राध्यापकजी ने आचार्य रामचंद्र शुक्ल जी का 'रिमार्क' हमें बनाया था वह मुझे बहुत जँचता है। 'हिंदी में शिष्ट हास्य का अभाव सा है।' यह शुक्लजी का कथन सोलहो आने सही है। तथापि...

दो लेखकों के बारे में मेरा मत कुछ अनुकूल बना है। हरिशंकर परसाई और शरद जोशी। इन दोनों को मैं अक्सर 'धर्मयुग' में पढ़ा करती हूँ। जीवन की असंगतियों में से हास्य का जन्म किस तरह होता है, इस की इन्हें अच्छी परख है—मुझे ऐसा लगता है। उनके टेलिफोन (परसाई) और अध्यक्षमहोदय (शरद जोशी) निबंध इसके उदाहरण हैं। टेलिफोन का दुरुपयोग और नकली या बाजारू अध्यक्षमहोदय की अयोग्यता जो कि हमारे नित्य अनुभव की बात हैं, इन लेखकों ने चुटीली शैली में और हास्यव्यंग के माध्यम से पेश की हैं। 'टेलिफोन' और 'अध्यक्ष महोदय' निबंध को पढ़ते समय हमें 'बरबस' हँसी आती है। इसी में उसकी सफलता है। खास बात तो यह है कि इनका हास्य हमें केवल हँसता नहीं बल्कि अंतर्मुख कर देता है, अपनी कमजोरीपर सोचने के लिए।

यदि हिंदी का हास्य-साहित्य इसी तरह अंतर्मुख हो सका तो...!!

---

**L. MUNGUR** B. Sc.

**Our Ex Student from Mauritius writes :**

"About myself, I have started working as a lecturer in an institution over here. This achievement would never have been possible without you and the staff of Modern College. I must also add, all this would not have been realised if in my difficult days you would not have stood by me and shown consideration and understanding. I am very grateful to you and the staff members for whatever all of you have done for me."

---

# सुनहरा दिनकर

पूर्व क्षितिज को गुंजित कर।
आसमानमें उगता दिनकर॥

जीवन की बुनियादी आशा,
चाहे ढँक दे हिम-वात वर्षा।
फिर भी दीपक एक जलाकर,
प्रतिदिन नभमें उगता दिनकर ॥ १ ॥

मेघ उमडते-पसीजते हैं,
जीवन भी फलता झडता है।
फिर भी जाती ज्वालाएँ ऊपर,
हर दिन नभमें होता ही है दिनकर ॥ २ ॥

चाहे रोए व्योम भयंकर,
धरती भी जो काँपे थरथर।
फिर भी जगता-जगाता जीवनमंदिर
पूरबको चुम्बित करता ही है दिनकर ॥ ३ ॥

भूले हुए ओ मंजिल के मतवाले,
किसके रोके रुके हैं सवेरे।
जीवन-रेखा चाहे हो धूसर,
तुझे चलनाही होगा निरंतर ॥ ४ ॥

जीवन तो हँसना रोना है,
आँधी बँवंडरोंका आना है।
सहारे छूटा ही करते हैं,
किनारे टूटा ही करते हैं ॥ ५ ॥

पर सब शेष खँडहरोंको,
मधुर ध्वनि से गुंजित कर।
हमें भी चलना है काँटीले पथपर,
जैसे आसमानमें उगता दिनकर ॥ ६ ॥

पतझड में भी बहार आती है,
'हेमन्ती-पूनो' छा जाती है।
वीराने मंदिर के वितानोंमें भी,
मधुर गान की सरगम सजती है ॥

गाकर-सोकर हँसता जीवन।
जैसे खिला कोई नंदनवन॥

**राजू महाजन**
प्रथम वर्ष वाणिज्य

# 1976 Nobel Prize-Winners Are All Americans

It is the first time that a single nation has won so many Nobel Prizes in one year.

**Saul Bellow, Literature—**

Saul Bellow, the Canadian–born virtuos Chicago novelist who calls himself "just an old-fashioned writer", was honoured for a body of fiction that is a paean to life and to indomitable nature of man.

It was, in fact, "the human understanding and subtle analysis of contemporary culture" combined in his work, that appealed to the judges, as well as his facility for presenting adventure and tragedy in quick succession.

Mr. Bellow has been a protector of the anti–hero, creating characters who are, in a sense, dangling men ( the title of one of his books ), men with no foot–hold, men who keep trying "to find a foothold during......... wanderings in our tottering world".

As they try and fall, however, they "can never relinquish...faith that the value of life depends on its dignity, not on its success, and that truth must triumph at last, simply because it demands everything except triumphs".

Mr. Bellow, now 61, moved with his family from Canada to Chicago at the age of nine. After studying at Northwestern University and the University of Wisconsin earning degrees in anthropology and sociology he began a writing career that has revealed his renaissance intellect.

Mr. Bellow is the first American to win the Nobel Literature Prize since 1962.

**Milton Friedman, Economics—**

Milton Friedman, winner of the 1976 Nobel Prize in Economics, is a professor at the University of Chicago since 1946, who calls himself a "true liberal".

Dr. Friedman believes that interest rates within countries and the value of world currencies internationally should be free to seek their own levels, on the international monetary scene, he has seen his view become a reality as major trading nations have permitted their currencies to "float".

In a June 3 Voice of America interview, he said the United States should have completely free trade with all other nations, and should not use food as a weapor.

He graduated from Rutgers University, earned a master's degree at the University of Chicago, and gained his Ph.D. at Columbia University.

His citation from the Nobel Committee reads : For his achievements in the fields

of consumption analysis, monetary history and theory and for his demonstration of the complexity of stabilization policy ".

**William N. Lipscomb, Chemistry—**

Dr. William N. Lipscomb, 56, of Harvard University, won the prize for his work in the chemistry of boranes—compounds of boron and hydrogen.

In the citation for chemistry, the Academy also praised Dr. Lipscomb for his "eminent work....in other fields, of......chemistry ... ... (such as) notable findings in studies of the structure and mechanisms of enzymes ".

Dr. Lipscomb's work has led to the transformation of boranes from a toxic explosive substance to a compound used now in drugs to treat mental illness and brain tumours. Boranes may also one day be used against cancer.

Referring to this latter potential Dr. Lipscomb said, " I still think my best work is ahead of me ". The use of boranes to fight cancer is " still preliminary and we have a much longer way to go ", he said.

Dr. Lipscomb graduated from the University of Kentucky and received his Ph.D. from the California Institute of Technology.

**Baruch S. Blumberg and D. Carleton Gajdusek, Physiology and Medicine—**

The prize for physiology and medicine was awarded to Professor Baruch S. Blumberg of the University of Pennsylvania Medical School and Professor D. Carleton Gajdusek of the National Institute for Neurological Diseases at Bethesda, Maryland, for " their discoveries concerning new mechanisms for the origin and dissemination of infectious diseases. ".

Both scientists found major clues to their work while studying primitive tribesmen in the South Pacific.

Dr. Blumberg discovered the so-called Australia antigen in the blood serum of Australian aborigines. An antigen is a chemical that stimulates the production of certain anti-bodies that in turn fight off disease in the body. The antigen was identified as part of the virus that causes the most severe form of hepatitis, a liver disease.

Dr. Blumberg's discovery has since led to the production of an experimental vaccine for the hepatitis virus, as well as a test for the disease used in screening blood doners. He hopes that vaccine – or a form of it – can eventually be used to treat a liver cancer.

While studying the blood serum, Dr. Blumberg became a medical anthropologist, a doctor who studies why people with different social and hereditary backgrounds have different responses to disease. He was born in New York city and received his Ph.D. in biochemistry from Oxford University.

D. Carleton Gajdusek's award-winning work began in New Guinea, where he had gone to investigate the cause of a fatal disease called "kuru". There he discovered a virus, transmitted through a primitive tribal custom of eating human brains, which also has implications for a number of other fatal diseases around the world.

The virus Dr. Gajdusek isolated in New Guinea, where the disease has now disapp-

eared since the custom has been abandoned, is similar to other pathogens known as "slow viruses", These are believed to be the cause of a number of nervous disorders including muitiple sclerosis and Parkinson's Disease, as well as "scrapie" a sheep disease that causes a breakdown of the nervous system. The viruses are extremely hard to isolate ( they are very small ) and hard to kill. They are resistant to high temperatures, ultraviolet light and strong chemicals.

Dr. Gajdusek continues his research on "slow viruses", and is also an expert in pediatrics, genetrics, immunology and neurology.

Dr. Gajdusek was born in New York of Hungarian parents. He received his degrees from the University of Rochester and Harvard Medical School and joined the National Institutes of Health in 1958.

**Burton Richter and Samuel C. C. Ting, Physics—**

The prize for physics was awarded jointly to Professor Burton Richter, 45, of the Standford Linear Accelerator ( SLAC ) in California and Professor Samuel C. C. Ting, 41, of the Massachusetts Institute of Technology ( M. I. T. ) for their discovery of a new kind of elementary particle named "PSI" by Dr. Richter and "**J**" by Dr. Ting. Their independent discoveries occurred within months of each other in 1974 and have subsequently revolutionized the field of physics, a landmark in the search for the "building blocks", or smallest things in nature. The discovery may soon lead to a unifying theory to describe the behaviour of all matter.

While the discovery may lead to a new theory to unify all theories of nature, it might also lead to an understanding of what matter is. With this understanding, science would then make up particles of matter that could be tailored and used to do, or build, whatever was needed.

Dr. Richter was born in New York in 1931, received his Ph.D. at the Massachusetts Institute of Technology in 1956, before coming to Stanford where he built the Instrument that led to his discovery (the "Storage Ring" facility ) that is connected to SLAC, the two-mile linear accelerator.

Dr. Ting was born in the United States of Chinese parents and grew up in China where he had no formal education until he was 12. He received his Ph.D at the University of Michigan and has worked at the University of California at Berkele and Columbia. He now divides his time between M. I. T. and the European Nuclear Researh Centre in Geneva.

# Money Talks

**Jayant Joglekar**
F. Y. B. Com.

Bombay's former Minister for Labour, Mr. Shantilal Shah, who is a Gujarati, moaned that Gujaratis were too fond of making money and in the process neglected " the finer things of life like poetry." After all" said Mr. Shah, " money does not make everything."

I wish I could agree with the Minister but I think his own people – the Gujaratis – know better. They have shown that ready money is Alladin's lamp. What of the fine arts, as Shakespeare pointed out, " If money go before all ways do lie open". Why even Milton with all his spiritualism, had to confess. " Money brings honour, friends, conquest and realms." In America where money reigns supreme, the frustrated penniless chant the biblical phrase " Money is the root of all evil"; but if some how they could get hold of it, they would love to do " all evil". History is replete with instances of people who showed the greatest contempt for money, but as soon as they came into possession of it they showed the strongest appetite for the pleasures that money enabled them to have.

Mr. Shah is not an artist but Disraeli was, and he said, " As men advance in life all passions resolve themselves into money. Love, ambition even, poetry, end in this." To Thackerey an old lady with a bank balance was a lovable person. How tenderly we love at her faults; if she is a relative what a kind, good natured old creature we find her." In fact as Barnfield sang in his Pecunia :

She is the sovereign Queen
Of all Delights.
For her the lawyer pleads,
The soldier fights.

Let us, therefore, not persuade any one to give up making money. Let us, on the contrary, try and make money ourselves, even if we like the finer things of life like poetry. After all it was a poor who said,

" Money is honey,
My little sonny
And a rich man's joke
Is always funny."

# The Food We Eat

**Yatin Kadolkar**
F. Y. B. Sc.

Our grand parents did not ask questions about the nature of the food they ate. We have evolved an elaborate picture of the chemistry of our diet. Some may say that we have not gained anything thereby, but that is not the case. The average life time of the modern man is longer in our times. Of course, that is brought about by better housing, better clothing and better medical science as well as by food.

In the first place, it is essential that our food has proteins, that is, substances which build up muscle fibre and tissue. So, we may say that proteins to the body are as bricks to the building. Meat is a rich source of proteins, but other substances can also supply them cheese and milk yield a certain amount of proteins and so do dhal and lentils. It would, however, be necessary to drink a vast amount of milk to yield all the proteins required by a strong man, engaged in work. That is why it is necessary to have a mixed diet, and no single food yields everything.

The carbohydrate substances are fats and sugars and they supply energy and resistance to cold. Sugar ( which is obtained from various vegetable sources ) and oils, such as butter and vegetable ghee, all yield carbohydrates. At the same time, there are several minerals found in the body, iron salt and others. A person deficient in iron has, as a rule anemia. Small quantities of lime and sodium are known to play some part in the bodily functions. If a person's diet lacks calcium, there will be unhealthy teeth and bones. As a rule a good mixed diet yields all the minerals, Calcium is an important requirement, and one of the best foods for the supply of calcium is milk. It prevents rickets and malnutrition in children.

In our times we hear much of vitamins, which we may call ' Atoms of Life '. The latin word " vita " means " life ". They cannot be isolated, but we know that they are in certain foods and not in others. Vitamin A is found in meat, and is important for building up tissue and muscles, and for ensuring healthy functioning of organs. It is found also in cereals such as whole wheat and rice. Vitamin B is very important one. It is also found in cereals. When grain is milled, according to modern methods, stripped of its husk and polished, much of the valuable Vitamin B may be lost. Whole meal which contains all the wheat and rice in its natural state like what they call " Red rice " in Sind, is very rich in Vitamin B. Lack of Vitamin B

e ads to weakness of the nervous system and general defective working of the body. Most of the tonics given by the doctors in our times are to give extra supplies of Vitamin B.

Vitamin C is required to tone up the body and revive the tissues. Any dificiency of Vitamin C will result in skin diseases such as scurvy and pimples. It is found in most fruits and vegetables, especially in oranges and limes.

Vitamin D helps the body to absorb and use its other materials, in particular its fats and sugars. It is produced by the action of the sun on the skin.

Vitamin E, found in small black germs, is in every gain of wheat before it is milled, and is also in rice, rye and maize.

As all now understand a mixed diet is the best calculated to yield all the requirements of the body.

# Infinity In Mathematics

Shri. Shriniwas Narvilkar
S. Y. B. Sc.

In my childhood I was very fond of hearing stories. Before going to bed, every night, I used to insist upon my grandfather to tell me a story. It was not possible for the story teller to have a new story each time. Then story could hardly have the different pattern. I was told, " Long long ago there was a huge barn filled with grains. There was a little opening in the walls of the barn. One day as it happened a sparrow entered, took a grain and flew away. Then came the another and after the same procedure, left the barn. Then came the third and it went on...... " But by this time I was hardly awake.

But when I tried to penetrate into the meaning of this story in my later age it dawned upon me that the story could not have any other end. However, large the number of sparrows may be, it was impossible for them to empty the barn.

The experience is alike when we try to count the stars twinkling in the sky. When one tries such thing what one gains is pains in the region of neck and fear of being branded a mad. But this is a problem which has attracted many people and to which many have tried to find out a solution. Someone may think looking in the stars as an indication of the mind of a poet which reminds me of " Weierstrass " saying,

"A mathematician who is not also something of a poet will never be a complete mathematician."

Thoughts run like horses without control, once you start. How many stars are there in the sky? What exists beyond them? What can be beyond that? Is there any limit for such thing? And one entangled in such a crowds of questions cannot hope to escape.

At the same time we must think, "when this universe has been brought into being? When it will be brought to an end?"

According to mathematics and other branches of science there can be only one answer and that is infinity! Though it seems something absurd to imagine about infinity, mathematicians are greatly captivated by this notion.

'James Pierpont' says,

"The notion of infinity is our greatest friend; it is also the greatest enemy of our peace of mind."

When we observe that it is impossible to count the number of stars in the sky we conclude that they are infinite. It means that counting of stars will be an endless process. This definition is the result of concepts in set theory.

The numbers which are used for the purpose of counting are known as natural numbers such as 1, 2, 3, 4,------etc. Similarly we get the ratlonal numbers such as 2/3, 7/8 etc: negative integers as – 1, – 2, – 3 etc. and negative fractions as – 1/2, – 23/29 etc. All these numbers are represented on a straight line which has neither end nor the start. But as we know that there are infinitely many points on a straight line, there are some points which are different from those mentioned above. Such numbers are known as irrational numbers. These are the numbers which can not be represented in the form p/q where p&q are integers.

Rational and irrational numbers together form real numbers. The line representing these numbers is known as real line.

Travelling in right hand direction on this line the numbers go on increasing infinitely. The line is endless and obviously what we get is infinity which is known as plus infinity & denoted by $+\infty$.

Similarly travelling in left hand direction the numbers go on decreasing and we get 'minus infinity' denoted by $-\infty$. It must be noted that $\infty$ is not a number which is very large. For example, the known portion of universe extends for appropimately $10^{10}$ light years or $10^{28}$ cm; but this figure can not be said to be infinity. Also the smallest known distance is $10^{-14}$ cm, light travels it in $10^{-24}$ sec but this is not the infinitely small distance.

Regarding different operations with $\infty$ we get $\infty H = \infty$, $\infty + 2 = \infty$ .........& finally $\infty + \infty = \infty$.

Also we have $5 = 2 + 3$ & hence $5 - 3 = 2$ but we have $\infty + 1 = \infty$ etc.

Hence $\infty - \infty = 1$, $\infty - \infty = 2$, $\infty - \infty = 3$ and finally $\infty - \infty = \infty$. Hence we can't give any logical meaning to this and hence it is said to be a meaningless quantity. Same in the case with

$$\frac{\infty}{\infty} \quad \infty^{\infty} \text{ etc.}$$

We know that there are infinite integers, infinite fractions and infinite real number. Can these infinities be equal? Or in other words can the number of integers be equal to that of fractions? etc.

To find such a difference between two sets containing infinitely many elements we must define a relation relating every element in first set with one and only one element in the other.

Let $S - \{ 2, 4, 6, 8, \ldots\ldots\ldots \}$

$N = \{ 1, 2, 3, 4, \ldots\ldots\ldots \}$


If we define a relation as $1 \rightarrow 2$, $2 \rightarrow 4$ etc, from $N \rightarrow S$ we get that though both the sets are infinite they are equal. Also if we take out the elements of S from N, we get

$V = \{1, 3, 5, 7, \ldots \ldots \ldots\}$ i e. set of all odd numbers which is also an infinite set. Thus we have an infinite set out of another infinite set.

It is nothing but,

" ॐ। पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥ "

" Whole is that, whole ( too ) is this, from whole whole cometh; take whole from whole, whole remains. "




From the above figure $PQ = RQ$. We observe every point on PQR such as A, B etc. is joined with one and only one point such as A', B' etc. respectively.

Thus the number of points on lines PQR and SQT is the same. We can also prove such a relation between this universe and the line segment SQT.

Thus set theory offered the hope of some elaborating a positive definition of infinity which would not negate finite as Hegel hoped.

Considering these facts about $\infty$ there are some interesting paradoxes, constructed by Zeno, of which one is given below. "

If a steel ball is released towards the surface ( of earth, it will bounce from the surface ) and come upto the height which is less than its original height. After many such bounces ball cannot cease to bounce since the height upto which is lifted after previous bounce must be greater that zero. Hence Zeno concluded that the ball will continue to bounce upto infinite time.

The paradox is resolved if we apply the principle we have got from the example of sets of even and odd numbers. Thus we must remember that the infinity whole can be equal to its part.

Riemann's metric infinity introduced an entirely new quality. Suffice it to recall that in curved space unlike flat Euclidean space, infinity and endlessness are not necessarily the same things. Curved space can be finite and at the same time endless.

The concept of infinity has played a great role in the history of our civilisation. Without it differential and integral calculus would perhaps never have been created.

They say that as man is mortal he derives consolation from the infinity of universe. The thought may not be so indubitable. But whatever the case, it is not the purpose of science to flatter either human weaknesses or human might. By encroaching on the infinity of the universe science and especially mathematics robs people of nothing because, **Franklin Benjmin** says,

" What science can there be more noble, more excellent, more useful for man, more admirably high and demonstrative than this of mathematics ?

## अब और न सहेंगे

चांदनी रातमें दर्द मेरा
चांदनी रातमें तनहाई मेरी
हमेशा की तुमसे हमने वफाई
जलते दिलमें अभी भी सच्चाई
इस आसमां हृदयपर ये हंसी ये सितारे
नहीं, ये हैं दिये ज़ख्म तुम्हीने सारे
आऽऽज फिरभी है अरमां तुम्हें पुकारे
तुम आओगी जरूर,
जिंदा हूँ मैं इसी इक आसके सहारे
शक्ति न है सहने की दूरी तुम्हारी
कि हमसे जो भी खता तुमने
बात खत्म करदो ये वहींपर पूरी
आऽभी जाओ ऽऽ
अब और न सहेंगे तुमसे दूरी.

**विजयकुमार कांबळे**
पदवीपूर्व कला

## लब्ज़ोंसे कह दो

लब्ज़ोंसे कह दो कि—
हम बुलाएँ, तो आया करें महफिलमें,

वरना—
हजारों खयाल आते हैं,
उल्फतके तूफाँ भी,
जब चाहे आ जाते हैं,

मगर —
ये बेवफा लब्ज नहीं आते,
और फिर,
इन नाजुक लबोंकी महफिलमें
कोओी आ नहीं सकता !

**सुनंदा कुलकर्णी**
प्रथमवर्ष कला

## न समझो ये

न समझो ये कि रोते हैं ये आँसू मुस्कुराते हैं।
तुम्हारी सेजपर अनगिन ये रंगी गुल चढाते है।
नहीं हो तुम हमारे, फिर भी कोई तो तुम्हारा है।
जो हम हों बेसहारे हों तुम्हारा तो सहारा है।
जो हम रोए, मुस्कुराहट तो तुम्हारी है।
यकीन रखो, नहीं है गम कोई, दिल खुश हमारा है ॥
किसीको दिलसे लगाकर प्यास अपनी तुम बुझा लेना।
अगर हम याद आ जाए, तो हसरत है भुला देना।
खुशीके वक्तपर गमका यहाँ है काम क्या आखिर ?
अगर दो दिल मुझे अपना, तो उसको भी जला देना ॥
मुबारक हो ये खुशियाँ, ये बहारें बेकरारों को,
हुआ है यह समा यूँही रहेगा वक्तो कयामत तक
भले ही चाँद मिट जाये फना कर के सितारों को
न समझो ये कि रोते हैं, ये आँसू मुस्कुराते हैं।

**मंगल वाघ**
तृ. व. वाणिज्य



महाराष्ट्र स्टेट कॉमर्स एज्युकेशनल इन्स्टिट्यूट्स् असोसिएशन, मुंबई या संस्थेमार्फत ऑगस्ट १९७६ मध्ये घेतलेल्या इंग्रजी टायपिंग स्पीड ( प्रति मिनिट ४५ शब्द परीक्षेत आमचा विद्यार्थी श्री. प्रभाकर महादेव आवटे ( तृ. ब. वाणिज्य ) याने पुण्यात पहिला व महाराष्ट्रात दुसरा क्रमांक मिळविला.

अभिनंदन !

## नहीं ! न सही !

कागजकी ही सही, कश्ती है मेरी,
किनारा नहीं न सही, आँधियाँ हैं मेरी ।
अधूरी ही सही, लेकिन राहें हैं मेरी,
खुशी नहीं, न सही, आहें हैं मेरी ।
गमगीन और अंधेरी ही सही, रातें हैं मेरी,
ख्वाब नहीं, न सही, नींदें तो हैं मेरी ।
वीरान जिंदगी ही सही, जीनेकी हसरत है मेरी,
तुम्हारा प्यार नहीं, न सही, नफरत है मेरी ।
दर्दभरी ही सही, लेकिन बातें हैं मेरी,
तुम नहीं, न सही, क्या यादें भी नहीं मेरी ?

—पी. आर. कुलकर्णी
तृतीय वर्ष शास्त्र

## ग़ज़ल

आज सुबह सुबह गुलशन में आँसू बहाये हैं किसीने ।
फूलों के कोमल पलकों पे शबनम के दाने बसाये हैं किसीने ॥
ये कौन दूरसे साजे-गमे दौरा छेड़ रहा है ।
शबे-गम का मारा, अहले-मोहब्बत को आवाज दी किसीने
खामोश नजारे, बहारें; इशारे किनारे भी हैं खामोश ।
जैसे इस दुनिया ही को मिटा दिया हो किसीने ॥
तूफाँ घिर आया है, मंजिल नजर नहीं आती ।
ऐसा लगता है, जैसे " साहिल " को मिटा दिया हो किसीने ॥

—श्याम अहिरकर ' साहिल '
द्वितीय वर्ष कला

## काटा

उजाड माळरानावरचा एक बाळका काटा,
कुणाच्या तरी पायातलं रक्त पिऊन झाला गोलमटोल मोठ्ठा.
चटकच लागली येणाऱ्या जाणाऱ्यांचं रक्त पिण्याची त्याला,
पायात घुसून मग पांढरे कपडे घालून,
नमस्कार करण्याची साधून घेतलीय कला.
उजाड माळरानावरचा तो बाळका काटा,
आता चांगलाच ताजा तवाना झाला
माळरान सोडून राजधानीत गेला
होता होता फुगून इतका झाला मोठा
टोचायची वेळ आली आता त्याला दुसरा काटा.

—राणी पारसनीस
तृतीय वर्ष कला

## दाता भवती वा न वा

* अक्कलकोट येथील श्री. आर. डी. कुलकर्णी यांनी मॉडर्न महाविद्यालयाच्या ग्रंथालयास रु. ५१ ची देणगी दिलेली आहे. या देणगीचा विनियोग गरीब व होतकरू विद्यार्थ्यांस पुस्तके उपलब्ध करून देण्यात व्हावा अशी त्यांची इच्छा होती. त्यानुसार साहित्य शाखेचा विद्यार्थी श्री. एस्. एस्. वाघमारे त्यास पुस्तके देऊन या देणगीचा विनियोग करण्यात आला आहे.

* मॉडर्न महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु. सुमन जोशी ( बी. ए. राज्यशास्त्र विशेष ) हिने महाविद्यालयास रु. १०१/– ची देणगी स्वेच्छेने दिली आहे.

* मॉडर्न महाविद्यालयाचाच माजी विद्यार्थी श्री. एस. जे. मुनोत याने २६ जानेवारी १९७७ रोजी भरलेल्या माजी विद्यार्थी मेळाव्याचे निमित्ताने गरीब विद्यार्थी साहाय्य निधीला रु. १०१ ची देणगी दिली.

* महाविद्यालयात ४।३।७७ रोजी सकाळी व्यवसाय मार्गदर्शन शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरिता आलेले डॉ. एस्. एन्. कौशिक, मॅनेजमेंट कन्सलटंट यांनी त्यांचे मानधन रु. ५०। विद्यार्थी साहाय्य निधीस देणगी म्हणून दिले.

या सर्वांच्या दातृत्वाकरिता मॉडर्न महाविद्यालय त्यांचे ऋणी आहे.

आमच्या महाविद्यालयात ज्यूनियर कॉलेज ( वाणिज्य विद्याशाखा ) मध्ये शिकत असलेला विद्यार्थी श्री. आनंद अच्युत जोशी यांचा दिनांक १।११।७६ रोजी दुःखद अंत झाला. ईश्वर मृतात्म्यास सद्गती देवो !

# वार्षिक अहवाल

## १९७६-७७

## क्रीडा संघटना

१९७६-७७ हे शैक्षणिक वर्ष मॉडर्न महाविद्यालयाने क्रीडाक्षेत्रात बरेच गाजवले. या शैक्षणिक वर्षात आमच्या खेळाडूंनी उज्ज्वल यश संपादन केलेले आहे. एकूण ३० विविध उपक्रमात आमच्या ३०० खेळाडूंचा सहभाग होता.

या वर्षीचे आमचे क्रीडानैपुण्य म्हणजे 'व्हॉली बॉल'च्या आंतर महाविद्यालयीन सामन्यात आमच्या विद्यार्थिनींनी सतत तीन वर्षे विजेतेपद मिळवून हॅटट्रिक साधली. तसेच आंतर-महाविद्यालयीन बॉल बॅडमिंग्टन सामन्यात विजेतेपद मिळविले. ही गोष्ट आमच्या महाविद्यालयाचा मान व अभिमान वाढवणारी आहे. गेल्या वर्षाप्रमाणे यंदाही आमच्या यशस्वी खेळाडूंनी आंतर महाविद्यालयीन खो खो सामन्यात उपविजेते पद प्राप्त केले.

क्रीडा क्षेत्रात विविध पातळ्यांवर मॉडर्न महाविद्यालयाची मान उंचावणारे विद्यार्थी आमच्या महाविद्यालयात आहेत याचा आम्हाला अभिमान वाटतो.

आंतर-विद्यापीठ क्रीडा स्पर्धात खालील खेळाडूंनी पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले :

| | | |
|---|---|---|
| कु. नीता भट | तृतीय वर्ष कला | व्हॉली बॉल व बॉल बॅडमिंग्टन |
| कु. भारती बनबेरू | द्वितीय वर्ष वाणिज्य | व्हॉली बॉल |
| कु. संजीवनी पत्की | द्वितीय वर्ष वाणिज्य | व्हॉली बॉल व बॉल बॅडमिंग्टन |
| श्री. अतुल जोशी | द्वितीय वर्ष शास्त्र | खो खो |
| श्री. विनय कुलकर्णी | प्रथम वर्ष शास्त्र | खो खो |
| श्री. प्रमोद दुबे | प्रथम वर्ष वाणिज्य | वेट लिफ्टिंग |
| कु. सरिता बोराबके | तृतीय वर्ष कला | बॉल बॅडमिंग्टन |

कोल्हापूर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर- विद्यापीठ खो खो स्पर्धेत पुणे विद्यापीठाने सातत्याने दहाव्यांदा विजेते पद मिळविले. त्यामध्ये आमच्या महाविद्यालयातील श्री. अतुल जोशी व विनय कुलकर्णी यांचा सिंहाचा वाटा होता.

आंतर राज्य क्रीडा स्पर्धात आमच्या महाविद्यालयातील खालील खेळाडूंनी प्रतिनिधित्व केले :

| | | |
|---|---|---|
| कु. भारती बनबेरु | द्वितीय वर्ष वाणिज्य | व्हॉली बॉल |
| कु. सरिता बोराबके | तृतीय वर्ष कला | बॉल बॅडमिंग्टन |
| कु. नीता भट | तृतीय वर्ष कला | बॉल बॅडमिंग्टन |
| कु. संजीवनी पत्की | द्वितीय वर्ष वाणिज्य | बॉल बॅडमिंग्टन |
| श्री. अतुल जोशी | द्वितीय वर्ष शास्त्र | खो खो |

श्री. अतुल जोशी यांनी आंतर–जिल्हा खो खो सामन्यात पुणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. त्यांना "बेस्ट ॲटॅकर" म्हणून पारितोषिक मिळाले.

या शिवाय विद्यापीठ आणि आंतर–महाविद्यालयीन पातळीवरील विविध स्पर्धामध्ये खालील खेळाडूंनी विशेष प्रावीण्य दाखविले आहे :

| | | |
|---|---|---|
| श्री. यशवंत शिंत्रे | तृतीय वर्ष शास्त्र | वेट लिफ्टिंग, फेदर वेट गटात २ रा क्रमांक. |
| श्री. ज्ञानेश्वर ढमाले | द्वितीय वर्ष कला | कुस्तीच्या ५२ किलो गटात १ ला क्रमांक. |
| श्री. प्रमोद दुबे | प्रथम वर्ष वाणिज्य | ( १ ) वेटलिफ्टिंग मध्ये मिडल वेट गटात १ ला क्रमांक<br>( २ ) थाळी फेक स्पर्धेत ३ रा क्रमांक. |
| श्री. सागर रांगे | प्रथम वर्ष शास्त्र | शरीरसौष्ठव लहान गटात ३ रा क्रमांक |
| श्री. प्रकाश वर्तक | प्रथम वर्ष शास्त्र | सूर मारणे स्पर्धेत ३ रा क्रमांक. |
| श्री. नरेंद्र गोळे | तृतीय वर्ष वाणिज्य | ४०० मी. धावणे स्पर्धेत २ रा क्रमांक. |
| कु. आशा देशपांडे | प्रथम वर्ष वाणिज्य | १०० मी. अडथळ्याच्या स्पर्धेत २ रा क्रमांक |
| कु. विनीता जोशी | तृतीय वर्ष वाणिज्य | ( १ ) उंच उडी स्पर्धेत १ ला क्रमांक.<br>( २ ) ब्रेस्ट स्ट्रोक स्पर्धेत ३ रा क्रमांक. |
| श्री. अशोक काळे | प्रथम वर्ष शास्त्र | ( १ ) तिहेरी उडी १ ला क्रमांक.<br>( २ ) उंच उडी २ रा क्रमांक.<br>( ३ ) लांब उडी २ रा क्रमांक.<br>( ४ ) ४०० मी. धावणे ३ रा क्रमांक. |

**विशेष स्मरण :**

आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेची **क्रीडा-ज्योत** नेण्याचा बहुमान आमच्या महाविद्यालयाला यंदा प्रथमच मिळाला. आमचे आंतर महाविद्यालयीन क्रीडा प्रतिनिधी श्री. यशवंत शिंत्रे यांनी ही क्रीडा-ज्योत खेळाडूंच्या सहकार्याने स्पर्धेच्या ठिकाणी पोहोचविली.

**विशेष नैपुण्य :**

( १ ) नाशिक येथे झालेल्या आंतर-जिल्हा व्हॉली बॉल स्पर्धेत आमच्या विद्यार्थिनी-खेळाडूंनी उपविजेतेपद मिळविले.

( २ ) बारामती येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतर विभागीय व्हॉली बॉल स्पर्धेत आमच्या विद्यार्थिनींनी **विजेतेपद** मिळविले.

( ३ ) श्री. अशोक काळे यांनी दिल्ली येथे झालेल्या खुल्या मैदानी स्पर्धेत तिहेरी उडीत ब्रॉंझ पदक मिळविले.

( ४ ) अन्नमलयी ( मद्रास ) येथे होणाऱ्या आंतर विद्यापीठ बॉल बॅडमिंग्टन स्पर्धेसाठी आमच्या महाविद्यालयातील कु. सरिता बोरावके यांची पुणे विद्यापीठ **कप्तानपदी** नियुक्ती झाली. हा बहुमान आमच्या महाविद्यालयास प्रथमच मिळाला आहे.

( ५ ) शहादे येथे झालेल्या आंतर-जिल्हा खो खो स्पर्धेत पुणे जिल्हा संघ विजेता ठरला. त्यांत आमच्या महाविद्यालयातील श्री. अतुल जोशी यांनी भाग घेतला होता. तसेच प्रवरानगर येथे झालेल्या विभागीय खो खो स्पर्धेत पुणे विभाग संघ विजेता ठरला. त्यात आमच्या महाविद्यालयातील श्री. अतुल जोशी व श्री. विनय कुलकर्णी सहभागी होते.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाविद्यालयात विविध सांघिक व वैयक्तिक खेळांच्या आंतर वर्ग स्पर्धा घेण्यात आल्या. ह्या स्पर्धांना विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्तम प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे या सर्व स्पर्धा विद्यार्थ्यांनीच आयोजित केल्या होत्या. त्यांना श्री. किरण लागू ( पी. टी. डायरेक्टर ) श्री. छाब्रा ( ज्यू. पी. टी. डायरेक्टर ) व श्री. यशवंत शिंत्रे ( आय. सी. एस. आर. ) ह्यांनी मार्गदर्शन केले.

श्री. भानुदास जोशी ( पदवीपूर्व कला ) या विद्यार्थ्याने याच वर्षी आमच्या महाविद्यालयात प्रवेश घेतला व " मॉडर्न श्री " हा यंदाचा किताब मिळविला. श्री. अशोक काळे यांना मुलांचे वैयक्तिक क्रीडा नैपुण्य पद मिळाले आणि कु. विनीता जोशी हिला मुलींचे वैयक्तिक क्रीडा नैपुण्यपद मिळाले. आंतरवर्गीय व सर्वसामान्य क्रीडा-नैपुण्य-पद म्हणजेच कै. दिवेकर ढाल प्रथम वर्ष शास्त्र ( ए ग्रुप ) या वर्गास मिळाली.

आंतर महाविद्यालयीन स्पर्धांच्या तयारीसाठी आम्हास कु. शकुन्तला खटावकर व सर्वश्री शांताराम जाधव, साठे कोल्हटकर, अभय प्रधान, फर्नांडीस, शेख, जोशी, दीपक गोडबोले, विजय भगत यांचे बहुमोल साहाय्य झाले. त्यांच्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

महाविद्यालयीन प्राध्यापकांचा क्रीडा विषयक सहकार्याचा व सहभागाचा उल्लेख केल्याशिवाय या अहवालाची पूर्तता होणार नाही.

आंतर विभागीय विविध उपक्रमांत आमच्या महाविद्यालयातील खालील प्राध्यापक निवड समितीचे सदस्य होते.

( १ ) प्रा. अनिल नातू ( २ ) श्री. किरण लागू ( ३ ) श्री. पी. डी. कुलकर्णी ( ४ ) प्रा. सुरेश दातार ( ५ ) प्रा. अशोक पाथरे.

आंतर विद्यापीठ सामन्यांसाठी पुणे विद्यापीठ निवड समितीचे अध्यक्ष व विभागीय निवड समितीचे अध्यक्ष म्हणून प्रा. पद्‌माकर आपटे यांनी काम केले.

## नाट्य विभाग

आमच्या महाविद्यालयातील नाट्य विभागाने 'पुरुषोत्तम करंडक' एकांकिका स्पर्धेत रत्नाकर मतकरी लिखित 'चित्रातलं घर' ही एकांकिका सादर केली. यात श्री. विनोद गोडसे यांनी दिग्दर्शन केले.

यंदा श्री. निळू फुले व श्री. राम नगरकर यांच्याबरोबर रंगभूमीविषयक प्रश्नांच्या चर्चेचा रंगतदार कार्यक्रम झाला. तो विद्यार्थ्यांना फारच आवडला.

नंदुरबार येथील पुणे विद्यापीठ युवक महोत्सवात आमच्या महाविद्यालयाने '**प्रतिज्ञा**' हा प्रयोग सादर केला व त्याला **पहिला क्रमांक** मिळाला. कु. उज्ज्वला पारसनीस हिला अभिनय नैपुण्याचे उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रक मिळाले. ह्या एकांकिकेचे दिग्दर्शन सौ. हेमा लेले यांनी केले. या एकांकिकेचे निर्मिती–संकल्पन प्रा. सौ. श्यामला बनारसे यांचे होते.

## मॉम

हे महाविद्यालयाचे हस्तलिखित नियतकालिक. यंदाचे वर्षी मॉमचे दहा अंक निघाले. पहिल्या सत्रात सात अंक. त्यात आलिंपिक विशेषांक, स्व. मुकेश विशेषांक हे उल्लेखनीय. दुसऱ्या सत्रातील दिवाळी अंकाचे कौतुक दूर चित्रवाणीवरून देखील झाले.

याच वर्षी मॉम तर्फे **आंतर महाविद्यालयीन युवक साहित्य संमेलन** आयोजित करण्यात आले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. सर्व वृत्तपत्रे व दूरचित्रवाणीवरून संमेलनाच्या अभिनव कल्पनेची प्रशंसा झाली. या संमेलनास मा. कुलगुरू देवदत्त दाभोलकर अगत्याने उपस्थित राहिले

कै. भाऊसाहेबांच्या निवडक कथांवर एक चर्चेचा कार्यक्रमही मॉमने आयोजित केला.

## कलामंडळ

आमच्या महाविद्यालयातील कलामंडळाने विविध कार्यक्रम आयोजित केले. त्यापैकी प्रामुख्याने उल्लेख असा :

सूरमणी श्री. फय्याझ हुसेन खान यांनी 'व्हायोलीनचा उपयोग व संगीतातील त्याचे स्थान' या विषयावर चर्चा केली. लिओ क्लबने नगर येथे आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन संगीत स्पर्धेत आमच्या महाविद्यालयातील श्री. अनिल मोटे व मुकुंद संगोराम यांनी भाग घेतला होता. युवक महोत्सवात श्री. किशोर कपोते यांनी 'कथक नृत्य' सादर केले. तसेच फिरोदिया करंडक स्पर्धेत ही आमच्या महाविद्यालयाने भाग घेतला होता.

## वादविवाद मंडळ

यंदा आमच्या महाविद्यालयातील वादविवाद मंडळाने एकूण ८ विविध स्पर्धांतून भाग घेतला. ( १ ) कै. हिवाळे वाद स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाने **उपविजेते पद** मिळवले. त्याचे श्रेय कु. उज्ज्वला पारसनीस व श्री. अविनाश धर्माधिकारी यांना आहे. त्यांना अनुक्रमे प्रशस्तिपत्रक व उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. ( २ ) कै. रानडे वाद स्पर्धेत श्री. अविनाश धर्माधिकारी व संजय गोखले यांनी भाग घेतला होता. ( ३ ) कै. मोरोपंत वाद स्पर्धेत व वक्तृत्व स्पर्धेत सर्वश्री धर्माधिकारी व गोखले यांना उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रक मिळाले. (४) कै. भाऊसाहेब हिरे वाद स्पर्धेत कु. उज्ज्वला पारसनीस व श्री. धर्माधिकारी यांनी भाग घेतला होता. ( ५ ) कर्मवीर भाऊराव पाटील वक्तृत्व स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाने **विजेते पद** मिळविले. अविनाश धर्माधिकारी यांना **प्रथम** व संजय गोखले यांना **द्वितीय** क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. ( ६ ) नगर येथे घेण्यात आलेल्या शारदा करंडक कथाकथन स्पर्धेत आमच्या महाविद्यालयातील कु. सुषमा जोशी यांना प्रशस्तीपत्रक मिळाले. (७) आंतर महाविद्यालयीन कथाकथन स्पर्धेत आमच्या महाविद्यालयास '**सुश्रुत**' **मानचिन्ह** मिळाले.

दिनांक २५ जानेवारी १९७७ रोजी एन्. डी. ए. मधील डेप्युटी कमांडंट, कर्नल शिवाजीराव भोसले यांच्या अध्यक्षतेखाली क्रीडा संघटना दिन साजरा झाला. याच प्रसंगी अध्यक्षांच्या हस्ते पै. हिरामण बनकर यांचा 'महाराष्ट्र केसरी पद' प्राप्त झाल्याबद्दल सत्कार झाला.

**कु. आशा देशपांडे** — विद्यार्थिनी प्रतिनिधी

**प्रा. पद्‌माकर आपटे** — कार्याध्यक्ष

**श्री. यशवंत शिंत्रे** / विद्यार्थी प्रतिनिधी

# वार्षिक स्नेहसंमेलन

दि. ११, १२ व १३ जानेवारी १९७७ या तीन दिवशी सीनियर कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन साजरे झाले. अल्पोपाहार, फनी गेम्स इ. कार्यक्रम झाले. यंदाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध गुण दर्शनाचे कार्यक्रम वर्गवार झाले. त्यामुळे अधिक कलाकारांना संधी मिळाली.

**आनंद मेळा**

ज्युनियर आणि सिनियर कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा एकत्र आनंद मेळा दि. ९ व १० फेब्रुवारी १९७७ रोजी झाला. आनंद मेळ्यातील उत्पन्नांची रक्कम 'विद्यार्थी साहाय्य निधी'ला देण्यात आली.

याच दिवशी महाविद्यालयात **रक्तदानाचा कार्यक्रम** झाला. एकूण ७५ व्यक्तींनी रक्तदान केले. या रक्तदान मोहिमेचा प्रारंभ प्राचार्य लिमये व विद्यार्थी प्रतिनिधी श्री. यशवत शिन्त्रे यांनी स्वतः प्रथम रक्तदान करून केला

संमेलन यशस्वी झाले ते सर्व वर्गांचे प्रतिनिधी, प्राध्यापक वर्ग शारीरिक शिक्षण संचालक, प्राचार्य लिमये, उपप्राचार्य डॉ. गाडगीळ आणि डॉ. कुलकर्णी आणि प्रा. गंभीर यांच्या सहकार्यामुळे. सर्वांना धन्यवाद.

**कु. आशा देशपांडे** — विद्यार्थिनी प्रतिनिधी

**प्रा. पद्माकर आपटे** — कार्याध्यक्ष

**श्री. यशवंत शिंत्रे** / विद्यार्थी प्रतिनिधी

# शारिरीक शिक्षण विभाग : सीनियर कॉलेज

आमच्या महाविद्यालयाने प्रथमपासूनच विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाकडे सर्वांगीण लक्ष दिले आहे.

१९७६–७७ या शैक्षणिक वर्षात १९ जुलै १९७६ रोजी शारीरिक शिक्षणाच्या तासांना सुरुवात झाली. शारीरिक शिक्षणाचे वर्ग चालू असताना त्यातूनच काही विद्यार्थी व विद्यार्थिनींची संघनायक म्हणून निवड करण्यात आली. त्यानंतर या संघनायकांना शारीरिक शिक्षण संचालक यांनी दिवाळीच्या सुट्टीत प्रशिक्षण दिले. अशा प्रकारे ४ विद्यार्थी व ४ विद्यार्थिनींची निवड झाली. त्यापैकी तृतीय वर्षातील दोन विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने भाग घेतला.

त्यानंतर शिस्तबद्ध योजनेतून शारीरिक शिक्षणाच्या तासांना सुरुवात झाली. विद्यार्थ्यांसाठी सोमवार बुधवार व शुक्रवार व विद्यार्थिनींसाठी मंगळवार, गुरुवार व शनिवार अशाप्रकारे तास घेतले. द्वितीय सत्रात विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचे तास सोमवार, बुधवार, शुक्रवार असे एकाच वेळी घेण्यास सुरुवात केली.

१४० विद्यार्थी व ६० विद्यार्थिनी असे एकूण २०० विद्यार्थी शारीरिक शिक्षण घेत होते. महाविद्यालयाचे पहिले व दुसरे सत्र मिळून शारीरिक शिक्षणाचे एकूण ६० तास झाले. बहुसंख्य विद्यार्थी या तासांना उपस्थित होते.

ह्या वर्षी विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणास आवश्यक असा गणवेष महाविद्यालयाच्या सहकारी भांडारातून स्वस्त दरात देण्याची व्यवस्था केली होती. त्याचप्रमाणे गरीब विद्यार्थ्यांना 'विद्यार्थी साहाय्य निधीतून' मुफ्त गणवेष प्राचार्यांनी दिला.

शारीरिक शिक्षणाच्या तासांच्या वेळी खालील उपक्रम घेण्यात आले : रोड रनिंग, क्रॉस कन्ट्री, सरकिट रनिंग, जिमनॅस्टिक्स, यौगिक पद्धतीचा व्यायाम, बास्केट बॉल, फूट बॉल, व्हॉली बॉल (मुलांसाठी) व थ्रो बॉल, व्हॉली बॉल, लेझीम (मुलींसाठी) यांसारखे छोटेमोठे खेळ. तसेच या वर्षी शारीरिक शिक्षणाने उंची वाढवणे, शारीरिक दोष असल्यास ते सुधारणे, यासारख्या विषयांवर शारीरिक शिक्षण संचालक यांनी व्याख्याने दिली. याशिवाय क्रीडांगण-सफाई, गाजर गवत उच्चाटन यासारखे सेवात्मक कार्यक्रमही विद्यार्थ्यांनी हाती घेतले.

या वर्षी विभागीय मैदानी स्पर्धांसाठी पुणे विद्यापीठाची मशाल नेण्याचा मान आमच्या महाविद्यालयास मिळाला. मशालीच्या संचलनामध्ये नेहरू स्टेडियमवर पी. टी. च्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला होता.

दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता जवळच्या महाविद्या-

ल्यात पी. टी. ला जाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली. तसेच दूर अंतरावर राहाणाऱ्या, जवळपास कॉलेज नसलेल्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणाच्या तासांना सूट देऊन दुसऱ्या सत्रात १४ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी १९७७ या काळात त्यांची शारीरिक क्षमता परीक्षा घेण्यात झाली. त्यात पुढील प्रकारांचा समावेश होता : १०० मी. धावणे, लांब उडी, गोळा फेक, पुल अपस् दंड, बैठका, सूर्य नमस्कार.

स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.

खालील विद्यार्थ्यांनी या वर्षी उत्तम शारीरिक शिक्षण संघनायक म्हणून काम केले :—

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) | श्री. पी. एम्. आवटे | प्रमुख | तृ. व. वाणिज्य |
| ( २ ) | ,, अे. डी. काळे | | प्र. व. शास्त्र |
| ( ३ ) | ,, यू. डी. वागले | | प्र. व. शास्त्र |
| ( ४ ) | ,, एस आर शिंदे | | तृ. व. कला |
| ( ५ ) | कु. माधुरी बर्वे | प्रमुख | प्र. व. वाणिज्य |
| ( ६ ) | ,, सीमा पारखी | | प्र. व. वाणिज्य |
| ( ७ ) | ,, कांचन भोसले | | प्र. व. वाणिज्य |
| ( ८ ) | कु. नंदा लोकापुरे | | पदवीपूर्व वाणिज्य |

आमचे प्राचार्य मो. भा. लिमये डॉ. स. य. परांजपे, व इतर प्राध्यापक—वर्ग यांनी दिलेल्या साहाय्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

**प्रभाकर आवटे** तृ. व. वाणिज्य
**माधुरी बर्वे** प्र. व. वाणिज्य

**श्री. किरण लागू**
संचालक, शारीरिक शिक्षण विभाग

# राष्ट्रीय छात्र सेना

छात्र सेनेच्या विविध विभागांमध्ये ( units ) दाखल होऊन छात्रसेनेचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या २५३ होती.

विभागानुसार ( units ) विभागणी खालीलप्रमाणे :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | १ | महाराष्ट्र सिग्नल कंपनी | ४४ |
| २. | ३ | ,, एअर स्काड्रन | ३७ |
| ३. | ३ | ,, आर्म्ड स्काड्रन | १० |
| ४. | ३ | ,, नेव्हल युनिट | ६८ |
| ५. | ३६ | ,, बटालियन | ६९ |
| ६. | २ | ,, गर्ल्स् बटालियन | २५ |
| | | | २५३ |

श्री. पी. सी. एल. जनार्दन (S. Y. B. Com) या विद्यार्थ्याची दिल्ली येथील प्रजासत्ताक दिन संचलनासाठी निवड झाली.

श्री. वी. आर. वाव्हळ (S. Y. B. Com) विद्यार्थ्यास बढती मिळून तो अंडर ऑफिसर झाला.

श्री. आर. सी. शहा (F. Y. B. Com) या विद्यार्थ्याने All India Aero Modelling ह्या स्पर्धेत पुणे विभागाचे प्रतिनिधित्व केले.

Sub/LT पाथरे हे नाविकदलात NCC अधिकारी म्हणून काम पाहतात.

**प्रा. पद्माकर भापटे**
Officer-in-Charge

# राष्ट्रीय सेवा योजना

१९७६–७७ च्या कार्याचा शुभारंभ मा. नामदार श्री. सुशीलकुमार शिंदे ह्यांच्या शुभहस्ते १८ जुलै १९७६ रोजी झाला.

पथकामध्ये २० विद्यार्थिनी व ७७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. ' राष्ट्रीय सेवा योजना ' कार्याचा परिचय करून देणारी प्रा. शं. ना. नवलगुंदकर, प्रा. श्यामला बनारसे, प्रा. राजेंद्र व्होरा आणि प्रा. सीताराम रायकर ह्यांची व्याख्याने व चर्चा आयोजित करण्यात आल्या होत्या.

पथकाने पुण्यातील इतर महाविद्यालयांबरोबर वेताळ टेकडी येथे वृक्षारोपणाचे काम केले. महाविद्यालयाच्या आवारात सायकल स्टँड रस्ता, वृक्षारोपण, साफ-सफाई हे कार्यक्रम केले.

स्वातंत्र्यदिनी आणि प्रजासत्ताकदिनी पथकाचे दत्तक

ग्राम पिसोळी ह्या ठिकाणी वृक्षारोपण, ग्रामसफाई व ध्वज-वंदनाचा कार्यक्रम केला.

कुष्ठरोग रुग्णालय, रिमांड होम, अंध शाळा, मूक-बधीर शाळा ह्या ठिकाणी रक्षाबंधन, तिळगुळ वाटप आणि दसरा ह्यांसारखे सण साजरे केले. मुलींच्या रिमांड होममध्ये भोंडल्याचा कार्यक्रमही घेण्यात आला.

४ ते १३ नोव्हें. १९७६ अखेर पथकाचे खास शिबिर पिसोळी गावी घेण्यात आले. त्यावेळी रस्ता बांधणी, आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण, शाळेतील मुलांना शिकवणे, २० कलमी कार्यक्रमावर चर्चासत्र व व्याख्यान इत्यादी कामे करण्यात आली.

यंदाच्या वर्षी 'मृद्-चाचणी 'चा एक विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आला. पिसोळी ग्रामस्थांच्या जमिनीचे नमुने आणून त्याची 'मृद-चाचणी' प्रयोग शाळा, महाराष्ट्र शासन ह्यांचे मार्फत करून घेतली. त्यांचे अहवाल ग्रामस्थांना देण्यात आले. उरलेल्या ग्राम-स्थांच्या जमिनीची 'मृद-चाचणी' करून घेऊन त्यावर 'जीव-नियोजन' करण्याचा विचार आहे. ह्या कामी मृद्-चाचणी प्रयोगशाळेच्या अधिकाऱ्यांनी, विशेषतः श्री. काळे ह्यांनी बहुमोल साहाय्य केले.

४ फेब्रु. १९७७ रोजी मुंबईच्या टाटा इन्स्टिट्यूटचे श्री. डी. एस. पिंगे ह्यांचा समावेत 'राष्ट्रीय सेवा योजने'वर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

वर्षभराच्या कार्यक्रमात प्राचार्य मो. भा. लिमये, उप-प्राचार्य भीमराव कुलकर्णी आणि सल्लागार समितीचे सभासद प्रा. ए. जी. गोसावी, प्रा. के. एम. गोखले आणि प्रा. एस. बी. न्हाळद ह्यांचे बहुमोल सहकार्य मिळाले.

| | |
|---|---|
| **दीपक घुबे** | **म. आ. कुलकर्णी** |
| कार्यवाह | प्रमुख, रा. से. योजना |

# साहित्य संघटना

साहित्य संघटनेच्या कार्यकारी समितीवर यावर्षी प्रा. मुकुंद महाजन (कार्याध्यक्ष), प्रा. वि. भा. देशपांडे, प्रा. सु. व्यं. धायगुडे, प्रा. सौ. शालिग्राम आणि प्रा. व्होरा या प्राध्यापकांची व कु. जयश्री गौतमे (तृ. व. साहित्य), कु. भानुमती ठोके (तृ. व. साहित्य), कु. त्रिवेणी पाटील (तृ. व. साहित्य), कु. राणी आवटे (द्वि. व. साहित्य), श्री. सुधीर जाधव (तृ. व. साहित्य), श्री. नरसिंह कुलकर्णी (द्वि. व. साहित्य), श्री. ए. इ. सोंडेकर (द्वि. व. साहित्य), व श्री. संभाजी शिंदे (तृ. व. साहित्य) या विद्यार्थी प्रतिनिधींची निवड झाली होती.

३ ऑगस्ट १९७६ ला स्वा. जयंतराव टिळक यांच्या भाषणाने संघटनेच्या यावर्षीच्या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. २६ ऑगस्ट १९७६ ला सौ. सुमन जोशी यांचे 'मतिमंद मुलांच्या समस्या' या विषयावर व्याख्यान झाले. ४ सप्टेंबरला संघटनेच्या सदस्यांनी शिक्षकांचा सत्कार करून शिक्षक दिन साजरा केला. १४ सप्टेंबरला हिंदी दिना-निमित्त श्री. गो. म. बोंबले, उपसंचालक, राज्य शिक्षण-शास्त्र संस्था, यांचे व्याख्यान झाले. २६ सप्टेंबर रोजी क्रौंचवध व कोसला या दोन कादंबऱ्यांवर चर्चा झाली. कु. भानुमती ठोके व सौ. कविता कवें या विद्यार्थिनींनी व प्रा. पुंडे व प्रा. देशपांडे यांनी भाग घेतला.

६ डिसेंबरला 'संतवाङ्मय व गाडगे महाराज' या विषयावर श्री. बाबा मोहोड यांचे व्याख्यान झाले. १८ डिसेंबरला इतिहासाचार्य राजवाडे यांच्या पन्नासाव्या स्मृतिदिनानिमित्त 'कै. राजवाडे यांची इतिहासाची कल्पना' या विषयावर प्रा. अ. म. देशपांडे यांचे व्याख्यान झाले. १८ व १९ डिसेंबर या दोन दिवशी हिंदी विभागातर्फे 'संदर्भ ग्रंथ कृति-सत्र' झाले. या सत्रांना श्री. श्रीपाद जोशी व श्री. ब. का. विप्रदास यांचे मार्गदर्शन लाभले. २१ डिसेंबरला 'आत्महत्या व आत्महत्येची कारणे' या विषयावर डॉ. पी. एन्. व्यवहारे यांचे व्याख्यान झाले. ९ फेब्रुवारीला आनंद मेळाव्याच्या अन्तर्गत 'ब्रेन ट्रस्ट' हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात प्रा. मुकुंद महाजन, प्रा. राजेंद्र व्होरा, सौ. हेमा लेले, प्रा. शं. ना. नवलगुंदकर व प्रा. अ. गो. गोसावी यांनी भाग घेतला.

या वर्षी 'ॐ' ह्या साहित्य संघटनेच्या भित्तिपत्रकास प्रारंभ झाला. यासाठी प्रा. वि. भा. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. संभाजी शिंदे (सचिव), श्री. मारुती माने, श्री. श्याम अहिरकर, श्री. जयंत बोरकर व कु. वंदना खळदकर यांनी अंकाचे काम पाहिले व श्री. दीपक घुबे, प्रदीप कदम यांचे विशेष सहकार्य लाभले. या भित्तिपत्रकाचे ३० ऑगस्ट (वर्षारंभ अंक), २५

सप्टेंबर ( अर्थशास्त्र विशेषांक ) व २५ नोव्हेंबर ( कै. कवी माधव जूलियन विशेषांक ) असे तीन अंक प्रकाशित करण्यात आले.

मार्चच्या प्रारंभी तृतीय वर्ष साहित्य वर्गाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्याचा समारंभ होईल.

दर वर्षीप्रमाणे याही वर्षी संघटनेच्या ग्रंथालयातून आठवड्यातून दोन वेळा पुस्तकांचे वाटप केले जात असे. द्वितीय व तृतीय वर्षाच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या ग्रंथालयाचा लाभ घेतला.

संघटनेच्या सर्व उपक्रमांना प्राचार्य, कार्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी सदस्य यांचे जे बहुमोल साहाय्य झाले त्याबद्दल त्यांचे प्रकट आभार.

**प्रा. मुकुंद महाजन**
कार्याध्यक्ष

## शास्त्र-संघटना

१९७६-७७ चे शास्त्र संघटनेचे कार्यकारी मंडळ खालीलप्रमाणे—

**अध्यक्ष :** प्राचार्य मो. भा. लिमये
**उपाध्यक्ष :** उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ
**कार्याध्यक्ष :** प्रा. किशोर काशीद.
**सदस्य प्राध्यापक :** ए. व्ही. रायरीकर
आर. जी. लिमये
एन्. सी. दुधाळे.

**सहाय्यक विद्यार्थी-प्रतिनिधी :** सर्वश्री. नाईक एन्. डी., बाफना एन्. पी, गोखले जे. बी. पंजाबी, शुक्ला पी. जी, कु. कोल्हे एस्. आर., श्री. शितोळे पी. बी., श्री. सुपनेकर पी. जे.

१७ ऑगस्ट १९७६ या दिवशी शास्त्र संघटनेचे उद्‌घाटन प्रा. मालवा केळकर यांच्या हस्ते झाले. २० सप्टेंबर १९७६ रोजी संघटनेच्या सभासदांनी मुंबईच्या भाभा अणू केंद्रास भेट दिली. " सायन्स न्यूज " हे नामाभिधान धारण करणारे भित्तिपत्रक हे संघटनेचे खास वैशिष्ट्य आहे. आकर्षक व रसपूर्ण मजकूर यामुळे सर्व विद्यार्थी आवडीने वाचतात.

या शैक्षणिक वर्षात काही नामवंत व्यक्तींची व्याख्याने विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी व विविध विषयांची त्यांना तोंड ओळख व्हावी म्हणून आयोजित केली होती.

या वर्षाच्या दुसऱ्या सत्रात शास्त्र संघटनेच्या विद्यार्थ्यांनी " शास्त्र प्रदर्शन " आयोजित केले होते. त्यामध्ये त्यांनी तयार केलेली उपकरणे ठेवण्यात आली होती. तसेच फेब्रुवारी १९७७ अखेर " स्वस्तिक रबर्स " ला शैक्षणिक भेट देण्याचे आयोजित केले आहे.

**प्रा. किशोर काशीद**
कार्याध्यक्ष.

## वाणिज्य संघटना

वाणिज्य शाखेतील द्वितीय व तृतीय वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशा ह्या संघटनेचे हे तिसरे वर्ष.

### संघटनेची कार्यकारिणी

**अध्यक्ष :** प्राचार्य मो. भा. लिमये
**कार्याध्यक्ष :** प्राध्यापक अ. गो. गोसावी
**प्राध्यापक सभासद :** प्रा. सौ. माधवी मित्रा. प्रा. पी. डी. पारखी, प्रा. एन्. एफ्. कर्नावट.
**विद्यार्थि-सचिव :** श्री. अविनाश ओगले ( तृ. व. वा. )
कु. नीलिमा वागळे. ( तृ. व. वा. )
कु. स्नेहलता मेहंदळे. ( द्वि. व. वा. )
श्री. संजय देशपांडे ( द्वि. व. वा. ).

**' कॉम ' संपादक मंडळ :** श्री. अविनाश ठकरार ( तृ. व. वा. ), श्री. उमेश उमराणी ( तृ. व. वा. ). कु. नीलिमा देशपांडे ( तृ. व. वा. ) श्री. चंद्रशेखर लघाटे.

### विविध उपक्रम

**व्याख्याने व चर्चा :** ( १ ) श्री. जगन्नाथन, अकाउंटस ऑफिसर, टेल्को पुणे ह्यांचे. ' Revenue Budgeting ' ह्यावर व्याख्यान व नंतर चर्चा.

( २ ) श्री. कूपर, प्रशिक्षणाधिकारी, आयुर्विमा, महामंडळ ह्यांची ' Career-Agent Scheme ' ह्यावर दोन व्याख्याने.

( ३ ) श्री. सुरेश देशमुख ह्यांचे " Why criminals

go unpunished " व " How women are protected by law in India " ह्या दोन विषयांवर व्याख्याने.

### औद्योगिक भेटी

राजाबहादूर मोतीलाल मिल्स, किर्लोस्कर न्यूमॅटिक्स, साठे बिस्किटस् ( फॅक्टरी व अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिस ) इ. उद्योग संस्थांना भेटी दिल्या.

### पुस्तक पेढी

ह्या वर्षीही तृ. व. वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तकांव्यतिरिक्त जादा पुस्तक देण्याची सोय करण्यात आली. ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या सुमारे २८३ आहे. ह्या व्यतिरिक्त जादा पुस्तकांची सोय करण्याची योजना विचारार्थ आहे.

### कॉम

ह्यावर्षी एकूण पाच अंक प्रकाशित करण्यात आले. त्यातील चार विशेषांक होते. अर्थशास्त्रज्ञ, व्यवस्थापनशास्त्र तज्ज्ञ, भारतातील सार्वजनिक उद्योगधंदे, महात्मा गांधी जयंती, ह्यासंबंधीचे विशेषांक प्रकाशित करण्यात आले.

### व्यवसाय मार्गदर्शन वर्ग

दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षीही व्यवसाय मार्गदर्शनाचा कार्यक्रम तृतीय वर्ष साहित्य, वाणिज्य व शास्त्र वर्गातील विद्यार्थ्यांसाठी मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आयोजित केला.

### वक्तृत्व स्पर्धा

फोरम ऑफ फ्री एंटरप्राईझची सेठ वालचंद वक्तृत्व स्पर्धा वाणिज्य संघटनेतर्फे घेण्यात आली. श्री. अविनाश ठकरार, श्री. अविनाश धर्माधिकारी व कु. अरविंदा ठकरार हे स्पर्धक यशस्वी झाले.

### निरोप समारंभ

द्वितीय वर्ष वाणिज्य विद्यार्थ्यांकडून तृतीय वर्ष वाणिज्य विद्यार्थ्यांना निरोप समारंभ मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटी आयोजित करण्यात आला.

प्रा. अ. गो. गोसावी
कार्याध्यक्ष


## तुमची पुस्तके एक ऋणानुबंध

सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेत आम्ही हार्दिक सुयश चिंतितो. परीक्षा झाल्यावर आपली पुस्तके महाविद्यालयाच्या ग्रंथालयास भेट द्या. अनेक होतकरू विद्यार्थ्यांची ज्ञानपिपासा ही पुस्तके भागवतील व हे विद्यार्थी तुम्हाला दुवा देतील.

महाविद्यालयाच्या ग्रंथपालांजवळ ही पुस्तके द्या. तुम्हाला हवीत त्या वेळी तुमची पुस्तके तुम्हाला ते परत देतील.

## तुमचे भांडार एक सहकारी संघटना

तुम्हाला लागणाऱ्या वस्तू महाविद्यालयाच्या तुमच्या भांडारातूनच घ्या. महाविद्यालयाचा प्रत्येक विद्यार्थी या भांडाराचा भागधारक आहे.

विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी भांडारात सर्व प्रकारची स्टेशनरी, शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना लागणारी जर्नल्स, डिसेक्शन बॉक्सेस, वेट बॉक्सेस व कला आणि वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना लागणारे मॅप-सेट्स अकौंटन्सी वह्या, भूगोलाची जर्नल्स, ट्युटोरिअल शीटस् व शारीरिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागणारे बनियन्स, पी. टी शूज, सॉक्स, हाफ पॅंटस वगैरे वस्तू योग्य किंमतीत मिळती.

**प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय**

# नियोजन चर्चा मंडळ

१० ऑगस्ट १९७६ रोजी नियोजन चर्चा मंडळाचे उद्घाटन, हस्ते–प्राध्यापक. एस्. व्ही. बोकील. (गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४). ह्या प्रसंगी प्रा. बोकील यांचे समाजवादी अर्थव्यवस्थांतील बदल या विषयावर व्याख्यान.

५ ऑक्टो. १९७६ रोजी. प्रा. जी. बी. कुलकर्णी (डायरेक्टर वैकुंठ मेहता इन्स्टिट्यूट, पुणे) ह्यांचे 'भारतीय नियोजन व लोककल्याण' ह्या विषयावर व्याख्यान.

१२ जानेवारी १९७७ रोजी "भारताचा अन्नविषयक प्रश्न व भारत सरकारचे अन्नविषयक धोरण" ह्या विषयवर अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांचे निबंध वाचन. ह्या कार्यक्रमात खालील विद्यार्थिनींनी भाग घेतला होता.

(१) कु. उषा भटेवरा तृतीय वर्ष कला
(२) कु. गौतमे तृतीय वर्ष कला
(३) सुनीता बर्वे द्वितीय वर्ष कला

२७ फेब्रुवारी १९७७ रोजी नियोजन चर्चा मंडळाची थेऊर (पुणे) येथील यशवंत सहकारी साखर कारखान्यास शैक्षणिक दृष्टिकोणातून भेट.

श्री. मारुती माने
कु. अलका ठुसे
विद्यार्थि-सचिव

प्रा. म. लु. पाथरे
कार्याध्यक्ष

# विद्यार्थी भांडार

चालू वर्ष हे भांडाराच्या व्यवहाराचे सातवे वर्ष. विद्यार्थी भांडारातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागणारे सर्व साहित्य माफक दरात पुरविण्यात येते. त्यात प्रामुख्याने सर्व प्रकारच्या वह्या, अकाउन्टन्सी जर्नल्स, नकाशाच्या रूपरेषा, आखीव व कोरे कागद, शास्त्रविभागातील विद्यार्थ्यांकरिता सर्व विषयांच्या प्रयोगवह्या, गणित आणि पदार्थविज्ञान यांच्या प्रयोग पुस्तिका व प्रयोगशाळेत लागणारे साहित्य यांचा समावेश आहे. तसेच या वर्षी सुरू झालेल्या १२ वी च्या तीनही शाखेच्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची पुस्तके सवलतीच्या दरात देण्यात आली.

जून १९७५ पासून विद्यार्थी भांडाराची खरेदी विक्री पाहण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग विद्यार्थ्यांच्या मधूनच नेमण्यात आला आहे. या विद्यार्थ्यांना महिना ५० रुपये वेतन देऊन आर्थिक सहाय्य करण्यात येते. गेल्या वर्षापासून भांडाराचे खरेदी विक्री प्रमुख म्हणून श्री. एस. बी कवडे यांना नेमण्यात आले व त्यांना विद्यार्थी सर्वश्री उद्धव जोशी, मोहन पिटके व प्रेमचंद हलवाई ह्यांची मदत होते.

जुलै ७५ पासून महाविद्यालयाच्या सर्व विभागांना लागणारी स्टेशनरी व इतर साहित्य पुरविण्याची जबाबदारी भांडाराकडे सोपविण्यात आलेली आहे. तसेच वर्गपाठ लिहिण्यासाठी विद्यार्थ्यांना लागणारे कागद (टयुटोरियल शीट्स्) भांडारामार्फत मोफत पुरविण्यात येतात. निरनिराळ्या प्रकारचे नमुना अर्ज व विद्यापीठ परीक्षांचे नमुना अर्ज यांची विक्री भांडारामार्फत करण्यात येते.

चालू वर्षी भांडाराची खरेदी व २८,७७०=१० ची आणि विक्री रु. २९,९९३=३६ डिसेंबर १९७६ अखेर झाली.

म. आ. कुलकर्णी
चेअरमन

# माजी विद्यार्थि-संघ

दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. २६ जानेवारी १९७७ रोजी सायंकाळी माजी विद्यार्थ्यांचा मेळावा झाला. माजी विद्यार्थ्यांशी हितगुज, अल्पोपाहार, फनी गेम्स, इ. कार्यक्रम झाल्यावर 'पथेर पांचाली' हा चित्रपट दाखविण्यात आला. या स्नेह–संमेलनाला १३० माजी विद्यार्थी उपस्थित होते.

या वर्षी माजी विद्यार्थिसंघाने 'फ्रीडम ॲट मिडनाईट' या ग्रंथावर एक छोटे चर्चासत्रही घेतले होते.

हणमंत अलबाल
सचिव, माजी विद्यार्थि-संघ

## मॉडर्न मित्र मंडळ

मॉडर्न मित्र मंडळाच्या या वर्षीच्या कार्याचा शुभारंभ ना. ॲड. सुशीलकुमार शिंदे, राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य, युवक सेवा, क्रीडा व समाज कल्याण) यांच्या हस्ते १८ जुलै १९७६ रोजी झाला. गेल्याच वर्षी सुरू झालेल्या या मंडळाच्या कार्याने या वर्षी जोर धरला. दलित–कविता व आत्मचरित्रात्मक निबंध यांचे वाचन हा एक लक्षणीय उपक्रम मंडळाने यंदा योजिला होता. 'मी व जात' या विषयावर विद्यार्थि-सभासदांनी लिहिलेल्या आत्मचरित्रात्मक निबंधावर आधारित एक परिसंवाद दुसऱ्या सत्रात घेण्यात आला. त्यास प्रमुख पाहुणे म्हणून 'अस्मितादर्श' या मासिकाचे संपादक प्रा. गंगाधर पानतावणे (औरंगाबाद) आमंत्रित केले होते. अध्यक्षस्थान श्री. पु. स. मोरे उप-संचालक, समाज कल्याण विभाग यांनी भूषविले. महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनातील फनी गेमसच्या कार्यक्रमात या वर्षी मंडळाचा एक स्टॉल ठेवण्यात आला होता. नंदुरबार येथे झालेल्या पुणे विद्यापीठ युवक महोत्सवात सादर केलेल्या प्रथम पारितोषिक विजेत्या 'प्रतिज्ञा' या एकांकिकेचा रंगीत तालमीचा प्रयोग मंडळाच्या सदस्यांसमोर सादर करण्यात आला होता. मंडळाच्या कार्यास राष्ट्रीय सेवा योजना पथकाची फार मदत झाली.

**प्रा. राजेन्द्र व्होरा**

## नाट्य-शिक्षण शिबिर

पुणे विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण योजनेच्या वतीने दि. १ ते ११ फेब्रु. ७७ या काळात एक नाट्य-शिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरात पुण्यातील विविध महाविद्यालयांतील २८ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या शिबिरात रंगभूमीवरील शारीरिक हालचाली आणि शब्द–आवाज या महत्त्वाच्या गोष्टींचे प्रशिक्षण देण्यात आले. शिबिराचा दुसरा महत्त्वाचा भाग होता, व्याख्याने, चर्चा, एकांकिका-प्रयोग यांचा. त्यामध्ये पु. ल. देशपांडे, अमोल पालेकर, सतीश बहादूर यांची व्याख्याने झाली. अमरीश पुरी, दत्ता भट, मामा पेंडसे या कलावंतांनी विविध भूमिकांचे दर्शन प्रात्यक्षिकांसह घडवले. थिएटर ॲकॅडमी, महाराष्ट्रीय कलोपासक आणि मॉडर्नच्या काही विद्यार्थ्यांनी अनुक्रमे बदकांचे गुपित, बर्डबाथ, डॉल्स, प्रतिज्ञा या एकांकिकांचे प्रयोग सादर केले. प्रत्येक व्याख्यान आणि प्रयोग यानंतर विद्यार्थ्यांनी चर्चा केली.

शिबिराचे उद्घाटन मा. कुलगुरू प्रा. दाभोलकर यांच्या हस्ते झाले. शिबिराचे सूत्रचालन अनुया पालेकर यांनी केले होते. संयोजक होते वि. भा. देशपांडे आणि प्रा. श्यामला वनारसे.

**प्रा. वि. भा. देशपांडे**

## व्यवसाय मार्गदर्शन शिबिर

गतवर्षाप्रमाणे ह्या वर्षीही २, ३ व ४ मार्च १९७७ या कालावधीत महाविद्यालयाने तृतीय वर्ष साहित्य, शास्त्र आणि वाणिज्य विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांसाठी एक व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित केलेले होते. या शिबिरात एकूण ५५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. अर्ज कसा लिहावा, बौद्धिक कसोटी, मुलाखत तंत्र याबाबत शिबिरात माहिती दिली गेली. त्याबरोबरच खालील तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली होती.

डॉ. प्र. चिं. शेजवलकर, डायरेक्टर, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, डेव्हलपमेंट अँड रिसर्च, पुणे श्री. जे. एल. जेरथ, मार्केटिंग मॅनेजर, इंजिनियरिंग डिव्हिजन, राजा बहादूर मिल्स, पुणे. श्री. एम. बी. जोशी ब्रँच मॅनेजर, L. I. C. डॉ. एस. एन. कौशिक मॅनेजमेंट कन्सलटंट.

**प्रा. सुरेश दातार**

# ग्रंथालय

जानेवारी १९७७ अखेर ग्रंथालयातील ग्रंथांची एकूण संख्या १५९१२ झाली. त्यापैकी ७४८२ कला, २७४५ वाणिज्य, २९६३ शास्त्रशाखेची व २७२२ विद्यापीठ अनुदान मंडळ पुस्तक पेढीच्या योजनेची आहे. ग्रंथालयामध्ये सध्या ७४ नियतकालिके व १२ वर्तमानपत्रे घेतली जातात. विद्यार्थ्यांना नियतकालिके अभ्यासिकेत उपलब्ध करून दिली जातात व वर्तमानपत्रे विद्यार्थी करमणूक केंद्रामध्ये वाचण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतात.

जानेवारी १९७७ अखेर ग्रंथालयावर एकूण रु. १,९०,०८० = ०८ खर्च करण्यात आला.

विद्यापीठ अनुदान मंडळाने पुस्तक पेढी योजनेसाठी रु. २०,००० चे अनुदान दिले होते. त्या रकमेतून पुस्तकपेढीसाठी ग्रंथखरेदी करणे पूर्ण झाले आहे. पुस्तक पेढी योजनेत पूर्वी असलेल्या १२७० ग्रंथसंख्येत आता १४५२ ग्रंथांची भर पडली आहे. या एकूण २७२२ ग्रंथांतून पुढील वर्षापासून सुमारे ५०० विद्यार्थ्यांना पुस्तक पेढी योजनेचे संच देणे शक्य होईल. म्हणजे एकूण विद्यार्थी संख्येच्या ३०% विद्यार्थ्यांना पुस्तकपेढीतून संच उपलब्ध करून दिले जातील.

कला, वाणिज्य आणि शास्त्र शाखांकडील प्रथमवर्ष ते तृतीय वर्ष या वर्गातील गुणानुक्रमाने पहिल्या पाच विद्यार्थ्यांना अभ्यासात जास्त उत्तेजन देण्यासाठी एक जादा वाचक-पत्र उपलब्ध करून देण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने प्रथम आणि द्वितीय सत्रात अभ्यासिका सायंकाळी ७ ते रात्री ११ पर्यंत खुली ठेवण्यात आली.

रोज सरासरीने १६० पुस्तके याप्रमाणे ३१ जानेवारी १९७७ पर्यंत झालेल्या ग्रंथालयीन कामकाजाच्या दिवसांत एकूण २३०५५ ग्रंथ गृह-वाचनासाठी घरी देण्यात आले. त्याचप्रमाणे रोज सरासरीने १०० पुस्तके, प्रश्नपत्रिका व मासिके याप्रमाणे एकूण १४४०० ग्रंथ अभ्यासिकेत वाचण्यासाठी देण्यात आले.

ग्रंथालय समितीच्या १९७६–७७ या वर्षात जानेवारी १९७७ अखेर एकूण ३ सभा झाल्या. ग्रंथालय समितीत खालील सभासद होते.

१. उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी (कार्याध्यक्ष).
२. प्रा. पी. एस. चिरपुटकर (गणित व संख्याशास्त्र विभाग).
३. प्रा. एस्. जी. दातार (वाणिज्य विभाग)
४. प्रा. ए. के. पांडे (जीवशास्त्र विभाग)
५. श्री. द. गो. बापट (चिटणीस).

महाविद्यालयास भेट देणाऱ्या मान्यवर व्यक्तींनी ग्रंथालयात जतन केलेल्या निरनिराळ्या विषयांवरील कात्रणे पाहून संतोष व्यक्त केला.

'Inter Library Loan' च्या योजनेनुसार यावर्षी आपल्या महाविद्यालयाने पुणे विद्यापीठ जयकर ग्रंथालय, फर्ग्युसन महाविद्यालय, गरवारे वाणिज्य महाविद्यालय व महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था, पुणे या ग्रंथालयांतून वाचनासाठी ग्रंथ आणले.

अक्कलकोट येथील श्री. आर. डी. कुलकर्णी यांनी ग्रंथालयास रु. ५१/– ची **देणगी** दिलेली आहे. तिचा विनियोग त्यांच्या इच्छेनुसार साहित्य शाखेचा गरीब व होतकरू विद्यार्थी श्री. एस्. एस्. बाघमारे यास पुस्तके देण्याकरिता केला आहे.

श्री. एस्. जे. मोडक M. B. A. यांनी १९७२ पासूनची Times of India, Economic Times, Financial Express वगैरे वर्तमानपत्रातील विषयवार कात्रणे महाविद्यालयाला भेट देऊन उपकृत केले आहे. ही कात्रणे प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त आहेत.

खालील व्यक्ती व संस्था यांनी ग्रंथालयाला बहुमोल ग्रंथ भेट देऊन उपकृत केले आहे.

(१) प्राचार्य मो. भा. लिमये
(२) उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी,
(३) उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ
(४) ॲड. सुरेश देशमुख
(५) श्री. आर. डी. कुलकर्णी, अक्कलकोट
(६) डॉ. डी. के. गर्दे
(७) श्री. बी. एस. शाह, अहमदाबाद
(८) श्री. जी. एम. बांबले, राज्यशिक्षणशास्त्र संस्था
(९) प्रा. एस. जी. दातार
(१०) प्रा. (सौ.) श्यामला बनारसे

(११) प्रा. पी. डी. आपटे
(१२) प्रा. श्री. दा. संगोराम
(१३) प्रा. पी. नारायण
(१४) श्री. वी. वाय. भिडे
(१५) श्री. आर. डी. पुंडे, मुंबई
(१६) श्री. जाधव व्ही. एल
(१७) श्री. डी. एस. मांडे
(१८) कु. सुमन जोशी
(१९) ब्रिटिश लायब्ररी, पुणे,
(२०) महाराष्ट्र राज्य शिक्षण खाते
(२१) Union Public Service Commission
(२२) पुणे विद्यापीठ
(२३) Cossip

**उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी** — कार्याध्यक्ष
**श्री. द. गो. बापट** — ग्रंथपाल

## प्रश्नपेढी : एक अभिनव योजना

मॉडर्न महाविद्यालयाचा १९७६-७७ मधील वैशिष्टय-पूर्ण व अभिनव उपक्रम म्हणून महाविद्यालयाने तयार केलेल्या प्रश्नपेढीचा उल्लेख करावा लागेल. महाविद्यालयाने प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष वर्गाच्या सर्व विद्याशाखेतील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अभ्यासक्रमावर आधारित 'प्रश्नपेढी' (Question Bank) आणि प्रश्नांच्या उत्तरांकरिता मार्गदर्शक अशी ग्रंथ-संदर्भ-सूची तयार केली. ह्या प्रश्नपेढीचे प्रकाशन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोलकर यांच्या शुभहस्ते दिनांक १६ डिसेंबर १९७७ रोजी झाले.

मॉडर्नमधील संबंधित वर्गाच्या प्रत्येक विद्यार्थ्यास प्रश्न पेढीची छापील प्रत विनामूल्य देण्यात आली. विशेष म्हणजे या सर्व वर्गांच्या पूर्व-परीक्षा या प्रश्नपेढीच्या आधाराने घेण्यातही महाविद्यालय यशस्वी झाले आहे. मॉडर्नच्या विद्यार्थ्यांनी प्रश्नपेढीस उत्तम प्रतिसाद दिलेला दिसतो.

पुणे विद्यापीठ कक्षेतील अनेक महाविद्यालयांनी स्वखर्चाने प्रश्नपेढीचे संच मागवून घेतले आणि आमच्या उपक्रमास पाठिंबा दिलेला आहे.

**प्रा. स. य. गंभीर**

## राज्यशास्त्र विभाग : ४२ व्या घटना दुरुस्तीवर परिसंवाद

५ डिसेंबर १९७६ रोजी राज्यशास्त्र (विशेष) विषयाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी 'भारतीय राज्य घटनेची ४२ वी दुरुस्ती' या विषयावर एक परिसंवाद आयोजित केला होता. सकाळी ८ वा. ४० मि. पासून सायंकाळी ५ वाजेपर्यन्त एकूण चार सत्रात हा परिसंवाद झाला. निबंध वाचन नंतर प्रश्नोत्तरात्मक चर्चा व शेवटी प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शनपर भाषण याप्रमाणे प्रत्येक सत्राचे नियोजन होते. विधि-महाविद्यालयाचे प्राचार्य सत्य-रंजन साठे, उपप्राचार्य स. वि. कुलकर्णी, प्रा. राम बापट आणि भूतपूर्व प्राचार्य जी. व्ही. पंडित ही तज्ज्ञ मंडळी या सत्रांत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरिता उपस्थित होती. परिसंवादाचे उद्घाटन मॉडनचे प्राचार्य मो. भा. लिमये यांनी केले. स्वतः ते, डॉ. दि. का. गर्दे आणि प्रा. मुकुंद महाजन या परिसंवादास संपूर्ण वेळ उपस्थित होते.

परिसंवादात सर्वश्री दाभाडे, काळोखे, माहूरकर, वहिले, चव्हाण, जाधव पी. एन., चिकोडीकर, गदगे, फोफलिया, थोरात, चुंबळकर, पोतदार, बोरकर, दामले, ऐनापुरे, गाडगीळ, जाधव एस. एस., कु. हरिप, कु. गिरे, कु. कांबळे, कु. बाविसकर, कु. ठाकरे आणि कु. देशपांडे या विद्यार्थ्यांनी आणि प्रा. शं. ना. नवलगुंदकर व प्रा. राजेन्द्र व्होरा यांनी भाग घेतला होता.

**प्रा. शं. ना. नवलगुंदकर**

## संख्याशास्त्र सेमिनार

गणित व संख्याशास्त्र विभागातर्फे तृ. व. वाणिज्य वर्गातील संख्याशास्त्र विशेष विषयाच्या विद्यार्थ्यांचे एक सेमिनार गरवारे वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. करंदीकर यांच्या उपस्थितीत झाले. सेमिनारमध्ये कु. देशपांडे या विद्यार्थिनीने 'संख्याशास्त्रीय गुणन नियंत्रण' (Statistical Quality Control) या विषयावर आणि श्री. गुंड या विद्यार्थ्याने 'राष्ट्रीय उत्पन्न' (National Income) या विषयावर आपापले अभ्यासपूर्ण निबंध वाचले.

या निमित्ताने संख्याशास्त्र विषयाचे स्वरूप, त्याच्या विविध उपशाखा आणि या विषयाची शिक्षणशास्त्र, अर्थ-शास्त्र, मानसशास्त्र, औद्योगिक प्रकल्प इत्यादी ज्ञान-शाखात असलेली उपयुक्तता इत्यादी विषयांचा ऊहापोह झाला. प्रा. करंदीकरांनी विद्यार्थ्यांना कॉम्प्युटरसंबंधी बरीच उपयुक्त माहिती सांगितली.

**प. स. चिरपुटकर**
गणित व संख्याशास्त्र विभाग प्रमुख

## शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक

| | | |
|---|---|---|
| १ कु. आयना राका आत्माराम | एप्रिल १९७६ मध्ये झालेल्या पुणे विद्यापीठाच्या पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत विद्यापीठात ४ थी | १५१–०० |

## प्राध्यापकनिधी पारितोषिके

| | | |
|---|---|---|
| २ कु. देशपांडे आशा गंगाधर | पदवीपूर्व साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ३ श्री. भावे दिलीप नारायण | पदवीपूर्व शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ४ श्री. साठे नितीन पद्माकर | पदवीपूर्व शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ५ कु. आयना राका आत्माराम | पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ६ श्री. कुलकर्णी श्रीकांत एकनाथ | प्रथमवर्ष साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ७ श्री. न्यायाधीश विनयकुमार हरिभाऊ | प्रथमवर्ष शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ८ श्री. ठाणेदार गिरीश वामनराव | प्रथमवर्ष वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ९ कु. भटेवरा उमा चांदमल | द्वितीय वर्ष साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| १० श्री. मोघे जगदीश मुकुंद | द्वितीय वर्ष शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| ११ कु. हसबनीस संजीवनी रामचंद्र | द्वितीय वर्ष वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| १२ कु. कारखानीस नयना पुरुषोत्तम | तृतीय वर्ष साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| १३ श्री. पाटील चंद्रशेखर बाळकृष्ण | तृतीय वर्ष शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |

| | | |
|---|---|---|
| १४ कु. कुलकर्णी कीर्तिमालिनी दत्तात्रेय | तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |

" कै. प्राध्यापक ए. पी. फडके पारितोषिक "

| | | |
|---|---|---|
| १५ श्री. भावे दिलीप नारायण | पदवीपूर्व शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांकगणित विषयात मिळविल्याबद्दल | ३६–१५ |
| १६ श्री. साठे नितीन पद्माकर | पदवीपूर्व शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात गणित विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ३६–१५ |
| १७ कु. दामले सुनीती गणेश | पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात व्यावसायिक गणित विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ३६–२० |

" माजी विद्यार्थी पारितोषिक "

| | | |
|---|---|---|
| १८ कु. कारखानीस नयना पुरुषोत्तम | बी. ए. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| १९ श्री. पाटील चंद्रशेखर बा. | बी. एस्सी. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |
| २० कु. कुलकर्णी कीर्तिमालिनी दत्तात्रेय | बी. कॉम. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |

## देणगीतून दिलेली पारितोषिके

" प्रकाश भागवत पारितोषिक "

| | | |
|---|---|---|
| २१ श्री. पाटील चंद्रशेखर बा. | बी. एस्सी. परीक्षेत फिजिक्स विषयामध्ये महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ४०–०० |

" कै. रावबहादुर दत्तात्रय बळवंत राजोपाध्ये पारितोषिक "

| | | |
|---|---|---|
| २२ कु. आयना राका आत्माराम | पदवीपूर्व परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६०–०० |

वासुदेवराव ताटके पारितोषिक "

| | | |
|---|---|---|
| २३ कु. आयना राका आत्माराम. | पदवीपूर्व परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६०–०० |

" वासुदेव व्यंकटेश पारितोषिक "

| | | |
|---|---|---|
| २४ कु. कारखानीस नयना पुरुषोत्तम. | बी. ए. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | २५–०० |

" नारायणराव भागवत पारितोषिक "

| | | |
|---|---|---|
| २५ श्री. सोळंकी आर. एन्. | प्रथम वर्ष शास्त्र परीक्षेत जीवशास्त्र विषयात महाविद्यालयात पहिला क्रमांक | ६०–०० |

" वासुदेव व्यंकटेश पंडित पारितोषिक "

| | | |
|---|---|---|
| २६ कु. कारखानीस नयना पुरुषोत्तम. | बी. ए. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम | |
| २७ श्री. पाटील चंद्रशेखर बा. | बी. एस्सी. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६२–५० |
| २८ कु. कुलकर्णी कीर्तिमालिनी दत्तात्रेय. | बी. कॉम. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६२–५० |

" सौ. लक्ष्मीबाई ताटके पारितोषिक "

| | | |
|---|---|---|
| २९ श्री. न्यायाधीश विनयकुमार हरिभाऊ | प्रथम वर्ष शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात गणित विषयात प्रथम क्रमांक | ६०–०० |

" चंद्रकांत मोरेश्वर शिंदे पारितोषिक "

| | | |
|---|---|---|
| ३० कु. नेर्लेकर वंदना प्रभाकर. | महाविद्यालयात तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत संख्याशास्त्र ह्या विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ६०–०० |

" मातुश्री मुळाबाई कर्नावट पारितोषिक "

| | | |
|---|---|---|
| ३१ श्री. माटे चित्तरंजन मधुकर. | महाविद्यालयात तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत ॲडव्हान्स अकौन्टिंग व ऑडिटिंग ह्या विषयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल | ५१–०० |

## शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची नावे

### राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १ भोरे नथू मारुती | बी. एस्. सी. पार्ट–१ |
| २ कु. राणे शालिनी भास्कर | एस्. वाय्. बी. ए. |
| ३ देशपांडे संजय नारायण | एस्. वाय्. बी. कॉम. |
| ४ लघाटे चंद्रशेखर यशवन्त | ,, |
| ५ मुंदडा मधुसूदन मोहनलाल | ,, |
| ६ अभ्यंकर विजय गुरुनाथ | एस्. वाय्. बी. एम्सी. |
| ७ भुजबळ मोहन सोनुजी | ,, |
| ८ बटवाल भागुजी लबाजी | ,, |
| ९ नारविलकर श्रीनिवास शरद | ,, |
| १० कु. तिखे नीलिमा रामचंद्र | ,, |
| ११ भांड नारायण भानुदास | टी. वाय्. बी. एस्. सी. |
| १२ डेरे संतु हनुमंत | ,, |
| १३ कुलकर्णी जयंत वसंतराव | ,, |
| १४ शिंगटे प्रकाश आप्पासाहेब | ,, |

| | |
|---|---|
| १५ ढेकणे शहाजी हरिभाऊ | ,, |
| १६ सुके ज्ञानेश्वर दत्तात्रेय | ,, |
| १७ हलगे अशोक रावसाहेब | बी. कॉम. पार्ट–१ |
| १८ कल्याणकर दिलीप गणपतराव | बी. एस्सी. पार्ट–१ |
| १९ सोनावणे मनोहर रामदास | बी. कॉम. पार्ट–१ |

राष्ट्रीय शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| २० जाधव विजयकुमार दशरथराव | बी. एस्सी. पार्ट–१ |
| २१ कुमठेकर गिरीश भास्कर | ,, |
| २२ पंचनदीकर विनय श्रीपाद | ,, |
| २३ साठे नितीन पद्माकर | ,, |
| २४ कु. मेहता मीनाक्षी माधव | बी. कॉम पार्ट १ |
| २५ लुंकड पारसमल इंद्रभान | एस्. वाय्. बी. कॉम. |
| २६ पुरंदरे संजय नारायण | ,, |
| २७ भावे दिलीप नारायण | बी. एस्सी. पार्ट–१ |
| २८ कु. शाह नीता मोतीलाल | टी. वाय्. बी. एस्सी. |

## राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| २९ कु. इनामदार वासंती गंगाधर | बी. ए. पार्ट–१ |
| ३० मांजरेकर मधुकर रंगनाथ | बी. एस्सी. पार्ट–१ |
| ३१ कु. आठल्ये पद्मजा सदाशिव | बी. कॉम. पार्ट–१ |
| ३२ महाजन राजेंद्र वसंत | ,, |
| ३३ महाजन हृषिकेश कृष्णनाथ | एस्. वाय्. बी. कॉम. |
| ३४ सहस्रबुद्धे संजीव गोपाळ | एस्. वाय्. बी. कॉम. |
| ३५ कु. शिरोळे अलका मारुतीराव | ,, |
| ३६ मोघे जगदीश मुकुंद | टी. वाय्. बी. एस्सी. |
| ३७ शिंपी अरुण खंडू | ,, |
| ३८ धाकस भानुदास दत्तात्रेय | टी. वाय्. बी. कॉम. |
| ३९ ओगले अविनाश गणेश | ,, |
| ४० साठे प्रसाद बाळ | ,, |
| ४१ साठे धनंजय बाळ | बी. एस्सी. पार्ट–१ |
| ४२ बाफना नेमिचंद पुखराज | टी. वाय्. बी. एस्सी. |

गव्हर्नमेंट पब्लिक स्कूलमधून पास झालेल्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| ४३ मेहता चंद्रकांत महादेव | पी. डी. कॉमर्स |

स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत

| | |
|---|---|
| ४४ कु. ओगन्नावार पद्मावती बाबूराव | पी. डी. आर्टस् |

४५ सुराळकर दिलीप रामकृष्ण — पी. डी. सायन्स
४६ देशमुख रामनाथ पांडुरंग — एफ्. वाय्. बी. ए.
४७ शिंद्रेकर प्रदीप माधवराव — ,,
४८ मुंडले शशिकांत श्रीपाद — एस्. वाय्. बी. कॉम.

सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत

४९ जाधव प्रताप शंकर — पी. डी. कॉमर्स
५० कु. कदम विद्या उद्धव — टी. वाय्. बी. ए.

✣

## Blood Donation

The students and teachers of our college participate in Blood–Donation drive every year. In this academic year the blood donation programme was arranged in both the terms (on 19.7.76 and on 10.2 77). Following staff and students participated in it. We heartily congratulate them for the sense of social responsibility they have shown.

Staff members and students who have donated blood on 28–7–76

1 Principal M B. Limaye
2 Prof. P. D. Apte ( Staff )
3 Miss Kinikar S. B.
4 Shri Panjabi P. J.
5 Shri Deshpande V. B.
6 Shri Badhale R. S.
7 Shri Mahurkar P. R.
8 Shri Gokhale B. D.
9 Shri Deshmukh S. R.
10 Shri Gupta R. C.
11 Shri Gune A. D.
12 Shri Desai M. D.
13 Shri Kale R. U.
14 Shri Jambhekar A. S.
15 Shri Jain A. N.
16 Shri Tatke D. S.
17 Shri Dawkhar D. B.
18 Shri Tambe P. S.
19 Miss Angal S. S.
20 Shri Lagoo M. N.
21 Shri Saraf S. Y.
22 Shri Patwardhan V. S.
23 Shri Sharma D. T.
24 Shri Joshi S. S.
25 Shri Halwai P. M.
26 Miss. Parab J. A.
27 Shri Shevale B M.
28 Shri Kapote N. B.
29 Shri Kulkarni K. R.
30 Miss. Sangle P. B.
31 Miss. Kavishvar P. B.
32 Miss. Ambikar S. M.
33 Shri Bhand N. B.
34 Shri Savarkar R. N.
35 Shri Gokhale R. D.
35 Shri Sansare S. S.

Staff–members and the students who have donated blood on 10–2–77

1 Prin. M. B. Limaye
2 Prof. (Mrs.) S. G. Nawathe
3 Prof. A. V. Rayrikar

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | Prof. (Mrs.) S. S. Vanarase | 22 | Arvind R. Patil |
| 5 | Yashwant P. Shintre | 23 | Sagar S. Ronghe |
| 6 | Vivek B. Deshpande | 24 | Adikumar N. Jain |
| 7 | Ravindra S. Bhadale | 25 | Vithal G. Kulkarni |
| 8 | Sanjay D. Kadolkar | 26 | Mukund V. Moghe |
| 9 | Vandana B. Gadgil | 27 | Ravindra K. Sonavale |
| 10 | Ajit R. More | 28 | Santosh N. Badan |
| 11 | Ratnakar N. Morankar | 29 | Umesh N. Vaste |
| 12 | Pramod H. Patil | 30 | Arun S. Sarade |
| 13 | Mahesh S. Gadgil | 31 | Prakash D. Kulkarni |
| 14 | Rajendra V. Pimpalkar | 32 | Anirudha P. Pandit |
| 15 | Jayant B. Kulkarni | 33 | Avinash D. Gune |
| 16 | Gajkumar S. Chankeshware | 34 | Umesh G. Shinde |
| 17 | Snehalata A. Mehendale | 35 | Saroj M. Shinde |
| 18 | Ishwar D. Shah | 36 | Jitendra V. Thakkar |
| 19 | Sadanand Q. Karmalkar | 37 | Sanjay R. Bharadiya |
| 20 | Baburao D. Virkar | 38 | Shrikant P. Pansare |
| 21 | Nidhish K. Patel | 39 | Chandrashekhar D. Deshmukh |
| | | 40 | Ramchandra D. Gokhale |

## वाङ्मयसमीक्षा शिबिर : अभूतपूर्व उपक्रम

विद्यापीठ अनुदान मंडळाने दिलेल्या अनुदानातून मॉडर्न महाविद्यालयामध्ये सात दिवसांचे वाङ्मय-समीक्षा शिबिर दि. २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर १९७६ या कालावधीत घेण्यात आले. समीक्षाविषयक वेगवेगळ्या प्रश्नांचा या शिबिरात ऊहापोह झाला. रोज तीन-तीन तासांची दोन सत्रे याप्रमाणे या शिबिरात एकूण १२ सत्रे घेण्यात आली. त्यांचा स्थूल आराखडा खालीप्रमाणे :

| विषय | अध्यक्ष | उपन्यासकार |
|---|---|---|
| १. उद्घाटन | कविवर्य अनिल | प्राचार्य लिमये, भीमराव कुलकर्णी |
| २. साहित्याचा सामाजिक संदर्भ | गं. बा. सरदार | प्रभाकर पाध्ये, वसंत दावतर |
| ३. साहित्य व अन्य कला संबंध | वा. ल. कुलकर्णी | अरविंद मंगरूळकर, लीला अर्जुनवाडकर श्यामला वनारसे |
| ४. मराठी समीक्षेचा सैद्धान्तिक-दृष्ट्या विचार | ,, | गो. म. कुलकर्णी, विलास खोले, रमेश तेंडुलकर. |
| ५. प्राचीन मराठी वाङ्मयाची समीक्षा | रा. श्री. जोग | हेमंत इनामदार, वा. पु. गिंडे, गं. बा. सरदार |
| ६. वाङ्मयीन समीक्षा व संशोधन | स. गं. मालशे | दु. का. सन्त, भीमराव कुलकर्णी |
| ७. कविता व तिचे आकलन | कविवर्य अनील | अनुराधा पोतदार, रमेश तेंडुलकर, गोविंद जोशी |
| ८. रससिद्धान्त | रा. शं. वाळिंबे | शांताराम जोग, गो. के. भट, सु. व्यं. धायगुडे |

| विषय | अध्यक्ष | उपन्यासकार |
|---|---|---|
| ९. सौंदर्यशास्त्र व मराठी समीक्षा | वसंत दावतर | प्रभाकर पाध्ये, सुरेंद्र बारलिंगे |
| १०. आधुनिक मराठी कादंबरी | प्रभाकर पाध्ये | सरोजिनी वैद्य, विद्याधर पुंडलिक, भालचंद्र फडके |
| ११. शालेय व महाविद्यालयीन पातळीवरील कवितेचे आकलन | रमेश तेंडुलकर | मो. रा. वाळंबे, निशिकान्त मिरजकर, श्री. दा. संगोराम, ग. ह. पाटील |
| १२. नाटकाची समीक्षा | अरविंद मंगरूळकर | चंद्रशेखर बर्वे, वि. भा. देशपांडे |
| १३. समारोप | वि. रा. करंदीकर | प्राचार्य लिमये, भीमराव कुलकर्णी |

अध्यक्ष व उपन्यासाकारांखेरीज श्री. पु. भागवत, मु. श्री. कानडे, आनंदप्रकाश दीक्षित, प्र. न. जोशी, सीताराम रायकर, आनंद यादव, श्री. दा. संगोराम, स. शि. भावे, मनीषा दीक्षित, द. दि. पुंडे, वीणा देव जयंत वष्ट, हेमा लेले, राजेंद्र व्होरा, शं. ना. नवलगुंडकर, कु. खोले, सुमन बेलवलकर, पद्माकर आपटे कल्याण काळे, श्री. ज. जोशी, वि. बा. प्रभुदेसाई, सुधाकर भोसले, ललिता कुंभोजकर, डॉ. कामत, डॉ. दिवाकर इ. महत्त्वाच्या व्यक्ती शिबिरास हजर होत्या. पुणे व एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे एम्. ए. चे विद्यार्थीही बहुसंख्येने हजर होते.

वाङ्मय समीक्षेची इतकी व्यापक व मोठ्या प्रमाणावर झालेली चर्चा ही एकंदरीत अभूतपूर्व झाल्याचे वृत्तपत्रांनी व समीक्षकांनी आवर्जून सांगितले. ह्या शिबिरातील चर्चेचे एक संकलनात्मक पुस्तक प्रसिद्ध करावे, अशी अनेकांनी सूचना केली आहे.

शिबिरामध्ये मॉडर्नच्या विद्यार्थ्यांनी 'प्रतिज्ञा' या अभिनव एकांकिकेचा प्रयोग करून दाखविला. पुण्यातील श्रीविद्या प्रकाशनचे श्री. मधुकाका कुलकर्णी व 'रसिक साहित्या'चे नांदुरकर बंधू यांनी आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने समीक्षकांचे यथोचित आदरातिथ्य केले. आणखी एका नामवंत प्रकाशकांनीही आदरातिथ्य केले. म. सा. परिषदेच्या त्रैमासिक पत्रिकेच्या १९७५ च्या वाङ्मय समालोचन विशेषांकाचे प्रकाशन प्राचार्य लिमये यांच्या हस्ते शिबिराच्या काळात करण्यात आले.

शिबिराचे यश अनेकांच्या सहकार्यामुळे, उत्स्फूर्त सहभागामुळे व मॉडर्न महाविद्यालयातील अनेकांच्या मदतीवर अवलंबून होते. त्या सर्वांचे हार्दिक आभार.

**भीमराव कुलकर्णी**
शिबिर–संचालक

## प्राध्यापक अभ्यास मंडळ १९७६–७७

महाविद्यालयाचे प्राचार्य आणि प्राध्यापक अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य मो. भा. लिमये यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली प्राध्यापक अभ्यास मंडळाने यंदा खालील कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित केले :

| दिनांक | विषय | वक्ता | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| रविवार दि. १५ ऑगस्ट, १९७७ | महाविद्यालयात अध्यापन पद्धतीचे स्थान व स्वरूप. | प्रा. श्री. दा. संगोराम | डॉ. (श्रीमती) चित्रा नाईक, भूतपूर्व शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे. |

| दिनांक | विषय | वक्ता | अध्यक्ष |
| --- | --- | --- | --- |
| मंगळवार दि. ३१ ऑगस्ट १९७६ | ' ऱ्होड्स् स्कॉलर ' म्हणून निवडीचा बहुमान मिळालेले प्रा. आर्. एस्. पतके यांचे व्याख्यान व त्यांचा सत्कार. | श्री. आर्. एस्. पतके | डॉ. एस्. नागराजन् इंग्रजी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ, पुणे ७. |
| शुक्रवार १५ ऑक्टोबर १९७६ | ललित कलांतील स्वातंत्र्याची कल्पना | डॉ. रा. शं. वाळिंबे | प्राचार्य मो. भा. लिमये |

याच वेळी मराठी विभाग प्रमुख म्हणून सेवानिवृत्त होत असलेले डॉ. वाळिंबे यांचा त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ प्राचार्य मो. भा. लिमये यांच्या हस्ते सत्कार.

तसेच आमच्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी सौ. हेमा लेले आणि कु. मंगला जाधव यांनी एम्. ए. (मराठी) परीक्षेत प्रथम श्रेणी व पारितोषिके प्राप्त केल्याबद्दल त्यांचा डॉ. वाळिंबे यांच्या हस्ते सत्कार.

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| गुरुवार २३ डिसेंबर १९७६ | राज्य-घटना दुरुस्तीच्या संदर्भात भारतीय राज्यघटनेचे स्वरूप. | प्रा. शं. ना. नवलगुंदकर | डॉ. डी. के. गर्दे राज्यशास्त्र विभाग पुणे विद्यापीठ, पुणे ७ |
| बुधवार १९ जानेवारी १९७७ | आपण व आपले दात | डॉ. राम काळे डेन्टल सर्जन | प्राचार्य मो. भा. लिमये |
| शुक्रवार १८ फेब्रुवारी १९७७ | एज्युकेशनल इम्प्लिकेशन्स ऑफ सिनेमा इन इंडिया | प्रा. सतीश बहादूर, फिल्म इन्स्टिटयूट, पुणे | प्राचार्य मो. भा. लिमये |

**कार्याध्यक्ष**
प्राध्यापक अभ्यास मंडळ

**प्राचार्य व अध्यक्ष**
प्राध्यापक अभ्यास मंडळ

# ज्यूनियर कॉलेज अहवाल

## क्रीडा विभाग

या वर्षी (इयत्ता १२ वी) ज्यूनियर महाविद्यालयाने राज्य क्रीडामहोत्सवात भाग घेतला. आमच्या ज्यूनियर महाविद्यालयातील एकूण २५० विद्यार्थी व १०० विद्यार्थिनी यांनी पावसाळी व हिवाळी सत्रात पुणे जिल्हा परिषदेतर्फे भरविलेल्या सांघिक स्पर्धेत व वैयक्तिक स्पर्धेत भाग घेतला. बास्केट बॉल, व्हॉलीबॉल, फूटबॉल, खो–खो व कबड्डी ह्या सांघिक स्पर्धा व पोहणे, टेबल–टेनिस, बॅडमिंटन ह्या वैयक्तिक स्पर्धा होत्या.

आमच्या ज्यूनियर महाविद्यालयाच्या मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने पुणे जिल्ह्यात विजेतेपद व पुणे विभागीय स्पर्धेत विजेतेपद मिळविले. तसेच पुणे जिल्हा स्पर्धेत मुलांच्या खो–खो संघाने आणि मुलींच्या बास्केट बॉल संघाने उपविजेतेपद मिळविले.

व्हॉलीबॉल, कबड्डी, फुटबॉल, बास्केटबॉल, टेबलटेनिस, बॅडमिंटन व हॉकी हे संघ उपान्त्य फेरीपर्यंत पोहचले आणि पुण्यातील क्रीडासमीक्षक व तज्ज्ञांच्या कौतुकास पात्र ठरले. धुळे येथील राज्य क्रीडा–स्पर्धेत आमच्या महाविद्यालयातील मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने पुणे जिल्हा विभागीय संघाचे प्रतिनिधित्व केले.

आमच्या महाविद्यालयातील खालील खेळाडूंनी धरमशाला ( हिमाचल प्रदेश ) येथे झालेल्या २२ व्या अखिल भारतीय शालेय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या विविध संघांतून भाग घेऊन आमच्या महाविद्यालयाची मान उंचावली.

( १ ) उदय भागवत ( शास्त्र शाखा ) आणि ( २ ) विजयकुमार राठी ( वाणिज्य शाखा ), ह्यांचा महाराष्ट्राच्या खो–खो च्या विजेत्या संघात सिंहाचा वाटा होता.

आपल्या महाविद्यालयातील ( ३ ) कु. वर्षा देशपांडे, ( वाणिज्य शाखा ) हिची महाराष्ट्र महिला बॉस्केटबॉल संघात निवड झाली. ह्या संघाने आंतर-राज्य स्पर्धेत ब्रॉन्झ पदक मिळविले.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र महिला व्हॉलीबॉल संघात ( ४ ) कु. सुलोचना अरगडे आणि ( ५ ) कु. स्वाती हर्डीकर यांची निवड झाली.

महाराष्ट्राच्या मुलांच्या व्हॉलीबॉल संघात ( ६ ) महेश साने, ह्याची आंतर-राज्य शालेय स्पर्धेसाठी निवड झाली.

वरील सर्व विद्यार्थ्यांचे आमच्या ज्युनियर महाविद्यालयातर्फे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

द्वितीय सत्रात आंतर-वर्गीय सामने भरविण्यात आले. त्याला सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त साद दिली. एकूण ४५० विद्यार्थ्यांनी विविध खेळांत भाग घेतला.

फूटबॉलचे विजेतेपद ‘ K ’ तुकडी वाणिज्य व उपविजेतेपद ‘ H ’ तुकडी वाणिज्य,
व्हॉलीबॉल विजेतेपद ‘ K ’ तुकडी वाणिज्य व उपविजेतेपद ‘ D ’ तुकडी वाणिज्य,
कबड्डीचे विजेतेपद ‘ B ’ तुकडी विज्ञान व उपविजेतेपद ‘ J ’ तुकडी वाणिज्य,
खो–खो चे विजेतेपद ‘ H ’ तुकडी वाणिज्य व उपविजेतेपद ‘ C ’ तुकडी विज्ञान
सर्वसाधारण विजेतेपद ‘ K ’ तुकडी
वैयक्तिक विजेतेपद : श्री. नारंग जयकुमार ‘ F ’ तुकडी
वैयक्तिक विजेतेपद ( मुली ) कु. जयश्री जोशी ‘ F ’ तुकडी

## ज्यूनिअर कॉलेज–शारीरिक शिक्षण अहवाल

१ जुलै १९७६ पासून ज्युनिअर महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षणाचे तास नियमितपणे सुरू झाले. कला विभागाचा एक, शास्त्र विभागाचे चार आणि वाणिज्य विभागाचे पाच अशा एकूण दहा वर्गांसाठी शारीरिक शिक्षणाचे स्वतंत्र असे वेळापत्रक तयार करण्यात आले होते. प्रत्येक वर्गातील दोन या प्रमाणे दहा मुलांची व दहा मुलींची शारीरिक शिक्षण–संघनायक म्हणून. निवड करण्यात आली होती. या संघनायकांना योग्य असे प्रशिक्षण देण्यात आले होते.दुपारी २·३० ते ५·३० या वेळात शारीरिक शिक्षणाचे तास घेण्यात येत असत. या तासांमध्ये विद्यार्थ्यांना योग्य शारीरिक शिक्षण कसे घ्यावे याबद्दल शिक्षण दिले जात असे. त्यानंतर विद्यार्थ्यांना सराव करण्यास सांगितले जात असे. या विद्यार्थ्यांना वेळोवेळी संघनायकसुद्धा मार्गदर्शन करत असत.

विद्यार्थ्यांकरिता फूटबॉल, व्हॉलीबॉल, हॉकी, बास्केटबॉल, खो–खो व विद्यार्थिनींकरता व्हॉलीबॉल, हॉकी, बास्केटबॉल, थ्रो-बॉल, खो-खो या आंतरशालेय व राष्ट्रीय मैदानी स्पर्धांचे नियम सांगितले जात असत.

विद्यार्थ्यांची बौद्धिक, शारीरिक पातळी उंचावली जावी या दृष्टिकोणातून शारीरिक प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखण्यात आला होता.

शारीरिक शिक्षणाचा एक प्रकार म्हणून फूटबॉल, कबड्डी, खो–खो, अॅथलेटिक्स तसेच बुद्धिबळ, टेबल टेनिस या आंतरवर्गीय स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्या संघास प्रशस्तिपत्रके देऊन त्यांच्यातील उत्साह वाढविण्यात आला.

२७ जानेवारी ७७ पासून प्रत्येक विद्यार्थ्यांची खालील प्रकारांची परीक्षा घेण्यात आली—

( १ ) १०० मी. पळणे ( २ ) गोळा फेक

( ३ ) लांब उडी ( ४ ) विविध खेळ

आणि उपस्थितीबद्दल त्यांना गुण देण्यात आले. विद्यार्थ्यांना शिकविलेल्या नियमांची तोंडी परीक्षासुद्धा घेण्यात आली.

आमचे प्राचार्य व इतर प्राध्यापक वर्ग यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

## ज्यूनियर कॉलेज : वार्षिक स्नेहसंमेलन

१२ वीच्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातले हे पहिलेच वर्ष. त्यामुळे नेहमीच्या वार्षिक स्नेहसंमेलनापेक्षा काही आगळे करण्याचा प्रयत्न झाला. ९ जानेवारी १९७७ रोजी १२ वीतील कला, शास्त्र आणि वाणिज्य विद्यार्थ्यांचे एकत्रित स्नेहसंमेलन साजरे झाले. त्यावेळी अल्पोपाहार व फनी गेम्स इ. कार्यक्रम झाले. सायंकाळी क्रीडा, युवक कल्याण संचालनालयाचे साहाय्यक संचालक श्री साळुंके यांच्या हस्ते विविध क्रीडा स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

### आनंदमेळा

ज्यूनियर आणि सिनियर कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा एकत्र आनंद मेळा दिनांक ९ व १० फेब्रुवारी १९७७ रोजी झाला. आनंद मेळ्यातील उत्पन्नाची रक्कम विद्यार्थिसहाय्य निधीला देण्यात आली. याच प्रसंगी रक्तदानाचा कार्यक्रम झाला. प्राचार्य प्राध्यापक आणि विद्यार्थी मिळून एकूण ७५ व्यक्तींनी रक्तदान केले.

**प्रा. पद्माकर आपटे**
कार्याध्यक्ष

## राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| १ | जगताप प्रभाकर रामचंद्र | १२ वी सायन्स |
| २ | कु. नाईक मंगला दिनकर | १२ वी सायन्स |
| ३ | फाकटकर हरिभाऊ गणपत | १२ वी सायन्स |
| ४ | शिंदे वसंत अण्णा | १२ वी सायन्स |
| ५ | कु. ठाकूर सुनीता सदाशिव | १२ वी सायन्स |
| ६ | कु. कामत उज्ज्वला अनंत | १२ वी सायन्स |
| ७ | कुलकर्णी राजेंद्र यशवंत | १२ वी कॉमर्स |
| ८ | आंबेकर प्रकाश दिगंबर | १२ वी कॉमर्स |
| ९ | कु. बारी प्रतिभा प्रभाकर | १२ वी कॉमर्स |
| १० | कु. जोशी पद्मजा प्रभाकर | १२ वी कॉमर्स |
| ११ | कु. रोहोकले उषाबाई देवराम | १२ वी सायन्स |

## राष्ट्रीय शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १२ देशपांडे विराज वसंत | १२ वी सायन्स |
| १३ हिंगणे श्रीनिवास दत्तात्रय | १२ वी सायन्स |
| १४ लुंकड दिलीपकुमार इंद्रभान | १२ वी सायन्स |
| १५ जैन सुरेश बाबूलाल | १२ वी कॉमर्स |
| १६ भराडिया संजयकुमार रामेश्वर | १२ वी कॉमर्स |

## स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी सवलत

| | |
|---|---|
| १७ कु. पोफळे रेखा शिवराम | १२ वी आर्टस् |
| १८ जाधव नंदकुमार आत्माराम | १२ वी सायन्स |

## सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत

| | |
|---|---|
| १९ कु. पगार नलिनी वसंतराव | १२ वी कॉमर्स |
| २० कु. सावंत शिला भाऊराव | १२ वी कॉमर्स |
| २१ कु. शिंदे शशिकला सीताराम | १२ वी आर्टस |
| २२ सुर्वे विजय सीताराम | १२ वी सायन्स |

# उपक्रम संयोजन १९७६–७७ ( द्वितीय सत्र )

[ टीप : : १९७६–७७ च्या प्रथम सत्रातील उपक्रम संयोजनाचा वृत्तांत डिसेंबर १९७६ मध्ये प्रकाशित झालेल्या ' मॉडर्न मानस ' या मध्यावधि–विशेषांकात आलेला आहे ]

| | |
|---|---|
| ६ डिसेंबर १९७६ | साहित्य संघटना :– व्याख्यान, वक्ते श्री. बाबा मोहोड<br>विषय : संत वाङमय व गाडगे महाराज |
| ११ डिसेंबर १९७६ | वाणिज्य संघटना—<br>साठे बिस्किट कारखाना : औद्योगिक सहल |
| १७, १८, व १९ डिसेंबर १९७६ | ' मॉम व मॅगेझिन ' आयोजित<br>पुणे आंतर महाविद्यालयीन युवक साहित्य संमेलन ( १ ले )<br>उद्घाटक : प्राचार्य मो. भा. लिमये<br>( १ ) कवी संमेलन : अध्यक्ष : पद्मा गोळे<br>( २ ) एकांकिका वाचन : समीक्षक : प्रा. विद्याधर पुंडलीक व सरिता पदकी<br>( ३ ) वक्तृत्व स्पर्धा : परीक्षक डॉ. कुंभारे आणि प्रा. श्याम जोशी<br>( ४ ) समारोप : प्रमुख पाहुणे : नाटककार सतीश आळेकर |
| १८ डिसेंबर १९७६ | साहित्य संघटना : इतिहासाचार्य राजवाडे स्मृतिदिनानिमित्त<br>व्याख्यान : वक्ते : प्रा. अ. म. देशपांडे<br>विषय : कै. राजवाडे यांची इतिहासाची कल्पना. |

| | |
|---|---|
| १८ व १९ डिसेंबर १९७६ | साहित्य संघटना : संदर्भ ग्रंथ कृतिसत्र<br>उद्‌घाटक प्राचार्य मो. भा लिमये<br>( १ ) वक्ते : श्री. श्रीपाद जोशी<br>विषय : शब्दकोशाचा जन्म<br>( २ ) वक्ते : श्री. व. का. विप्रदास<br>विषय : संदर्भ ग्रंथांचा उपयोग |
| २१ डिसेंबर १९७६ | साहित्य संघटना—व्याख्यान<br>वक्ते : डॉ. पी. एन्. व्यवहारे (मानसोपचार तज्ज्ञ, मध्यवर्ती मनोरुग्णालय येरवडा )<br>विषय : आत्महत्या आणि आत्महत्येची कारणे. |
| २१ डिसेंबर १९७६ | नियोजन चर्चा मंडळ : विद्यार्थ्यांचा परिसंवाद<br>विषय : अन्नसमस्या व धोरण |
| २२ डिसेंबर १९७६ | नियोजन चर्चा मंडळ—व्याख्यान वक्ते : प्रा. शरद कुलकर्णी<br>विषय : नियोजन व लोककल्याण<br>साहित्य व वाणिज्य संघटना—<br>शेठ वालचंद हिराचंद वक्तृत्व स्पर्धा |
| २३ डिसेंबर १९७६ | प्राध्यापक अभ्यास मंडळ<br>वक्ते : प्रा. शं. ना. नवलगुंदकर<br>विषय : : घटना दुरुस्तीच्या संदर्भात भारतीय राज्यघटनेचे स्वरूप<br>अध्यक्ष : डॉ. दि. का. गर्दे. |
| २५ डिसेंबर १९७६ | वाङ्मयीन समीक्षा शिबिर<br>( १ ) उद्‌घाटन—कवी अनिल<br>सकाळी ८-३० ते ११-३०<br>साहित्य विचार व सामाजिक संदर्भ<br>दुपारी ४·३० ते ७-३०<br>साहित्य आणि अन्य कला संबंध |
| २६ डिसेंबर १९७६ | वाङ्मयीन समीक्षा शिबिर<br>सकाळी ८.३० ते ११.३० }<br>दुपारी ४.३० ते ७·३० } मराठी समीक्षेचा सैद्धांतिकदृष्ट्या विचार |
| २७ डिसेंबर १९७६ | वाङ्मयीन समीक्षा शिबिर<br>सकाळी ८·३० ते ११·३०<br>प्राचीन मराठी वाङ्मयाची समीक्षा<br>दुपारी ४·३० ते ७·३०<br>वाङ्मयीन संशोधन आणि वाङ्मयीन समीक्षा |

| | |
|---|---|
| २८ डिसेंबर १९७६ | वाङ्मयीन समीक्षा शिबिर<br>सकाळी ८·३० ते ११·३० } कविता व तिचे आकलन<br>दुपारी ४·३० ते ७·३० } |
| २९ डिसेंबर १९७६ | वाङ्मयीन समीक्षा शिबिर<br>सकाळी ८·३० ते ११·३० : रससिद्धान्त<br>दुपारी ४·३० ते ७·३० : सौंदर्य शास्त्र आणि मराठी समीक्ष |
| ३० डिसेंबर १९७६ | वाङ्मयीन समीक्षा शिबिर<br>सकाळी ८·३० ते ११·३० : आधुनिक मराठी कादंबरी<br>दुपारी ४·३० ते ७·३० : शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवर कवितेचे आकलन. |
| ३१ डिसेंबर १९७६ | वाङ्ममीन समीक्षा शिबिर<br>सकाळी ८·३० ते ११·३०<br>( १ ) नाटकाची समीक्षा : संहिता व प्रयोग दृष्ट्या.<br>( २ ) म. सा. पत्रिका अंकाचे प्रकाशन हस्ते : प्राचार्य मो. भा. लिमये<br>( ३ ) समीक्षा शिबिराचा समारोप |
| ६ जानेवारी १९७७ | वाणिज्य संघटना—व्याख्यान वक्ते : श्री. सुरेश देशमुख ( ॲडव्होकेट )<br>विषय : ( १ ) Why criminals go unpunished.<br>( २ ) How women are protected by law In India |
| १९ जानेवारी १९७७ | प्राध्यापक अभ्यास मंडळ—व्याख्यान वक्ते : डॉ. राम काळे.<br>विषय : You and Your teeth.<br>अध्यक्ष : प्राचार्य मो. मा. लिमये. |
| २६ जानेवारी १९७७ | ( १ ) प्रजासत्ताक दिन ध्वजारोहण<br>( २ ) माजी विद्यार्थी मेळावा. |
| ९ फेब्रुवारी १९७७ | साहित्य संघटना : "Brain Trust" चा कार्यक्रम |
| ९ व १० फेब्रुवारी १९७७ | वाणिज्य संघटना—'फन फेअर'<br>बौद्धिक चाचणीचा कार्यक्रम |
| १८ फेब्रुवारी १९७७ | प्राध्यापक अभ्यास मंडळ-व्याख्यान<br>वक्ते : प्रा. सतीश बहादूर ( Film Institute )<br>विषय : Educational Implitions of the Cinema<br>अध्यक्ष : प्राचार्य मो. भा. लिमये. |
| २७ फेब्रुवारी १९७७ | नियोजन चर्चा मंडळ व साहित्य संघटना<br>थेऊर साखर कारखाना—औद्योगिक सहल. |

✣

# १९७७-७८ मधील प्रवेशासंबंधी महत्त्वाच्या सूचना

विद्यापीठाच्या नियमानुसार एस्. वाय्. आर्टस् व कॉमर्स च्या विद्यार्थ्यांना टी. वाय्. मध्ये प्रवेश घेण्यासाठी परीक्षेच्या निकालाची वाट पाहण्याची गरज नाही. अशा विद्यार्थ्यांना २५ मे पासून प्रवेश देण्यात येईल. जूनच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यातील इतर प्रवेशेच्छूंच्या गर्दीमुळे होणारा त्रास टाळण्यासाठी एस्.वाय्. च्या (आर्टस्, कॉमर्स) विद्यार्थ्यांनी टी. वाय्. ला मेच्या शेवटच्या आठवड्यात प्रवेश घ्यावेत.

या महाविद्यालयांतील इतर वर्गातील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या परीक्षांचे निकाल लागल्यानंतर दहा दिवसांपर्यंत अग्रहक्काने जागा राखून ठेवण्यात येतील. हे लक्षात घेऊन अशा विद्यार्थ्यांनी निकाल लागल्यावर लगेच प्रवेश घ्यावा.

शाळांचे ११ वीचे निकाल लागल्या दिवसापासून बारावीला प्रवेश देण्यात येतील.

अशा प्रकारच्या सर्वच प्रवेशासंबंधी वेळोवेळी सूचना-फलकावर सूचना लावण्यात येतील. विद्यार्थ्यांनी वेळोवेळी सूचना-फलकांचा सल्ला घेण्याची सवय लावून घ्यावी. त्यामुळे उभयतांचा त्रास वाचतो.

१२ वीचे उत्तीर्ण होणारे विद्यार्थी पुढच्या वर्षापासून ज्येष्ठ महाविद्यालयात ( Senior College ) प्रवेश करतील. त्यांना यापुढे सत्रपद्धत ( Semester System ) लागू आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांनी निवडीसंबंधाने व अभ्यासक्रमासंबंधाने फार जागरूक राहाणे अवश्य आहे. त्यांनी निःसंकोचपणे आपापल्या विषयातील प्राध्यापकांशी विचारविनिमय केला पाहिजे.

प्रवेश-अर्ज व माहितीपत्रकासाठी बाहेरगावच्यांनी दि. २० मे नंतर रु. २ ची मनिऑर्डर पाठवावी. त्यांना पोष्टाने प्रवेश अर्ज व माहितीपत्रक पाठविले जाईल. स्थानिक व्यक्तींना हे साहित्य महाविद्यालयाच्या वेळेत योग्य शुल्क भरून मिळेल.

या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लवकर प्रवेश घेण्यामध्ये काही आर्थिक अडचणी असतील तर प्राचार्यांच्या निदर्शनास त्या आणाव्या. त्यांचा सहानुभूतीने विचार करण्यात येईल.

PROGRESSIVE EDUCATION SOCIETY, POONA-5

## INSTITUTIONS

| | |
|---|---|
| Modern High School, Poona 5 | ( Estd. 1934 ) |
| Modern High School, Poona 8 | ( ,, 1967 ) |
| Prathamic Vidya Mandir | ( ,, 1936 ) |
| Sir Sassoon David Hostel ( For Boys ) | ( ,, 1940 ) |
| Girls High School | ( ,, 1946 ) |
| Shishu Vidya Mandir | ( ,, 1968 ) |
| Girls Hostel, Poona 5 | ( ,, 1968 ) |
| Modern College of Arts, Science & Commerce | ( ,, 1970 ) |
| N. C. L. Kindergarten and Primary English Medium School, Poona 8 | ( ,, 1976 ) |

---

The Progressive Education Society's Institutions are absolutely non-sectarian in character and offer special facilities to poor, deserving pupils of all classes witout distinction of caste and creed.